# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. ०८/०६/२००७

आज दि. ०८/०६/२००७ रोजी दि. ०१/०६/२००७ रोजीची मिरा भाईंदर महानगरपालिकेची तहकूब झालेली महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. २२/०५/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ७) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ९) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १०) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १२) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १३) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १४) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १५) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १६) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १७) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १८) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १९) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २०) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २१) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २२) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| २३) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २४) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २५) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २६) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २७) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २८) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २९) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३०) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३१) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ३२) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३३) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३४) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३५) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| ३६) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ३७) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ३८) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ३९) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४१) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ४२) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४३) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ४४) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ४५) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ४६) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ४७) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ४८) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ४९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५०) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५१) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ५२) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ५३) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ५४) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५५) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ५६) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ५७) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ५८) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ५९) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ६०) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ६१) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ६२) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ६३) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| २) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ३) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ४) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ५) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ६) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ७) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ८) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ९) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| १०) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ११) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| १२) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| १३) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| १४) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| १५) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| १६) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| १७) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| १८) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १९) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| २०) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज दिलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |

(राष्ट्रीयगीत वंदे मातरम् नंतर महासभेला सुरुवात झाली.)

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

(नगरसचिवांनी परिपत्रकाचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३८ चे वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

मा. कमिशनर साहब, मा. महापौर मॅडम, हमारे मा. उपमहापौर साहब, मेरा खास कर के विनंती है की, आजकल शहर मे डेंग्यु ,मलेरिया,के कम से कम बीस - पच्चीस पेशंट हो गए है। और उस विषय मे मैने मिटींग के लिए अनेक बार प्रोसिजर तैयार किया है। और सब विषय भी लिया था। मा. नगरसचिव साहब को भी बताया है और सब विषय भी लिया था। मा. नगरसचिव साहब को भी बताया था लेकिन हमारे पी.ए. जो श्री. शिंदे है उन्होने बताया की, श्री. कांबळे साहब मुझे मना करते है। हमारी जो ऑपरेटर मॅडम है, वह भी बोलने को तैयार है की, वह बोला कांबळे साहब मिटींग लेने से मना करते है। इसका मतलब क्या है दुसरी बात यह है की, आज भी हमारा पी.ए. पिकर आया था। मैने मा. श्री. खतगांवकर साहब को दो महिने पहले बताया की, इसका ट्रान्सफर किजीए उन्होने ओदश भी किया था। लेकिन अभी भी उसका ट्रानस्फर नही हुआ आज अभी मै श्री. कांबळे साहब उसका ट्रान्सफर नही हुआ। आज अभी मै श्री. कांबळे साहब को बोला की उसका इमिजिटली डॉक्टरी किजिए। डॉक्टरी करने के बाद मै निचे बैठने वाल हु क्योंकी यह पिकर आने के बाद सभापती का अपमान करता है। यह महापालिकामे क्या चल रहा है पता नही चलता।

**परशुराम पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतो. मा. आयुक्त साहेब, एखाद्या वेळेला आपला पी.ए. जर असा वागला तर आपण त्याला काय पर्याय काय रस्ता दाखवाल? आणि श्री. कांबळे साहेब तुम्हाला याच्यामध्ये काय अडचण येते. आज सभापती असतांना त्यांचे ऐकत नाही. त्यांना उलट उत्तर देतात.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर महोदया, ही अतिशय गंभीर बाब आहे. आणि जर पी.ए. असे करत असतील तर त्यांना सस्पेंड करण्याची मागणी मी करतो. अशा पी.ए.ला ताबडतोब सस्पेंड करण्याची मागणी मी करतो. अशा पी.ए.ला ताबडतोब सस्पेंड करा.

**परशुराम पाटील :-**

साहेब, मी तुम्हाला एक उदाहरण देतो. १९८१ साली मी सरपंच असतांना एका पी.ए. ने असेच मला उलट बोललेले. तो उलट बोलल्यानंतर त्याला मी काय सजा दिली हे सभागृहाला माहिति पडेलच. कारण त्या वेळेला सभा असतांना मी सांगितलेले की, आपल्या घरातील विषय बाहेर जाता कामा नये. तेव्हा ते मला असे म्हणाले की, असे किती सरपंच आले, येवुन गेले, आम्ही काय करणार? एकाच ठरावामध्ये त्याची डिसक्वॉलिफाइड ची ऑर्डर काढली आणि नंतर त्याला आठवण आली की, मी कुठेतरी चुकलो श्री. काबंळे, आता सभापती असतांना तुम्ही त्यांना उलट बोलतात. त्याला ट्रान्सफर करण्यासाठी त्यांनी किती वेळा तुमच्याकडे तक्रार केली? त्याची बदली का केलेली नाही? त्यांच्याकडुन तुम्हाला काही फायदा आहे का?

**चंद्रकांत मोदी :-**

उसको श्री. कांबळे साहब के ऑफिस मे बुलाया।

**परशुराम पाटील :-**

एखाद्या सभापतीचा अपमान जर झाला किंवा एखाद्या अधिकाऱ्याचा जर अपमान झाला तर तुम्ही काय करणार?

**एस.ए.खान :-**

मा. महापौर महोदया, ही अतिशय गंभीर बाब आहे. आम्ही सस्पेन्डची मागणी करतो. तुमचे रुलिंग काय असेल ते आपण आम्हाला सांगावे.

**परशुराम पाटील :-**

त्याला शोकॉज नोटीस काढा.

**चंद्रकांत मोदी :-**

श्री. कांबळे साहब, को सस्पेंन्ड करने के लिए मै मा. आरोग्य मंत्री को लेटर आजही टाईप कर रहा हु क्योकी अनेक बार मेरा अपमान करके उन्होने मिटींगं कॅन्सल किया है।

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलु इच्छिते, मॅडम गेल्या वेळेला आपली जी एक तारखेची मिटींग झाली. त्याच्यामध्ये श्री. कांबळे साहेबांनी ६० टक्के साफसफाई झाल्याचे आपल्या निदर्शनास आणुन दिले होते. इकडे सगळ्यांच्या समक्ष त्यांनी सांगितले होते. जागेवर प्रत्येक्ष पाहणी केली असता ६ टक्के सुध्दा झालेले नव्हते. तसे पत्र मी मा. आयुक्त साहेबांकडे दिलेले आहे. अशा अकार्यक्षम अधिकाऱ्याला आणि जो चुकीची माहिती देतो त्याला या पदावर राहण्याचे कारण नाही. आज मा. आरोग्य समिती सभापती जर पब्लीकच्या हितासाठी मिटींग घेण्याची इच्छा व्यक्त करतात तर त्यांना मिटींग घेवु नये असे हे करणारे हे कोण आहेत?

**चंद्रकांत मोदी :-**

आजकल आरोग्य मे जो कात हुआ है। आजतक मुझे कुछ मालुम नही क्या काम होता है। कैसे होता है हमारी मिंटीग मे कोई काम करने का एक विषय भी नही आया।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य तसेच आरोग्य समिती सभापती श्री. चंद्रकांत मोदी ह्यांनी सभागृहाच्या निदर्शनास ही बाब आणुन दिलेली आहे. त्यांचा जो कोणी पी.ए. असेल, त्याला त्वरीत घरी बसवावे त्याला कामकाजातुन सस्पेंड करण्यांत यावे अशाप्रकारचे आदेश मी प्रशासनाला देते. त्याला आजपासुनच घरी बसविण्याची सुचना मी देत आहे.

**चंद्राकंत मोदी :-**

लेकिन मॅडम, उसका अभी इमिजिएटली डॉक्टरी करिए।

**परशुराम पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतो. या विषयी आपण निर्णय घेतला त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. आपण असा निर्णय कायमस्वरुपी ठेवावा. आणि प्रशासनाला कोणा कोणाला काम न करावेसे वाटेल अशी मी आपणाकडे विनंती करत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, पहले माले पर कम से कम साठ आदमी जमा हो गए। इतना हंगामा यह आदमी करता है।

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, आरोग्य अधिकाऱ्याचे आपण काय करता? जो आरोग्य अधिकारी सभा घेत नहाी त्याची सभा घ्यायची इच्छाच नाही. मॅडम, आरोग्य अधिकाऱ्याला काय शिक्षा आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. सभापतींनी हे निर्णय घ्यायचे असतात. आणि पी.ए ना सांगुन ती मिटींग लावायची असते. श्री. काबंळे हे अधिकारी आहेत. ते सभापतींना सांगणार नाही की, तुम्ही मिटींग घ्या. हे चुकीचे आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, यांच्यावर कोणी सक्षम अधिकारी नाहीत. हे शेफारले गेले आहेत. जोपर्यंत आपण डॉक्टर नेमत नाहीत तोपर्यंत श्री. अजित पाटील यांची नेमणुक करण्यात यावी. ते सक्षम आहेत. त्यांनी गेल्या वेळेलासुध्दा आरोग्य विभाग चांगल्याप्रकारे साभांळलेला आहे.

**चंद्राकांत मोदी :-**

मॅडम, आरोग्य मे पोलिओ डोस रहता है तभी ग्यारह बुथ बांधते है। पंधरा - बीस बुथ भुल जाते है। लिस्ट मे देते नही। मैने कॉन्ट्रॅक्टर से लिखीत मे लिया है की, अधिकारी ने हमको लिस्ट दिया नही।

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. मोदी साहेब, आता तुमचा निर्णय मा. महापौर साहेबांनी घेतलेला आहे. त्याचे अभिनंदन केलेले आहे. आतापुढच्या विषयाला चालु द्यावे.

**चंद्रकांत मोदी :-**

श्री. कांबळे साहेब ने पी.ए को बोला की, मिंटीग नही लेना का। इसका मतलब क्या है? अधिकारी ने जो चार बार मिटींग कॅन्सल किया वह भी हमारा अपमान है ना?

**रिटा शहा :-**

सभागृहामध्ये ज्या अधिकाऱ्याबद्दल वादावाद चाललेला आहे. तर मला असे वाटते की,ते अधिकारी इथे बसलेले आहेत. तर त्यांनीच स्वतःची बाजु मांडावी.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, एक तारिख की, मा. महासभा मे सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गाडोदिया इन्होने लक्षवेधी सुचना प्रस्तुत की थी। उसमे आपको डेंग्यु के बारे मे बताया गया था। उस समय पाच रुग्ण उनको बाद मे आरोग्य अधिकारी या लोकल अधिकारी इन्होने शहर के बाद मे अधिकारी इन्होने शहर के लिए क्या क्या किया? होर्डीग वगैरे लगाऐ हुए है। ऐसा स्वास्थ अधिकारी को बोलकर निवेदन कराए। क्योकि शहर मे एक भय का वातावरण फैला हुआ है। अभी हम देख रहे है की, मा. महासभा मे आरोग्य के सभापती है। उनको कुछ चलता नही है। जब आरोग्य समिती सभापती का नही चल रहा है। तोहम तो यहाँ बैठने के लिए शरम आती है। ऐसा कौन अधिकारी है जो आरोग्य समिती सभापती की सुनता नही। या आरोग्य समिती सभापती के विरुध्द कोई दुसरा षडयंत्र रच रहा है। उसका नाम आप उजागर करिए। की, यह आरोग्य अधिकारी को किसी दुसरे ने बोला है की, इनका मत सुनिए।

**राजकुमार कांबळे :-**

मा. महापौर परवानगीने बोलतो. गेल्या पंधरा वीस दिवसापुर्वी एक सभा आयोजित केली होती. आणि आपल्या नालेसफाईचे काम सुरु होते. त्या कामाचा आढावा घेण्यासाठी सभा होती. त्योवेळेला मी सन्मा. श्री. चंद्रकांत मोदी साहेबांना रात्री सांगितले की, मा. आयुक्त साहेबांनी उद्या आम्हाला एका ठिकाणी जायला

सांगितले आहे. श्री. खतगांवकर साहेब ती मिंटीग घेणार होते. पण त्यावेळेला कोरम अभावी ती सभा तहकुब झाली दुसरी जी मिटींगसाठी सांगितले तर श्री. शिंद म्हणुन जो क्लार्क आहे तो माझ्याकडे आला तेव्हा मी, साईडवर चाललो होतो. तो मला बोलला की साहेब विषय काय घ्यायचे आहेत?

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, दो बार आपके पी.ए ने कॅन्सल किया है।

**राजकुमार कांबळे :-**

मेरा पी.ए नही है।

**चंद्रकांत मोदी :-**

दो बार श्री. महेश ने कॅन्सल किया है मेर पास लिखा हुआ है।

**राजकुमार कांबळे :-**

त्यानंतर मी साईडवर गेलो. म्हटले दोन दिवसानंतर आपण सभा लावु या तो पर्यंत साफ सफाईचे काम एवढे होते की, मी सकाळी आठ वाजल्यापासुन रात्री नऊ वाजेपर्यंत बाहेर असायचे त्यावेळेला मला ते विषय घेऊन गोषवारे देणे जमले नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, आप सभागृह को ऐसे गुमराह मत किजिए आपने मुझे बोला था की, मै श्री. खतगांवकर के साथ जानेवाला हु। श्री. खतगांवकर खुद आरोग्य समिती के मिटींग मे आये थे।

**राजकुमार कांबळे :-**

श्री. खतगांवकर साहब मिटींग अटेंड करनेवाले थे। मै बाहर जा रहा हु ऐसे आपको बताया था।

**चंद्रकात मोदी :-**

आपने डेप्युटी कमिशनर का बात बताया था।

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, आता ह्यांनी सांगितले की, साफसफाई करण्यामध्ये हे एवढे बिझी होते. पण अजुनपर्यंत एक ही नाला साफ झालेला नाही. ज्या दिवशी आम्ही पाहणी करायला गेलो होतो. तेव्हा तुम्ही आले असतात. तर बघितले असते की, तिकडची परिस्थिती किती वाईट होती.

**चंद्रकांत मोदी :-**

कभी बताते है की, मा. कमिशनर के साथ मिटींग मे हु। कभी बोलते है की, मा. महापौर के साथ मिटींग मे हु।

**मुक्ता रांजणकर :-**

एखादे आरोग्य समितीचे सभापती मिटींग घेण्याचे बोलतात त्या वेळेला हे टाळाटाळ करतात. त्यांना काय अधिकार आहे आणि अशा अधिकाऱ्याला आपण काही शिक्षा न देता.त्याला आपण सोडुन देतो.

**चंद्रकांत मोदी :-**

मॅडम, यह भी ठिक है। पोलिओ डोस के दिन मै नगरसेवक नही था तब से बुथ बांधते है। एक श्री. शिंदे साहब को फोन करता है तो बोलते है की, मै छुट्टी पर हु। श्री. पडवळ साहेब को फोन किया तो बोलते है की, मेरे हाथ मे नही है। एक दुसरे के सिर पर ढकेलकर काम चलता है। और श्री. कांबळे साहब को बोला तो बोलते है की, मै मा. महापौर के साथ मिटींग मे हु। कमिशनर साहब के साथ हु। कोई कमिशनर साहब के ऑफिस मे जाता है तो वहॉ श्री. कांबळे साहब नही होते मतलब यह बहाना बनाते है।

**मुक्ता रांजणकर :-**

अशा अधिकाऱ्यांना आपण पदोन्नती देतो. त्यांचे पगार वाढवतो.

**चंद्रकांत मोदी :-**

मिटींग के दिन भी बोलते है की, मै कमिशनर साहब के साथ मिटींग मे हु।

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, अशा अकार्यक्षम अधिकाऱ्याच्या प्रमोशनचा नव्हे तर डिमोशनचा मी ठराव मांडतो.

**मिलन पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतो. मॅडम, त्या दिवशी एवढी चर्चा झाली मा. आयुक्त साहेब, मी संबध त्या डेग्युबद्दल ज्या मुलाला झाला होता त्याचे नाव व पत्ता दिला. परंतु आपले सक्षम अधिकाऱ्यापैकी एकानेसुध्दा जाउन त्याची चौकशी केली नाही. आज आठ दिवस व्हायला आले. आपल्या मागच्या मिटींगला मी एवढा बोललो होतो. बेंबीपासुन बोंब मारुन त्याचे काही नाही. तर आता जसे सस्पेंड केले तसे त्या अधिकाऱ्याला संस्पेंड करा. ह्या अधिकाऱ्यानेसुध्दा अजुनपर्यंत विचारले नाही. त्यांना मी ॲड्रेस दिला होता. त्या ॲड्रेसवर गेले होते का? हे त्यांना विचारा म्हणजे हे काय चालले आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

श्री. पडवळ के अंडर जो डॉक्टर है उसके साथ बैठकर मैने टायमिंग के साथ फोटो निकाला है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य यांनी गेल्या वेळेस मिटींगमध्ये डेंग्युच्या पेशंटची नांवे सांगितली होती. तर संबधित अधिकारी यांनी त्यानंतर काय कार्यवाही केली याबाबत त्यांनी सविस्तर खुलासा करावा.

**धनराज अग्रवाल :-**

मा.महापौर मॅडम, मी विचारलेला प्रश्न आहे. एक तारीख नंतर या लोकांनी डेंग्युची रोगधाम करण्यासाठी काय कार्यवाही केली याचे पुर्ण विवरण आम्हाला द्या.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सन्मा. महापौर यांनी निर्देश दिल्याप्रमाणे ...

**मिलन पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, माझे अजुन पुर्ण झालेले नाही मॅडम, हे आरोग्य अधिकारी श्री. कांबळे यांनी मी काल सकाळी फोन केला. त्यांचा फोन सात सोडेसातला सुध्दा बंद होता. तर तुम्ही आदेश द्या की, हे जेवढे आरोग्य अधिकारी आहेत. त्या सर्वांचे फोन चालु राहिले पाहिजेत. दुसरी गोष्ट भाईंदर सेकंडरी पासुन ते स्टेडीअमपर्यंत संध्याकाळी तिकडे मच्छिमार्केट बसते. इतकी दुर्गंधी असते. आता त्याच्यामध्ये डेंग्युचे डास आपल्याला ओळखता येत नाहीत. परंतु, एवढे डास आणि अळ्या नाचत होत्या. मी ताबडतोब ह्यांना फोन करुन सांगितले की, हा परिसर तरी करा. आता शाळा सुरु होण्याची वेळ आहे. तिकडे मुले असतात. लोक भाज्या घेवुन संध्याकाळी इकडे बसतात. तिथला परिसर थोडा थातुर - मातुर साफ केला आजसुध्दा तिकडे वास येतो. तिकडे अजुन फवारणी झाली. नाही. तिकडे डेंग्यु पसरेल नाहीतर काय होईल?

**लिला पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, मा. महापौर मॅडम, माझ्या प्रभागामध्ये रामेश्वर अपार्टमेंटमध्ये पण एक डेंग्युचा पेशंट आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सभागृहामध्ये मागील कालावधीमध्ये डेग्यु सदृश्य रोगाची लागण झाली. त्याबाबतच्या सन्मा. सदस्यांच्या मागच्या सभेमध्येसुध्दा तक्रारी होत्या. आजच्या सभेमध्येसुध्दा सन्मा. आरोग्य सभापती इतर सन्मा. सदस्य, सदस्या यांनी याबाबत मुद्दे उपस्थित केलेले आहेत व या अनुषंगाने प्रशासनाकडुन जी कार्यवाही करण्यांत आलेली आहे. त्याचा खुलासा मी या ठिकाणी करत आहे. साधारणः मिरा भाईंदर शहरातील नवघर विभागातील सरस्वती नगर या भागामध्ये विशेषतः डेंग्यु सदृश्य रोगाची लागण झाली होती ही वस्तुस्थिती आहे. सदर रोगाची लागण १५ एप्रिलपासुन सुरु झालेली होती. या महिन्याच्या दोन तारखेपर्यंत साधारणः पंचवीस नागरिकांना डेंग्यु सदृश्य रोगाची लागण झाली होती. या अनुषंगाने प्रशासनाने तातडीने दक्षता घेवुन व मागील सभेमध्ये सन्मा. सदस्यांनी चर्चा घडवुन सुचना दिल्याप्रमाणे सर्व सुचनांचा विचार करुन तात्काळ पुर्ण शहरामध्ये डेंग्यु हा एडिज इजिप्ती या डासापासुन स्वच्छ पाण्यामध्ये ते पाणी दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी साठुन राहिल्यास त्यावर अंडी टाकुन त्याची वाढ होते आणि तो डास जर चावला तर हा रोग होतो. या अनुषंगाने उद्धबोधक असे तीस डिजीटल बोर्ड प्रशासनाकडुन पुर्ण शहरामध्ये लावण्यात आलेले आहेत. तसेच मागील सभेमध्ये निर्देश दिल्याप्रमाणे मुख्यतः लागण झालेल्या भागामध्ये आणि शहरामध्ये याबाबत नागरिकांना मार्गदर्शन होण्यासाठी व त्यांच्याकडे साठवण असलेले पाणी काढुन टाकण्यासाठी व आपल्या घरामध्ये त्यांनी कोरडा दिवस पाळण्यासाठी विशेषतः वीस हजार मराठीमध्ये, पाच हजार हिंदीमध्ये, पाच हजार गुजराती मध्ये तयार करुन त्या भागामध्ये एस.आय.च्या माध्यमातुन वाटलेले आहेत. तसेच शहरामध्ये एकुण नऊ रिक्षा हायर करुन मायकिंग द्वारे नागरिकांना याबाबत घ्यावयाच्या दक्षतेसाठी सुचना दिलेल्या आहेत. तसेच शहरामधील केबलधारकांच्या माध्यमातुनसुध्दा या अनुषंगाने सुचना देण्यात आलेल्या आहेत. मुखत्वे ज्या भागामध्ये या रोगाची लागण होत होती. आपल्या आरोग्य केंद्रातील कार्यरत सर्व डॉक्टर्सच्या टिमच्या माध्यमातुन साधारणतः आठशे दहा पाण्याचे साठुन असलेले कंटेनर तपासणी केलेली आहे. आणि त्या भागातील सर्व घरांना तपासणी केलेली आहे. आणि संभाव्य आजाराच्या ठिकाणी त्याचे स्वताःचे रक्ताचे नमुने घेतलेले आहेत. आणि त्या लोकांना मार्गदर्शन केलेले आहे. पुर्ण टिमने नवघर भागामध्ये आजपर्यंत पाहणी करत आहेत. लोकांना विश्वासात घेवुन या रोगची माहिती देत आहेत. मी आपल्याला वस्तुस्थितीची माहिती देवु इच्छितो की, मागच्या दोन तारखेनंतर फक्त तीन तारखेला एक संभाव्य रुग्ण आढळलेला आहे. त्यानंतर एकाही दवाखान्यामध्ये शहरात कोणत्याही ठिकाणी रुग्णाची भरती झालेली नाही. मा. आयुक्तांच्या मान्यतेने शहरातील खाजगी आणि आपल्या सर्व डॉक्टर्सना आम्ही लेखी सुचना दिलेल्या आहेत की, संभाव्य डेंग्यु रुग्णाचा आपल्या दवाखान्यात समावेश झाल्यास तात्काळ आपल्या महापालिकेकडे नाव व पत्ता कळवावेत. त्या भागामध्ये सविस्तर फवारणी करण्यात आलेली आहे. त्या भागामध्ये विशेष स्वच्छता करण्याची कार्यवाही चालु आहे. मुख्यत्वे शहरामध्ये नाल्याची साफसफाई चालु असल्यामुळे पावसाळ्यापुर्वी ही कार्यवाही पुर्णपणे आटोक्यात आल्यानंतर पुर्ण शहरामध्ये विशेष साफसफाईची मोहिम राबवुन अशी कुठलीही संभाव्य डेंग्यु परिस्थिती शहरामध्ये कदापी निर्माण होउ दिली जाणार नाही. सन्मा. सभापती महोदयांनी या ठिकाणी त्यांच्या पी.ए. बद्दल जे आक्षेप नोंदवलेले आहेत. मा. महापौरांनी निर्देश

दिल्याप्रमाणे मी सभागृहाला आश्वासीत करु इच्छितो की, सदर कर्मचाऱ्याचे गैरवर्तन या सभागृहाने मान्य केल्यामुळे त्याला आजच निलंबीत करुन त्याची चौकशी करुन पुढील कार्यवाही निश्चित केली जाईल.

**मिलन पाटील :-**

साहेब, माझ्या प्रश्नाचे काय? मा. उपायुक्त साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर काय दिले? माझ्या प्रश्नाचे उत्तर तुम्ही दिलेले नाही. मी ज्या रुग्णाची माहिती सांगितली त्याच्याबद्दल तुम्ही काय माहिती दिली?

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आता मा. उपायुक्त (मुख्यालय) श्री. बालाजी खतगावकर साहेब बोलले की, आपल्याकडे डेंग्युबद्दल एकाच पेशंटची नोंद झालेलली आहे. मॅडम, आजच मी आपल्याकडे दोन फाईल सुपुर्द केलेल्या आहेत आणि त्या पेपरसह आणि डेंग्युचे पुरावे आहेत अशा फाईल मी तुमच्याकउे आज सबमिट केलेल्या आहेत. त्या पेशंटना मदतीसाठी मी आपल्याकडे फाईल सुपुर्द केलेल्या आहेत आणि मी मा. कमिशनर साहेबांशी गोष्टी केलेल्या आहेत. तेव्हा डेंग्युची एक नाहीत अजुनही प्रकरण चालु आहेत. आणि शहरामध्ये मलेरियाची साथ चालु आहे. आपल्याला आरोग्य खात्याकडुन अजुन देखील चांगल्या प्रकारची साफसफाई आणि औषध फवारणी करणे गरजेचे आहे. कृपया आपण या गोष्टीकडे थोडे लक्ष द्या आणि पावसाळ्यापुर्वी जर साफसफाई झाली संपुर्ण केरकचरा जर आपण उचलला, फवारणी बरोबर केली तर मलेरिया आणि डेंग्यु हा जो रोग आहे तो आटोक्यामध्ये येईल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी डेंग्युच्या पेंशटचे अर्ज दाखल केलेले आहेत. त्या सर्व डेंग्यु पेशंटला आपतकालीन महापौर फंडातुन मदत उपलब्ध करुन देण्यांत येईल.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. उपायुक्त (मुख्यालय) श्री. बालाजी खतगांवकर साहबने जो बोला की, डेंग्युका एकही पेशंट है। वह गलत है मैने भी आपके पास दो फाईल भेजा है। एक श्री. शर्माजी है वह मर भी गया।उनका एक फाईल है। और एक हॉस्पिटल मे ॲडमिट है, उनका एक फाईल है। आजकल मिराभाईंदर शहर मे चुहो की संख्या बहोत बढ गई है। हर जगह बडे बडे चुहे है। बारीश मे डर हे की, इन चुहो की, वजह से सुरत के जैसी प्लेग की बिमारी मिरा भाईंदर शहर मे ना फैले। इसलिए पहले से इसका प्रिकॉशन लेना बहोत जरुरी है। मै आरोग्य डिपार्टमेंट से विनंती करता हु मा. कमिश्नर साहब से विनंती करता हु की, इसके बारे मे जल्द से जल्द दवाईओ का छिडकाव करे। जिससे यह जो चुहो की संख्या बढ रही है वह कम हो जाए। आरोग्य डिपार्टमेंट के बारे मे हमने स्टँडींग मे चर्चा की थी। उसके बारे मे मै पुछना चाहुंगा की, उसके बारे मे अंमलबजावणी हुआ की नही? क्योंकी हमने कहा था की, श्री. राजकुमार कांबळे इन से कुछ काम होता नही है। हर समय हम लोग उनके बारे मे चर्चा करत है। लेकिन काम होता नही। तो उनको जगह पर कोई ऐसा अधिकारी नियुक्त किजिए जो यह काम कर सके जैसे आपने श्री. अजित पाटील को आरोग्य का काम दिया था की, श्री. अजित पाटील आरोग्य डिपार्टमेंटका काम करेंगे तो आरोग्य विभाग का इंन्चार्ज श्री. अजित पाटील इनको क्यों ना बनाया जाए। क्योंकी जिस वॉर्ड मे उनको डालते है। जिस कॉटेगिरी मे डालते है वहाँ सुटेबल होते है काम करते है। तो आरोग्य डिपार्टमेंट मिरा भाईंदर शहर के लिए जरुरतमंद डिपार्टमेंट है। तो इसलिए मै चाहता हुँ की श्री. अजित पाटील जैसे सक्षम अधिकारी को आरोग्य डिपार्टमेंट मे लिया जाए।

**एस.ए.खान :-**

मेरा इसमे अनुमोदन है।

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, सक्षम अधिकारी आपण घेणार हे ठिक आहे. आज त्या पी.ए.ची चुक समोर आली म्हणुन पी.ए. ला आपण संस्पेड केले. यांची चुक वारंवार प्रत्येक सभेमध्ये ८० नगरसेवकांनी चुका लक्षात आणुन दिलेल्या आहेत. यांच्यावर आपण काय दखल घेणार आहात? यांची प्रमोशनची ऑर्डर आपण काढलेली आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम या सभागृहाने वारंवार श्री. अजित पाटील यांच्याबद्दल सदस्य एवढे भावनिक होतात. जर या महापालिकेत श्री. अजित पाटील हा एकच अधिकारी सक्षम असेल त सगळीच्या सगळी खाती श्री. अजित पाटील यांच्याकडे वर्ग करा. इथे बसलेले बाकीचे अधिकारी अकार्यक्षम आहेत. असा या सभागृहाचा कल आहे का? नेहमी श्री. अजित पाटील कसलाही विषय असला आरोग्याचा असो, बांधकामाचा असो, झोपडपट्टीचा असो, सुवर्ण जयंतीचा असो. कोणतीही विषय असो. श्री. अजित पाटील यांच्या शिवाय गाडा पुढे हलतच नाही. याचा अर्थ बाकीचे जेवढे अधिकारी आहेत तेवढे अकार्यक्षम आहेत का? जर ते अकार्यक्षम असतील तर जसे श्री. अजित पाटील चांगले काम करतात. त्या प्रमाणे त्यांनीही चांगले काम करावे असे त्यांना अवगत करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आज या सभागृहामध्ये जी चर्चा चालु आहे. दोन विषय आहेत. एक आरोग्य एक विभागाची चाललेली साफसफाई ठेका पध्दती आणि एका बाजुला शहरामध्ये डेंग्यु पसरलेला आहे. आताच श्री. खतगांवकर साहेबांनी जे सांगितले की, तीस हजार हॅन्डबिल छापलेले आहेत. त्यामध्ये आपण जी संख्या

सांगितली यासभागृहातील कोणाच्या लक्षात आलेली नाही. वीस हजार हॅन्डबील आपण मराठीचे छापले. पाच हजार हिंदी आणि पाच हजार गुजराती म्हणजे हा अधिकारी वर्ग अकार्यक्षम कसा आहे हे यावरुन दिसते. शहरामध्ये पन्नास टक्के गुजराती भाषिक आणि हिंदी भाषिक आहेत. आणि या शहराची लोकसंख्या साडेसात लाख आहे. त्या ठिकाणी फक्त पाच हजार हिंदी भाषिक आणि पाच हजार गुजराती भाषिकचे हॅन्डबिल छापतात. म्हणजे या शहराचा डेंग्यु कुठे थांबणार आहे. लोकांना मराठी येत नाही. चिकनगुणिया किंवा डेंग्यु याचा प्रकार समजत नाही. आपण कार्यवाही केली. भाईंदर मध्ये कटआउट लागलेले आहेत. त्या कटआउटमध्ये सर्व ठिकाणी मराठीमध्ये उल्लेख केलेला आहे. मी मराठीच्या विरोधात नाही. पण शेवटी या शहराची लोकसंख्या.......

**लिओ कोलासो :-**

मा.महापौर साहेब, हे बोलतात की, मी मराठीच्या विरोधात नाही. पण ते इनडायरेक्टली मराठीला विरोधच करत आहेत. या शहरातील गुजराती ,हिंदी भाषिकांना चांगल्या प्रकारे मराठी बोलता येते, वाचता येते, सांगता येते, हे स्वतः मराठीच बोलतात. आणि हे सांगतात की, इथल्या शहरातील लोकांना मराठी समजत नाही. हा मराठी लोकांवर अन्याय आहे. हे मराठी अस्मितेला सार्थ करणारे नाही.

**रतन पाटील :-**

महाराष्ट्रात राहायचे असेल तर मराठी शिकायलाच पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

मा.महापौर साहेबा, मी आपले लक्ष वेधु इच्छितो. मागे आपली आम सभा जी होती. ती वेळेमुळे बंद झाली आणि जेव्हा दुसऱ्या दिवशी किंवा ठरलेल्या वेळी ती मा. महासभा सुरु होते त्यावेळी त्या सभेचे कामकाज जिथे थांबले होते तिथुन ते सुरु व्हायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण सर्वांनी दोन मिनिटे बसुन घ्या. आपल्या सर्व सन्मा. सदस्यांच्या सुचना लक्षात आलेल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी फक्त दोन मिनिट घेतो.

**मिलन पाटील :-**

मॅडम, माझ्या प्रश्नाचे उत्तर अजुन दिलेले नाही. त्यांनी सर्वांची नावें घेतली माझेच एकट्याचे राहिले आहे. मी ॲडरेस देउन सुध्दा त्यांनी त्या मुलाचे नाव घेतले नाही. त्यांनी सांगावे की, ते जाणार की नाही?

**डॉ. पडवळ :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो मा. सदस्यांनी ज्या केसबद्दल माहिती दिली होती. ती ॲक्चुअली जुनी केस होती. ती साधारण एप्रिलच्या सुरुवातीची केस होती त्या वेळेस डॉ. राठोड होते.

**मिलन पाटील :-**

डेंग्यु होता की  नाही?

**डॉ. पडवळ :-**

तो संशयीत डेंग्यु होता. त्यावेळेस त्याबद्दल सर्व्हे पुर्ण करून घेतलेला होता.

**मिलन पाटील :-**

मग त्या बुकामध्ये  त्या माणसाची नोंद का नाही?

**डॉ. पडवळ :-**

संबधित आरोग्य केंद्रातुन आपण त्यांची माहिती मागवुन नोंद करुन घेवु.

**मिलन पाटील :-**

तुम्ही त्याची नोंद करा.

**मा. आयुक्त :-**

त्याची सर्वांत नोंद घेण्यात येईल.

**चंद्रकांत मोदी :-**

मॅडम, मेरा प्रश्न है। बाकी दुसरी बाते चलती है। मुझे जवाब दिजिए।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम मा. आयुक्त साहेब, जर या श्री. कांबळेंच्या बाबतीत सर्वांची तक्रार असेल त्यांचे ओव्हर बर्डन होते. आणि आता पावसाळा येतो. श्री. शिंदे सारखीसुध्दा कार्यक्षम माणसे आहेत. तर तुम्ही त्यांना विभाग वाटुन द्या. आज वर्ष झाले आपण त्यांना नुसतेच ठेवलेले आहे. त्यांना विभाग वाटुन द्या. यांच्यावर संबध बोझा होतो. मिरा रोड, भाईंदर ईस्ट, भाईंदर वेस्टचा बोझा होतो. त्यांना कामे वाटुन द्या. दोघांना दोन साईड देउन टाका. बघा कार्य होतात की नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आताच सभागृहामध्ये आमचे मा. सभागृह नेते यांनी सांगितले की, बाकीचे अधिकारी अकार्यक्षम आहेत. आपण ज्यावेळेला अतिक्रमण विभाग श्री. अजित पाटील यांना दिले होते. त्यावेळी

यासभागृहाने त्यांचे कौतुक केले होते. आणि एक गोष्ट यासभागृहातील सर्वांना माहिती आहे. की श्री. अजित पाटील का सक्सेस होतात? कारण त्यांचा जन्म या भाईंदर मध्ये झालेला आहे. त्यांना गल्लोगल्ली माहिती आहे. कुठे काय चाललेले आहे आणि कुठे काय करायला पाहिजे हे त्यांना माहिती आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, बाकी के अधिकारीयों को मिरा भाईंदर से कुछ लेना देना नही है। यही आपके कहने का मतलब है क्या? जो रिस्पॉन्सीबल ऑफीसर यहा बैठे है। उनका मिरा भाईंदर से कोई वास्ता नही है क्या?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, डॉक्टर आले. आज त्यांच्याकडे या महापालिकेचे ऐंशी लाख रुपये बाकी आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, आपण विषयांतर करत आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, मी मराठीत बोलतो, तुमचे लोक मराठीमध्ये बोलत नाहीत. मराठी बद्दल कोण अपमान करतो, कोण बोलतो ते बोलायचे नाही पण ही नक्की बाब आहे. आपले आरोग्य अधिकारी डॉक्टर आहे हे डॉक्टर गेले आणि आज त्यांच्यावर महानगरपालिकेची पन्नास लाखाची थकबाकी आहे असे अनेक अधिकारी आले जे सगळे सोडुन गेले आणि नगरपालिकेचे वाटोळे करुन गेलेले आहेत. म्हणुन या शहराचा जो स्थानिक आहे. त्याच्यावर काहीतरी अन्याय आहे. म्हणजे पहिल्यांदा अतिक्रमण विभाग दिले नंतर टॅक्स डिपार्टमेंट दिले.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो सन्मा. नगरसेवक श्री. ओमप्रकाश अग्रवालजी आपण स्थायीकांचा जो विचार करता. आता इथे स्थानिक नाहीत. आता सगळे स्थायिक असते तर इथे सर्व स्थायीकच भरती दिसले असते. पण त्यांचा पण काहीतरी विचार करायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. श्री. मुझफ्फर साहेबांनी, श्री. अजित पाटील ह्यांना मिरारोडला मागुन घेतले.

**परशुराम पाटील :-**

हा जो अन्याय हा अधिकाऱ्यांवर अन्याय होतो. तुम्ही स्थानिक आणि हा विषय काढु नका. स्थानिकांच्या भरतीसाठी आम्ही जेव्हा उपोषणाला बसलो होतो. तेव्हा तुम्ही माझ्याकडे आले होते का? तुम्ही आता स्थायीकांचा उल्लेख करता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या शहराच्या विकासासाठी कार्यक्षम अधिकारी नेमले पाहिजेत.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गाडोदिया श्री. अजित पाटील साहेबांचे फार कौतुक करत आहेत. तुमच्या मताशी आम्ही सहमत आहोत. या ठिकाणी अन्य अधिकारीसुध्दा आहेत. त्यांनी भाईंदरमध्ये जन्म घेतला नाही म्हणुन ते अकार्यक्षम आहेत. असे म्हणायचे नाही श्री. शिवमुर्ती नाईक, तत्कालीन आयुक्त यांचा जन्म भाईंदरमध्ये झाला नव्हता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुमच्या वक्तव्यामुळे यासभागृहातील एका अधिकाऱ्याला घरी पाठवा ते वक्तव्य तुम्हीच केले या सभागृहामधील एका अधिकाऱ्याला घरी पाठवा नंतर ही महानगरपालिका सुधारणार आहे. हे तुमचे वक्तव्य आहे. माझे नाही. म्हणुन तुम्हाला अधिकाऱ्यांबद्दल सहानुभुती आहे` सांगायची गरज नाही.

**असिफ शेख :-**

तुम्ही फक्त श्री. अजित पाटील यांचे नाव घेता. साहेब, बाकीचा अधिकाऱ्यांना कायमस्वरुपी पावर दिली पाहिजे आपल्याकडे असे बोलले जाते की, कमिशनर पण आहेत आणि एक्झीक्युटीव्ह कमिशनर पण आहेत. तशा एक्झीक्युटीव्ह कमिशनरला पावर दिल्या पाहिजेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणुन तर शहरामध्ये डेंग्यु येतो.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसुन घ्या. सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवालजी आपण खाली बसा.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, साई आशिर्वाद हॉस्पिटल मिरारोड मे दो मलेरिया के पेंशंट है।

**असिफ शेख :-**

आपल्याकडे सर्व अधिकारी वर्ग जो आहे. कार्यक्षम आहे. ते चांगले कार्य करु शकतात. परंतु त्यांना कार्य करण्यासाठी चांगले पाठबळ दिले पाहिजे.

(सभागृहात गोंधळ )

**मा. महापौर :-**

एका एका सदस्यांनी बोला.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य श्री. असिफ शेख आपण आता मिटत आहे तिथे घासलेट ओतुन पेटायची बाजु करता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

घासलेट ओतायचा प्रश्नच नाही.

**परशुराम पाटील :-**

आता चर्चा झाली मग बसा.

**आसिफ शेख :-**

पण एका अधिकाऱ्याची तारिफ करायची बाकीचे अधिकारी नालायक आहेत का? सगळे कार्यक्षम आहेत. सगळ्यांना पावर द्या. त्यांना पावर का देत नाही?

**परशुराम पाटील :-**

मी तुमच्याशी सहमत आहे.

**आसिफ शेख :-**

पण श्री. अजित पाटील यांच्यासारखे अन्य अधिकारी या ठिकाणी आहेत.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहामध्ये मघासपासुन जी चर्चा सुरु आहे. त्या संदर्भांत मी खुलासा करतो. सभागृहामध्ये जी चर्चा आहे. ही वैयक्तिक अधिकाऱ्यांना नजरेसमोर धरुन आपण चर्चा सुरु करत आहात. किंवा केलेली आहे. या शहरामध्ये बरेच अधिकारी या ठिकाणी मुळचे आहेत. आणि बरेच अधिकारी या ठिकाणी बाहेरुन कार्यरत आहेत. या ठिकाणी आपले असे म्हणणे आहे का की, जर जिल्हाधिकारी पाहिजे. प्रत्येक अधिकारी हा बाहेरुन येतो आणि त्याच्या कर्तव्यामध्ये तो कुठेही कसुर करत नाही. त्याच्या परिने ते ते काम करण्याचा तो प्रयत्न करतो. परंतु, असे तो स्थानिक आहे म्हणुनच तो कार्यक्षम आहे. बाकीचे अधिकारी सुध्दा या ठिकाणी स्थानिक आहेतच. काही ठिकाणी बाहेरुनसुध्दा या ठिकाणी स्थानिक आहेतच. काही ठिकाणी बाहेरुनसुध्दा अधिकारी येतात. माझी सभागृहाला विनंती आहे की, तुम्ही वैयक्तिक टार्गेट करुन बोलु नका आपण सगळ्यांनी सामोरे जायचे आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रकरण क्र. ३८ मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व झोपडपट्ट्या घोषित करणे ठराव क्रमांक मी कशाला कोणाचे ऐकु? मी या सभागृहाचा सदस्य आहे आणि मी सभा चालवायला आलेलो आहे. गेल्या वेळी अख्खा दिवस बाजार चालला. आज सकाळपासुन दुसरा बाजार सुरु आहे. कोणत्याही गोष्टीला काही तारतम्य राहिलेले नाही. आम्ही इकडे काय बोलतो वरुन आम्हाला सगळे हसतात. आमची चेष्टा करतात.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, मला दोन मिनीटे बोलायचे आहे. त्यांना ठराव मांडु द्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्ही जेव्हा इथे चर्चा करत असतो, आमच्या चर्चेची दखल घेतली जातच नाही. पण वरुन आणखीन थट्टा चालु होते. आम्ही इथे कोणाचे वैयक्तिक वाभाडे काढायला आलेलो नाही आणि ही मिंटीग आहे. मिटींग चालवायची असेल तर चालवा नसेल चालवायची तर इथे गोंधळ करायला सुरुवात करा. मग, आम्ही इथे कशाला थांबायचे? मागच्या वेळीसूध्दा आम्ही अख्खा दिवस मिटींगच्या सभागृहात बसुन राहिले प्रत्येक माणसांची आपली सुध्दा स्वतःची कामे असतात. महापालिकेत येउन महापालिकेची आमची कामे होतच नाहीत. त्यामुळे आमची दुसऱ्या क्षेत्रातील इतर जी कामे आहेत ती तशीच राहतात.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, मला फक्त दोन मिनिटे द्या.

**मा. महापौर :-**

त्यांचे बोलणे झाल्यानंतर आपल्याला दोनमिनिटे बोलण्याची संधी दिली जाईल आपण बसुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम,मा. आयुक्त साहेबांनी जे निवेदन केले. त्याच्यावर मी बोलतो की, मा. आयुक्त साहेबांची ही चाल कोणाच्या लक्षात येत नाही. एक तर पहिल्यांदा मा. आयुक्त साहेबांनी जसे निवेदन केले की, आम्ही सक्षम अधिकाऱ्यांना देतो. आम्ही तर श्री. अजित पाटील यांना चांगले बोलायला तयार नाही हे बाहुले बनवुन या महापालिकेची या सभागृहाची दिशाभुल चाललेली आहे. एक वेळ जर तुमची खात्री पटली होती की, श्री. अजित पाटील हे अतिक्रमणला सक्षम आहेत. तर त्यांना का बदलले? जर श्री. अजित पाटील आरोग्य असेल तर त्यांना का बदलले? हा तुमचा फिरता रंगमंच चाललेला आहे. एकही अधिकारी त्यांना उत्तर द्यायला सक्षम नाही किंवा जबाबदारी घेत नाही. पंधरा दिवसापुर्वी जर आपण विचारले आज केबिनवर गेले तर आपल्याला माहिती पडते की, हे खाते त्यांच्याकडे नाही ही कोणती पध्दत आहे? ॲडमिनिस्ट्रेशनची

जर पध्दत असेल तर मा. आयुक्तांनी दिलेले ते ही सभागृहाचे कामकाज आहे. आम्ही ते परिवर्तन करतो किंवा बदल करतो. अंतर्गत जे बदल आहेत. ते ही स्टँडीगला किंवा सभागृहाला यायला पाहिजे पण इकडच्या कोणत्याही सदस्याला कोणाचे खाते कधी बदलले हे माहिती पडत नाही. आणि माहिती न पडल्यामुळे कोणताही अधिकारी त्याच्या जवळ जायला देत नाही. श्री. पानपट्टे साहेबांना त्यांच्याकडे कोणते खाते आहे हे माहिती नाही. श्री. शेख साहेबांना त्यांच्याकडे कोणते खाते आहे हे माहिती नाही. पंधरा दिवसांनी खाते बदलते कोण अधिकारी काम करेल? जर चर्चा करायची असेल तर मा. आयुक्त साहेबांनी याच्यावर खुलासा करावा की, तीन महिन्यामध्ये सहा महिन्यामध्ये हे प्रशासकिय काम करते वेळी आयुक्त म्हणुन माझ्या नजरेस हे आले आणि म्हणुन मी या अधिकाऱ्यांना बदली केले. जेणे करुन शहरामध्ये हे काम चांगले झाले आज जर सभागृह सांगतो, ऐकणारे प्रेक्षक सांगतात, पत्रकार सांगतात, की, या सभागृहाचे कामकाज किंवा ॲडमिनिस्ट्रेटीव्ह कामकाज निट चालत नाही. म्हणुन शहरात बोंबाबोंब आहे. मग हे कोणामुळे होते. अधिकाऱ्यामुळे होते नगरसेवकांमुळे होते की, नागरिकांमुळे होते? तुमच्याकडे जर सक्षम अधिकारी असतील तर त्यांच्यावर विश्वास ठेवायला पाहिजे तुमचा कोणावरच विश्वास नाही असे झाले. ठेवायला पाहिजे. तुमचा कोणावरच विश्वास नाही असे झाले म्हणजे पात्रता किंवा त्याची क्षमता एखादा नगरसेवक बोलतो. त्याच्या लक्षात येत नाही जसे सन्मा. सदस्य श्री. मदन सिंह त्या दिवशी बोलले मी. या सभागृहात क्षमा मागितली त्यांचाही बोलण्याचा तो उद्देश नव्हता. त्यांचा हिंदी भाषेमध्ये फरक शब्द आहे. तुम्हाला शरम वाटते की शरम हा शब्द पुर्ण व्हॅल्युएबल शब्द आहे. पण हिंदीमध्ये तो नाही मी त्यांनाविचारले की, असे कसे बोलले तर ते म्हणाले सब लोग ऐसे ही बोलते है। हे प्रसंग का येतात. मास्तर तिथे पुस्तक घेउन बसलेले आहेत.या गोष्टीचे सभागृहात तारतम्य नाही. म्हणुन मी मास्तरांचे अभिनंदन करतो. कारण ते मराठीचेच मास्तर आहेत. वास्तविक त्यांना त्याची जाण आहे. पण हे असे का होते हे न बघता आपला टाईमपास चालला आहे याच्यावर बोला की, अधिकाऱ्यांना प्रशासनाला हे विचारा की, तीन महिन्यामध्ये सहा महिन्यामध्ये तुमच्या नजरेमध्ये कोणते अधिकारी अकार्यक्षम दिसले म्हणुन तुम्ही बदल केला का? बदलीचे सत्र शेवटच्या क्षणात चालले आहे. शेवटच्या क्षणामध्ये कोण जवाब देणार? आता डेंग्यु आहे. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल,गाडोदिया, यांच्यावर आपण सगळे हसतो किंवा कशाला उगाच या दृष्टिने बघतो. हे मला समजत नाही पण मुद्दयाच्या विषय होता की, शहरात डेंग्यु आला. एका तासात नाही तर तो पंधरा मिनिटात संपवु शकलो असतो की, याची आपण अशी अशी दखल घेतो. आताही स्वाभाविक आहे आपण नगरसेवक म्हणुन बोलतो काय तमाशा चालला आहे? तमासगिर कोण झाले आहेत? आपण झाले आहे. प्रशासनाचे एक कर्तव्य आहे की, यासभागृहात लक्षवेधी नंतर त्याचा खुलासा करणे गरजेचे आहे. ज्यावेळी एका सदस्यांने लक्षवेधी मांडली तर त्या लक्षवेधीची कार्यवाही केलेली आहे. डेंग्युचे इतके पेशंट मिळालेले आहेत. हा उपचार केलेला आहे. वाढला नाही, कमी झाला. जो आहे त्यालाही मदत केली आहे. असे निवेदन न केल्यामुळे शंभर प्रश्न येतात. अधिकाऱ्यांना याची धास्तीच नाही किंवा कर्तव्यच नाही की, प्रश्न विचारतील आणि आपल्याला उत्तर द्यायला लागेल आपण आपले चालले आहे. ८४ सदस्य येतील बोलतील व जातील अशा भुमिकेत झाल्यामुळे मा. महापौर मॅडम ही आजची स्थिती आहे. हे सभागृह आहे एका कोंबडीची जशी दहा बारा मुले असतात कोंबडी सगळ्यांवर प्रेम करते पण ते एका पिल्लालाजसे टोचतात तसे मा. महापौरांना तुम्ही टोचायला निघालेले आहात. मा. महापौरांना टोचायचे कारण नाही या शहराला जे चांगले आहे ते त्यांच्याकडुन वठवुन घ्या. त्यांना असे वाटते की, माझे कोणीच नाही माझी मी एकटीच ज्याला पाहिजे त्याला खुश करा. त्या उत्तर देत सुटलेल्या आहेत. आम्ही म्हणतो की, शहरात जे चांगले आहे. त्या उत्तराची अपेक्षा करा. जे ठराव कराल ते शहराच्या दृष्टीने करा. मान द्या. मा, महापौरांना मान द्या, मा. आयुक्तांना मान द्या, अधिकाऱ्यांना मान द्या, मा. आयुक्तांनी किंवा अधिकाऱ्यांनी सभागृहातील सदस्यांना मान दिला पाहिजे. मा. आरोग्य समिती सभापती श्री. चंद्रकांत मोदी यांनी सांगितले की, माझी अशी स्थिती आहे. आता त्यांची तशी स्थिती आली हे त्यांचे दुर्दैव आहे. शेवटी शेवटी आली. मधल्या काळामध्ये आली ठिक आहे. आता आठ दहा दिवस बसतील. ते तिकडे विधी सल्लागार बसले आहेत त्या दिवशी मा. उपमहापौर खाली बसले.

**लिओ कोलासो :-**

आचार संहिता केव्हा लागणार आहे? जरा त्यावर बोला.

**रोहिदास पाटील :-**

आचारसहिंतेचेच बोलतो नंतर तुम्हाला बोलायलाच मिळणार नाही.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, मागच्या मिटींगमध्ये सुध्दा आपण पाच तास ह्या विषयासाठी घालवले. आपले महत्वाचे विषय राहिले आजपण नाला सफाई, श्री. राजकुमार कांबळे आणि श्री. अजित पाटील ह्या सर्व विषयांवर आपली बेकायदेशीर चर्चा चालु आहे. परंतु, हा जो मुद्दा आहे श्री. अजित पाटील यांना कुठे ठेवायचे की, श्री. राजकुमार कांबळेना सस्पेंन्ड करायचे. त्यांचे कुठे चुकले असेल ते प्रशासन बघणार त्याची शहानिशा करणार. त्यांना सस्पेंड करणार की, त्यांना ठेवणार हा प्रशासनाचा मुद्दा आहे. श्री. अजित पाटील किती चांगले काम करतात ते प्रशासनाला मा. आयुक्त यांनी बघायचे आहे की, त्यांना कुठे ट्रान्सफर करायचे. श्री. अजित पाटील यांची आपण एवढी स्तुती करतो. परंतु, मागे अँन्टी करप्शन ब्युरो अंतर्गत ते सस्पेंन्ड झाले होते. त्यांना

ह्या शहराची गल्लोगल्ली माहिती आहे. त्यांना गल्लोगल्लीमध्ये चालणारे राजकारण आणि कोण कुठे बसलेला आहे आणि कोण कुठे चाललेला आहे ते ही त्यांना माहिती आहे आणि ते जास्त राजकारण करायचे काम करत नाहीत आता साहेबांनी त्यांना अतिक्रमण विभागामध्ये ठेवले त्यांनी त्यांच्या काळात दाखवुन द्यावे की, एकसुध्दा अनधिकृत बांधकाम झालेले नाही. खुप अनधिकृत बांधकामे झाली. त्यांची त्यासाईडवर जाऊन खुप हे केलेले आहे. म्हणजे श्री. अजित पाटील चांगले असा समज करायचा नाही. कारण श्री.अजित पाटील त्यांच्या कामामध्ये सक्षम नाही त्यांना फक्त कोण पुढारी येउन जेवढे सांगतात तेवढेच जवाब देतात आणि ते तेवढेच बोलतात. ते त्यांच्या अधिकाराचे काहीच बोलत नाहीत. उलट कुठे चोवीस तासाची नोटीस पाठवायला पाहिजे कुठे २१२ पाठवायला पाहिजे याचे त्यांना ध्यान नाही. तरीपण त्या बारावी पास माणसाला तुम्ही अतिक्रमण विभागात ठेवले आणि नालासफाई आणि डेंग्यु याचे आज आपण पाच वर्षाच्या शेवटच्या दिवशी चिंतन आणि मंथन करतो. पंधरा वर्षापसुन टेंडरमध्ये सेटिंगचे राजकारण आहे. आपण लोकशाही पध्दतीने कुठे टेंडर देतो? मॅडम, हे सगळे चिंतन आणि मंथन केल्यानंतर येणाऱ्या इलेक्शनला आपल्याला सामोरे जायचे आहे. ही सर्व आठवण ठेवा. आता कुठल्याही एका अधिकाऱ्याला सस्पेंन्ड केले तर आपले त्याच्यामध्ये काही होणार नाही. धन्यवाद.

**प्रफुल्ल पाटील :-**

खरे, तर मागच्या सभेमध्ये बरीच चर्चा झाली. आम्हाला वाटलेले की, आज विषयाला सुरुवात होईल. परंतु, ती झाली. नाही मा. आरोग्य समितीच्या सभापतींपासुन बऱ्याच नगरसेवकांनी बऱ्याचशा कामांबद्दल बरीचशी नाराजी व्यक्त केली. अख्खा पाच वर्षात काय काय घडले ते ही मला सांगायचे होते. पण हे सांगुन उपयोग काय? सगळे पालथ्या घड्यावर पाणी आहे हे जे काही केले आहे किंवा झाले आहे. याला आपणसुध्दा काही अंशी कारणीभुत आहोत हे विसरता कामा नये कोण चांगले कोण वाईट हे ठरविण्याची वेळ आता आलेली नाही. आता कोण चांगले आहेत हे पुढच्या महिन्यात दिसणारच आहे तेव्हा याच्यावर आपण बोलायला नको. माझी सभागृहाला अशी विंनती आहे की, आपण विषयावरच चर्चा करावी. विषय संपल्यानंतर जे काही महत्वाचे विषय असतील त्यांना मा. महापौरांनी परवानगी दिली तर तुम्ही जरुर चर्चा करा. रात्री बारा वाजेपर्यंत सुध्दा बसायला आम्ही तयार आहोत परंतु, जर सभागृहामध्ये विषय आणले आणि त्या विषयावर चर्चा झाली नाही तर उगाच दुसऱ्यांचा दिवस वाया जातो. म्हणुन या ठिकाणी प्रकरण क्र ३८, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील सर्व झोपडपट्ट्या घोषित करणे जे अधिकार आहेत. ते मा. आयुक्तांचे आहेत. त्यांनी शेवटपर्यंत म्हणजे आतापर्यंत जी काही परिस्थिती आहे ती पाहुन किंवा वेळोवेळी जी परिस्थीती आहे ज्या झोपडपट्ट्या अस्तित्वात आहेत. ज्यांना अधिकृत फोटोपास वगैरे दिलेले आहेत. कारण झोपडपट्टी घोषित झाली तर केंद्रीय आणि राज्य सरकारच्या तसेच इतर संस्थांच्या कितीतरी ग्रॅण्डस तुम्हाला मिळतात. युनिसेफ सारखी संस्थासुध्दा या झोपडपट्ट्यांना ग्रॅण्ड देते. ह्या ग्रॅण्डस आपण कशाला घालवायच्या? झोपडपट्ट्या घोषित करायच्या आणि त्याचे अधिकार जे आहेत ते मा. आयुक्तांना आहेत. म्हणुन त्यांनी ज्या झोपडपट्ट्या अधिकृत आहेत त्या घोषित करायला पाहिजे. त्याच्यासाठी मी ठराव मांडतो.

**(सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ३८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)**

**लिला पाटील :-**

अनुमोदन आहे.

**परशुराम पाटील :-**

साहेब, ठराव होण्या अगोदर चर्चा होणे गरजेचे आहे.

**असिफ शेख :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब आपण झोपडपट्ट्यांचा ठराव मांडलेला आहे. कोणकोणत्या झोपडपट्ट्या आहेत त्याच्या यादीचे वाचन करा.

**रतन पाटील :-**

आपण कुठल्या झोपडपट्ट्या घोषित करणार आहोत याचा गोषवारा मा. आयुक्तांनी दिलेला नाही. ज्या झोपडपट्ट्या घोषित करणार त्याची यादी तरी द्यायला पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

झोपडपट्ट्यांची यादी वाचुन दाखवतो अजुन माझा ठराव वाचुन झाला नाही आता तुम्ही अधिकाऱ्याबद्दल बोलत होते......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसुन घ्या. सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील आपण दोन मिनीटे बसुन घ्या.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, मा. आयुक्तांनी जो विषय दिला तो गोषवारा तर यायला पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

नगरसेवक म्हणुन मी ठराव मांडतो......

**शरद पाटील :-**

गोषवारा दयायची जबाबदारी प्रशासनाची नाही का?

**प्रफुल्ल पाटील :-**

यादी सोबत जोडली आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील, आपल्याबद्दल आमचे मत नाही. पण मा. आयुक्तांनी घोषित करायला पाहिजे. त्यांनी गोषवारा दयायला पाहिजे होता. तसा गोषवारा प्रशासनाकडून आला नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी माझा विषय पूर्ण करतो. नंतर आपण चर्चा करा. मी विषय पूर्ण करण्याच्या अगोदरच मा. विरोधी पक्षनेता उठले. माझा ठराव तर वाचून पूर्ण होउ दया.

**रतन पाटील :-**

साहेब, आपला ठराव घ्या. पण प्रशासनाला गोषवारा दयायला सांगा.

**परशुराम पाटील :-**

मा. माजी नगराध्यक्ष साहेब, आपण म्हणता की, मी ठराव मांडत आहे. तर ठराव मांडण्याच्या अगोदर त्याची मंजूरी होण्याअगोदर खुलासा होणे गरजेचे आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्ही मांडलाच नाही तर त्या अगोदर तुम्ही कुठे बोलता?

**परशुराम पाटील :-**

बरोबर आहे. पण त्या अगोदर आपण याच्यामध्ये जे वाचले त्यामध्ये संपूर्ण झोपडपट्टी त्यात नवघर आहे, गोडदेव आहे, बंदरवाडी आहे, मुर्धा आहे, किंवा सुभाषचंद्र बोस आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ते आम्ही वाचू ना.

**परशुराम पाटील :-**

साहेब, तुम्ही मंजूरी देण्यासाठी सांगता. डिव्हायडरमध्ये सुभाषचंद्र बोसचे सर्व आहेत. तिथे धंदेवाले आहेत. तिथे तुम्ही काही करु शकत नाही आणि तुम्ही आता मंजूरी मागता. सुभाषचंद्र बोस मैदानाची ती शान आहे. त्या डिव्हायडर मधले हटले जात नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एक एकाने बोला. सर्वांनी एकत्रित बोलू नका. आपली सुचना समजली. आपण बसा.

**रतन पाटील :-**

प्रशासनाने खुलासा करावा की कुठल्या झोपडपट्ट्या घोषित करायच्या आहेत.

**मा. महापौर :-**

आपली सुचना समजली. प्रशासन खुलासा करेल. आपण बसा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलते. संपूर्ण सभागृह बोलताना सन्मा. प्रफुल्ल पाटील साहेब एकदम गप्प बसलेले आणि आत्ता त्यांनी ठराव मांडला. त्याच्या पुढचे त्यांचे वाक्य झाले नाही आणि त्याच्यापूर्वी यांची बोंबाबोंब ....

(सभागृहात गोंधळ)

**प्रफुल्ल पाटील :-**

मी जेव्हा बोलतो तेव्हा सभागृहाच्या कामकाजानुसार बोलतो. तुम्ही बोलत असताना आम्ही मध्ये बोलत होतो का?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, आपल्याला एक निवेदन. मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांना जो ठराव मांडायचा असेल तो मांडू दया. ज्यांना त्याच्या विरोधात ठराव मांडायचा असेल त्यांनाही मांडता येईल. प्रथम मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त महोदय, सभागृहासमोर, मा. महासभेसमोर विषय आणण्याचे अधिकार मा. महापौरांचे आहेत. हे विषय मा. आयुक्तांच्या माध्यमातून प्रशासनाकडून यायला पाहिजेत. मा. महापौर मॅडम, या विषयपटलावर असे काही विषय आहेत. ज्याच्याबद्दल प्रशासनाने अजिबात मत व्यक्त केले नाही. याच्या आधीची एक मा. महासभा आम्ही विरोध करुन रद्द केली होती. त्यानंतर दुसरी मा. महासभा पूर्णतः गोंधळात चालली. म्हणजे ह्यानंतर प्रशासनाला याच्यावर आपले मत सादर करण्यासाठी फार मोठा कालावधी मिळत होता. याचा अर्थ प्रशासनाला या विषयामध्ये कोणत्याही प्रकारचा इंटरेस्ट नाही किंवा प्रशासनाने कोणत्याही प्रकारचा अभ्यास केलेला नाही किंवा त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसावी. मा. महापौर मॅडम, जर आपण आपल्या अधिकारात हा विषय आणला असेल तर आपण खुलासा करावा की, आपण हा विषय आणलेला आहे. त्यानंतर सन्मा. सदस्यांना ज्यांचा झोपडपट्टीच्या विषयात

इंटरेस्ट असेल त्यांना जो विषय आणायचा असेल तो आणावा. त्यानंतर इतर सदस्यांनी आपले मत व्यक्त करावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्यांना कशाला बोलता? तुम्ही मा. उपमहापौर होते तेव्हा विषय आणताना तुमचा काही इंटरेस्ट नव्हता का? सदस्य बोलतो तेव्हा कोणाच्या हितासाठी बोलतो?

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, आपण आपले मत व्यक्त करावे. हा विषय आपण आणलेला आहे की, प्रशासनाने आणलेला आहे. त्यानंतर विषयावर चर्चा व्हावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

मॅडम, मला तुम्हाला हे ही विचारायचे आहे की, तुम्ही प्रोटोकॉल पाळता का? तुम्ही एखादया पक्षाच्या मा. महापौर म्हणून निवडून आलात. कॉंग्रेस पक्षाचे मा. उपमहापौर म्हणून श्री. चंद्रकांत वैती साहेब निवडून आहे. तुम्ही आत्तापर्यंत जेवढया सभा घेतल्या तेव्हा तुम्ही मा. उपमहापौरांशी चर्चा केली होती का? की हे विषय घ्यायचे आहेत. त्यांनी मान्यता दिली होती का? ही सभा लावतांनासुद्धा त्यांना काही विषय विचारुन घेतले होते का? हे तुम्ही आम्हांला सांगा. नंतर आम्ही तुम्हाला विचारु की, सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी तुम्हाला विषय दिला होता की, सन्मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती यांनी दिला की, सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी विषय दिला होता. तुम्ही नगरसेवकांचे विषय घेता की, मा. महापौर, मा. उपमहापौर व मा. आयुक्त तिघे मिळून विषय घेता म्हणजे गेल्या अडीच वर्षात तुम्ही जेवढया सभा घेतल्या त्या सगळ्या आम्हाला पूर्नविलोकनात मागता येतील. मला याच्यावर स्पष्टीकरण पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब मी, स्पष्टीकरण देतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही कशाला स्पष्टीकरण देता? मी मा. महापौरांना विचारतो. तुम्ही पिठासिन अधिकारी नाहीच आहात

**मा. उपमहापौर :-**

मी कॉंग्रेस पक्षाचा नगरसेवक आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

कॉंग्रेस पक्ष इथे सभागृहात नाही. इथे आपण सगळे स्वतंत्र आहेत.

**मा. उपमहापौर :-**

आपण आमच्या पक्षात नंतर आलेले आहात. आपण कॉंग्रेस पक्षाच्या गटात बसलेले आहात.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही नंतर आलात मी अगोदर आलो. तुम्ही काय होते आणि मी काय होतो हा विषय नाही. मी सभागृहामध्ये सदस्य म्हणूनच बोलतो.

**मा. उपमहापौर :-**

कॉंग्रेस पक्षाचा प्रतोद म्हणून माझी नियुक्ती या सभागृहात आहे.

**प्रफूल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही विषय तुमच्या मताने आणले की, इतरांना विचारुन आणले.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, तुम्ही प्रश्न विचारला त्याचा खुलासा करतो. मी कॉंग्रेस पक्षाचा प्रतोद आहे आणि कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक बसून सभागृहात कोणत्या विषयावर चर्चा झाली पाहिजे असे विषय नगरसेवक जेव्हा आमच्याकडे आणताता किंवा शहरातील इतर काही मंडळी सामाजिक संस्था एखादया विषयाबद्दलची माहिती देतात. तेव्हा ते विषय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने, कॉंग्रेस पक्षाचा प्रतोद म्हणून मी इथे असतो, म्हणून मी मा. महापौरांशी बोलत असतो. मा. महापौर आज राष्ट्रवादी पक्षात नसल्या तरी राष्ट्रवादी पक्षाच्या होत्या. आणि त्यांचे सर्व नगरसेवक किंवा सामाजिक संस्था किंवा इतर कोणते विषय चर्चेला येतात तेव्हा त्यांचे प्रतिनिधी मा. महापौर आहेत आणि ते त्यांच्या माध्यमातून विषय आणतात म्हणून मा. महापौर, मा. उपमहापौर किंवा इतर लोक विषय आणण्याबाबत चर्चा करतात.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मी तुम्हाला प्रश्न विचारला मग तुम्ही मला उत्तर दया. कोण काय करतो याच्याशी इथे अर्थ नाही. तुम्हाला मी हा प्रश्न विचारला की तुम्ही आमचे नेते मा. उपमहापौर यांना विचारुन या सभागृहामध्ये काही विषय आणले का नाही? किंवा तुम्ही तुमच्या मताने आणले किंवा मा. आयुक्तांच्या मताने आणले.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, त्यांनी विषय क्र. ०१ ला सुरुवात केलेली आहे. मी सभागृहाच्यावतीने आपल्याला अशी विनंती केलेली आहे की, हा विषय प्रशासनाने आणलेला आहे की, आपण आणलेला याबद्दल मत व्यक्त करुन......

**प्रफुल्ल पाटील :-**

सगळ्या विषयपत्रिकेवरचे विषय आम्हांला सांगा. बऱ्याच विषयांवर प्रशासन गोषवारा देत नाही. ह्या पाच वर्षाच्या इतिहासामध्ये तुम्हाला शंभर विषय दाखवतो की, प्रशासनाने गोषवारा दिला नाही. मग काय या सभागृहाने ठराव केले नाही? प्रत्येक वेळी सभागृहाने ठराव केलेले आहेत. मा. सभागृह नेते सांगतील की, प्रशासनाचा गोषवारा नसताना आम्हाला ठराव करायची केवढी घाई असते. याच्यामध्ये प्रशासनाचा इंटरेस्ट असतो की, तिथे बसलेल्या पिठासिन अधिकाऱ्यांचा इंटरेस्ट असतो. याचा पण खुलासा करा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह, सन्मा. सदस्यांनी या सभागृहात आणलेल्या विषयावर जी चर्चा सुरु केलेली आहे. ह्यानंतर प्रकरण क्र. ३८ चा जो विषय आहे की मिरा भाईंदर शहराच्या हद्दीतील असणाऱ्या झोपडपट्टया घोषित करणे. विषयपटलावर जेव्हा विषय घ्यायचे असतात. त्यावेळेस दोन्ही सत्ताधारी पक्ष याच्या अगोदर चर्चा करुन विषयपटलावर विषय घेत होते. परंतु, ह्या दोन तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये प्रशासनाने जे विषय माझ्यासमोर आणलेले आहेत. ते विषय मी मा. महासभेपुढे घेतलेले आहेत. आणि हे विषय घेत असताना मी स्वतः मा. उपमहापौर यांच्याशी चर्चा करुन विषय घेतलेले आहेत. विशेष लक्षणीय बाब म्हणून आपल्याला सांगू इच्छिते की, विषयाची चर्चा करत असताना प्रशासनाला आजच्या विषयपटलावर जे विषय घेण्यात येणार होते. त्या विषयांचे गोषवारे मागितले होते आणि लिखीत स्वरुपाचे पत्रव्यवहार सुद्धा मा. महापौर दालनात स्वीय सहाय्यक यांनी त्या त्या विभागाला केला होता की ह्या विषयाचे गोषवारे या या कालावधीमध्ये उपलब्ध करावेत. कारण हे विषय मा. महासभेच्या विषयपटलावर घ्यायचे आहेत. परंतु, बऱ्याच कालावधीनंतर हे गोषवारे आले नाहीत. तेव्हा त्यांनी सांगितले की हे विषय आम्ही देतो. तुम्ही विषय घ्या. त्यानंतर हे विषय घेतले गेलेले आहेत. जरी मा. महापौर म्हणून मला विषय घेण्याचे अधिकार असतील. तरीसुद्धा चर्चा करुन संगनमताने हे विषय विषयपटलावर आलेले आहेत. आणि विशेष करुन झोपडपट्टया डिक्लेअर करणे हे अधिकार पूर्णपण मा. आयुक्तांचे असतात. आपण ते मा. महासभेसमोर आणून सर्वांच्या समक्ष झोपडपट्टया त्या वस्त्या डिक्लेअर करायच्या आहेत. आणि हा ठराव सर्वांच्या मताने, सर्वांच्या संमतीने आपण मा. महासभेपुढे मांडायचा आहे. आपल्याला ज्या ज्या झोपडपट्टया ह्यामध्ये समाविष्ट करुन घ्यायच्या असतील त्या १९९५ च्या आधीच्या असतील किंवा नंतरच्या असतील. ज्यांना प्राधान्य दयायचे आहे त्याबद्दल आपण सर्व सदस्यांनी ह्या विषयावर चर्चा करुन ह्या विषयात सहभाग घेउन आपआपले मत मांडण्याचा प्रयत्न करा. आपसात एकमेकांना एकमेकांशी कापण्याचा प्रयत्न करुन इथे सभागृहामध्ये वेगळ्या प्रकारचे प्रदर्शन करुन नका. कारण सभागृहामध्ये आपल्याला पाहण्यासाठी आलेली जी जनता आहे. प्रेक्षक गॅलरीतील पत्रकार आहेत. त्यांच्यापर्यंत ह्या सभागृहातील सर्व मॅसेज पोहचत आहे. आपसामधील ज्या वैयक्तिक गोष्टी असतील त्या आपण सभागृहाच्या बाहेर ठेवाव्यात. आणि ह्या शहराच्या विकासासाठी आपण जे विषय सभागृहात आणलेले आहेत. त्याचा खोलवर विचार करुन आपण त्या बाजूने आपले मत व्यक्त करावे अशी मी सर्व सभागृहाला, सर्व सदस्यांना विनंती करते. सर्व सदस्यांना विनंती आहे की, उभे राहतात आणि बोलायला सुरुवात करतात. मा. महापौर जोपर्यंत तुम्हाला बोलायला सांगत नाहीत. तोपर्यंत कृपया करुन आपण बोलू नका. आपण तज्ञ नगरसेवक आहात. सगळ्यांना नियम माहिती आहेत. आम्हाला नियम सांगायची गरज नाही. आपण स्वतः उभे राहता आणि बोलायला सुरुवात करता. तुम्हाला बोलायची परमिशन नसते. तुम्ही जर अशा प्रकारे वक्तव्य करत असाल. तर मा. सचिवांना सांगून ते सर्व वक्तव्य कामकाजातून काढण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, तसे पण तुम्ही कापणार. आणि पहिल्यांदा सॉरी बोलतो आणि परवानगी मागतो. दुसरी गोष्ट आपण बोलता ते आपण पाळतसुद्धा नाही. आत्ता तुम्ही सांगितले की ज्यावेळी तुम्ही विषय आणता त्यावेळी मा. सचिवांना सांगून पत्र देता की, प्रशासनाला याचा गोषवारा सादर करायला सांगा. ऑक्ट्रॉय विषय जो सभेत आणला होता. नंतर तुम्ही कट केला. ते ठेवायचे की कट करायचे हे तुम्ही कोणाकडून मागितले होते?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य तो मा. महासभेचा विषय होता. म्हणून मा. महासभेपुढे तो विषय घेतलेला होता.

**नरेंद्र मेहता :-**

मग कट का केला?

**मा. महापौर :-**

परंतु, दुसऱ्या वेळेस तो विषय स्टॅण्डींगमध्ये घेतल्या मुळे अधिकाऱ्यांनी सांगितले की, तो विषय मा. महासभेत घेउ नका. अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुनच विषय घेतले. हे काही वैयक्तिक विषय नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

आपण पूर्वी चर्चा केली नव्हती का?

**मा. महापौर :-**

मा. महासभेमध्येच विषय यायला पाहिजे. मा. स्थायी समितीने मा. महासभेपुढे शिफारस करायला पाहिजे. हवे तर आपण इथे सल्लांगाराचा सल्ला विचारा. मग ऑडीटरचा सल्ला विचारा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. स्थायी समितीच्या म्हणण्यावर तुम्ही विषय कमी केला का? कोणाच्या म्हणण्यावरुन कमी केला?

**मा. महापौर :-**

मा. स्थायी समितीमध्ये मंजूर झाल्यावर इथे विषय घेण्याचा प्रश्नच येत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

म्हणजे तुमचे असे म्हणणे आहे की, तुम्ही विषय आणले. नंतर स्टॅण्डींग सगळे डिसीजन घेउ शकतात का?

**मा. महापौर :-**

प्रशासनाने तो विषय दिला असेल. मा. स्थायी समिती सभापती परस्पर निर्णय घेउ शकतात. मा. महासभेमध्ये मा. महापौर निर्णय घेउ शकतात.

**नरेंद्र मेहता :-**

म्हणजे तुमचे असे म्हणणे आहे की, प्रशासनाने एकदा तुम्हाला पत्र दिल्यानंतर स्टॅण्डींगला गोषवारे दिले.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य श्री. नरेंद्रजी मेहता यांच्या विषयाला अनुसरुन बोलतो. मागच्या सभेत आपण ऑक्ट्रॉय विषयी आणला होता. आणि नंतर पुन्हा तो पुढच्या सभेमध्ये यायला पाहिजे होता. लोकांना सगळ्यांना कळते काय चालते. अंदर क्या है, बाहर क्या है, यह पब्लिक है सब जानती है। त्यामुळे तुम्ही सभागृहापुढे एकदा विषय आणला. त्यानंतर सुसंवाद झाला का? म्हणून विषय कट केला का? मग याचा खुलासा करा की, नक्की काय झाले?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मा. स्थायी समितीमध्ये एकदा विषय मंजूर झाल्यावर विषयपटलावर विषय घ्यायचे नसतात, हे आपल्याला माहिती पाहिजे. आपण सन्मा. नगरसेवक आहात. स्टॅण्डींगमध्ये विषय मंजूर झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी सांगितले की, हा विषय स्टँण्डींगमध्ये मंजूर झालेला आहे. आपण विषयपटलावर विषय घेवू नका. आणि स्टॅण्डींगच्या अगोदर मा. महासभेत हा विषय घेतलेला होता.

**आसिफ शेख :-**

मॅडम, आपली पहिली टर्म आहे. आम्ही दहा वर्षे झाली आम्हाला नियम माहिती आहेत.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, ज्या वेळेला आपल्या मिटींगचे जे जे विषय असतात. मा. स्थायी समितीमध्ये ठराव झाल्याशिवाय मा. महासभेमध्ये आपण घेत नाही, हे आपल्याला माहिती आहे. मग तो विषय आलाच कसा? तो विषय आला आणि नंतर कट केला गेला हे चुकीचे आहे. आपल्याकडे मा. स्थायी समितीने तो विषय दिलेलाच नव्हता असे आपल्याला मानावे लागेल की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, अख्ख्या महापालिकेचे जे जनरल बजेट असते ते पहिल्यांदा मा. स्थायी समिती मंजूर करते. मी दोन वर्षे मा. स्थायी समितीमध्ये होतो. त्यानंतर ते मा. महासभेपुढे त्याला मंजूरी दिल्यानंतर बजेटला अंतिम मंजूरी मिळते. तुम्ही हे जे वक्तव्य केले. उदया मा. स्थायी समितीच्या पंधरा सदस्यांनी ही इमारत विकायचे ठरवले. तो निर्णय आम्ही फिरवू शकतो. मा. महासभेच्या सर्वस्वी पावर आहेत. चुकीचा पॉईट आहे. एका कुठल्यातरी छोटयाशा नियमाचे पालन करुन हे संपूर्ण टेंडर मा. स्थायी समितीने ठरवले.कल्याण-डोंबिवलीमध्ये जे टेंडर दिले गेले त्याची चौकशी चालू आहे. मा. हायकोर्टाच्या जजच्या अंडरमध्ये ती चौकशी सुरु आहे. तिकडचे मा. आयुक्त श्री. आर. डी. शिंदे यांनी स्वतःचा अहवाल हायकोर्टामध्ये दिलेला आहे. आणि हिच व्यक्ती त्या अहवालामध्ये दोषी ठरलेली आहे. हे साधेसुधे नाही. प्रशासनाने तुमच्याकडे गोषवारा देण्याचे काम केले. मा. पिठासिन अधिकारी म्हणून तुम्ही तो इकडे घ्यायला पाहिजे होता. मा. स्थायी समितीने काय केले? चांगले केले, वाईट केले. महापालिकेचा आर्थिक फायदा केला आहे की, नुकसान केले? आपले अधिकारी सक्षम आहेत. मा. आयुक्त सक्षम आहेत आणि जे कोण आहेत ते तुम्ही मा. महासभेपुढे आणून त्याचा निर्णय घ्यायला पाहिजे होता. मी स्वतः दोन वर्षे काम केलेले आहे. त्या त्या वेळेच्या मा. आयुक्तांनी मा. महासभेपुढेच हे टेंडर आणून मंजूर केले आहे आणि त्या त्या वेळेला मा. महासभेनेसुद्धा चुकीचे निर्णय घेतले. त्याच्यावर आम्ही मतदानाची मागणी केली आणि मा. हायकोर्टामध्ये सुद्धा पिटीशन फाईल केले आहे आणि त्याचे निकाल लवकर लागले असते पण वर्षभरानंतर टाईम बार झाल्यामुळे ते लागू शकले नाहीत. त्याकरिता सांगतो हे जे आत्ता एक एक नवीन सुरु झालेले आहे. ह्याला पायबंद घाला. ही शेवटची मा. महासभा आहे किंवा आपण आणखीन एक लावाल. पण असे बोलण्यात काही अर्थ नसतो. मा. स्थायी समितीला अनेकवेळा आमचे वक्तव्य झाले आहेत. मा. आयुक्त स्वतः आले आहेत. त्यांनी सरळ सांगितले की, हा आर्थिक बजेटवर परिणाम करणारा विषय आहे. आणि हा आपल्या मा. महासभेपुढे आला पाहिजे. पहिल्यांदा जेव्हा ऑक्ट्रॉयचे झाले त्यावेळेला श्री. आर. डी. शिंदे हे आयूक्त होते. त्यांच्या कालावधीमध्ये आपल्याला प्रथम ऑक्ट्रॉय लागला. दोन विषय होते. त्यावेळेस तुम्हीसुद्धा सभागृहामध्ये असाल. एक ऑक्ट्रॉय

लावायचा की, सेझ लावायचा हे आपण मा. महासभेने ठरवले आहे. दुसरे त्यांची किंमत किती असावी? मा. स्थायी समितीने त्याचा गोषवारा चौतीस करोडचा दिला. नंतर सगळी सेटलमेंट झाली आणि तो सत्ताविस करोडला गेला. महापालिकेचे चार पाच करोडचे पहिल्याच वर्षी नुकसान झाले. आणि ते आम्ही चॅलेंज केले. मंत्रालयातुन त्याला वरदहस्त मिळाले म्हणून हायकोर्टात जावे लागले हे आमच्या शहराचे दुर्देव आहे. आत्ता मा. स्थायी समितीने काय कले हे आम्हाला काहीच माहित नाही. पेपरला नोटीस कधी देतात हे आम्हाला माहित नाही. खालचा नोटीस बोर्ड एवढा भरला आहे की, आजची नोटीस कुठल्या ठिकाणी किती वाजता लावली हे आम्हाला कळत नाही. पहिल्यापासुन म्हणतो की, पब्लिक नोटीस त्या त्या डीपार्टमेंटला जाहीर केली पाहिजे. आज जाउन खालचा नोटीस बोर्ड बघा. त्याच्यामध्ये हजारो कागदपत्र आहेत. त्याच्यात कुठेतरी एक ऑक्ट्रॉयची बारीकशी नोटीस लावली, खानापुर्ती तयार केली, कागदे तयार केली, दोघांच्या सह्या घेतल्या. मा. महापौर म्हणून तुम्हालाही हे माहित नाही. आम्ही स्वतः आहोत. आम्हाला लोक बोलतात की वो नोटीस आया है। कब का टेंडर है? आत्ता मा. स्थायी समितीने जर घेतलेले असेल. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये स्थगिती आली का? हे तुम्ही मा. आयुक्तांना विचारा आणि ती आली असेल तर ती का आली? त्याला कारण काय होते? ती टेंडर रिकॉला झाली का? ह्याचा संपूर्ण बजेटवर मोठा परिणाम होणार आहे आपल्या बजेटची सुरूवात ऑक्ट्रॉयच्या टेंडरने हाते आणि त्याची रिकव्हरी त्याची अमाउन्ट आपल्याला दररोज येत असते. माझी अशी विनंती आहे, मा. स्थायी समितीने काय केले, काय नाही. आमच्यापर्यंत अजून काही आलेले नाही. त्यामुळे आम्ही काही बोलणार नाही. ज्या दिवशी हे कोर्टापर्यंत घेउन जावू काय असेल ते आम्ही ठरवू. पण तुम्ही एक विचारायला पाहिजे की, स्थगीती आली का? त्याच्यात किंमत कमी केली का? बजेटमध्ये काही निगोसिएशन केले का? त्याच्यात किती पार्ट्या होत्या? सगळ्यांना कॉन्टेस्ट केले का? सगळ्यांना फॉर्म दिले का? हे त्यांना विचारा आणखिन एक त्या बी.ओ.टी. चे सुद्धा झाले. आत्ता ऑक्ट्रॉयचे टेंडर झाले. बी.ओ.टी. चे सुद्धा असेच आहे. डायरेक्ट स्टँडींग मा. महासभेचे काही घेणे-देणे नाही. नोटीस निघाल्या, ऑक्ट्रॉयचे टेंडर ठरले, कॉन्ट्रॅक्टर ठरला. त्यातली सुपेरिअर पार्टी शेवटी हायकोर्टात गेली. हे काय चालले आहे. हे सभागृह भरू नका. मा. स्थायी समिती सभाच चालू द्या.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, मला फक्त एवढे विचारायचे होते की, प्रशासनाने तुम्हाला एकदा गोषवारा दिल्यानंतर परत त्यांनी स्टँडींगला गोषवारा दिला का? प्रशासनाकडून स्टँडींगनी अहवाल नाही मागितला का? इकडे मिटींग पेंडींग आहे. तुमच्याकडे अहवाल आहेत की, मा. महासभेमध्ये विषय आणावा आणि एका बाजुला मा. स्थायी समितीने निर्णय घेतला. तर त्यांनी दोघांना अहवाल दिले होते का?

**मा. महापौर :-**

मा. स्थायी समितीमधून शिफारस करून. मा. महासभेला आल्यानंतर घ्या म्हणून सांगितला तरी तो विषय घेतला नाही. पण ह्यावेळेस मा. स्थायी समितीकडून मा. महासभेला शिफारस करून विषय आला नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही विषय आणला होता तो रद्द करण्याचे कारण काय होते?

**मा. महापौर :-**

मा. स्थायी समितीमध्ये तो विषय दिला. मा. स्थायी समितीमधून शिफारस करून मा. महासभेला येईल म्हणून सांगितल्यानंतर तो विषय अधिकाऱ्यांनी घेतला नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आता मा. महासभेत कशाला येणार?

**मा. महापौर :-**

त्यांनी मा. महासभेकडे शिफारस केलीच नाही. त्यांनी परस्पर विषय मंजुर केला.

**मिलन म्हात्रे :-**

पण, त्याच्याशिवाय तुमचे टेंडर नाही निघायला पाहिजे. सगळी टेंडर प्रक्रिया थांबली पाहिजे.

**मा. महापौर :-**

तुम्ही काय केले? त्यावेळेस तुम्ही मौन धारण केले होते का? आपण सभागृहातील सन्मा. सदस्य आहात ना?

**नरेंद्र मेहता :-**

बर झाल तुम्ही विचारले की, मी काय केले? त्या विषयासाठी मी दिल्ली कोर्टात होतो. तिकडे माझे रेकॉर्डेड स्टेटमेंट आहे. मी जजला सांगितले की, तुम्ही एक दिवस थांबा मला मिटींगला जायचे आहे. ऑक्ट्रॉयचा महत्वाचा विषय आहे. कोर्टात माझ्या स्टेटमेंटमध्ये रेकॉर्डेड आहे की, मला जायलाच लागेल. मी वीस हजार रूपये फ्लाईटला खर्च करून इकडे आलो. नंतर माहिती पडले की, मिटींग रद्द झाली. हे मी त्यासाठी केले आणि माझ्या वॉर्डमध्ये ९०% इंडस्ट्रीज आहेत. मला ऑक्ट्रॉय किती पडतो तो मला माहित आहे. म्हणून मी तुम्हाला एवढे बोलतो. आम्ही इकडे अभ्यास करून येतो आणि तुम्ही परस्पर डिसीझन घेता. आय हॅव दि एव्हरी प्रुफ तिकिटे आहेत, कोर्टाचे स्टेटमेंट आहे माझ्याकडे सगळेच आहे. म्हणजे मी काय केले? तुम्ही काय केले आत्ता ते मला सांगा?

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रत्येक वेळी कोणत्याही विषयावर जेव्हा प्रशासन माहिती देत नाही. तशा प्रकारे ऑक्ट्रॉयच्या बाबतीत सुद्धा प्रशासनाने माहिती दिलेली नाही की, त्याच्यावर हायकोर्टातुन स्टे आला आहे. स्टे आला होता की आलेला आहे? आत्ता सध्या स्थिती काय आहे? आणि नियमाप्रमाणे जेव्हा आपण हा विषय मा. महासभेपुढे आणला होता. तेव्हा मा. स्थायी समितीने घेतला नव्हता. जेव्हा मा. स्थायी समिती कोणता विषय घेत नाही. तो विषय घेण्याचा अधिकार मा. महासभेला आहे. पण जेव्हा कायद्यातच जो विषय घेण्याचे अधिकार मा. स्थायी समितीला आहेत. तसा अनुसुची प्रकरण क्र. ३५ बघा. त्याच्यामध्ये स्पष्ट तरतुद आहे की, या विषयाबाबत जे अधिकार आहेत ते मा. स्थायी समितीला आहेत आणि मा. स्थायी समितीने जर याच्यावर निर्णय घेतला असेल तर मा. महापौरांनी मा. महासभेपुढे आणण्याची काही गरज नाही. तर दोन बाबी आहेत. एक तर याच्यामध्ये न्यायालयातून स्थगिती आहे की, कंटीन्यु आहे का? आणि जर आपण ३५ प्रमाणे निर्णय घेतला असेल तर ती पुन्हा मा. महासभेपुढे आणण्याची गरज नाही. आणि म्हणून कदाचित मा. महापौरांना प्रशासनाने तशा प्रकारची माहिती दिली असेल. म्हणून आपण हा विषय आणला नसेल. मा. महापौर मॅडम, आपण ह्या संदर्भात जरा खुलासा करा.

**मा. महापौर :-**

प्रशासनाने यावर खुलासा करावा.

**मा. उपायुक्त सो. :-**

मा. महापौरांच्या परवानगीने सभागृहामध्ये सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने खुलासा करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील सेक्शन ३५ जकात व पथकर यांची वसुली कशाप्रकारे करता येईल? मा. स्थायी समितीच्या मान्यतेने एका वेळेस जास्तीत जास्त एका वर्षाच्या कोणत्याही कालावधीसाठी जकात व पथकर वसुली करण्याचा मक्ता देता येईल. किंवा मा. आयुक्त मा. स्थायी समितीच्या मान्यतेने ह्या प्रोव्हीजनसाठी ज्या व्यक्तीस आपला अभिकर्ता म्हणून नेमतील अशा कोणत्याही व्यक्तीच्या आदेशान्वये जकात वसूल करता येईल. या कायद्याच्या स्पष्ट सुचना असल्या कारणाने आणि सन्मा. सदस्यांनी या सभागृहामध्ये तसे नमुद केले असल्या कारणाने प्रशासनाने या वर्षीच्या जकाता वसुली करण्याकरिता अर्थसंकल्पाच्या तरतुदी अधिन म्हणजे मागील वर्षाच्या जकातीच्या रक्कमेच्या १०% वाढ करून शासनाच्या निर्देशाप्रमाणे रक्कम निश्चित करून जकात वसुली अभिकर्त्यामार्फत करण्याबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्तांच्या गोषवाऱ्याने मा. स्थायी समितीला सादर करण्यात आला होता. आणि त्या दरम्यानचा काळात मा. महापौरांनी तो विषय ह्या. मा. महासभेच्या अजेंडयावर घेतला होता. परंतु, हे अधिकार मा. स्थायी समितीचे असल्यामुळे आणि मा. स्थायी समितीला प्रशासनाने गोषवारा दिल्यामुळे आणि मा. स्थायी समितीने त्यामध्ये एक वर्षासाठी मक्ता देण्याबाबतचा ठराव पारित केल्यामुळे मा. महापौरांनी ह्या सभेतील विषय ड्रॉप केलेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण आत्तापर्यंत मा. स्थायी समितीचे कितीतरी ठराव गोषवारे म्हणून इकडे देता. ह्या मिटींगमध्ये तुम्ही मा. स्थायी समितीचे ठराव गोषवारे म्हणून दिलेले आहेत. मग तुम्हाला तो विषय घ्यायला कोय झाले? आत्ता ह्या प्रोसिडींगमध्ये मा. स्थायी समितीचे ठराव गोषवारे म्हणून दिले. यामध्ये तुम्ही जे मा. स्थायी समितीचे ठराव दिलेले आहेत. मग ते चुकीचे आहेत का? तुम्ही मा. महापौरांचा दिलेला विषय का कट केला? मा. महासभेला ही माहिती दया की, मा. स्थायी समितीने काय केले? ह्या सभेमध्ये जे गोषवारे लावले ते चुकीचे आहेत का?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

मा. महापौरांना अपेक्षा होती की, महासभेमध्ये हे अंतिम करावे लागेल. परंतु, कायदयामध्ये तरतुद असल्यामुळे आणि कायदयाच्या तरतुदीने मा. स्थायी समितीने निर्णय घेतल्यामुळे मा. स्थायी समिती ही मा. महासभेचीच एक अंगीकृत संस्था आहे. ती वेगळी नाही. ती कायदयाने एक अधिकृत संस्था आहे. आणि त्यामुळे त्यांनी आपल्या महापालिकेच्या भल्यासाठीच निर्णय घेतलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. स्थायी समितीने केलेला ठराव विखंडीत करण्याकरिता आम्ही मागणी केलेली आहे. त्याच्यामध्ये ऐशी लाखाचे नुकसान होते.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडमचे असे म्हणणे आहे की, ते शिफारस करुन इकडे येणार होते. तुमचे म्हणणे आहे की, मॅडमनी ड्रॉप केले तर नक्की काय आहे?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

तशी शिफारस करण्याची तरतुद नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला दोन महिन्यांची मुदतवाढ दिली. त्याच्यात सुद्धा महापालिकेचे चाळीस लाखाचे नुकसान झालेले आहे. हे सगळे कोण ठरवते?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

जकात ठेकेदाराला कोणतीही मुदतवाढ दिलेली नाही त्याचा जो कालावधी आहे. त्या तारखेपर्यंत जकात ठेकेदारामार्फत जकात वसूली केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. अग्रवाल हा तुमच्याकडे तीन महिने फेऱ्या मारत होता.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

सन्मा. सदस्यांनी याबाबत एक प्रश्न विचारला होता की, यामध्ये काही स्थगिती वगैरे आलेली आहे का? तर मी सन्मा. सभागृहाला माहिती देवू इच्छितो की, मा. स्थायी समितीच्या मंजूरीने सदर अभिकर्ता नियुक्तीसाठी प्रशासनाकडून पेपरमध्ये जाहिरात दिली. रितसर निविदा प्राप्त झाल्या आणि.....

**मिलन म्हात्रे :-**

जरा तारखा सांगा. आपण निवेदन करता. मा. महासभेला किती तारखेला मंजूरी मिळाली. आम्हांला तारखा हव्या. रेकॉर्डला प्रोसिडींगला त्या तारखा आल्या पाहिजे. व्यवस्थित अभिकर्ता कितीची त्याची अमाउंट सांगा. मा. स्थायी समितीची बजेटमध्ये काय अमाउंट होती ती सांगा. या बजेटवर सगळ्यात मोठा प्रभाव पडणारा तो ठराव आहे. जर मा. स्थायी समितीने चांगले केले असेल तर व्यवस्थित आम्हाला तारखा सांगा.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

मागील वर्षाची आपली जकात वसूली ६६ कोटी ४५ लाख ३३ हजार होती. शासनाच्या निर्देशाप्रमाणे १०टक्के वाढ करुन होणारी रक्कम ही ६ कोटी ६४ लाख ५३ हजार ३०० इतकी आहे. त्या दोन्हीची बेरीज केली असता ७३ कोटी ९ लाख ८६ हजार ३०० इतक्या रक्कमेपेक्षा जास्तीचा अभिकर्ता नेमण्यासाठी मा. स्थायी समितीने दि. ११/०५/२००७ चे प्रकरण २०, ठराव क्र. १८ अन्वये मान्यता दिलेली आहे. आणि मी यापूर्वी नमुद केल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ सेक्शन ३५ अन्वये मा. स्थायी समितीला विहित अधिकार आहेत त्या ठरावाची अंमलबजावणी मा. आयुक्तांनी राज्यस्तरीय, देशस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हास्तरीय आणि स्थानिक अशा विविध वर्तमानपत्रामध्ये जास्तीची स्पर्धा होउन स्पर्धात्मक दर महापिालकेला मिळावे ह्या उद्देशाने वर्तमानपत्रामध्ये जाहिराती देण्यात आलेल्या होत्या. सदरच्या वर्तमान पत्रातील जाहिराती हिंदी,इग्रंजी,मराठी ह्या वर्तमान पत्रातुन देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये ''दै. नवभारत, दि. इंडियन एक्स्प्रेस, दै. सामना, दै. मुंबई सकाळ, सुरज प्रकाश''. अशा वर्तमानपत्रामध्ये मोठ्या संख्येने जाहिराती देवुन याबाबतच्या निविदा विक्रीला ठेवण्यांत आलेली होती. यामध्ये निविदेची किंमत दहा हजार रूपये ठेवण्यात आलेले होते. निविदा विक्रीची तारीख १८/०५/२००७ ते ३०/०५/२००७ अशी होती. निविदा अंतिम स्विकारल्याची तारीख ३१/०५/२००७, दुपारी ०४.०० वाजेपर्यंत ठेवण्यांत आलेली होती. आणि सदरच्या प्राप्त निविदा विहीत समितीसमोर दि. ३१/०५/२००७ रोजी दुपारी ०५.०० वाजता उघडण्यात येणार होत्या. एकुण सहा निविदा विक्री झाल्या आणि विहीत मुदतीमध्ये एकुण तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. आणि सदरच्या निविदा विहीत मुदतीत प्राप्त झाल्या होत्या परंतु, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. मुन/मिभामनपा/११०७/८४८/प्र.क्र./१९७/नवि - २८, दि. ३१/०५/२००७ ला फॅक्सद्वारे ०४.४० मिनिटाला सदरच्या निविदा प्रक्रियेला शासनाने स्थगिती दिलेली होती. मी शासनाचे पत्रसुध्दा आपल्यासमोर वाचुन झाल्यानंतर जी ०५.०० (पत्राचे वाचन केले.) हे पत्र प्राप्त झाल्यानंतर जी ०५.०० वाजता निविदा ओपन करण्याची जी प्रक्रिया होती ती मा. आयुक्तांनी व निवड समितीने शासनाच्या निर्देशाप्रमाणे स्थगित ठेवलेली आहे. आजसुध्दा ती त्याच पध्दतीत कायम आहे. शासनाने या पत्राद्वारे जे वस्तुस्थिती दर्शक अहवाल मागवायचे निर्देश दिलेले होते. त्याबाबतचे अहवाल ३१/०५/२००७ ला मनपा/जकात/१२२/२००७-२००८ त्याच दिवशी जो आपला वस्तुस्थिती अहवाल आहे. जो आपल्यासमोर मी मांडलेला आहे तो शासनाच्या निर्देशनास आणलेला आहे. त्यामध्ये आम्ही शासनाला विनंती केलेली आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेने जकात वसुली निविदा प्रक्रिया २००७ - २००८ संपुर्ण पणे शासनाच्या विहित सुचनेप्रमाणे इतर महापालिकांनी करित असलेली कार्यवाही विचारात घेउन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या विहित तरतुदीनुसार, नियमानुसार पारदर्शक पध्दतीने स्पर्धात्मक निविदा प्राप्त होण्याच्या उद्देशाने संपुर्ण कार्यवाही पार पाडलेली आहे. असे उपरोक्त अहवाल पाहता आपल्या निदर्शनास येईल. त्यामुळे गुणात्मक दृष्ट्या व महापालिकेचे हित विचारात घेवुन शासन स्तरावरुन मिरा भाईंदर महानगरपालिका जकात वसुली स्तरावरुन मिरा भाईंदर महानगरपालिका जकात वसुली निविदा सन २००७ - २००८ याला देण्यात आलेली स्थगिती तात्काळ उठविण्यांत यावी. कारण अभिकर्ता नेमुन निविदा नाही दिल्यास नगरपालिकेच्या उत्पन्नात घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही या प्रकरणात वस्तुस्थिती आहे. शासनाकडुन स्थगिती आदेश उठवल्याचे पत्र अजुन प्राप्त झालेले नाही. २२/०६/२००७ पर्यंत त्यांची मुदत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्यानंतर आपण सायमल्टेनिअसली जो पर्यंत आदेश रद्द होत नाही तो पर्यंत कंटीन्यु करणार?

**मिलन म्हात्रे :-**

कोणत्याही प्रकरणाला ज्या दिवशी न्यायालयात स्थगिती किंवा कोशो ज्युडीशिअरी मशिनरी जी आहे किंवा जे काही पावर्स आहेत. त्यांच्याकडे स्थगिती लागते त्या वेळेला हे प्रकरण कोणतेही असो, पाच रुपयाचे

असो, पाच करोडचे असो किंवा जे काही पावर्स आहेत. त्यांच्याकडे स्थगिती लागते त्या वेळेला हे प्रकरण कोणतेही असो, पाच रुपयाचे, असो, पाच करोड असो किंवा पन्नास करोडचे असो, हे १०० टक्के वादांकित असते. आपल्या मा. आयुक्तांची नियुक्ती करणारे, आपल्या नियुक्तीची पत्र काढणारे हेड ऑफ दि ऑफिसर मंत्रालयात बसलेले आहेत. ते आपल्यापेक्षा १०० टक्के सक्षम असतात. ह्याच्यात काय झाले हे मी बोलत नाही. कारण दोन त्या निविदा बघितल्या. मंत्रालयात सुध्दा खेळखंडोबे काय चालले आहेत. हे आम्हाला माहिती आहेत. पण मी तो विषय सांगत नाही. तुमच्या कॉम्पिटन्ट ऑथेरीटीने ज्या दिवशी ही स्थगिती दिली त्या दिवशी मी सभागृहाला ठामपणे सांगतो की, स्थायी समितीने ह्याच्यामध्ये चुकीचा निर्णय घेतला होता. जी काही प्रक्रिया ह्याच्यामध्ये चुकीचा निर्णय घेतला होता जी काही प्रक्रिया आहे ती चुकीची झाली म्हणुन शासनाने स्थगिती दिली.

**मा. उपायुक्त (मु.) सो :-**

मा. स्थायी समितीने चुकीचा निर्णय घेतला म्हणुन अशी कोणतीही स्थगिती शासनाकडुन प्राप्त झालेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. स्थायी समितीने जो ठराव केला त्याच्यावर तुम्ही ॲक्ट केले. तुम्ही जी कार्यवाही केली त्याच्यावर स्थगिती आली. मा. स्थायी समितीने तुम्हाला ठराव दिली त्याच्यापुढे प्रोसिजर झाली. त्याच्यावर तुम्ही अंमलबजावणी केली आणि तुमच्या अमंलबजावणीवर महराष्ट्र शासनाने स्थगिती दिली हा संपुर्ण पणे इतिहास मी तुम्हाला सांगतो आतापर्यंत कोणत्याही निविदेला, दोन तीन वर्षांच्या निविदेला शासनाने आम्ही स्वतः पत्रव्यवहार करुन सुध्दा स्थगिती दिलेली नव्हती आम्हाला मग कोर्टात जावे लागले आता ही शासनाने स्थगिती दिलेली आहे. आमचा एकच आग्रह होता. मा. स्थायी समितीने जे काही केले त्याला आम्ही विरोध करतो अशातला भाग नाही पण मा. महापौरांनी तुम्हाला हे दिल्यानंतर तुम्ही मा. महासभेपुढे आणायला पाहिजे होते. आज तुम्ही ही वस्तुस्थिती सांगता मागे मी तुम्हाला जे बोललो दोन महिन्याचा कालावधी जो ऑक्ट्रॉय वाल्याला एखाद्या पुढाऱ्याच्या संगनमताने तुम्हाला चाळीस पन्नास लाखाला लॉस झाला आहे. त्या माणसाने तुमच्या पैशाची मागणी केली आहे ती व्यक्ती मा. आयुक्तांच्या केबिनच्या बाहेर तास न तास बसलेली असायची.

**मा. उपायुक्त (मु.) सोा. :-**

कृपा करुन आपल्याला सांगतो हे सभागृह आणि आम्ही कोणीही त्याची मागणी मान्य केली नाही ती वस्तुस्थिती आपल्याला माहिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे प्रकरण होतात. एखादा माणुस तुमच्याकडे येतो, पैशाची मागणी करतो, हे सर्व काय चालले आहे? आम्ही तुम्हाला परवानग्या देत नाही का? दोन महिन्याकरिता लेट झाला. आणि त्याच्यानंतर त्याच्यामध्ये नेमके काय हे आम्ही नंतर सांगु पण तो ठेकेदार तुमच्या केबिनच्या बाहेर बसायचा. तो दोन तीन महिने पैशाची मागणी करत होता. हे सगळे जे प्रॉब्लेम येतात ते आपणच तयार करत असतो. आज मा. स्थायी समितीने केले तुम्ही मा. महासभेपुढे आणायला पाहिजे होते. मा. महापौर म्हणतात. आम्ही गोषवारा दिला पण प्रशासनाने आम्हाला पुढे गोषवारा आणुन दिला नाही. आज स्थगिती लागली आज आमच्या सभागृहातील सर्व सदस्यांना कळले की, ऑक्ट्रॉयची स्थगिती लागली.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, मी आपल्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे ह्यांनी ऑक्ट्रॉयच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केला. मला एक दुःख वाटते की, एखाद्या महत्वाच्या प्रश्नामध्ये आपण दुसरा एक महत्वाचा प्रश्न धुसखोरी करुन या सभागृहाला द्विधा अवस्थेत घेवुन जायचे हे बरोबर नाही. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी एस.आर.ए च्या संदर्भामध्ये आणलेला प्रश्न तो अंत्यत महत्वाचा आहे. सन्मा. श्री. चंद्रकांतजी वैती आणि सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील यांच्यामध्ये कितीतरी जुगलबंदी झाली. तरी ती एका पक्षाची माणसे आहेत. एका विचाराची सुध्दा माणसे असतील मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे ह्यांचा जो विषय आहे. त्याचे मी समर्थन करेन. त्याला कोणाला घाबरायचे, कोणाला झुकायचे अशातला भाग नाही. आपण जे काही उपस्थित केलेले मुद्दे आहेत. आपण आपल्या उत्तरार्धामध्ये बोलता की, आमचा काही विरोध नाही. आम्हाला हे मंजुर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दोन वेळ मंजुरी माझ्या तेव्हा तुम्ही पण माझ्याबरोबर सभागृहात स्थायी समितीमध्ये होते.

**लिओ कोलासो :-**

आपण सभागृह बरोबर चालवत होतो. त्यावेळेला स्टँडींग कमिटी बरोबर चालायची मला माहिती आहे. मी हे खात्रीपुर्वक सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजेच आताच्या वेळीची बरोबर चालत नाही.

**लिओ कोलासो :-**

आता त्यांनी जे डिटेल्स दिलेले आहेत ते अत्यंत बरोबर आहेत. मा. महापौर साहेब, एस.आर.ए सारखा महत्वाचा शहरातील झोपडपट्ट्या संबंधामध्ये जो विषय आहे. त्याचा पहिल्यांदा आपण विचार करायला पाहिजे आणि ऑक्ट्रॉयच्या संदर्भात विशेष उल्लेखद्वारे स्पेशल मेन्शनद्वारे तो विषय आपण दुसऱ्या वेळेमध्ये घेवु शकतो.

**नरेंद्र मेहता :-**

विषय ऑक्ट्रॉयचा नव्हता. विषय एस.आर.ए. चा होता मॅडम, तुम्ही असे म्हटले होते की, गोषवाऱ्यावर आम्ही चर्चा करुन अधिकारी किंवा प्रशासनाकडुन घेवु. माझे असे म्हणणे आहे की, अधिकारी किंवा प्रशासनाकडुन घेउ. माझे असे म्हणणे आहे की, हे कोणाला विचारुन रद्द झाला. होता मला तेवढेच विचारायचे होते. तुम्ही थोडक्यात एक लाईन सांगायची होती. की, त्यांनी परस्पर न विचारता तिकडे दिले आणि त्याच्यावर स्थगिती आली. तुम्ही अजुनपर्यंत मला सांगता की, ते शिफारस होउन मा. महासभेपुढे येणार आहेत. आता कसली शिफारस होउन मा. महासभेपुढे येणार आहे? ते येणारच नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम ह्या सभागृहामध्ये मघासपासुन जो काही वाद निर्माण झाला. मी मगाशी आपल्याला विचारले की, आपण सभागृहापुढे जे विषय आणता तेव्हा आमचे नेते श्री. चंद्राकांतजी वैती यांना विचारुन आणता की, नाही? आपण प्रशासनाला विचारता की नाही? यातले किती विषय त्यांना विचारुन घेतले? या संदर्भात मी तुम्हाला प्रश्न विचारला आपण त्या संदर्भात मी तुम्हाला प्रश्न विचारला. आपण त्यासंदर्भात उत्तर दिले त्या दिवशी सुध्दा आपण सांगितले की, त्यांना त्या संदर्भात माहिती दिलेली या ठिकाणी मी स्वतः स्पष्टीकरण देतो की, या संदर्भात मी काही आपल्याला विषय दिले होते का? या विषयापैकी एक तरी विषय दिला आहे का? हा झोपडपट्टीचा विषय हा श्री. प्रफुल्ल पाटील यांचा विषय आहे का? ह्या ठिकाणी सन्मा. श्री. लिओ कोलासो आणि सन्मा. परशुराम पाटील यांनी सांगितले की, हा झोपडपट्टी हा विषय माझा नाही हा विषय मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी आणलेला विषय आहे पण ॲक्चुअली हा विषय मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी नाही आणायला पाहिजे होता. कारण मा. पिठासीन अधिकाऱ्यांनी नाही आणायला पाहिजे होता. कारण कायद्यामध्ये तरतुद काय आहे की, झोपडपट्टी डिक्लेअर करायची काम हे मा. आयुक्तांचे आहे. मी तोच ठराव आणला की, मा. आयुक्तांनी त्यांचे काम करावे कुठली झोपडपट्टी वाचवावी, किंवा अनधिकृत झोपडपट्टी अधिकृत जाहिर करावी? सगळी मा. आयुक्तांची जबाबदारी होती. आम्ही सांगुन या ठिकाणी कोणती झोपडपट्टी होणार नाही. आणि म्हणुन ह्यापुर्वी याशहरामध्ये ज्या झोपडपट्ट्या अधिकृत म्हणुन जाहिर झालेल्या आहेत. त्यासंदर्भात गॅझेटपण झालेले आहे. त्याच्यानंतर काही झोपडपट्ट्यांची नावे घेतो. संदानंद नगर, मुर्धा, इंदिरा नगर, देवतलाव, लाल बहादुर शास्त्री नगर, उत्तन, नेहरु नगर, नाझरेथ आगार, डाचकुल पाडा, चेना पाटील पाडा, चेना बेलकरी पाडा, माशाचा पाडा अशा काही ज्या झोपडपट्ट्या झालेल्या आहेत. त्या झोपडपट्ट्या अधिकृत करायच्या की, अनधिकृत ठेवायच्या या संदर्भात मा. आयुक्तांनी या कायदयाच्या असतील तर त्या घोषित कराव्यात. अनधिकृत असतील तर घोषित करु नये. त्या काढुन टाकाव्यात दुसरा प्रश्न असा आहे की, एस.आर.ए स्कीमचा या विषयाशी जोडला गेला एस. आर.ए. स्किम आणण्याबाबतचा सुध्दा विषय आम्ही कोणी दिलेला नाही. एस.आर.ए. चा विषय ह्या झोपडपट्टीला लावु नये. हा विषय वेगळा आहे. एस.आर.ए चा विषय याच्या पुढे येतो. ह्या विषयावर आम्ही बोलणारच आहोत. त्या विषयावर आम्हाला बोलण्याचे अधिकार आहेतच पण एस.आर.ए स्कीम या झोपडपट्टीला लागु करा. असा विषय मी आता घेतलेला नाही. हा जो ठराव आहे तो एवढाच आहे की, कायद्याच्या तरतुदीनुसार मा. आयुक्तांचे जे अधिकार आहेत. ते मा. आयुक्तांनी बजावावेत आहेत आणि अशा ज्या झोपडपट्ट्या शहरात अधिकृत आहेत. त्या अधिकृत कराव्यात घोषित कराव्यात.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर सचिवांनी पुढील विषय घ्यावा.

**रतन पाटील :-**

असे नाही चालणार. आम्हाला याच्यावर निवेदन करायचे आहे.

(सभागृहात गोंधळ.)

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी कधीपासुन आपल्याकडे बोलण्याची मागणी करतो. आपण आम्हला परवानगी दिली नाही. या वेळेला सगळ्यांनी बोलले.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, कुठल्या झोपडपट्ट्या आहेत ते तुम्ही डिक्लेअर करा. काशिची एक झोपडपट्टी आहे. त्याचे नांव घेतलेले नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण एका बाजुला निवेदन करुन सांगता की, प्रशासनाने गोषवारे द्यायला पाहिजे होते. जर प्रशासनाने आपल्याकडे गोषवारे दिले नाहीत. मग हा विषय घेतला कशाला? आपल्याला माहिती

आहे. मा. आयुक्तांनी सांगावे की १९९५ नंतरच्या किती झोपडपट्ट्या आपण दिलेल्या आहेत ? या झोपडपट्ट्याची यादी नाही गोषवारा नाही, मग हा विषय घेण्याची गरजच काय? पाणी कुठे मुरते? मागच्या सभेमध्ये असे ठरले होते की, ज्यांना फोटोपास दिले आहेत. त्याची चौकशी करा. बोगस फोटोपास दिलेले आहेत. त्याच्या चौकशीचा अहवाल आणा. मग तेव्हा हे विषय आणा. व्यवस्थित प्रशासनाकडुन त्याची यादी इथे आणा. सन्मा. नगरसेवक श्री. प्रफुल्लजी पाटील यांच्याकडे यादी आहे. आमच्याकडे यादी नाही. प्रशासनाने यादी द्यायला पाहिजे होती. साहेब, विषय व्यवस्थित व्हायला पाहिजे आणि त्या विषयाच्या संदर्भातच तुम्ही गोषवारा द्या. हा विषय भलता सलता ठराव मांडु नये. प्रशासनाने याच्यावर खुलासा करावा.

**हॅरल बार्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन करतांना बऱ्याचशा सदस्यांनी आपल्याला विनंती केली की, ठरावाचे वाचन झाल्यानंतर या विषयावर चर्चा करावी. आपण अशा प्रकारे घाई गडबडीमध्ये निर्णय घेउन ठराव मंजुर असे सभागृहाला आपणच बोललात. पत्रकार मंडळी येथे बसलेले सभागृहात प्रेक्षक बसलेले आहेत. याचा चांगला मॅसेज लोकांमध्ये जात नाही ह्या विषयावर सभागृहाला मा. आयुक्ताकडुन खुलासा व्हावा असे सगळ्यांचे मत होते. परंतु, सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी जो विषय मांडलेला आहे. सभागृहासमोर झोपडपट्टीच्या विषयावर कसलाही गोषवारा नाही तरी या सभागृहामध्ये आजच्या विषयपटलावर आलेला प्रकरण क्र. ३८ चा विषय मा. आयुक्तांकडुन ह्या विषयावर सविस्तर गोषवारा यावा आणि त्यानंतर हा विषय विषयपटलावर आणावा. असा मी ठराव मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

अनुमोदन आहे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, या विषयावर एक ठराव आपण आधी घेतला आहे. नक्की ठराव झाला आहे काय?आपण ठराव मंजुर दिला होता तो ठराव झाला आहे का?

**परशुराम पाटील :-**

त्याला अनुमोदन कोणी दिले?

**मा. महापौर :-**

जो ठराव मांडलेला आहे तो मा. आयुक्तांचा अधिकार आहे. मा. आयुक्तांनी डिक्लेअर करा असा ठराव मांडलेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, १२ जुन १९८५ ला या नगरपालिकेची स्थापना झाली. २८ फेब्रुवारी २००२ ला महानगरपालिकेची स्थापना झाली. २००१ च्या सेंन्सस प्रमाणे या शहराची लोकसंख्या ५,२०,३०१ होती या शहरामध्ये ३५ झोपडपट्ट्या होत्या. एक रेल्वेने तोडली. वीस सरकारी जागांवर आहेत. चौदा खाजगी जागांवर आहेत. त्या व्यतिरिक्त या शहरामध्ये झोपडपट्ट्यांमध्ये वाढ झाली असे मी मागच्या सभेत सांगितले आणि आपल्याकडे याची सर्वाची नोंद असताना आपण मागे झोपडपट्टयामध्ये काही फोटोपास दिले त्या फोटोपासमध्ये फार मोठा गोंधळ झाल्याचा आमचा आरोप आहे. त्याची चौकशी व्हायला पाहिजे ती आतापर्यंत झाली. नाही. त्यावेळेला २००० साली या शहरामध्ये एकुण १२,८३२ झोपडपट्ट्या होत्या आणि यातील लोकसंख्या ३८,१३७ इतकी होती. बारा हजारांच्यावर झोपडपट्ट्यांची नोंद झाली हाती. आज शहरामध्ये किती झोपडपट्ट्या आहेत हे तुम्हाला माहिती आहे का? आज त्याच्यापेक्षा दुप्पटीने वाढ झाली तिप्पटीने वाढ झाली. दिड लाखाच्या घरात या शहरामध्ये झोपडपट्टयांमध्ये लोक राहतात. १/१/९५ च्या कायदयाप्रमाणे ही घरे अधिकृत करायला शासनाने २००२ ला तसा निर्णय घेतला. पुन्हा हायकोर्टाने त्याला स्थगिती दिली आणि त्याच्यावर इम्प्लीमंटेशन होत नाही याबाबत महापालिकेने परत एकदा सर्व्हे करुन घ्यायला पाहिजे होता. ज्याअर्थी प्रशासन याच्यावर आपले मत सादर करत नाही त्याअर्थी प्रशासनाकडे या संदर्भातील पूर्ण माहिती उपलब्ध नाही. मग आपल्याला अशी घाई कसली आणि महासभेसमोर हा विषय येण्यापेक्षा आयुक्तांनीच याविषयामध्ये या झोपडया घोषित करण्याचे अधिकार त्यांना आहेत. महासभेसमोर आणला किंवा महासभेसमोर आणून आपण त्यांना यांच्या निदर्शनास आणण्याच्या आधी मा. महापौर मॅडम आपण जर हा ठराव आणला असेल तर आपण हा विषय आणला असेल तर आपण तशा आशयाचे आयुक्तांना पत्र दिले होते का? किंवा संबंधित नगरसेवकांना ज्यांना असे वाटले होते की खरंच झोपडपट्टयांचा विकास झाला पाहिजे तर त्यांनी या विषयावरती काही लिखाण केलेले आहे का? असेल तर त्यांनी आयुक्तांना सादर करावे. मला सांगण्याची काही गरज नाही. परंतु, ह्या झोपडपट्टया व्यतिरिक्त या शहरामध्ये आणखिन नविन झोपडयांची निर्मिती झाली. त्यावेळेला आपल्या प्रशासनाने काय केले? आज जे आपले प्रशासन याबाबतीत सुस्त आहे. एखाद्या इंडस्ट्रियल मालकाने १०,०००/- रु. भरुन परवानगी घेतली तरी आपला अधिकारी जातो तो गाळा तोडतो. पण झोपडया होतात त्या आपण तोडतो का? त्या झोपडया कशा होतात? त्याच्यात कुटुंब राहतात का? फक्त प्लॅस्टीकच्या गोणी बांधल्या जातात ७-८ दिवस त्याच्यामध्ये ४-५ जण वास्तव्य करतात. मग ते कोणाला तरी १५-२०-२५ हजारामध्ये विकतात. मी मागच्या सभेतही आयुक्त सो. आपल्याला सांगितलेले आहे की, अशा झोपडया विकसित करण्यांवर आपण अंकूश लावायला पाहिजे. त्यांच्यावरती फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजे. पोलिस

कमिशनर सागरीया पोलिस आयुक्तालयासाठी जी जागा रिझर्व्ह केली आहे त्याच्यामध्ये आज २००-२५० झोपडया बांधल्या आहेत. त्यात लोक राहत नाहीत. त्याच्यात कचरा/प्लॉस्टीक स्टोअर करण्याचे काम सुरु आहे. मग ही जबाबदारी कोणाची आजच्या महासभेने हा विषय आयुक्त साहेब आपल्यासमोर आणलेला आहे. आपल्याला विनंती करतोय की आपण ह्या विषयी आणि दुसरी एक गोष्ट ह्या विषयी पाउल उचलताना आपण आपल्या सर्व विभागीय कार्यालयांना आदेश द्यावेत व या झोपडयांना टॅक्स लावण्याचे धारिष्ठ जो अधिकारी / कर्मचारी करेल त्याच्यावर आपण तातडीने कार्यवाही केली पाहिजे. आपल्याकडे अशा काही झोपडया आहेत की ज्या कधीच अस्तित्वात नव्हत्या पण त्यांच्याकडे ०१/०१/९५ च्या आधीचा पुरावा निर्माण झाला. एका घरात समजा चार लोक राहत असतील त्यांच्या घरामध्ये चार वोटींग कार्ड असतात किंवा ते चार जण सेपरेट रहात असतील तर रेशनिंग कार्ड होतात मग त्या चार जणांचे सेपरेट झोपडपट्टीचे फोटोपास बनतात मग अशा फोटोपासची सुद्धा चौकशी झाली पाहिजे? आपण त्याचे ०१/०१/९५ चे पुरावे घेण्याचे ठरविले होते ते सुद्धा लोकांनी बनविले. तरी ही अतिशय गंभीर बाब आहे. मा. महापौर मॅडम आपण आधी बोललात की ठराव मंजूर त्यानंतर दुसरा ठराव झालेला आहे. कुठचा ठराव मंजूर ते सांगा नसेल तर मतदान घ्या. येथे विषय संपला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर आता आपल्या डिपार्टमेंटने त्यांना राईटस दिले आहेत. नळाचे कनेक्शन दिलेले आहेत. बांधकामास सर्व्हे करुन रस्ता बनवून दिलेला आहे. हे मा. आयुक्तांना माहिती आहेत का? ज्या अनधिकृत झोपडया आहेत, त्यांना लाईटसुद्धा दिलेल्या आहेत. त्यांना पाणी दिलेले आहे. त्यांना रस्ते बनवून दिलेले आहेत. आणि जे बिल्डिंगमध्ये राहणारे लोक आहेत. जे खरोखर टॅक्स भरतात त्यांना आपण सुविधा पुरवू शकत नाही आणि हे दहा रुपये टॅक्स भरणाऱ्यांना आपण एवढया सुविधा देतो? मा. आयुक्तांना याबद्दल काही माहिती आहे की, नाही? किती टेंडर निघतात? किती अनधिकृत झोपडया आहेत? त्याच्यामध्ये अजून रस्ते होतात. तिथे लाईटस जातात. आणि हा लाईटचा बोजा वर्षानुवर्षे आपल्या माथी पडणार आहे. हे तुम्ही लक्षात ठेवा. झोपडयांमध्ये किती लाईटस दिलेल्या आहेत. अधिकृत झोपडपट्टींना दिले. त्याला आमची हरकत नाही. अनधिकृत झोपडपट्टयांना तुम्ही देता. रस्ते बनवून देता. संडास बनवून देता.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील, चर्चा कराल तेवढी थोडी आहे. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांच्या ठरावासमोर मी सभागृहामध्ये माझा ठराव दिलेला आहे. जर हा ठराव तुम्ही मंजूर केला असेल तर त्याला पॅरेलल आम्ही सेकंड ठराव दिलेला आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. मी एक थोडक्यात माहिती देतो. आपली महानगरपालिका दि. १६ ऑगस्ट २००२ ला स्थापन झाली.

**प्रफुल्ल पाटील :-**

निट ऐकून करा.

**परशुराम पाटील :-**

आपली निवडणुक १६ ऑगस्ट, २००२ ला झाली.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, प्रत्येक वेळी जर मा. विरोधीपक्ष नेते बोलतील तर आम्ही केव्हा बोलणार? तुम्ही आम्हाला बोलायची संधी दया. मा. विरोधी पक्षनेते उभे राहतात. बाकी सर्वांनी सभागृहामध्ये बोलू नये का?

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सर्व्हे नं. २०९ या जागेमध्ये जवळ जवळ दोनशे झोपडया झालेल्या आहेत आणि त्याला आशिर्वादसुद्धा काही स्थानिक लोकांचा आहे आणि त्या पद्धतीने आजपर्यंत त्यांना फोटोपास दिलेले आहेत आणि त्या झोपडपट्टया २००२ ला झाल्या तर त्या ठिकाणी फोटोपास कसे दिले?

**प्रफुल्ल पाटील :-**

कोणाच्या आशिर्वादाने झाल्या ते सांगा. हे तुम्ही पहिले स्पष्ट करा.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांच्याशी मी सहमत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही सिद्ध कराल का की, त्या आमच्या आशिर्वादाने आहेत. आम्ही समजतो की, त्या तुमच्या आशिर्वादाने आहेत.

**परशुराम पाटील :-**

घोडबंदर, उत्तन, सदानंद नगर ह्या ठिकाणी अधिकृत आहेत. त्यांना रेग्यूलाईज करा. अशा जर झोपडया आपण रेग्यूलाईज केल्या. तर दोनशे झोपडपट्टयासुद्धा आपल्याला रेग्यूलाईज कराव्या लागतील.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मुर्धा खाडीवर सन्मा. सदस्य श्री. परशुराम पाटील यांची जागा आहे. ती विकसित किंवा काही करतील. तिकडे नगरपालिकेचे समाजमंदिर बांधा.

(सभागृहात गोंधळ)

**परशुराम पाटील :-**

या सभागृहामध्ये वैयक्तिक कोणी बोलू नका.

**प्रफुल्ल पाटील :-**

ती जागा सरकारी आहे की खाजगी आहे याची चौकशी व्हावी.

**परशुराम पाटील :-**

अशा झोपडया जर तुम्ही मंजूर करत असाल तर त्या झोपडयासुद्धा तुम्हाला मंजूर कराव्या लागतील असा माझा मुद्दा आहे.

**नयना म्हात्रे :-**

झोपडयांचा विषय सोडा. यांची जागा आहे तिकडे समाजमंदिर बांधा.

**परशुराम पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मी तुम्हाला विचारतो. सर्व्हे नं. २०९ ह्या सरकारी जागेमध्ये दोनशे झोपडया बांधलेल्या आहेत. त्यांना खोटे फोटोपास दिलेले आहेत. तर त्याला तुम्ही मंजूरी देणार का? त्याला आम्ही आत्तासुद्धा मंजूरी देवू शकतो. पण त्या मंजूरी दिल्यानंतर या दोनशे झोपडयांना तुम्हाला सहाजिकच मंजूरी दयावी लागेल. मग तुम्ही देणार का? साहेब, तुम्ही जरा त्याच्यावर खुलासा करा. आणि मघाशी आपण जो ठराव डायरेक्ट मांडला की, ठराव झालेला आहे पुढचे विषय घ्या. तर नक्की ठराव कोणता आहे याचा तुम्ही खुलासा करा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, आपण ज्या झोपडपट्टया आत्ता कायदयाप्रमाणे लिगल-इललिगल ठरवणार आहेत. कोणते अधिकृत आणि कोणते घोषित करायचे. एरियावाईज आपला संबंधच नाही की, आझादनगर की काशीनगर? जे १९९५ च्या अगोदरचे असतील किंवा फोटोपास असतील, ते कोणत्याही एरियात असू दया. त्या सर्वांना तुम्ही लिगलाईज करा. झोपडपट्टया डिक्लेअर करा. सेकंड थिंग, चौदा झोपडपट्टया डिक्लेअर करा. सेकंड थिंग, चौदा झोपडपट्टया खाजगी जागेवर आहेत आणि त्यांचे कोर्ट मॅटर चालू आहेत. की आमची जागा एन्क्लोज झाली आहे. ते कोर्टात भांडतात आणि आपण त्या खाजगी जागा लिगलाईज करणार हे कुठपर्यंत योग्य आहे. तेही आपण लक्षात घ्यावे. तिसरी गोष्ट, साहेब ज्यावेळी तुम्ही झोपडपट्टया अधिकृत ठरवणार त्यासोबत तुम्हाला अनधिकृत झोपडपट्टया काढायची आपली तयारी आहे का? ते आपण लक्षात घ्यावे.

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही पहिल्यांदाच वक्तव्य दिलेले होते की जे नगरसेवक परमिशन न घेता बोलतील. ते वक्तव्य तुम्ही काढणार. आत्ता मला हे सांगा कोणाचे वक्तव्य तुम्ही काढणार? मा. आयुक्त साहेब, मा. स्थायी समितीमध्ये मी आणि सन्मा. सदस्य जयंतदादा पाटील ह्यांनी मागणी केलेली की, जे फोटोपास दिले गेलेले आहेत ते बोगस आहेत. जिथे झोपडपट्टया नव्हत्या. २००० पर्यंत रोडही नव्हता, झोपडपट्टीही नव्हती तिथे तुम्ही फोटोपास दिलेले आहेत आणि मी आणि सन्मा. सदस्य श्री. जयंतदादा पाटील ह्यांनी मागणी केलेली आहे की, आम्हाला ते रिपोर्ट पाहिजे. फोटोपास किती आणि कधी दिलेले आहेत. आम्हाला अजून तो रिपोर्ट मिळालेला नाही. मला अजून लिस्ट मिळालेली नाही. जिथे रोड नव्हता, जिथे आम्हाला आश्वासन दिलेले की, दहा दिवसात चौकशी करुन आम्हाला जवाब देणार आणि साहेब आता दहा दिवसांपेक्षा जास्त झालेले आहेत. ती चौकशी कुठंपर्यंत झालेली आहे ते आम्हाला सभेमध्ये सांगा.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर महोदया आणि सर्व सन्मा. सदस्य, सदरची माहिती गोळा करण्याचे काम चालू आहे. जवळ जवळ ५०टक्के काम झालेले आहे. अजून दहा दिवसात मी तुम्हाला माहिती देतो.

**गिता जैन :-**

साहेब हे उत्तर मला पंधरा दिवसांपूर्वीसुद्धा मिळालेले आहे.

**शुभांगी नाईक :-**

दहा दिवसानंतर आचारसंहिता आली. मग तुम्ही कधी देणार?

**मिलन म्हात्रे :-**

माहिती गोळा करण्याचे काम तर सकाळपासून संध्याकाळपर्यंत चालते. त्या रिपोर्टचे बोला.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

०१/०१/१९९५ पूर्वीचे जवळपास पंधरा ते वीस डॉक्युमेंटस लागतात.

**गिता जैन :-**

मा. उपायुक्त श्री. संभाजी पानपट्टे साहेब, मी मानते की, तुमचे काम चालू आहे. आतापर्यंत तुम्ही शंभर, दोनशे, तीनशे, किती चौकशी केले ते तरी सांगा. ते प्रोसेस रिपोर्ट तर असतील दहा केली, पंधरा किती, वीस केली, शंभर केली, किती केली?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते बोलवून मी दोन मिनिटात तुम्हाला सांगतो.

**गिता जैन :-**

कधी?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आत्ता मी संबंधित अधिकाऱ्यांना बोलवतो आणि तुम्हाला सांगतो.

**गिता जैन :-**

मा. महासभेपुढे तुम्ही मला माहिती दया.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी तुम्हाला दोन मिनिटांत सांगतो.

**परशुराम पाटील :-**

सर्व्हे क्र. २०९ मध्ये ज्या दोनशे झोपडया झाल्या आहेत. त्यांना तुम्ही नोटिसा दिल्या आहेत का?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

अगोदर चौकशी तर होउ दया. चौकशी झाल्यानंतर ते होईल.

**नरेंद्र मेहता :-**

१९९५ च्या अगोदरची जरी असली तरी हा सी.आर.झेड असताना तुम्हाला त्याला लिगलाईज करता येते. किंवा झोपडपट्टी घोषित करता येते हे`जरा लक्षात घ्या आणि तुम्ही जर ते लिगलाईज केले तर बाकीचे इतर सी.आर.झेड तुम्ही रेग्यूलाईज करावे लागतील.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. मा. उपायुक्त श्री. एस.एस. पानपट्टे साहेब, अजून फोटोपास देणे चालू आहे का?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

फोटोपास देण्याची कार्यवाही चार महिन्यापासून बंद आहे.

**मिलन पाटील :-**

जर दोन महिने अगोदरची असेल तर?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

कार्यवाही बंदच आहे.

**मिलन पाटील :-**

दोन महिने अगोदरची असेल तर?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मला तसे दाखवा.

**मिलन पाटील :-**

काय कार्यवाही कराल?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

काय करायची ती कार्यवाही करेन.

**गिता जैन :-**

मा. आयुक्त साहेब, मला अजून एक माहिती पाहिजे. माझे फर्स्ट टर्म आहे. मला हे माहिती नाही. पण जसा सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी ठराव मांडला की, आम्ही तुम्हाला हे झोपडपट्टया डिक्लेअर करायचे अधिकार देतो. म्हणजे तुम्ही सर्व अधिकार मा. महासभेला विचारुनच घेता का? म्हणजे एवढे सगळे अधिकार आहेत ते तुम्हाला मा. महासभेने दिल्यानंतरच मिळतात का? हा अधिकार तुम्हाला लागण्यासाठी तुम्हाला मा. महासभेची परवानगी पाहिजे का?

**जयंत पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाच वर्षांच्या कालावधीतील ही शेवटची सभा आहे. आणि त्याच्यामुळे बऱ्याच जणांना बरेच काही बोलण्याचा उत्साह निर्माण झालेला आहे. त्याच्यामध्ये तात्वीक किती? अतात्वीक किती? कायदेशीर किती? बेकायदेशीर किती? याचा कोणीही विचार करत नाही. मघाशी बोलता बोलता ऑक्ट्रॉयचा विषय आला. मा. स्थायी समितीमध्ये ऑक्ट्रॉयवर कुठल्याही तऱ्हेचा चुकीचा ठराव आम्ही मांडलेला नाही. मी मा. स्थायी समितीचा सदस्य म्हणून या विषयावर सांगतो. आणि गेल्या दोन वर्षामध्ये मी असल्यामुळे, सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब, आपल्यासाठी सांगतो, कुठल्याही तऱ्हेचा असा ठराव आम्ही केलेला नाही आणि केला असेल तर आपली बॅग कायदयाच्या पुस्तकांनी नेहमी भरलेली असते आणि

आपली दिशा असते हायकोर्ट किंवा सुप्रिम कोर्ट प्रकरण क्र. ३८, झोपडपट्टया घोषित करणे विषय खरोखरच चांगला आहे. या शहरात गरिबांच्या झोपडपट्टया झाल्या असतील तर त्या गरिबांना निवारा दयायचा किंवा दयायला पाहिजे हा शासनाने नियम केलेला आहे. परंतु गरिब हा शब्द मी मुद्दाम वापरतो. झोपडपट्टया कशा बनत गेल्या आणि कशा वाढत गेल्या याचा मी बराचसा साक्षीदार आहे. दुदैवाने किंवा सुदैवाने मी एकही झोपडी बनवली नाही. एकाही झोपडीला प्रोत्साहन दिलेले नाही. हे मी या सभागृहात अगदी खात्रीपूर्वक आणि गंभीरपणे सांगतो. परंतु, ज्या प्रभागाचे मी नेतृत्व करतो. त्या प्रभाग क्र. ०८ मध्ये तीन झोपडपट्टया आहेत. त्यातली सर्वात मोठी झोपडपट्‌टी इंदिरा नगर, मला लागूनच आहे आणि एस.एन. कॉलेजला खेटून उभी आहे. सुरुवातीला लहान-लहान झोपडया बनल्या. राहायला निवारा नाही गरिब आहेत. कालांतराने त्या झोपडयांवर इमले चढले. म्हणजे जी पाचशे लोकांची वस्त्ी होती. त्या वस्तीची दोन हजार लोकं झाली. त्यांना दिलेल्या सोयी-सुविधा मग त्या गटाराच्या असतील, प्रातःविधीच्या असतील, पाण्याच्या असतील त्या खुप कमी पडू लागल्या. एक इंच जागा तिकडे कुठे शिल्लक राहिलेली नाही. कारण त्यांनी इमले चढवल्यानंतर त्याच्यामध्ये भाडेकरु ठेवले. बिचारे गरिब लोक होते. भाडे खाउन पोट भरत असतील. आणि म्हणून प्रचंड ताण त्या संपूर्ण यंत्रणेवर आला. नगरसेवक काहीही करु शकत नाही. कुठेही एक इंच जागा नाही. दहा वीस संडास बांधले ते अपुरे पडू लागले. त्याच्यामुळे मी मागच्या मिटींगमध्ये या विषयावर बोललो. कशा तऱ्हेचे फोन आम्हाला येतात. हातात चहाचा कप असतो आणि तिकडे काहीतरी तुंबलेले आहे. असे सांगून आमच्या चहाचा आस्वाद नाहीसा करुन टाकतात. इंदिरा नगरच्या पुर्वी असणाऱ्या झोपड्यात्याच्यात प्रचंड प्रमाणात वाढ झाली. महापालिका झाल्यानंतर महापालिकेकडे कचरा डम्प करण्यासाठी कुठेही मैदान नव्हते. आणि आपल्याला माहिती आहे, ते चुकीने असो, आपल्या गैरसोयीने असो किंवा आपल्याकडे जागा नसल्यामुळे असो. आपण बांधाच्या पलिकडे, इंदिरा नगरच्या पलिकडे, उत्तरेच्या बाजूला मॅन गोजवर आपण कचरा टाकला. आणि त्या दृष्टीने तसा आदेश मा. कलेक्टर साहेबांकडे गेल्यानंतर, त्यांना माहिती मिळाल्यानंतर आपल्या अधिकाऱ्यांवर त्याबाबतीत केसेससुद्धा झाल्या आणि त्या डम्प केलेल्या कचऱ्यावर नवीन झोपडपट्‌टी वसली. २००२ साली महापालिका होते. त्याच्यावर कचरा टाकला जातो आणि त्याच्यावर झोपडपट्टी बनते आणि त्याला प्रशासनाने ओळखपत्र दिली आता एवढा पुरावा दुसरा असण्याची काही गरज नाही. तुम्ही जर खाली पाहिले तर तुम्हाला कचरा आढळेल. आणि तो कचरा आपण १९९५ च्या अगोदर टाकलेला नव्हता. मला माहिती आहे त्या कशा बनल्या. त्याबाबतीत माझा संपूर्ण अभ्यास आहे. कारण माझ्या समोरच घडलेल्या घटना आहेत. ह्या नगरपालिकेच्या अधिकाऱ्याने, त्यांच्या त्या ओळखपत्रावर सह्या आहेत. माझ्याकडे ती माहिती आलेली आहे. माझ्याकडे ओळखपत्र पाठवलेली आहेत. मा. उपायुक्त श्री. एस.एस. पानपट्टे साहेबांच्या सह्या आहेत. सन्मा. उपायुक्त श्री. एस. एस. पानपट्टे साहेब आपल्या सह्या आहेत की नाहीत हे सांगा.

**श्री. पानपट्टे सो. :-**

असतील. ०१/०१/१९९५ पुर्वीचे जे काही पुरावे असतील......

**जयंत पाटील :-**

असतील नाही आहेत.

**श्री. पानपट्टे सो. :-**

मी दिलेल्या असतील.

**जयंत पाटील :-**

सह्या करताना किती पैसे घेतले?

**श्री. पानपट्टे सो. :-**

साहेब, असे काहीतरी बोलू नका.

**जयंत पाटील :-**

काहीतरी नाही. मी हे सभागृहात गंभीरपणे बोलतो.

**श्री. पानपट्टे सो. :-**

साहेब व्यवस्थित बोलायचे.

**जयंत पाटील :-**

व्यवस्थितच बोलतो. तुम्ही मला शिकवू नका कसे बोलायचे ते. मला या सभागृहामध्ये कसे बोलायचे हे शिकवण्याचा तुम्हाला अधिकार नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपल्याला जे काही वक्तव्य करायचे असेल ते वक्तव्य आपण करा. परंतु, हे जे महापालिकेचे अधिकारी आहेत. त्या अधिकाऱ्यांना वैयक्तिक टार्गेट करुन बोलू नका अशी विनंती मी सुरुवातीलाच आपल्याला केलेली आहे. आपल्या अडचणी असतील, आपली कामे होत नसतील किंवा अन्य कुठलीही कारणे असतील, आपण जे वक्तव्य कराल हे चांगल्या पद्धतीने वक्तव्य करा.

**जयंत पाटील :-**

ठिक आहे त्यांनी एक रुपया खाल्ला नाही. ते अगदी स्वच्छ आहेत, हरकत नाही. परंतु, ती झोपडपट्टी बनली आणि त्याला ओळखपत्र दिली गेलेली आहेत, हे सत्य नाकारता येणार नाही. जे डंम्पींग ग्राउन्ड २००२

साली होते. मा. श्री. शिंदे साहेब असताना, मा. सचिव श्री. हरेश पाटील माझ्याबरोबर तिकडे स्मशानात गेले होते. त्यांनी जेव्हा पाहिले त्यांना आश्चर्य वाटले की, इकडे झोपडपट्टी कशी बनली? कालपर्यंत नव्हती, आज कशी झाली? गरिबांनी निवारा दयायला पाहिजे ते आमचे कर्तव्य आहे. शासन देते, केंद्र सरकार देते. परंतु, नक्की गरीब कोण? ह्या गरिबांचा शोध आपण घ्यायला पाहिजे. एक यंत्रणा तिकडे कायमची राबते. जागा दाखवते, बोर्ड दाखवते, झोपडपट्टी बनते आणि झोपडपट्टी विकली जाते. जागा कोणाची? सर्व्हेनंबर २०९ हा मा. कलेक्टरांचा आहे. त्यात तिवराची झाडे आहेत. मॅनग्रोव्हची झाडे आहेत. मा. सुप्रिम कोर्टाचा २००५ चा आदेश आहे. मी सांगायची आवश्यकता नाही साठ मिटरच्या परिधामध्ये एकही झोपडपट्टी बनता कामा नये. मग त्या झोपड्या बनल्या कशा? आणि त्या तोडायला आपल्याकडे पत्र दिल्यानंतर एकही झोपडी तोडली गेली नाही. आपली समिती नेमलेली आहे. आपली चौकशी झाली. त्या मा. स्थायी समितीमध्ये आपल्याला सांगितले गेले की, मुंबईमध्ये ओळखपत्र दिलेल्या रस्त्यावरच्या झोपड्या महापालिकेने रातोरात तोडुन टाकल्या आम्ही नागरिकांच्या सुविधा बघायच्या की, झोपड्याचे बघायचे? मी गरिबांबद्दल निश्चित काही बोलत नाही. परंतु,एका एकाच्या इकडे झोपड्या तिकडे झोपड्या आहेत. तुम्ही कोणाकोणाला घर बांधुन देणार आहात. तुम्ही कोणाकोणाला सुविधा देणार आहात. ह्या शहरातील प्रामाणिक करदाता आज बोंबाबोंब करतो. त्याला कुठलीही सुविधा नाही. ज्या रस्त्यावरुन एकुलता एक रस्ता, सकाळी ड्युटीवर जाणे आणि संध्याकाळी परत येणे याच्या पलिकडे आपण काही दिलेले नाही.

**गिता जैन :-**

ते ही फेरिवाल्यांनी अतिक्रमण केलेले आहे.

**जयंत पाटील :-**

आणि एका स्ट्रीट लाईट ते ही चालु आहेत की, बंद आहेत हे बघायला कोणी नाही. परंतु, आम्हाला इकडे झोपडपट्ट्यांबद्दल जबरदस्त पुळका येतो. मी म्हणतो, ज्या झोपडपट्टया आहेत त्या जागेवरील झोपडपट्टया आणि सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता ह्यांनी सांगितल्या प्रमाणे ज्या सी.आर.झेड मध्ये आहेत त्यांना तुम्ही सुविधा देणार का? त्या झोपडपट्टया आपण इथे द्यायला करणार आहात का? साहेब ह्याचे उत्तर आपण इथे द्यायला पाहीजे. मध्ये एक अतिशय वाईट प्रकार राई गावामध्ये घडला. माझी तर खात्री आहे की, झोपडपट्टयामध्ये राहणारे जे गुंड आहेत ते त्या घरामध्ये घुसले त्यांनी हल्ला केला असेल. असे प्रकार राजरोसपणे आपल्या शहरामध्ये होत राहतील. लोकांना लूटले जाईल. पूर्वी कधी ह्या शहरामध्ये अशा घटना घडत नव्हत्या. आपण जर मागचा इतिहास काढला तर आपल्याला कळेल की अशा तऱ्हेचे दरोडे घालण्याचे प्रकार ह्या शहरामध्ये नगरपालिका व्हायच्या अगोदर कधीही झाले नाहीत. सन्मा. सदस्य श्री. परशुराम पाटील ग्रामपंचायतीचे सरपंच होते. कधी असा प्रकार घडलेला आहे का हे ह्या सभागृहात विचारा. मी असे म्हणत नाही की, झोपडपट्टीत राहणारे सर्वच लोक चोर-दरोडेखोर आहेत. परंतु, झोपडपट्टीचा आसरा घेउन लपणारे बरेच लोक ह्या शहरामध्ये आहेत. मागे इंदिरा नगरमधून मुंबईचे पोलिस येउन राजरोसपणे गुंड घेउन जातात. ही सत्य परिस्थिती आहे. असे असताना ह्या शहरामध्ये किती झोपडपट्टी व्हावी हे ठरवणे ह्या नगरसेवकांचे काम होते. गेल्या पाच वर्षामध्ये कोणीही ह्या गोष्टीचा विचार केलेला नाही. प्रशासन काय, आणि नाही घेतले काय पैसे घेतले असे म्हटले की, त्यांना राग येतो. परंतु, ते असत्य नाही. एखादाच अविनाश भोसले पकडला जातो. परंतु, जागोजागी असे बरेच अविनाश भोसले असतात. ते पकडले जात नाहीत. आणि जेव्हा पकडले जातात तेव्हा त्यांचे धिंडवडे निघतात. मला ह्याबद्दल जास्त बोलायचे नाही. आपण ही गोष्ट लक्षात घ्या. आत्ता कुठली झोपडपट्टी घोषित करायची याचा आपण विचार करा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. साहेब, आपण मतदान घ्या. पण, मा. उपायुक्त श्री. एस.एस.पानपट्टे साहेब, आपण आत्ता जे फोटोपास दिले. त्याचे काय काय पुरावे आपल्याकडे आहेत ते आपण जरा सांगाल का? आणि कधीपासून आहेत. साहेब, कितीतरी असे फोटोपास दिलेले आहेत. आत्ता झोपडया होतात त्याला फोटोपास देतात. ते रेग्युलाईज झाल्या का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा.सभागृहामध्ये बऱ्याच वेळापासून प्रकरण क्र. ३८ च्या विषयावर चर्चा सुरु आहे, झोपडपट्टी जाहिर करण्याबद्दल. शहरातील झोपडपट्टी जाहिर करण्यासाठी शासनाने ०४ मार्च १९९६ रोजी जी.आर. पब्लिश केला आणि त्या जी. आर. प्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये मा. आयुक्तांना अधिकार दिले. मिरा भाईंदर नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकाऱ्यांना म्हणजे जेव्हा तत्कालिन नगरपालिका होती, तेव्हा मा. मुख्याधिकाऱ्यांना अधिकार दिले. त्यानंतर विरार नगरपरिषद आहे, नालासोपारा नगरपरिषद आहे, परळी-वैजनाथ आहे, रत्नागिरी नगरपरिषद आहे, कुसब नगरपरिषद आहे, हिंगोली नगरपरिषद, बुलढाणा नगरपरिषद, मलकापूर, उस्मानाबाद, पनवेल, आंबेजोगाई, या ठिकाणी एक जी.आर. काढून, १९९६ सालामध्ये हा जी.आर काढला आणि झोपडपट्टी घोषित करण्याचे अधिकार हे तिथल्या तत्कालिन अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. ह्या सभागृहामध्ये मघापासून जी चर्चा सुरु आहे. माझ्या मनामध्ये एक प्रश्न उपस्थित झाला की, १९९६ सालामध्ये आपली नगरपरिषद होती. मग, नगरपरिषद असतांना हा इश्यू का ओपन झाला नाही? किंवा जेव्हापासून शासनाने १९९६ सालामध्ये हा जी.आर. काढला. आणि हा जो जी.आर. काढला हा १९७१

सालच्या महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन व पुर्नविकास अधिनियम १९७१ च्या कायदयानुसार काढला. १९७१ साली शासनाने कायदा केल्यानंतर १९९६ सालामध्ये असा जी.आर. निघाला. आणि १९९६ सालापासून आजपर्यंत मिरा भाईंदर शहरामध्ये असलेल्या ज्या झोपडपट्ट्या आहेत. त्या आत्तापर्यंत घोषित करण्यात आलेल्या नाहीत.

**प्रफुल्ल पाटील :-**

काही घोषित झालेल्या आहेत. जवळ जवळ अठ्ठाविस झोपडपट्ट्या घोषित झालेल्या आहेत. तत्कालिन मुख्याधिकारी यांनी केल्या. मा. श्री. अजित पाटील हयांना त्या संदर्भात माहिती असेल. मी जो विषय या ठिकाणी मांडला की, ज्या घोषित केलेल्या आहेत त्या सोडून, ज्या झोपडपट्ट्या झालेल्या आहेत त्या झोपडपट्ट्या अधिकृत आणि अनधिकृत असे तपासून जर त्या अधिकृत असल्या तर त्या घोषित कराव्या असा आपल्याला अधिकार असल्याचे वक्तव्य मी केले आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण म्हणता त्याप्रमाणे मी माहिती घेतलेली आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे अठ्ठाविस झोपडपट्ट्या घोषित झालेल्या आहेत असे माझ्यातरी निदर्शनास आलेले नाही किंवा माझ्या अधिकाऱ्यांनी माझ्या निदर्शनास आणून दिलेले नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हाला मी त्याच्या संदर्भात माहिती देतो. माझ्याकडे कागदपत्र आहेत.

**अनंत पाटील :-**

नगरपालिका असतांना अठ्ठावीस पैकी एकवीस झोपडपट्ट्या त्यावेळेस अधिकृत म्हणून घोषित केलेल्या होत्या. त्यावेळेस तो विषय झाला होता. त्या विषयावर चर्चा झाली होती. नगरपालिकेचा ठराव १९९४ च्या सभेमध्ये झालेला आहे आणि घोषित केलेले आहे. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील हे सुद्धा त्यावेळेला सदस्य होते.

**मा. आयुक्त :-**

आपण सन्मा. सदस्य सांगता त्याप्रमाणे ज्या अधिकाऱ्यांना माहिती आहे त्यांनी माहिती दयावी.

**रतन पाटील :-**

प्रशासन आपल्याला माहिती देत नाही की, एवढया झोपडपट्ट्या घोषित झालेल्या आहेत. आणि आपण तो विषय इकडे आणतो.

**परशुराम पाटील :-**

ज्या अठ्ठाविस झोपडपट्ट्या रेग्युलाईज झालेल्या आहेत त्यादेखील आपल्याला माहिती नाहीत. आम्हालासुद्धा माहिती कळावी म्हणून आम्ही गोषवारा मागवत होतो.

**मा. आयुक्त :-**

झोपडपट्ट्या घोषित करताना, मग त्या मा. मुख्याधिकाऱ्यांनी घोषित केल्या काय किंवा मा. आयुक्तांनी घोषित केल्या काय? ज्यांना जे अधिकार प्राप्त झालेले आहेत त्या अधिकाराप्रमाणे अशा प्रकारच्या झोपडपट्ट्या ह्या शासकीय राजपत्रामध्ये पब्लिश कराव्या लागतात आणि त्या पब्लिश झाल्यानंतर त्या अंमलात येतात. आणि अशा ज्या झोपडपट्ट्या घोषित होतील, मध्यंतरी शासनाच्या विविध योजना आल्या. त्याच्यामध्ये एस.आर.ए. स्किमसुद्धा लागू होती किंवा त्याच्या आधी झोपडपट्टी पुनर्वसन करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने जे जी.आर. काढले. ते सगळे जी.आर. हे फक्त घोषित झोपडपट्ट्यांनाच लागू होतील. अशा प्रकारे शासनाने त्याच्यावर एक निर्बंध टाकलेला होता. परंतु, १९९६ सालापासून आजतागायत अशा प्रकारच्या, मिरा भाईंदर शहरामध्ये असलेल्या झोपडपट्ट्या घोषित झालेल्या नाहीत आणि ह्या झोपडपट्ट्या आपल्याला जर घोषित करायच्या असतील तर संबंध शहराची सिच्युएशन ह्या संदर्भामध्ये जे सर्व गटनेते असतील, त्या गटनेत्यांना विश्वासात घेवून, सर्व पक्षियांना विश्वासात घेवून त्या ठिकाणी कुठलीही अडचण येणार नाही. किंवा जे जे कायदे असतील, आत्ता सन्मा. सदस्यांनी निदर्शनास आणुन दिल्याप्रमाणे सी.आर.झेड. आहे. किंवा अन्य खाजगी क्षेत्रामध्ये एखादी झोपडपट्टी असेल तर अशा प्रकारे ही झोपडपट्टी घोषित करण्यासाठी आपल्याला कुठे कायद्याचा प्रतिबंध आहे का किंवा अडचण आहे का? ह्या सर्व बाबी तपासुन घेतल्या जातील आणि त्यानंतरच ह्या बाबतीमध्ये निर्णय घेण्यांत येईल. असे मी सभागृहाला विनम्रपणे सांगु शकतो.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, माझी मा. आयुक्तांना माझी विनंती आहे की, हा इतका गंभीर विषय आहे. आणि ह्या शहराचे दुर्देव म्हणा किंवा त्या गरिब लोकांचे दुर्देव म्हणा, याच्यात कोणाचा स्वार्थ असण्याचे काही कारण नसावे. असे सगळ्यांना प्रथमदर्शनी वाटते. पण आता जे राजकीय द्वंद चालते. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी ठराव मांडला म्हणुन दुसऱ्याचे विरोधी मांडला. शेवटच्या बैठकीमध्ये किंवा आणखीन एक सभा होईल. किंवा होणार नाही. अशा ठिकाणी जेव्हा इतके वर्ष ही मा. महासभा चालली म्हणजे महापालिका म्हणुन चालली त्यावेळीही हा विषय आला नाही. शेवटी असा मॅसेज देण्याचा प्रयत्न होतो की, मा. महापौर त्या समाजाच्या आहेत. म्हणुन त्यांना झोपडपट्टीचा कळवळा आला काय? असेही वाटायचे कोणाला कारण नाही. पण झोपडपट्ट्या घोषित होणे गरजेचे होते की, नाही? झोपडपट्ट्यांचे कैवारी असे होण्याचे कारण नाही. व

झोपडपट्टयांना न्याय द्यायला आपण प्रयत्न करतो आणि ते शासनाचे धोरण आहे. त्याची अमंलबजावणी होत नाही. याची किव वाटते. जसे मघाशी सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील ह्यांनी सांगितले की, रेल्वेची झोपडपट्टी साहेब किती द्युनिय अवस्था रेल्वेच्या जागेतील झोपडपट्टी डेव्हलप झाली त्यांनी चोवीस तासात तोडली. प्रशासनाकडे आम्ही इतका पाठपुरावा केला. त्याला यश आले नाही. हा विषय वेगळा नंतर रेशनिंगची अशी स्थिती उभी राहिली की, त्यांना कुठेही घर नाही. जिथे मिळेल तिथे ते लोक राहायला लागले. जिथे राहतात तिथे रेशनींग मिळत नाही . जी दोनशे अडतीस कार्ड रद्द केली मला ह्या सभागृहाला माहिती द्याविशी वाटते. परत कोणीतरी ओरडेल की, काका हे काय? त्यावेळेला आमदार श्री. संजय केळकर ह्यांनी रेशनिंग ऑफिसरची भेट घेतली ही माणसे जिवंत आहेत, कुठेतरी राहतात. इकडे १९७७ – ७८ सालापासुन झोपडपट्टी राहत होती ती मराठी आहेत इथपर्यंत सांगितले गेले ही बाहेरुन आलेली माणसे नाहीत. जी बंदरवाडी झोपडपट्टी होती त्यांचे रेशनकार्डपण बंद झाले होते. आपल्या या चालढकल धोरणामुळे किंवा आपण ज्या गोष्टीकडे बघायला पाहिजे त्या न बघितल्यामुळे गरिब लोकांना किती त्रास होत असेल. त्यावेळी त्यांची भेट घेतल्यानंतर ती रेशनकार्ड चार दिवसांपुर्वी ओपन झाली. त्यांना घासलेट मिळायला लागले. त्यांचा असा स्पष्ट आदेश निघाला की, बंदरवाडी झोपडपट्टी मध्ये असलेल्या लोकांना जे मिरा भाईंदर महापालिका हद्दीत कूठेही निवारा घेवून राहत असतील त्याची खात्री करायची आणि त्याच रेशनिंग कार्ड सुरु करायचे. हे कशामुळे होते? हे सर्व आपल्यामुळे होते आपण अधिकारी म्हणुन महानगरपालिके मध्ये ध्यान ठेवले नाही किंवा पुढारी म्हणुन सुध्दा ध्यान दिले नाही. म्हणुन ते होते आणि हा प्रसिध्दीचा नाही आता ही कोण म्हणते की, झोपडपट्टी वाढली हा विषय दोन्ही पध्दतीने झाला. पाहिजे. झोपडपट्टी वाढली नाही पाहिजे हे बरोबर आहे. पण जी वाढली तिला शासनाच्या कायद्यानुसार किंवा महापालिकेचे कर्तव्य म्हणुन ह्या सभागृहाचे कर्तव्य म्हणुन ज्या सवलती द्यायला पाहिजेत त्याच्यावर वादविवाद व्हायला नको. त्या सवलती द्यायला पाहिजे ज्याच्या कोणाच्या वॉर्डात असतील त्यांनी प्रयत्न करायला पाहिजे आम्ही पक्ष म्हणुन प्रयत्न करतो. पण झोपडपट्टी बनलेली असेल त्यांना सुविधा देणे हे कर्तव्य आहे. आज पाच वर्षात नगरसेवकांनी दिले नसेल तर ही त्यांची चुक आहे. पण मी त्याच्याबद्दलही बोलत नाही. पण त्यांना काहीतरी न्याय द्यायला पाहिजे की नाही? निर्णय द्यायला कुठेतरी तो निर्णय झाला. पाहिजे आज घोषित करणार असे तुम्ही सांगितले दोन ठराव झाल्यानंतर तुम्ही निर्णय मागे ठेवला. माहितीच नसेल तर निर्णय मागे ठेवणे स्वाभाविक आहे. पण जर माहिती असती, आज जर त्या घोषित झाल्या असत्या तर त्याचा पुढे कुठेतरी स्कीममध्ये बसवायच्या आहेत त्याच्यात कुठेतरी फायदा झाला असता. तुम्ही आज सांगता की, पुढे पाठपुरावा करणार. सोळा किंवा सतरा तारखेला आचारसंहिता लागेल. आम्ही सगळे बोलणारे गप्प. तुम्ही आम्हाला वेळ देणार नाही. आमचे ऐकणार नाही, काही करणार नाही. किंवा नाकारणार असे नाही पण तुमच्या हातात. अधिकारच राहणार नाही. ते कधी होणार आहे त्या गोष्टीची चिंता वाटते आम्हाला नक्की आठवत की, ते जरी कायद्यात बसत नसले तरी, तुम्ही आणलेल्या सगळ्या ठरावांना या संपुर्ण सभागृहाने सहकार्य केलेले आहे. अशी भुमिका असतांनासुध्दा पुर्ण अपयश कोणत्याही गरिब लोकांना आपण सन्मानाने सांगु शकत नाही. की, सभागृहात आम्ही तुम्हाला न्याय दिला याला कारण म्हणजे आपल्या कामाची चालढकल होते. दुसरे काहीही कारण नाही. मघाशी सन्मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती ह्यांनी सांगितले की, ती जागा शासनासाठी हवी आहे. पोलीस स्टेशनसाठी हवी आहे. आपण जागा ताब्यात घेउ शकलो नाही. आपली स्किमपण राबवु शकले नाही आणि त्याचीही नाही म्हणजे शहराला तुम्ही चांगले काय देणार? जी जमिन प्रोटेक्ट करायला पाहिजे होती. त्याच्यामध्येही अपयश आले.

**हॅरल बोर्जीस :-**

चर्चेला जेवढा वेळ द्याल जेवढा वाव द्याल तेवढा थोडासा आहे. सभागृहामध्ये ज्यांना जेवढे बोलायचे तेवढे सगळ्यांनी बोललेले आहेत.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही बोललेलो नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, आपल्यासमोर दोन ठराव आलेले आहेत एक ठराव सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब यांनी दिलेला आहे. त्या ठरावाला ज्यांचे अनुमोदन आहे त्याला पॅरेलल दुसरा ठराव आपल्याकडे आलेला आहे. कृपया दोन्ही ठरावावर मतदान घ्या.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, कृपया आपण आम्हाला बोलायची संधी द्यावी. मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिकेला देखील ७४ व्या घटनेमध्ये जेव्हा दुरुस्ती झाली. त्यानुसार नागरी दारिद्र निर्मुलन हे स्थानीक स्वराज्य संस्थेचे आद्य कर्तव्य आहे. हे कायद्यामध्ये आहे आणि त्यानंतर मा. उपमहापौर साहेब बोलले की, ०१/०१/१९९५ च्या आधी १२,८३२ झोपडपट्टया त्या मताशी सहमत आहोत. ०१/०१/१९९५ च्या नंतर ज्या झोपडपट्टया वाढल्या असतील त्यांच्या बाजुने आम्ही बोलतो अशी गोष्ट नाही. पण ज्या लोकांना आपण सगळ्या सुविधा दिल्या त्या ठिकाणी बहुतेक नगरसेवकांच्या नगरसेवक निधीत व प्रभाग समिती निधीत सी. सी रस्ते झाले. त्याच रस्त्यामध्ये सी.सी रस्ता करावा म्हणुन कित्येक नगरसेवकांची पत्र आहेत. त्यांच्या पत्रानुसार सार्वजनीक बांधकाम विभागाने सी.आर.झेड असतांना देखील त्या ठिकाणी रस्त केलेला आहे. स्ट्रीट लाईट

लावलेल्या आहेत. त्या लोकांना सो. कॉल्ड फोटोपास कसेही मिळाले पण मिळाले त्यांची नावे मतदार यादीमध्ये आली आहेत. त्या ठिकाणी पाण्याच्या पाईपलाईन पडल्या आहेत. आणि आता ह्यांना आठवते की, त्यांची घरे बेकायदेशीर आहेत. ज्या सरकारी जमिनीवर जर कोणी घर बांधत असेल त्यांच्या बाजुने आम्ही बोलत नाही. पण त्या सरकारी जमीनीवर घर बांधत असतांना आपला क्षेत्रिय अधिकारी काय करत होता आज मी या ठिकाणी आपणा समोर सांगु इच्छितो की, गेल्यावर्षी २००६ ला सुवर्ण जयंती शहरी योजनेने दारिद्र रेषेखाली लोकांचा सर्व्हे केला. त्यामध्ये ९,७०२ लोकांना आपण शोधुन काढले त्या लोकांना आपण सगळे प्रशिक्षणाचे फायदे देतो. त्या लोकांना आपण फोटोपास दिले आहेत. त्या लोकांची नांवे मतदार यादीमध्ये आतादेखील टाळण्याचे काम चालु आहे. म्हणजे ते काय भारतीय नाहीत? ते मतदार नाहीत? एवढेच नव्हे तर मी शासनाच्या निर्णयाच्या बाजुला आपले लक्ष वेधु इच्छितो. शासनाचा दि. १९ जुलै २००१ चा जी.आर आहे. मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, १९९६ चा जी.आर आहे. २००१ च्या जी.आर मध्ये देखील राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रम राबविण्यात येणाऱ्या ६१ शहरामध्ये देखील मिरा भाईंदरचे नांव आहे. ऑल भाईंदरचे इंडिया लेव्हलवर मिरा भाईंदरचे नाव आहे आणि आज या ठिकाणी अघोषित आणि घोषित या विषयांवर चर्चा केली जाते. मिरा भाईंदर महानगरपलिकेच्या मा. उपायुक्तांचे पत्र माझ्याकडे आहे. सर्व्हे करण्याच्या आधीदेखील आपण दिलेले आहे की, घोषित झोपडपट्टी आणि अघोषित झोपडपट्टी व गावठण भागामध्ये राहणाऱ्या गरिबांचा आपण दिलेले आहे की, घोषित सर्व्हे करणार आणि आज तोच विषय जर सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, गरिबाच्या बाबतीत घोषित झोपडपट्टी केले तर त्यांना काय मिळणार आहे आणि काय मिळणार नाही ही जबाबदारी मिरा भाईंदर महानगरपालिकेची आहे. ते देखिल करदाते आहेत मा. महापौर मॅडम,मा. आयुक्त श्री. आर.डी शिंदे साहेबांनी मा. जिल्हाअधिकारी साहेबांना दिलेले पत्र मी तुम्हाला वाचुन दाखवतो की, त्यांनी चांगल्या पध्दतीने पोझीटीव्ह उल्लेख केले. ज्या पध्दतीने सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील बोलले. बंदरवाडीच्या लोकांची पन्नास घरे म्हणजे मी ते एक वाक्य तुम्हाला वाचुन दाखवतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर झोपडपट्टीत २३० लाभार्थी उत्तन धावगी झोपडपट्टी लाभार्थी, बंदरवाडी झोपडपट्टीचे ५५ लाभार्थी असे एकुण ४२७ पात्र लाभार्थी आहेत. मग सदर लाभार्थी पात्र आहेत. म्हणजे ०१/०१/१९९५ आधीचे लोक आहेत. त्यांची यादी आपल्याकडे यापुर्वीच पाठवलेली आहे. असे तत्कालीन आयुक्त श्री. आर.डी.शिंदे मा जिल्हाअधिकारी साहेबांना पत्र लिहितात. तसेच सादर केलेल्या रेखांकनातील किमान क्षेत्र २२५ स्क्वेअर फिटनुसार एकुण ४०६ सदनिका उपलब्ध होत आहेत. दुर्देवाने ती सर्व्हे नं. २३३ घोडबंदरची ती जमिन आपल्या ताब्यामध्ये आली नाही त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये बेकायदेशिर पुणे मुंबई वरून माती आणून भरणी होतेय दोनदा त्या बेकायदेशिर झोपडपट्टया मी तोडायला लावल्यात आपल्या महापालिकेच्या मा. आयुक्तांनी ते काम केलेले नाही. शेवटी मला लोकशाही दिवसामध्ये जावे लागले. मी लोकशाही दिवसामध्ये गेल्यानंतर मा. आयुक्त साहेबांनी श्री. अजित पाटील आणि श्री. संजय तायशेट्टे साहेब असतांना तिकडे आपली टीम पाठवली आणि त्या झोपडया बेकायदेशीर आहे मत. सर्व्हे नं. २३३ आहेत मध्ये झोपडपट्टी नव्हती. पण मिरा भाईंदर महापालिकेच्या क्षेत्रामध्ये मुख्य कार्यालयाच्या खाली कातकरी समाजाची जी पंचवीस कुंटुबे राहात होती त्यांना आपण आंबेडकर नगरमध्ये पाठवले. बंदरवाडीचे बरेचशे लोक आज भोला नगरमध्ये राहतात. आंबेडकर नगरमध्ये राहतात. मग ते जेव्हा बंदरवाडीमध्ये राहात होते ते काय बेकायदेशीर होते. रेल्वेच्या प्रॉपर्टी मध्ये राहात होते हे मला मान्य आहे पण जे ०१/०१/१९९५ च्या पुर्वी राहात होते आणि आज ते राहायला आंबेडकर नगर आणि भोला नगरमध्ये आहे आहेत. तत्कालीन श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांनी टाकले पण रोड वायडिंगमध्ये त्यांना परत तिथुन काढुन सर्व्हे नं. २३३ मध्ये शिफ्ट केले. कारण आपण वाल्मिकी आंबेडकर आवास योजना राबवणार होतो. पण दुर्देवाने जागा आपल्या ताब्यात आली नाही. गेल्यावेळी देखील आलेला फंन्ड आणि ग्रॅण्ड परत गेला कारण आपल्या ताब्यात जागा नाही मग असे असतांना आपण स्वतः मिरा भाईंदर महानगरपालिका या नात्याने जर त्या झोपडपट्टीचे पुर्नवसन करु शकत नाही. किंवा आपण त्यांना काही सुविधा देउ शकत नाही. मग त्यांना घोषित करुन काय नुकसान आहे? तुम्ही सी. आर.झेड मधल्या झोपडया अधिकृत करा असे मी बोलत नाही. कायदेशीर बाब बघुनच करा. एका ठिकाणी मा. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग साहेब यांनी सांगितले की, दोन कोटी एक्केचाळीस करोड रुपये आम्ही इनडायरेक्ट टॅक्सेसमधुन जमा केले. त्याच्यापैकी चार हजार चाळीस कोटी रुपये केंद्र सरकारने फक्त इंदिरा आवाससाठी ठेवले, राजीव गांधी आवास योजनेसाठी ठेवले या सगळ्या गोष्टी खोट्या आहेत का? मा. श्री. विलासराव देशमुख साहेबांनी ०१ नोव्हेंबर २००६ ला देखील राज्याचे गृहनिर्माण झोनचे प्रारुप ठेवले त्यामध्ये देखील मिरा भाईंदरला समाविष्ट केलेले आहे. असे असतांना देखील विरोध होतो ही अत्यंत दुर्देवांची बाब आहे. मा. महापौर मॅडम, जो ठराव आपण मंजुर केलेला आहे. तो योग्य आहे असे मी या ठिकाणी सांगु इच्छितो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मगासपासुन झोपडपट्टी घोषित करण्याबाबत बराच वाद सुरु आहे. ही झोपडपट्टी का घोषित करावी याबद्दल जर या लोकांनी अधिनियमाचा अभ्यास केला असेल तर ते बोलु शकतात. कारण माझ्या वॉर्डमध्ये झोपडपट्टी नाही. पण मी वाचन केल्यानंतर प्रशासनाला २३/०१/२००७ रोजी पत्र दिले होत की, झोपडपट्टी घोषित करण्यासंबधी मा. स्थायी समितीमध्ये विषय घ्या. मा. महासभेमध्ये विषय घ्या. परंतु

आजपर्यंत घेतला नव्हता म्हणून मी ज चा प्रस्ताव आणला ज च्या प्रस्तावानंतर विषय सविस्तर पटलावर आला हा विषय पटलावर आल्यानंतर मी आपले अभिनंदन केले मी प्रशासनाकडे खुलासा मागितला की, घोषित करण्याचे अधिकार कोणाचे आहेत. तद्नंतर मा. उपमहापौर साहेबांनी त्यांच्या निवेदनाला सुरुवात केली. ज्यावेळेस आपण जनगणना २००१ मध्ये आपण ३५ झोपडपट्टया म्हणुन घोषित केल्या. महापालिकेतर्फे मा. आयुक्तांनी किंवा नगरपरिषद असतांना मा. मुख्याधिकाऱ्यांनीसुध्दा केलेले नाही. आणि एकुण झोपडपट्टया १२,८३२ नंतर लोकसंख्या ३८,१३७ हे सगळे २००१ च्या जनगणनेमध्ये झालेले आहे. ज्यावेळेस महाराष्ट्र शासनाचा जी.आर आला त्यावेळेस १९९६ मध्ये घोषित करण्याचे अधिकार मा. मुख्यअधिकाऱ्यांना होते तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांनी केले नाहीत. तद्नंतर महापालिका आली. महापालिकेने सुद्धा केले नाही. परंतु, जेव्हा माझ्या वाचनात आले की, ह्या झोपडपट्टया जोपर्यंत घोषित होत नाहीत. तोपर्यंत आपल्याला शासनातर्फे किंवा केंद्र शासनातर्फे जेवढे अनुदान किंवा ग्रॅण्ड मिळत असतील. त्या मिळणे अशक्य होत आहे आणि त्याचा नाहक खर्च आपल्या बजेटवर पडत आहे. ज्या ज्या वॉर्डमध्ये रस्ते बनवून देतात, गटारे बनवतात, स्ट्रीट लाईट लावतात. त्या सुधारणा का करतात? कारण आपल्या त्या नागरिकांना सुखसोयी मिळणे गरजेचे आहे. त्यांचे आरोग्य चांगल्या रितीने असणे गरजेचे आहे. त्यामुळेच या चारच्या अधिनियमाखाली त्यांनी सरळ सरळ लिहिलेले आहे की, आपण घोषित का कराव्यात? ते अधिकार सर्वस्वी मा. आयुक्तांचे आहेत. हा ठराव झाला पाहिजे असे मी बोलणार नाही. पण मा. आयुक्तांचे अधिकार आहेत. त्यांनी करायला पाहिजे. आपल्या या झोपडपट्टी क्षेत्रामध्ये बरेच महिला बचतगट आहेत की, त्यांना आपल्या या महापालिकेतर्फे, बचत गटातर्फे उदयोग मिळेल. जे सुशिक्षित बेकार आहेत, त्यांना उदयोग मिळेल. ह्या हेतूने मी पुढाकार घेउन हा विषय आणलेला होता. कारण आपल्याकडे बऱ्याचशा योजना येउन पुन्हा परत जातात. म्हाडातर्फे आपल्याला प्रत्येक घोषित झोपडपट्टीच्या व्यक्तीबद्दल रु. ४९५/- मिळणार होते. ते मिळत नाहीत. कारण त्याच्यामध्ये दिवाबत्ती, स्ट्रीट लाईट, पायवाटा, गटारे बनविण्यासाठी समाजकल्याणतर्फे जसे सुवर्ण जयंती रोजगार योजना आहे. त्या अंतर्गत आपल्याला बराच निधी येतो. तोही मिळत नाही. तद्नंतर युनिसेफ कडून आपल्याला आरोग्यासाठी ग्रॅण्ड मिळते तीही परत जाते. नगरविकास खात्याकडून आपला बराच निधी रिटर्न जातो. हा निधी आपण का उपलब्ध करु शकत नाही. ज्यावेळेस आपण झोपडपट्टी घोषित करु. या झोपडपट्टया मालकीच्या जागेत असू शकतात किंवा सरकारी जागेमध्येपण असतात. पण ते घोषित करण्याचे सर्वस्वी अधिकार मा. आयुक्तांना आहेत. तर मा. आयुक्तांच्या कर्तव्याची फक्त जनजागृती करावी म्हणून 'ज' चा प्रस्ताव घेतलेला. मा. आयुक्तांचे अधिकार असतील तर मा. आयुक्तांनी त्या झोपडपट्टया घोषित करुन महाराष्ट्र शासनाकडून आणि केंद्र शासनाकडून जेवढा निधी आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रासाठी होईल. त्याची उपलब्धता करुन ज्या ज्या ठिकाणी झोपडपट्टया आहेत. त्यामुळे आपल्या शहराचे सौदर्यीकरण नष्ट होते. ते सुंदर दिसावे ह्या हेतूने हा विषय आणलेला होता आणि आपले झोपडपट्टीतील रहिवासी चांगल्या जागेत राहतील, त्यांचे आरोग्य चांगले राहावे, सुस्थितीत राहावे, सर्व झोपडपट्टीतीमधील विदयार्थ्यांना चांगल्या प्रकारे शिक्षण मिळावे. आणि स्वयंरोजगार मिळावा हाच हेतू होता. पुढील कार्यवाहीसाठी मा. आयुक्तांनी संबंधित खात्याला निर्देश दयावेत.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, झोपडपट्टी घोषित करणे ह्या विषयावर सदनामध्ये भरपूर चर्चा झाली. झोपडपट्टी घोषित करावी की करु नये याचे गाईडलाईन्स अधिनियमाखाली दिलेले आहेत आणि ते अधिकार मा. आयुक्तांना आहेत. परंतु, सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र मेहता, सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर आणि सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील ह्या सर्व सन्मा. सदस्यांनी आपल्यासमोर ठेवले की, झोपडपट्टी घोषित करायला पाहिजे, त्या सर्वांना दिवाबत्ती दयायला पाहिजे, रोड, गटारे दयायला पाहिजे, शिक्षण दयायला पाहिजे, त्यांच्या आरोग्याचे बघायला पाहिजे. ते सर्व मान्य आहे. परंतु, साहेब झोपडपट्टी घोषित करण्याचे अधिकार तुम्हाला आहेत याचा अर्थ कोणाच्याही मालकीच्या जागेमध्ये जाउन तुम्ही त्या झोपडपट्टया घोषित करणार आणि त्याला लिगल पुरावे देणार हे योग्य नाही. शहरात झोपडपट्टी नसावी हा पहिला हेतू प्रशासनाचा असायला पाहिजे. परंतु, जागे-जागेवर एकोणतीस झोपडपट्टया होत्या. आज बेसुमार झोपडपट्टी आपल्याकडे आहे. म्हणजे ह्या झोपडपट्टया झाल्या त्याच्यामध्ये कोण संलग्न आहेत? त्याच्यामध्ये राजकीय लोक संलग्न आहेत. गुंड लोक झोपडपट्टी बनवतात आणि पन्नास पन्नास हजाराला झोपडपट्टी विकतात. जिथे ओपन प्लॉट दिसले, कलेक्टरची जमिन दिसली, मिठागराची जमिन दिसली तिथे रात्रीच्या रात्री झोपडया बांधतात. मागे सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा, सभागृहामध्ये बोलले होते. त्यांनी एका नगरसेवकाच्या नावाचा उल्लेख केला होता की, त्यांच्या नावावर काहीतरी आहे. मग आत्ता ज्या झोपडपट्टया आहेत. त्यांची शहानिशा करा. ह्या शहराला हॉस्पिटल नाही, चांगले मार्केट नाही, चांगले कॉलेज नाही, चांगली शाळा आपल्याकडे नाही. आपण फक्त झोपडपट्टीचे आरोग्य सुधरवायचे, त्यांचे रस्ते बनवायचे. आपल्या टोटल बजेटमधून आपण किती पैसे झोपडपट्टी सुधारणेला लावतो? आपल्या शहरामध्ये जेवढे धारक आहेत. त्याच्या ७५टक्के पैसे आपण झोपडपट्टी सुधारणेला लावतो. ह्या शहराला आपल्याला किती विकासाची योजना दयायची आहे. ती विकासाची योजना बाजूला राहिली आणि फक्त झोपडपट्टी घोषित करा. पण, पहिल्यांदा त्याच्यामध्ये शहानिशा करा. याच्यामध्ये पुष्कळ बोगस फोटोपास निर्माण झालेले आहेत.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मी अर्ध्या तासापासून हात वर करुन आपल्या परवानगीची वाट बघत आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, जेव्हा ते बोलतात तेव्हा मी मध्ये बोलत नाही. माझे बोलणे पूर्ण होउ दया.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, एस.आर.ए. चा विषय घेउन आपण हा विषय अजेंडयावर आणला.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो साहेब, मी बोलत आहे. आपण मध्येच उठू नका. माझे संपल्यानंतर तुम्हाला काय बोलायचे असेल ते बोला. साहेब, माझे म्हणणे एवढेच आहे की, झोपडपट्टी घोषित करणे हे अधिकार प्रशासनाचे आहेत, मा. आयुक्तांचे आहेत. परंतु, याच्यामध्ये झालेले बोगस फोटोपास आणि काही राजकिय, सामाजिक लोकांच्या नावावर झोपडया आहेत. त्याची शहानिशा करा आणि तुम्ही लिगली डिक्लेअर करा आणि ज्या झोपडपट्टया प्रायव्हेट जागेवर आहेत त्यांना आपण घोषित करु नये. कारण त्या झोपडयांसाठी कुठल्याही एका मालकाचा आपण लॉस करु शकत नाही. तुमच्या सरकारी जागेवर आहेत त्यांना दयायचे असेल तर दया. ह्या शहराला हॉस्पिटल देउ नये, मार्केट देवू नये, कुठले विकासाचे काम करु नये. ह्या झोपडपट्टया विकसित करा आणि तुमची जेवढी सरकारी जागा आहे ती झोपडपट्टी वासियांना दया. आमची हरकत नाही पण पहिल्यांदा शहानिशा करा आणि नंतर हे करा.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आपकी इजाजत से बोलना चाहूँगी। महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा निर्मूलन व पुर्नविकास अधिनियम १९७१ इसके अंतर्गत मा. माजी नगराध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटीलजी ने ठराव दिया है की, मा. आयुक्त साहब जो झोपडपट्टी घोषित कर सकते है। जो पुरावे है, उनको आप घोषित किजिए। ताकी उनकी तरफ से सरकार जो ग्रॅण्ड देती है वह हमको मिले। ताकी हमारे मिरा भाईंदर का जो बजेट हम घटा रहे है, वह खर्च नही करना पडे। सिर्फ वह उद्देश था। इसे कहाँ से कहाँ पहूचाया है यह आपको पता है।

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम, आत्ताच मा. उपायुक्त श्री. एस.एस.पानपट्टे साहेबांनी माहिती मागवली आणि श्री. आसोदेकर साहेब फाईल घेउन आले आहेत. त्यांची मेहनत वाया जावू नये म्हणून आपण ते रिपोर्ट बघून घेउ. मा. आयुक्त साहेब मी तुम्हाला विचारलेले की जे आपले अधिकार आहेत. त्या ठरावासाठी आम्ही कशाला भांडतो याचे आपण स्पष्टीकरण दया. पण जे अधिकार तुमचेच आहेत. तो आम्ही ठराव मांडतो आणि परत त्याच्यासाठी भांडतो. तुम्हाला ते घोषित करायचे आणि तुम्हाला ते घोषित करायचे नाही असे आमचे दोन ठराव आले आणि हा अधिकार मा. आयुक्त साहेबांचा आहे हेही ठरावामध्ये नमुद आहे. तर जे अधिकार आपलेच आहेत ते तुम्हाला मा. महासभेमधून दयायचे का?

**मा. आयुक्त :-**

नाही. गरज नाही.

**गिता जैन :-**

साहेब, गरज नाही. मग हा ठराव कशाला? आणि कशाला दोन तास झाले हे भांडण आहे?

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्या श्रीम. गिता जैन मॅडम, यांनी जे सांगितले तेच आम्हालासुद्धा बोलायचे होते की, आपले हेतू स्वच्छ आहेत, आपली भुमिका स्वच्छ आहे. सगळ्यांचा इष्टांक बरोबर आहे. तर दोन ठरावांची फार मोठी आवश्यकता नाही. जे स्वयंपूर्ण अधिकार मा. आयुक्तांना आहेत, ही मे डिस्चार्ज हिज अधिकार. पण ह्या निमित्ताने अजेंडयावर विषय आला. एक सर्वसाधारणपणे चर्चा झाली. देअर आर सम हॉट एक्सचेंजेस गरमागरमी झाली. हे आवश्यक आहे. हे लोकशाहीचे लक्षण आहे. हे या सभागृहात होणे आवश्यक होते. पण मी मुद्दामहून ह्या विषयावर आपली परवानगीहून पाच मिनिटे बोलेन. ते ह्यासाठी का, मा. आयुक्त साहेब, इफ यु रिमेंबर मी ॲज ए नगरसेवक म्हणून आपणाला पत्र दिलेले होते की, ह्या शहरामध्ये यापुढे असंबंध झोपडपट्टया होवू नयेत. आणि मला बरे वाटले की, पत्राच्या बऱ्याच झेरॉक्स झाल्या आणि आपण प्रभाग अधिकाऱ्यांना, सगळ्यांना वाटून टाकल्या की, श्री. लिओ कोलासो साहेबांचे असे म्हणणे आहे की झोपडपट्टया वाढू नयेत. त्यामुळे त्यावेळी झोपडयांना टॅक्स लावणे बंद झाले होते. आय एम हॅप्पी की, कुठेतरी सुर्य उगवला. पण नंतर सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील, मी मुद्दामून हाउ मच व्ही रिस्पॉन्सीबल. आपण या गोष्टीला किती जबाबदार आहोत? माझे ते पत्र गेल्यानंतर बरेच अधिकारी मला म्हणाले की, त्याच्या झोपडीची पावती फाडायची आहे. पण तुमचे पत्र आड येते. मग माझे पत्र आड आल्यामुळे मलासुद्धा दुःख व्हायला लागले की, त्यांच्यामध्ये मी थोडासा अडथळा निर्माण केलेला आहे. तर मग मी पण अधिकाऱ्यांना सांगायला लागलो की, माझ्या पत्राचे फार गंभीरपणे घेउ नका. आपल्या पावत्या फाडायचे काम अहोरात्र चालू ठेवा. आणि त्या दृष्टीकोनातून हे पुढे पुढे होत गेले. मी मुद्दाम सांगतो की, सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी एस.आर.ए चा जो विषय आणलेला आहे. त्याच्या मला वावगे काही दिसत नाही. आय एम गोईंग टू सपोर्ट मी ह्या झोपडपट्टयांच्या संदर्भामध्ये की ते शहरवासी आहे, दिनदुबळे आहेत, गरिब आहेत. वुई आर टॉकिंग

अबाउट समथिंग. जे बोलायला पाहिजे ते बोलत नाहीत. या शहरामध्ये अनंत गोष्टी चुकीच्या बेकायदेशीर होत आहेत. सगळ्याच गोष्टीमध्ये गरिब जबाबदार आहे का? नाही. देअर आर सर्टन पॉकेटस. शहरामध्ये काही पॉकेटस् आहेत. इंदिरा नगर, उत्तन. स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सावानिमित्त भूमिहीन शेतमजूर, लॅन्डलेस लोकांच्यासाठी ती वसाहत दिलेली आहे. अशा पद्धतीने शासनाचे स्तुत्य धोरण आहे. आदरणीय स्वर्गवासी इंदिरा गांधी ह्यांनी विस कलमी कार्यक्रमाची घोषणा करताना रोटी, कपडा, मकान. त्या मकानमध्ये गरिबाचे उत्स्थान करण्याची कल्पना त्यांनी मांडलेली होती. मी मुद्दामहून सांगेन. सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील आपण लक्ष दयावे की, जेव्हा आपले भा.ज.पा.चे सरकार केंद्रात होते त्यावेळी आपण वाल्मिकी आणि आंबेडकर ही अत्यंत सुंदर योजना आणली. व्हेरी गुड. वाल्मिकी आणि आंबेडकर हे दोन विचार एकत्र आणले. कशासाठी की, गरिबाला, झोपडपट्टीवाल्याला आपण कुठेतरी न्याय दयावा, सहारा दयावा. झोपडपट्टीवाल्यांच्या गरजा फार मोठया नसतात. त्यांच्या डोक्यावर छत असले, त्यांना रात्रभर झोप मिळावी एवढीच त्यांची माफक अपेक्षा आहे. पण, मा. महापौर साहेबा, कायदयामध्ये काय प्रोव्हिजन केले की, जो मागासवर्गीयांसाठी आपल्या घटनेमध्ये, बजेटमध्ये जो ३५टक्के चा निधी दिलेला आहे. तो आपल्याला चांगले करण्यासाठी दिलेला आहे. तर मी मुद्दामहून झोपडपट्टीवाल्यांची बाजू यासाठी घेतो की, मॅडम आय हॅव सिन देम. मी त्यांना पाहिलेले आहे. त्यांची गरिबी मी अनुभवलेली आहे. 'किस तरह जिते है, वो लोग बता दो यारो। मुझे भी जिने का अंदाज सिखा दो यारो।' असे मी खरोखरच त्यांच्याकडून शिकलो. कारण आपण काय म्हणतो की, सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी ठराव आणला. आमचे सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी ठराव आणला. मी मुद्दाम सांगतो की, आमच्या राष्ट्रवादी पक्षामध्ये ह्या विषयाबद्दल काही चर्चा झाली नाही. मी त्यांचा आदर करतो. ते आमच्या सभागृहाचे नेते आहेत. पण त्यांनी आणि श्री. प्रफुल्ल पाटील हे दोघे जर हे मान्य करतात की, ऑल राईट्स रिझर्व विथ कमिशनर. कमिशनर बरोबर सर्व अधिकार आहेत. तर दोघांचे ठराव आपण विड्रॉ करावेत आणि मा. आयुक्तांना एकमुखी या ठरावाची अंमलबजावणी करायला सांगावे अशी मा. महापौर साहेब, आपल्यावतीने मी सभागृहाला विनंती करतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, उशिरा का होईना पण बरेच बोलते झाले. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि ते असेच बोलत रहावेत असे मी त्यांना सांगतो. ह्या सभागृहात जो विषय चाललेला आहे. त्याच्यात मला ऐवढेच सांगावेसे वाटते की, सगळेच झालेले आहे. या विषयाचा निकाल कसा लागेल? मला या गोष्टीचा आनंद होतो की, मास्तरांनी सांगितले, श्री. वाजपेयी यांची योजना, भारतीय जनता पार्टीची योजना. पण त्याच्या बरोबर याचा आनंद होतो की, याच सभागृहात त्यांनी कबुली जवाब दिलेला आहे की, आम्ही पाच वर्षे सत्तेत असूनसुध्दा गरीबांसाठी काही करु शकलो नाही. जे शासनाने अधिकार दिले होते, नियतीने अधिकार दिले होते ..........

**लिओ कोलासो :-**

बजेटचा सगळा पैसा झोपडपट्टयांमध्ये वापरला. आता त्यातील झोपडपट्टया अनप्लॅन आहेत, निट नाहीत म्हणून हा प्रस्ताव आलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे सिध्द झालेले आहे. साधी झोपडपट्टी घोषीत करण्याचा जो...... नविन आहे. म्हणजे काल जी.आर. निघाला आणि मा. आयुक्त साहेबांना...... आता मा. आयुक्त साहेबांना तरी आम्ही कसा दोष देउ? आधी दिलेलाच आहे. पण आत्ता कसा देउ? ज्यादिवशी तुम्ही सभागृहामध्ये शपथ घेतली. आपण सिनिअर आहात. तेव्हा तुम्हाला सांगतो की, सिनिअर सगळ्या लोकांसाठी चपराक आहे. नगरपरिषदेमधून महापालिकेत आलो. नगरपरिषदेमधून पण करु शकलो नाही, महापालिकेत पण करु शकलो नाही. महापालिकेच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या वर्षात कधीतरी ह्या झोपड्या घोषीत केल्या असत्या तर गरीबांनी तुम्हाला दुवा दिल्या असत्या. पण आत्ता गरीबांचे कैवारी, दलितांचे कैवारी, बाबासाहेब आंबेडकरांचे कैवारी असे बोलण्याचा असे बोलण्याचा ह्या सभागृहातील सत्ताधारी पक्षाला कोणताही अधिकार राहिलेला नाही. असे मी सभागृहासमोर मांडतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृहासमोर दोन ठराव आलेले आहेत आणि दोन ठराव जवळ जवळ एका सारखेच आहेत. दोन्ही ठरावत असे मांडण्यात आलेले आहे की, जे झोपडपट्टया घोषीत करण्याचे अधिकार आहेत ते पूर्णपणे मा. आयुक्तांना आहेत.

**मा. उपमहापौर :-**

मॅडम, तुम्ही दिशाभूल करु नका. आमचा ठराव असा आहे की, या सदनाला सविस्तर माहिती सादर केल्यानंतरच मा. आयुक्तांनी हा ठराव घ्यावा.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिव साहेब, दिलेले ठराव जरा वाचा म्हणजे संपूर्ण सभागृहाला कळेल.

**मा. महापौर :-**

मी बोललेले तुम्ही पूर्णपणे ऐकलेले नाही. थोडीशी तफावत आहे. पूर्णपणे सारखे आहेत असे म्हटलेले नाही.

**रतन पाटील :-**

थोडीशी नाही. गोषवाराच दिलेला नाही. फार मोठी तफावत आहे. कुठल्या बेसवर तुम्ही ठराव देणार. गोषवाराच दिलेला नाही. झोपडपट्टयांची नावेच दिलेली नाहीत.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३८ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव श्री. प्रफुल्ल पाटील सुचक आहेत. अनुमोदक श्रीम. लिला पाटील आहेत. दुसरा ठराव सुचक श्री. हॅरल बोर्जीस व अनुमोदन श्री. परशुराम पाटील यांचे आहे. अनुक्रमे दोन ठराव आल्यामुळे शेवटी आलेला ठराव वाचून मतदानाला टाकतो.

**नरेंद्र मेहता :-**

सी.आर.झेड. असताना त्यासंबंधी कायद्याने ठराव करता येईल का? याची माहिती मला द्यावी. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी काही झोपडपट्टयांची एरियावाईज नावे सुचवलेली आहेत. त्यावेळी काही भाग सी.आर.झेड. मध्ये आहेत. मला त्यांच्याबरोबर जायचे असेल. तर सी.आर.झेड. मध्ये मला जाता येईल का?

**प्रफुल्ल पाटील :-**

याच्या संदर्भात मी अगोदरसुध्दा स्पष्टीकरण केले आहे की, हे अधिकार मा. आयुक्तांचे आहेत. आत्तापर्यंत मा. आयुक्तांनी त्या अधिकारांची अंमलबजावणी केली नाही. आत्तापर्यंत हा विषय मा. महासभे पुढे का आला? तर गेल्या पाच वर्षात मा. आयुक्तांनी त्याची अंमलबजावणी केली नाही. ती करावी ही जागृती करण्यासाठी हा विषय आलेला आहे. तुम्ही ठराव घ्या किंवा नका घेउ. आणि मा. आयुक्त जर ते करायला तयार असतील, म्हणजे आम्ही असे सांगत नाही की, त्यांनी सी.आर.झेड. मधले करावे. ठरावात असे कुठेही म्हटलेले नाही की, सी.आर.झेड मधल्या झोपडपट्टया अधिकृत कराव्यात अनधिकृत झोपडपट्टयासुद्धा अधिकृत कराव्यात असेही ठरावात कुठे नाही. ज्या अधिकृत असतील त्या झोपडपट्टया मा. आयुक्तांनी जाहिर केल्या तर त्याला पुढे एस.आर.ए. स्किम आणि सरकारी अनुदान प्राप्त होईल.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आत्ता दोन्ही ठराव मांडलेले आहेत. दोन्हींचा मक्सद एक आहे की, मा. आयुक्तांनी घोषणा करावी आणि मा. आयुक्तांनी हा विषय घ्यावा.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. धनराज अग्रवाल तुम्ही ऐकून घ्या. विषय तसा नाही. वाचून घेउ दया. तसे सारखे काही नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मा. उपमहापौर साहेब, मा. आयुक्तांच्या अधिकाराचा विषय आहे. तो विषय मा. आयुक्तांना करू द्या.

**मा. उपमहापौर :-**

आमच्या ठरावात आम्ही मा. आयुक्तांना अधिकार दिलेले नाहीत.

**धनराज अग्रवाल :-**

मा. आयुक्तांना अधिकार आहेत. आपण दिलेले नाहीत.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. धनराज अग्रवाल तुम्ही सांगता दोन्ही ठराव सारखे आहेत. तसे सारखे ठराव नाहीत. या विषयावर आम्ही स्पष्ट लिहिले आहे की, याची सविस्तर माहिती सादर करावी. मगच हा विषय मा. महासभेसमोर आणावा.

**नगरसचिव :-**

अनुक्रमे दुसरा आलेल्या ठरावाचे मी वाचन करतो.

(मा. नगरसचिव सो. ह्यांनी सुचक सन्मा. श्री. हॅरल बोर्जीस व अनुमोदन सन्मा. श्री. परशुराम पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाचे वाचन केले.)

**प्रफुल्ल पाटील :-**

तोच ठराव आहे. शेवटी आमचेही मत तेच आहे. तोच ठराव घ्यावा.

**मा. उपमहापौर :-**

ठराव मांडला. आत्ता दोन ठराव आहेत. मग आत्ता मतदान घ्या. आपल्याला समजेल की, सभागृहात किती ताकद आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

कोणाच्या ताकदीची गोष्ट करता? आम्ही ठराव मांडला. आम्ही मागे घेतला.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, असे डिक्लेअर करा की, माझा ठराव मागे घेतो. तशी प्रोसिडींगला नोंद होउ द्या. ठराव रितसर मागे घ्या.

**मिलन पाटील :-**

मॅडम, तुम्ही रूलिंग द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील व सन्मा. सदस्या श्रीम. लिला पाटील ह्यांनी मांडलेला ठराव मागे घेतलेला आहे. दुसरा ठराव सुचक श्री. हॅरल बोर्जीस व अनुमोदक श्री. परशुराम पाटील ह्यांनी मांडलेला ठराव हा एकच ठराव राहिल्याने तो मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व झोपडपट्ट्या घोषित करणेबाबत.

(सदरचा विषय सविस्तर गोषवारा व परिपुर्ण माहिती नसल्यामुळे मा. महापौर यांच्या आदेशान्वये पुढच्या सभेत घेण्याचे ठरले.)

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(जेवणाची सुट्टी )

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३९ चे वाचन केले.)

**प्रफुल्ल पाटील :-**

मघासचा विषय अतिशय गाजला. बऱ्याच लोकांनी उगाच त्याचा प्रेस्टिज इश्यू केला. थोडक्यात म्हणजे विषय असा होता की, मा. आयुक्त साहेबांनी त्यांचे काम करावे. आमच्या नगरसेवकांनी जेव्हा आपल्याला निवेदन दिले तेव्हा झोपडपट्ट्या घोषित झाल्या नाहीत. मग तो ज चा प्रस्ताव आणला तेव्हासुद्धा झाल्या नाहीत. मा. महापौरांनी विषय घेतला म्हणून आमची आशा अशी होती की जे मा. आयुक्तांना अभिप्रेत आहे. ते मा. आयुक्तांनी करावे. एकदा झोपडपट्ट्या घोषित झाल्या. तर मग एस.आर.ए ची स्किम लागू करायला आपल्याला आणखिन सोपे गेले असते. आणि मघाशी या ठिकाणी जे काही निवेदन केले गेले की, मा. मुख्याधिकारी जेव्हा होते त्यावेळेस १९९४-९५ च्या दरम्यान सन्मा. श्री. अनंत पाटीलसुद्धा सभागृहाचे सदस्य होते. त्यावेळीसुद्धा मा. मुख्याधिकारी यांनी झोपडपट्ट्या घोषित केलेल्या आहेत. उपनगराध्यक्षा सन्मा. श्रीम. जेन्वी अल्मेडा मॅडम होत्या. त्यावेळीसुद्धा हा विषय झालेला आहे. असे दोन टर्ममध्ये मा. मुख्याधिकारी यांनी झोपडपट्ट्या घोषित केल्यानंतर सभागृहाची अपेक्षा असते की, झोपडपट्ट्या घोषित कराव्यात. पुढचे जे कायदेशिर सोपस्कार आहेत की, त्याचा जी.आर. काढायला पाहिजे किंवा गॅझेट करायला हवे होते. तर ते गॅझेट केले गेले अशी माझी माहिती आहे. कदाचित प्रशासनाची माहिती खरी असेल किंवा चुकीची असेल  हे मला माहिती नाही. पण त्यावेळी गॅझेट केले गेले. त्याच्यानंतर त्यांना अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न झाले पण जर त्याच्यामध्ये काही त्रुटी असेल तर आजच्या दृष्टीने ज्या झोपडपट्ट्या अधिकृत आहेत त्यांना संपुर्ण संरक्षण देण्यासाठी, त्या झोपडपट्ट्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी आपल्या बजेटवर जास्तीत जास्त बोजा येउ नये म्हणून त्याचा जर विचार करायला गेलो तर आपल्यालाही झोपडपट्ट्या घोषित करणे आणि एस.आर.ए. स्किम लागू करणे हे महत्वाचे आहे. मागच्या सभेमध्ये एस.आर.ए. स्किम लागू करणे म्हणजे अमुक बिल्डरला ती एस.आर.ए. स्किम लागू करणे म्हणजे अमुक बिल्डरला ती एस.आर.ए. स्किम देणे असा त्याचा अर्थ होत नाही. एस.आर.ए. स्किम लागू झाल्यानंतर त्याच्या खालच्या सगळ्या तरतुदी आहेत. या तुम्हाला पार कराच्या लागणार आहेत. तेव्हा सभागृह किंवा कोणी अधिकारी किंवा एस.आर.ए. स्किम लागू करावी. या ठिकाणी आत्ता जो विषय आलेला आहे तो जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (B.S.U.P) अंतर्गत घरकुल बांधणेकरिता मंजुर विकास योजनेत फेरबदल करून (B.S.U.P) करिता आरक्षण करणेबाबत. हा विषय आलेला आहे. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान अंतर्गत जो प्रकल्प कार्यान्वीत करावयाचा आहे. त्याच्यासाठी मंजुर विकास योजनेमध्ये आरक्षण प्रस्तावित करण्यासाठी मी ठराव मांडत आहे. महाराष्ट्र प्रदेश नागरी नगररचना अधिनियम १९६६ चा कलम ३७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

**शशिकांत भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. सचिवांनी पुढचा विषय घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला याविषयी थोडे बोलायचे आहे. आपण एक विषय आणला. या विषयाअंतर्गतच विकास योजनेत फेरबदल करून B.S.U.P करीता आरक्षण करणेबाबत. परंतु, याहीपेक्षा महत्वाचा मोठा विषय असा होता की, विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह अंमलात असलेल्या दि. १५ जुलै १९९७ रोजी आपल्याला या विकास योजनेच्या अंतर्गत जी आरक्षणे आहेत. ही १५ ऑक्टोबर २००० पर्यंत आपण जी आरक्षणे वगळली, काही डिलीट केली, काही टाकली, काही आपण नविन तयार केली. ह्या सगळ्यांची अंतिम मुदत ह्या एक महिन्या अगोदर म्हणजे तेव्हा आपला प्रशासकिय कालावधी असेल, आचारसंहिता लागलेली असेल, अपण सभागृहातील कोणीही सदस्य त्यावेळेला सभागृहात बसू शकणार नाही. पण गेल्या दहा वर्षामध्ये आपल्याला जी आरक्षणे दिली त्यांची मंजूरी किंवा त्यांची मुदतवाढ हि करण्याकरिता प्रस्ताव प्रशासनातर्फे या अगोदर यायला पाहिजे होता. आज अगोदरच संपूर्ण मिरा भाईंदरच्या विकास नियमावली म्हणा, डेव्हलपमेंट प्लॅन म्हणा, ह्याची जर प्रत्येक पाने आपण उलटून बघितली तर अनेक महत्वाची आरक्षणे वगळून तिकडे आर. झोन केलेला आहे. आणि एका विशिष्ट टेक्नॉलॉजीद्वारे आम्ही त्याचा परसेंटेज काढला. तर ज्यावेळेला हा प्लॅन मंजुर झाला त्यावेळेला ह्या शहरामध्ये उदा. १०० टक्के ह्या नकाशाच्या परसेंटेजचा समजा ३० टक्के आरक्षण ग्रीन झोन होते. ते आत्ता फक्त ३ टक्के राहिलेले आहे. हे डेव्हलपमेंट प्लॅनचे माझ्याकडे संपूर्ण असे मोठे नकाशे काढले आहेत. आणि जिकडे जिकडे डिलीट करत आले तिकडे आत्ता ३ टक्के हरित पट्टा जिकडे प्ले ग्राउन्ड बगीचे वगैरे सगळे राहिलेले आहे. आज आपल्याकडे एकुण ३८२ आरक्षणे आहेत. २१ आरक्षणे वगळलेली आहेत. शिल्लक ३६१ आरक्षणे आहेत. ताब्यात घेण्यात आलेली ५८ आरक्षणे आहेत. आणि असलेली आरक्षणे एकूण मिळून आरक्षणे ३०३ आहेत हा आपला संपूर्ण आणि अंदाजित आरक्षित असलेले क्षेत्र ४५८.१०९५ हेक्टर आणि ४५,८१,०९५ चौ.मि. इतके आहे. भूमी संपादन टी.डी.आर. यु.एल.सी. यातून संपादीत झालेले क्षेत्र २,१७,७२४-४.१ चौ. मि. म्हणजे टोटल ४३,६३,३७०.६ एवढे आरक्षित क्षेत्र आत्ता आपल्याकडे राहिलेले आहे. एकूण आरक्षणांपैकी ४.७५ टक्के जमीन संपादीत आरक्षण व्यपगत होण्याच्या कालावधी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दहा वर्षापर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका विकास योजना अंतिम कालावधी हा १५ जुलै २००७ आहे. कारवाई अपेक्षित, एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १२६ अन्वये तातडीची कार्यवाही होणे आवश्यक होते. आरक्षण संपादित न केल्याची जबाबदारी संबंधित अधिकारी यांच्यावर निश्चित केली जावी. प्रलंबित टी.डी.आर., यु.एल.सी., एफ.एस.आय. प्रकरणाचीच कार्यवाही केली जायला हवी. मॅडम, आज माझ्याकडे हे सगळे स्टॅटिस्टीक्स आहे. ह्याच्यात सगळे दिलेले आहे. वाटल्यास तुमच्या माहितीकरिता हा सेट मी पुढे पाठवतो. हा विषय एवढा गंभीर आहे की, याची अंतिम डेट आत्ता १५ जुलैला संपते. सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो साहेब आपल्या नियोजन समितीचे सभापती होते. हा विषय आला नाही. बहुतेक ही शेवटची सभा असण्याची शक्यता आहे. ह्या शेवटच्या सभेमध्ये गेल्या दहा वर्षात आपण जे काही केले. त्याला मुदतवाढ हवी आहे. याकरिता जे प्रस्ताव आपल्याला शासनाकडे पाठवायला लागतील. ज्यावेळेला आपण नगरसेवक असतो पण हाउस अस्तित्वात नसते. त्यावेळेला ह्या महानगरपालिकेच्या विकास आराखड्याची संपूर्ण जबाबदारी ही प्रशासन स्तरावर चालत असते. मा. आयुक्त जर चांगले असतील तर अगदी उत्तम. आणि जर नसतील तर मघाशी जे सेक्शन ३७ सांगितले. मंत्रालयातून मागच्या वेळेला काय झाले आठवते. आपल्या पार्कचे संपूर्ण रिझर्व्हेशन डिलीट करण्यात आले होते. मंत्रालयातून काहीही घडण्याची शक्यता आहे. आणि त्याचे मंत्रालयातून ठरावाला स्थगिती आली आणि ते आरक्षण तसेच राहिले. हा आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचा गेल्या पाच वर्षाचा इतिहास आहे. आपण ह्या १५ जुलैच्या कट ऑफ डेटचे काय करणार आहोत या संदर्भात तुम्ही प्रशासनाकडून माहिती करून घ्या. ही सभा आपण हातची घालवली नाही पाहिजे. ह्या सभेमध्ये प्रशासनाने १५ जुलैच्या आतमध्ये म्हणजेच आपल्या हाउसचा कालावधी जिवंत आहे तिथपर्यंत या प्रशासनाने डेव्हलपमेंट प्लानचा जो मसुदा आहे. ड्राफ्ट आहे त्याच्यातील आरक्षणा संदर्भामध्ये शासनाकडून मुदतवाढ घ्यावी. याकरिता आपण काय करणार आहोत? जरा मा. आयुक्त आणि टाउन प्लानिंगच्या अधिकाऱ्यांनी याच्यावर जरा खुलासा केला तर बरे होईल. आमच्या सगळ्या सन्मा. सदस्यांना कळेल.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, माझ्यादेखील प्रश्नावर श्री. घेवारे साहेब उत्तर देतील अशी अपेक्षा आहे. की, केंद्र सरकारची जी योजना आहे. त्याच्यात जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान जो जाहिर झालेला आहे त्याच्यामध्ये दोन पार्ट आहेत. एक आहे B.S.U.P म्हणजे शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे. दुसरा आहे I.S.D.P. म्हणजे एकत्रित गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम असे दोन कार्यक्रम आहेत. इन्टीग्रटेड हाउसिंग ॲन्ड स्लम डेव्हलपमेंट प्रोग्राम म्हणून ज्या गाईडलाईन्स आपल्याला केंद्र सरकारने पाठविलेल्या आहेत. त्याचा देखील जी.आर. माझ्याकडे आहे. कृपया, त्या जी.आर.ची आपण झेरॉक्स काढून

घ्यावी. या दोन्ही स्किम मिरा भाईंदरला लागू आहेत. तरी आपण ह्या दोन्ही स्किम फक्त आपल्या मा. आयुक्तांच्या गोषवाऱ्यामध्ये बी.एस.यु.पी. बद्दल माहिती दिलेली आहे. एकच ठिकाणी इन्टिग्रेटेड हाउसिंग ॲन्ड स्लम डेव्हलपमेंट प्रोग्रामबद्दल काही माहिती नाही. कृपया त्याच्याबद्दल पण आपण खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

**दिलिप घेवारे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना ही १४ मे १९९७ रोजी मंजुर झालेली आहे. आणि ती १५ जुलै १९९७ पासून अंमलात आलेली आहे. यामध्ये शासनाने काही भाग वगळलेला होता. वगळलेल्या भागाची विकास योजना ही २५ ऑगस्ट २००० रोजी मंजुर झालेली आहे आणि १५ ऑक्टोबर २००० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झालेली आहे यात एकूण १९ महसुली गावांचा समावेश असुन ७९.४० चौ. कि.मी. क्षेत्र आहे. या मंजुर विकास योजनेमध्ये एकुण ३८६ आरक्षणे आहेत. याच्यामध्ये २७ शासकिय जागेवरचे आहेत. यात २१ महानगरपालिकेने निश्चित करायचे आहेत आणि ६ काही इतर संस्था आहेत ते निश्चित करायचे आहेत. ३१५ खाजगी जागेवर आहेत. २० आरक्षणे मिठागराच्या जागेवर आहेत. आणि २४ इतर संस्थांच्या जागेवर आहेत. त्याच्यात शासकिय जागेवरची जी २७ आरक्षणे आहेत. त्याच्यामध्ये ६ विकसित झालेली आहेत. ४ पुर्ण झालेली आहेत २ पार्टली झालेली आहेत. ११ जागेचा मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केलेला आहे. त्यांनी ज्या ज्या क्वेरिझ ज्या ज्या त्रुटी प्रत्येक वेळेस काढलेल्या आहेत. गेली पाच वर्षे झाली आपण त्याचा पाठपुरावा करत आहोत. आणि जे सहा प्रस्ताव आहेत ते इतर शासकिय निमशासकिय संस्थांनी निश्चित करायचे आहेत. सॉल्ट विभागाच्या जागेवर जे २० प्रस्ताव आहेत. त्यापैकी आपण त्यांना वेळोवेळी मागणी केलेली आहे. तसेच आवश्यक ते बंधपत्र सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील साहेब यांच्या काळापासूनच त्यांना देण्यात येत आहेत. जी ३५५ आरक्षणे महानगरपालिकेने निश्चित करायची आहेत. त्याच्यापैकी सॉल्टची आणि शासकीय जागेवरची वगळल्यास ३१५ आरक्षणे ही खाजगी जागेवर आहेत. ज्यापैकी १३० जागेवरची आरक्षणे ही सी.आर.झेड ने बाधित आहेत. पार्टली किंवा पूर्णपणे. ३४ आरक्षणात काही प्रमाणात ५टक्के ते ५०टक्के पर्यंत अतिक्रमण झालेले आहे. त्यात बऱ्याचशा झोपडया आहेत. ही १३० अधिक ३४ अशी आपल्याला १६४ आरक्षणे आज ॲक्वीजीशन करता येत नाहीत. जी उरलेली १९१ आरक्षणे आहेत. त्याच्यामध्ये १७ आरक्षणे पूर्णपणे विकसित झालेली आहेत. १७ आरक्षणे पार्टली विकसित झालेली आहेत. आणि २७ आरक्षणांचे काम प्रगतीपथावर आहे. आणि टी.डी.आर. तरतुदीव्दारे ४२ आरक्षणांच्या जागा आपण काही प्रमाणात ताब्यात घेतलेल्या आहेत. उरलेल्या जागा ताब्यात घेण्याचा प्रयत्न आपण करत आहोत. अशी आपण १९१ पैकी १०३ जागा आपल्या हातामध्ये आहेत. त्याच्यानंतर आत्ता जी एन.टी.डी.सी. नविन स्पेशल प्लॅनिंग ॲथोरिटी आलेली आहे, उत्तन चौक, तारोडी, डोंगरी, पाली या पाच गावांसाठी, तिथे आपली एकूण ४५ आरक्षणे आहेत. त्यापैकी ३ आरक्षणे आपण डेव्हलप केली आहेत. ४२ आरक्षणासंबंधी आपल्याला आज लॅन्ड ॲक्वीझीशन करता येत नाही. म्हणजे आपली जी काही १०३ आरक्षणासंबंधी पूर्णपणे किंवा पार्टली भूसंपदनाची कार्यवाही झालेली आहे. यात ५५ कि.मी. लांबीचे रस्ते आपण विकास योजनेत डेव्हलप केलेले आहेत. आणि गेल्या २००५ पासून एफ.एस.आय. आणि टी.डी.आर. व्दारे जवळपास दिड लाख स्क्वेअर मीटर रस्त्याखालची जमीन आपण ताब्यात घेतलेली आहे. आणि या सर्व कामासाठी आपल्याला एक रुपयाही खर्च आलेला नाही. एफ.एस.आय. आणि टी.डी.आर. माध्यमातून किंवा समावेशक आरक्षण या धोरणातून आपण हा सगळा विकास केलेला आहे. सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला की, १५ जूलै २००७ ला कट ऑफ डेट आहे. आपल्या विकास योजनेचा कालावधी वीस वर्षाचा आहे. म्हणजे एका भागासाठी १५ जूलै २०१७ आहे. आणि एका भागासाठी १५ ऑक्टोबर २०२० आहे. त्याच्यामुळे ती कुठलीही आरक्षणे व्यपगत होणार नाहीत. आत्ता ह्याच्यामध्ये ज्यावेळेस दहा वर्षे कालावधी पूर्ण होईल. त्यावेळेस जमिन मालक महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमचे कलम १२७ आहे, त्यानुसार आपल्यावर नोटीस बजावू शकतात. की तुम्ही आमचे ॲक्वीझीशन करा आणि जर सहा महिन्यांच्या आत जर आपण त्याची कार्यवाही सुरु केली नाही, कार्यवाही म्हणजे आपण फक्त कलेक्टरला पत्र दिले तरी कार्यवाही सुरु होते, जर कार्यवाही. सुरु झाली नाही. तर ती व्यपगत होईल. तोपर्यंत २०१७ किंवा २०२० सालापर्यंत नवीन सुधारित विकास योजना होत नाही. तोपर्यंत कुठलेही आरक्षण व्यपगत होणार नाही. आपण जी भिती सांगितली की, अतिक्रमण किंवा झोपडया होण्याची भिती आहे. त्यासाठी आपले प्रशासन प्रयत्नशिल आहे आणि जी १०३ आरक्षणे आहेत ही तुम्हांला दोन ते तीन वर्षांमध्ये डेव्हलप झालेली दिसतील.

**मिलन म्हात्रे :-**

मी तुम्हाला जी डेट दिली त्यामध्ये माझे म्हणणे काय आहे ते तुम्ही बघा की, आपण मुदतवाढीचा प्रस्ताव १५ जुलैचा सांगितला आहे. जो आत्ता तुम्ही म्हणता. त्याच्या मुदतवाढीचा प्रस्ताव आपण शासनाकडे पाठवणार आहोत की नाही?

**दिलीप घेवारे :-**

आपण कशासाठी पाठवायचे? कारण ह्याची मुदत जी आहे. एम.आर.टी.पी. ॲक्टमध्ये संशोधन झालेले आहे...

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही अर्धे सांगितले. अर्धे वीस वर्षाचे आहे आणि अर्धे दहा वर्षाचे असे आपले स्टेटमेंट असताना.

**दिलीप घेवारे :-**

कलम १२७ खाली नोटीस बजावण्यासाठी दहा वर्षे पिरिएड आहे. पण डी.पी.सी ची मुदत वीस वर्षे आहे. आपण हा प्लॅन वीस वर्षासाठी तयार केलेला आहे. दहा वर्षाचा नाही.

**मिलन म्हात्रे :-**

दहा वर्षे तर पूर्ण झाली ना?

**दिलीप घेवारे :-**

त्याची मुदत वीस वर्षाची आहे. अजून दहा वर्षे बाकी आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

सेक्शन १२७ काय म्हणते. त्याबद्दल आपले काय मत आहे?

**दिलीप घेवारे :-**

सेक्शन १२७ असे म्हणते की, जर दहा वर्षे पूर्ण झाली. तर त्या जमिन मालकांनी प्लॅनिंग ऑथोरिटीला परचेस नोटीस बजावावी. म्हणजे आमची जमिन तुम्ही खरेदी करा. पैसे देउन, एफ.एस.आय. देउन किंवा टी.डी.आर. देउन. जर आपण सहा महिन्यात ती प्रोसिजर केली नाही. आपण एक लँड ॲक्वीझीशनचे प्रपोजल जरी कलेक्टरला टाकले तरी आपली प्रोसिजर सुरु झाली असा त्याचा अर्थ होतो. जर आपण ती केली नाही तर सहा महिन्यात ते रिझर्व्हेशन लॅप्स होते.

**मिलन म्हात्रे :-**

ज्या रिझर्व्हेशनच्या जागा आहेत. त्याच्यावर जे जमिन मालक आहेत. त्यांच्या त्या होणार. जी आरक्षणे आहेत. समजा माझ्या नावावर पाच एकरचे आरक्षण आहे. ते १५ जूलैनंतर मी त्याच्यावर क्लेम करणार. कारण त्याच्यावर तुम्ही प्रस्ताव पाठवलेले नाहीत.

**दिलीप घेवारे :-**

तो प्लॅनिंग ऑथोरिटीला १२७ ची नोटीस बजावणार. त्या नोटिसवर मा. आयुक्तांची सही घ्यावी लागेल की ही माझी जमिन आहे. तुम्ही दहा वर्षे काहीच केले नाही. ॲक्वीझीशन करा. जर आपण बोललो की ठिक आहे. ॲक्वीझीशन करतो तर ती जागा आपोआप ताब्यात येईल आणि जर आपण सहा महिने केलेच नाही. हेतू पुरस्पर दुर्लक्ष केले. तर ती लॅप्स होईल. त्याची जबाबदारी येईल.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आता शेवटचे बोललात तेच मी बोलतो आम्हाला तेच आश्वासन पाहिजे की, १५ जुलैनंतर प्रशासन काय करणार आहे? कारण नंतर भाईंदरला अब्जो-खरबो रुपयांच्या जमिनी आहेत. आणि लाईनमध्ये लोक तयार आहेत. आत्ता मिठागराच्या जमिनीचे सौदेसुद्धा व्हायला सुरुवात झाली असेल. दलाल लोक फिरतात. त्याच्यात काही आरक्षणाचे आपण सांगितले हा जो धोका मी तुम्हाला बोलतो. ही भिती नाही धोका आहे. भिती काय बाळगणार? सगळे लुटले गेलेले आहे. आरक्षणे काही राहिलेलीच नाहीत. काय भिती बाळगायची?आत्ता आपण दिडशे मिटरचे रस्ते बनवले त्याच्यात टॉवर बनून तयार झाले आहेत. शाळांची रिझर्व्हेशन प्ले ग्राउंड डिलीटेड टू आर झोन. काय भिती बाळगायची? तुम्ही ते पण परसेंटेज सांगा की, आपले आरक्षण किती होते? त्याच्यात किती परसेंट रिझर्व्हेशन आपण आर झोन केले? हरित पट्टा किती होता? त्याचे परसेंटेज किती राहिले? मी तुम्हाला पटकन सांगितले की, ३ टक्के राहिला. माझ्याकडे मॅप आहे. मी तुम्हाला स्पेशल मॅप आणून दाखवतो. म्हणजे १९९२ ला ज्यावेळेला तुमचा नकाशा झाला १९९७ ला मंजुरी दिली तेव्हाचा एक मॅप बनवला आणि आत्ताचा मॅप बनवला. मी तर सरळ सांगतो की, जी तुमची डी.सी. रुलची पुस्तिका आहे त्याच्यामध्ये दिलेली आरक्षणे आणि प्रत्यक्ष विकास आराखडयामध्ये असलेली आरक्षणे या संख्येचासुद्धा मेळ बसत नाही. साहेब, टाउन प्लॅनिंगची जी केस झाली. त्याच्यामध्ये मी प्रचंड अभ्यास केला. आपण ब्रम्हदेवचे टाउन पार्क बनवतो. त्या केसमध्ये मी संपूर्ण स्टडी केली. जवळ जवळ दिड महिना त्याच्यावर अभ्यास केला. पण ही फॅक्चुअल परिस्थिती आहे. तुम्ही शिटवरची एक-एक आरक्षणे मोजा आणि त्याच्या मार्किंग आरक्षणाची लिस्ट दिली आहे त्याच्यात दिले आहे मालकी आहे की, सरकारी आहे ते सगळे दिले आहे. तो जो डी.सी. रुल आहे. त्याच्यातील आणि याच्यातील आरक्षणाच्या संख्येचा मेळ बसत नाही. आणि तुम्ही हे जे शेवटचे वाक्य बोलतात तेच मी म्हणतो. भाईंदरमध्ये काही घेउ शकते. ही जी आरक्षणे आहेत त्याबद्दल सभागृहाला एक माहिती दया की, आम्ही १५ जूलैच्या ह्याच्यामध्ये ही ही प्रोसिजर करायला तयार आहोत. आणि ते आम्ही करु. साहेब आम्हाला बाकी काही म्हणायचे नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी, १९९२ साली जेव्हा ड्राफ्ट डेव्हलपमेंट प्लॅन प्रसिद्ध झाला. त्यानंतर आपल्याकडे ऑब्जेक्शन आणि सजेशन मागवले. १९९२ साली जेव्हा ड्राफ्ट डेव्हलपमेंट प्लॅन प्रसिद्ध झाला तेव्हा त्याच्यासोबत जी आरक्षणे दाखवली गेली त्या आरक्षणाचे सिरिअल नंबर कुठल्या सर्व्हे नंबरमध्ये आहेत, त्याचा एरिया किती, ती कोणी ॲक्वायर करायची, ॲक्वीझीशन ऑथोरिटी आणि त्याची ॲक्वीझीशन कॉस्ट अशा प्रकारची एक पुस्तिका प्रसिद्ध केली गेली. खरे म्हणजे ठराविक कालावधीमध्ये सजेशन ऑब्जेक्शनवर विचार होउन जर तो निर्णय नगरपालिकेच्या लेव्हलला झाला असता. तर त्यावेळीच ती आरक्षणे फायनल

झाली असती. परंतु, १९९२ सालानंतर १९९७ साली शेवटी शासनाने आपल्याकडून ड्राफ्ट डेव्हलपमेंट प्लॅन मागवून घेतला. १९९२ ते १९९७ च्या कालावधीमध्ये एम.आर.टी.पी. ॲक्ट खाली ३७ च्या कलमानुसार जे काही फेरबदल करायचे होते. त्या फेरबदलाचे सगळे अधिकार राज्य सरकारकडे होते. अजूनपर्यंत १९९७ पर्यंत मिरा भाईंदर नगरपालिका ही फायनल प्लॅनिंग ऑथोरिटी अस्तित्वात आली नसल्यामुळे १९९२ ते १९९७ च्या दरम्यान १९९२ ला दाखवलेली जेवढी आरक्षणे होती त्या आरक्षणामध्ये या एम.आर.टी.पी. कायदयाच्या ३७ अन्वये फेरबदल करण्याचे सगळे अधिकार शासनाने स्वतःकडे ठेवले आणि जेवढी प्रपोझल शासनाकडे गेली. त्या बऱ्याचशा प्रपोजलमध्ये शासनाने भुमिका घेउन ती आरक्षणे बदलून जे विकासक किंवा जे मालक होते ज्यांच्या जमिनीमध्ये आरक्षण होते त्या लोकांच्या मागणीनुसार आरक्षण बदलण्यात आले. बगिचाचे आरक्षण होते. मागणी होती रहिवास क्षेत्रात करायचे तर रहिवास क्षेत्रात केले. त्याच्यामुळे पहिल्यांदा जो पुस्तिकेचा संच प्रसिद्ध करण्यांत आला त्याच्यामध्ये जी आरक्षणे होती. ती आरक्षणे नंतर कायम राहिली नाहीत. ती आरक्षणे काही प्रमाणात कमी झाली. १९९७ साली जेव्हा पार्ट प्लॅन पहिल्यांदा पब्लिश केला. त्यावेळी त्या पार्ट प्लॅनमध्ये ती आरक्षणे कन्फर्म झाली आणि उरलेला पार्ट प्लॅन हा २००० साली प्रसिद्ध झाला. २००० सालापर्यंत आपले जे डी.सी.रुल्स होते. ते डि.सी.रुल्स शासनाच्या निकषानुसार किंवा मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीनुसार जे डी.सी.रुल्स होते त्याचाच आपण वापर करत होतो. त्यावेळी विकास नियंत्रण नियमावली प्रसिद्ध केली गेली होती. ती अदययावत करण्यासाठी आपण महानगरपालिकेच्या कालावधीमध्ये तो निर्णय घेतलेला आहे. विकास नियंत्रण नियमावली आणि रिझर्व्हेशनचा हा असा डायरेक्ट संबंध येत नाही. आजच्या तारखेला नगरसेवकांच्या मनामध्ये एवढीच भिती आहे की, १९९७ साली जो भागशः पार्ट प्लॅन प्रसिद्ध झाला. त्याची मुदत जेव्हा संपते त्याच्यामध्ये जी आरक्षणे आहेत. ती आरक्षणे व्यपगत होउ नयेत म्हणून आपण काही कारवाई करतो का? तर त्याच्यामध्ये दोनच शक्यता आहेत. जर आपण आरक्षणाच्या जागा आपल्या ताब्यात घेतल्या नाहीत. तर दहा वर्षे वाट पाहून तो जमिन मालक आपल्याला १२७ खाली नोटिस देईल. आणि ती नोटीस दिल्यानंतर ही आपण त्या जागा ॲक्विझीशन करण्याचा प्रयत्न केला नाही. तर ते आरक्षण व्यपगत होईल. त्याच्यानंतर २००० सालामध्ये जो भागशः प्लॅन प्रसिद्ध झाला. त्याच्या संदर्भातसुद्धा जर आरक्षणाची कुठलीही ॲक्शन आपल्याकडून घेतली नाही, त्याच्यामधील आरक्षणे ताब्यात घेण्याची तर त्याच्यामध्ये सुद्धा ते जमिन मालक १२७ खाली नोटीस देउन आपल्याकडून ती आरक्षणे व्यपगत करुन घेतील. म्हणून २०२० सालापर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेचा विकास आराखडा प्रसिद्ध झाल्यानंतर २० वर्षापर्यंत त्या विकास आराखडयाचे तरतुदी आपल्याला चालू राहतात व २० वर्षानंतर पुन्हा नविन विकास आराखडा बनविण्यात येतो. तर २० वर्षे संपेपर्यंत तरी कुठली आरक्षणे ही व्यपगत होत नसली तरी आरक्षण ताब्यात घेण्याच्या दृष्टीने त्या जागा ताब्यात घेण्याच्या दृष्टीने जर प्रशासनाने हयगय केली तर १२७ च्या नोटीसप्रमाणे आपली ही आरक्षण व्यपगत होउ शकतात आणि म्हणून ही करायला नको. कुठल्याही प्रकारे आरक्षणे व्यपगत होता कामा नये आणि आतापर्यंत असे काही प्रश्न आपल्याकडे आले आहेत का? जर आपण १९९७ असे धरले तर २००७ साली त्याला १० वर्षे पूर्ण होतात. कदाचित ह्यावर्षामध्ये आपल्याला अशा नोटीसा मिळण्याची शक्यता आहे किंवा आतापर्यंत अशा काही नोटीसा आपल्याकडे आले आहेत का? अशी कूठलीही नोटीस आलेली नाही जर ह्याच्या पुढे जर कोणत्याही नोटीसा आल्यातर त्याप्रमाणे आपण ती कार्यवाही सुरु करावी किंवा नोटीस वाटुन आपण फक्त आरक्षण ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु केली पाहिजे. १९९७ सालामध्ये जो भागाशः प्लान प्रसिध्द झालेला आहे त्या भागाशः नकाशामध्ये जी आरक्षणे दाखविली आहेत त्या आरक्षणांची जमिनी ताब्यात घेण्याची कार्यवाही आपल्याकडुन सुरु झाली पाहिजे. याठिकाणी महत्वाचा मुद्दा मला सांगावासा वाटतो की, आम्ही विकास नियंत्रण नियमावली बनवली विकास नियंत्रण नियमावली बनवतांना मिरा भाईंदरमध्ये ज्या जुन्या इमारती आहेत. त्या जुन्या इमारतींना वाढीव ऐफ एस आय मिळावा या दृष्टीकोनातुन त्यांना जास्तीत जास्त अडीच पर्यंत एफ.एस.आय अशाप्रकारच्या अनेक तरतुदी आम्ही केल्या.गावठण क्षेत्रामध्ये दोन एफ.एस.आय अशाप्रकारच्या अनेक तरतुदी करुन विकास नियंत्रण नियमावली प्रशासनाकडुन हे उत्तर पाहिजे की, विकास नियंत्रण नियमावलीचे काय झाले? ती मंजुर झाली की, नाही की होणार का नाही. त्याच्यामध्ये काही बदल सांगितले आहेत ते बदल करणे आवश्यक आहे का? आणि असतील तर ते कोणते किंवा मग आम्हला असे ऐकायला आले की, राज्य शासनाने अख्खा महाराष्ट्राकरिता सगळ्या महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्राकरीता एकाच प्रकारची विकास नियंत्रण नियमावली बनवणार आहे आणि त्याची आपण वाट पाहणार आहोत का? तसे केले तर आपल्याकडचा जो विकास आहे ह्याला अडथळा निर्माण होईल. कारण ज्याजुन्या इमारती पडायल्या आहेत. त्या पडायला आलेले आहेत. त्या इमारती तर पुन्हा बांधायला गेलोत व आम्ही प्लन पास करायला टाकला तर त्याठिकाणी आताच्या नियमानुसार फक्त एकच एफ.एस.आय मिळेल पण त्या मोडकळीस आलेल्या इमारतीतील लोकांना जर ॲकोमोडिक करायचे झाले तर ऑलरेडी तिथे दोनापेक्षा जास्त एफ.एस.आय वापरलेला आहे आणि म्हणुन आपण जास्त एफ.एस.आय देण्या संदर्भात विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तरतुद संदर्भात काय झाले. याबाबत कृपया प्रशासनाने आम्हाला स्पष्टीकरण करावे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी सुध्दा एक क्वेरी विचारली होती. त्याबद्दल प्रशासनाने अजून खुलासा केलेला नाही. कारण आपण फक्त बी.एस.यु.पी. बद्दल बोलता पण आय.एच.एस.डी. बद्दल उल्लेख केलेला आहे. केंद्र

सरकारचा जी.आर आहे आणि केंद्र शहरी रोजगार दारिद्र्य निर्मुलन विभागाचे आदेश दि. १५/६/२००६ त्यामध्ये या दोन्ही आपल्या महाराष्ट्र वाज्यामध्ये लागू करायचे असा केंद्र सरकारचा जी.आर. आहे. विषयपत्रिकेमध्ये आयुक्त साहेबांनी फक्त बी.एस.यु.पी. बद्दल उल्लेख केलेला आहे. त्यासंबंधी ही आपण क्लिअर करावे अशी माझी विनंती आहे.

**मिलींद वाणी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. हा जो बी.एस.यु.पी. आहे ते बेसिक सर्व्हिसवर अर्बन पुअर नावाची जी स्कीम आहे त्यात आपल्याला ज्या जागा आहेत. जिथे झोपडपट्टया झालेल्या आहेत. जे शासकीय विभागामध्ये बसतात त्या झोपडपट्टया ज्या कच्च्या असतात किंवा ज्या नॉमच्या बाहेर असतात अशा झोपडपट्टयांना शसनाच्या नियमानुसार आपण पक्क्या झोपडपट्टयांना बांधून देण्याची तरतुद जवाहरलाल नेहरु अरबन टिन्युअल मिशनमध्ये आहे आणि ते करण्यासाठी आपल्या ताब्शत जागा लागतात ही वस्तुस्थिती आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, केंद्र शासनाचे जवहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानमध्ये दोन स्कीम जाहिर केल्या आहेत. दोन कार्यक्रम आहे. त्या अंतर्गत गृहनिर्माण योजना तसेच बाह्य सुविधांचे प्रकल्प राबविणेकरीता दोन कार्यक्रम राबविण्यात आपल्याला आरक्षण दिलेले आहे, तसा निर्णय आहे. जो पहिला आहे तो बी.एस.यु.टी. जो आपण आता विषयपत्रिकेवर विषय आणलेला आहे. पण दुसरा जो आहे तो एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम आय.एस.एच.जी.पी. तो आपण आणणार नाही का? तो ही ह्याच्यामध्ये जोडा. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी जे मांडले आहे ते आपण या ठरावामध्ये अंतर्गत करुन घ्यावे.

**लिओ कोलासो :-**

या विषयामध्ये सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा यांनी जे विचारले त्याला सिटी इंजिनिअर साहेबांनी उत्तर दिलेले आहे की, हे जे चांगले प्रॅाग्राम्स आहेत विशेषतः झोपडपट्टी पुर्नबांधणीचे त्याठिकाणी जवाहरलाल राष्ट्रीय मिशनमध्ये जो प्रोग्रॅम घ्यायचा आहे त्याठिकाणची जी जमिन आहे. मालमत्ता जी आहे ती आपल्या ताब्यात असली पाहिजे. यासंपूर्ण मिरा भाईंदर क्षेत्रातल्या झोपडपट्टयांचा आपण जर विचार केला तर ह्या अद्यापही कोणाच्याही ताब्यात आलेल्या नाहीत. महापालिकेकडे वर्ग झालेल्या नाही. त्यामुळे तशा परिस्थितीमध्ये हा प्रोग्राम आपण ॲडोप करायचा जरी ठरवला तरी आपल्याला प्रत्यक्ष इम्प्लीमेंट करता येणार नाही. म्हणून याविषयावर आपण हे करु नये. परंतु, मी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांच्या मुद्यांकडे थोडेसे लक्ष वेधतो की, त्यांनी सांगितले की, ह्या शहरामध्ये नाविकासपट्टा जो एन.डी.झेड. त्याचे प्रमाण अत्यंत जास्तीचे घसरलेले आहे आणि ते ३ टक्केपर्यंत आलेले आहे. ह्याच्याशी आम्ही सहमत नाही. ह्याचे कारण जेव्हा मिरा भाईंदर शहराची विकास योजना प्रस्तावति झाली त्यावेळी शहराचा जो इ.एल.यु. तयार करण्यात आला होता एक्झीस्टींग लॅन्ज्यूर मॅप, त्या मॅपमध्ये शहरातील निरनिराळ्या टप्प्यांच्या क्षेत्राचे भुमापन करण्यांत आलेले होते. त्यामध्ये इंडस्ट्रीयल क्षेत्र किती? रहिवास क्षेत्र किती? विकसित रेसीडेन्शियल क्षेत्र किती? असे करुन जेव्हा विकास प्रस्ताव आपल्याकडे सादर करण्यांत आला होता त्यावेळची परिस्थिती अशी होती की, त्यावेळी भाईंदर वॉस कॅल्क्युलेट अपटू ७ टक्के डेव्हलप. संपूर्ण मिरा भाईंदर क्षेत्राचे भूमापन, भू विकास हा फक्त ७ टक्के झालेला होता आणि प्रस्तावित विकास आराखड्यामध्ये तो १५ टक्के ॲडीशनल दाखवण्यित आला होता. ह्याचा अर्थ बाय २०१० ह्या प्लॅनच्या पहिल्या दशकामध्ये हा विकास आरखडा फक्त मिरा भाईंदरचा विकास हा २५ टक्के ह्याचा अर्थ मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये आजसुध्दा ७५ टक्के ओपन भूक्षेत्र विकासासाठी उपलब्ध आहे. ज्याच्यामध्ये डांगराळ भाग आहे. ज्याच्यामध्ये स्लॉट लॅन्ड आहे. ज्याच्यामध्ये मार्शल लॅन्ड आहे आणि त्यामुळे फक्त सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी निर्दशनास आणले की, १९९२ ते १९९७ च्या दरम्यानच्यामध्ये राज्य शासनाने हा विकाय आराखडा आपल्याकडे ठेवल्यामुळे त्यांनी त्यांच्या मर्जीप्रमाणे कोणाची रद बदली करुन, वशिले लावून कोणी आपल्या स्कीम बदलल्या. काही आरक्षणे डीलेट केली तर हे सगळं समजण्यासारख आहे. परंतु, मी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांची जी भिती आहे, त्याच्यावर सांगतो की, सर्वसाधारण सभागृहाची ही एक भुमिका असते की, ३८६ रिझर्व्हेशन आपल्याकडे विकास योजनेमध्ये दिलेले आहेत. आपण सकाळी उठलो की, धाव मारायची आणि ती रिझर्वेशन ताब्यात घ्यायची अशी जी एक मानसिकता आहे ती तशी नाही. विकास आराखड्यातील भूसंपादनासाठी महापालिका पातळीवर सरकारी जमिन असेल तर आपल्याला फुकटामध्ये मिळेल. पहिल्या फेजमध्ये आपण १५ जमिनीची मागणी केली होती. त्यामध्ये ९ जागा आपल्याला विना खर्चाने मिळाल्या. स्टेडीयमची जागा आर्धी मिळाली आणि अर्धी वादग्रस्त झाल्यामुळे अजून मिळालेली नाही. पण आपण जे काही रिझर्व्हेशन ॲक्वायर करण्याचा प्रयत्न करणार आहोत तर आपल्याला महापालिकेच्या बजेटमध्ये हे रिझर्व्हेशन डेव्हलप करण्यासाठी किती निधी उपलब्ध आहे. आणि ह्या रिझर्वेशनची लॅन्ड ॲक्वीझीशन करण्यासाठी आपल्याकडे किती निधी आहे? दुर्देवाने म्हणावे लागेल की, गेल्या चार वर्षामध्ये, पाच वर्षामध्ये आपण कोटी आणि दिड कोटीच्या पलिकडे एखाद्या रिझर्व्हेशनसाठी किंवा भूसंपादनासाठी आपण काहीही प्रोव्हिजन केलेली नाही तर त्याला कारण आहे की, आपल्याकडे मोठा बजेट नाही. आपल्याला इतर बजेटच्या ॲलोकेशनप्रमाणे आरोग्याला, पाणी पुरवठ्याला असा निधी इतर ठिकाणी वापरला गेला किंवा अनुप केला जातो. आपण रिझर्वेशनच्या जमिनी विकत घेण्यासाठी निधीचे प्रोव्हिजन परिपूर्ण केले नाही. ते आपले

फायनान्शीयल ड्राफ्टॲक्ट आहे. ११७ खाली जरी कोणाच्या नोटीसा आल्या आणि जर त्याने सांगितले की, माझी जमिन घे. महापालिकेला सांगितले की, आमची जमिन घ्या आणि बाजार भावाप्रमाणे तेवढे पैसे आम्हाला द्या. तर ते महापालिकेला देणं शक्य नाही. त्याचे इस्टंट आहे. उत्तनला आम्ही ११७ कलमाखाली नोटीस दिली की, ही जमिन आम्हाला नको. महापालिकेचे त्याच्यावर रिझर्व्हेशन आहे. महापालिकेने ते ताब्यात घ्यावे. महापालिकेने आजपर्यंत घेतले नाही. कारण प्रत्यक्ष रिझर्व्हेशनची कॉस्ट फार मोठी आहे ते आपल्या बजेटमध्ये नाही म्हणून जेव्हा सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी आपण बोलतो की, ॲक्वायझेशनला प्राधान्य दिले पाहिजे. फक्त ह्याच्यामध्ये एकतर्फे येण्यासारखे आहे की, ११७ च्या नोटीसी बिफोर एक्सपायर ऑफ २००८ ह्याच्या अगोदर आपण दिल्या नाही. ॲक्वीझीशनच्या नोटीसा आपण संबंधितांना दिल्या पाहिजेत एवढी माझी मा. महापौर साहेबांकडे विनंती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमची मागणी सुद्धा हीच आहे. प्रशासनाने तो प्रस्ताव पुढे आणायला पाहिजे होता. जेणेकरून जर उद्या प्रशासनाकडून नोटीसा गेल्या नाही तर पुढचे काम करायला सोपे जाईल.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी जे वक्तव्य केले. मी ३८६ आरक्षणाच्या संदर्भात न बोलता सन्मा. सदस्य हे त्यावेळी नियोजन समितीचे अध्यक्ष होते. हा जो आरक्षणाचा विषय आहे त्याच्यामध्ये त्यांची बरीचशी मोठी भुमिका आहे. जुनी ग्रामपंचायत पासूनची घरे उत्तन, चौक आणि पाली येथे ग्रामपंचायत काळापासूनची घरे आहेत आणि विकास आराखडा ज्यावेळी १९९२ साली ड्रॉफ्ट तयार झाला आणि १९९७ ला मान्यता मिळाली तर ग्रामपंचायतीच्या वेळेला जी जी घरे आहेत तिथे आरक्षण टाकायची गरज काय होती? सरांना मी विचारतो की, त्यावेळेला जी आरक्षण टाकली गेलेली आहेत ती ग्रामपंचायतची आहेत. काका बॉप्टीस्टा मेमोरियल उत्तन २०१ पैकी जुनी ग्रामपंचायत कालावधी पासूनची घरे, कोंडवाडा ८ - ९ पैकी मुर्धा जुनी ग्रामपंचायतच्या कालावधीपासूनची घरे प्राथमिक शाळा व मैदान ७ पैकी चौक, कोटानिकाल गार्डन १७-१८-५-१४-१६ पैकी पाली, मासळी सुकवण्याची जागा ८२-८४-८५ आणि ९३ पाली जर ग्रामपंचायत काळापासून जर होती तर आपण ती आरक्षणात केव्हा टाकली सन्मा. सदस्य (सर) मी आपणालाच विचारत आहे.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी जी माहिती गोळा केली ती वाखाणण्यासारखी आहे. बरं झाले की ही माहिती त्यांनी संग्रहित केली. आपल्याला एक गोष्ट मानायला पाहिजे, महापालिकेची विकास योजना किंवा नगरपालिकेचा विकास योजना करताना ई.एल.यु. म्हणजे विद्यमान भूमापन नकाशा. हा तयार केला त्यावेळी ती घर नसावीत काही घर असतील. एखादे दुसरे घर ह्या कोपऱ्यात असू शकेल. स्टेडियमच्या समोर मी राहतो तुम्ही राहत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, प्रशासनाने ही दिलेली माहिती आहे. ती मी आपल्याला वाचून दाखविली.

**लिओ कोलासो :-**

प्रशासनाने ही माहिती दिलेली नाही की लोकांच्या घरावर विकास आराखडा लावलेला आहे. पोर्टनिकल गार्डन पालीच्या बाबत आपण जो विषय सांगता की, जेव्हा विकास आराखड्यावर साधारणपणे ५८० लोकांच्या हरकती आलेल्या होत्या आणि ज्या ज्या ठिकाणी समिती होती त्या समितीमध्ये माजी नगराध्यक्ष गिल्बर्टजी मेंडोंन्सा होते, सी.डी. सिंग होते, मुझफ्फर हुसैनजी होते, तुळशीदास म्हात्रेजी होते आम्ही हेअरिंग घेतल्या आणि त्या हेअरिंगमध्ये आम्ही जो रिपोर्ट तयार केला तो फार मुदतबाह्य झाल्यामुळे आमच्या रिपोर्टला कोणी विचारले नाही आणि ते शासनाने करून घेतला. प्रश्न हाच राहिला जिथे जिथे अन्यायग्रस्त होत, मी तुम्हाला मुद्दामुन सांगतोय काशिमिरा, मिरा गावठणमध्ये एका आंधळ्या माणसाची जमिन आरक्षणामध्ये आली होती. आमच्या समितीने त्यावेळी निर्णय घेतला की, ही जागा महापालिकेला नको, आंधळ्याकडे सुद्धा आपण दृष्टीपूर्वक बघायला पाहिजे म्हणून आंधळ्याची जमीन आरक्षण मुक्त केले. अशा किती तरी गोष्टी आरक्षणातून मुक्त झालेल्या आहेत. त्या गोष्टीचा उहापोह करण्यात आता आवश्यकता नाही जो प्रश्न सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी उपस्थित केलेला आहे की, हा विकास आराखडा व्यपंगत होणार आहे का? संपणार आहे का तर नाही. तो सिलोटा आहे तो परंपरेने चालणार आहे. मुंबई महापालिकेचा विकास आराखडा आजपर्यंत कधीच संपलेला नाही तो कंटीन्यु प्रोसेसमध्ये आहे काही वेळा विकास आराखड्यामध्ये पार्टलीबद्दल सुचविण्यात येतात म्हणून टी.पी. मध्ये ३७ सेक्शनचे जे प्रोव्हीजन आहे. त्या सेक्शनप्रमाणे जेव्हा आपल्याला आवश्यकता असेल सन्मा. सदस्य रतन पाटील आपण म्हणतात व जर लोकांच्या घरावर विकास आराखडा आलेला असेल तर त्याठिकाणी ३७ ची कारवाई आपण सभागृहात करू शकता आणि त्यावरच्या त्याच्या डोक्यावरचे रिझर्व्हेशन आपण काढू शकता हे आपल्याला ह्याच्यातील माहिती आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे आता १९९२ ते १९९७ ला आपण प्लान तयार झाला. माझी स्वतःची जागा स्वतःच्या जागेवर मी १९९२ साली बिल्डींग बांधलेली आहे. आपल्या महानगरपालिकेची

परमिशन घेउन बिल्डींग बांधलेली आहे. त्याला ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिलेले आहे आणि माझ्या जागेच्या पुढे पोस्ट ॲन्ड टेलिग्राफचे रिझर्व्हेशन होते आणि अस्तित्वात तिथे बिल्डींग सुद्धा होती. परंतु, माझी बिल्डींग झाल्यानंतर माझे ऑक्युपेशन सर्टिफिकेट आल्यानंतर सुद्धा माझ्या बिल्डींगवर पोस्ट ॲन्ड टेलिग्राफचे रिझर्व्हेशन त्याठिकाणी लादले गेले. माझी बिल्डींग पूर्ण होउन सुद्धा त्या बिल्डींगवर लोक आज १०-१५ वर्षापासुन राहतात तरीही त्या बिल्डींगचे रिझर्व्हेशन अजूनही हटलेले नाही आणि त्याच ठिकाणी आहे. आपल्याकडे रिझर्व्हेशनमध्ये पोस्ट ॲन्ड टेलिग्राफचे रिझर्व्हेशन आहे का? असले तर सांगावे. म्हणजे आता सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब बोलले ना बिल्डींगच्या ह्याच्यावर असे कुठलेही आरक्षण नाही. तर आहे. माझ्या स्वतःच्या बिल्डींगच्या जागेत आहे आणि त्यावेळी साहेब नियोजन समितीवर अध्यक्ष होते. तेव्हा मी त्यांना पत्रव्यवहार केलेला आहे व त्यांना सुद्धा मी कळविलेले आहे. महानगरपालिकेला सुद्धा कळविलेले आहे. कलेक्टरला सुद्धा कळविलेले आहे की माझ्याकडे ऑक्युपेशन सर्टिफिकेट असताना तुम्ही ह्याच्यावर आरक्षण टाकलेले आहे हे कृपया हटवावे आणि आजच्या तारखेला ते आरक्षण हटलेले नाही. आणि आज ही पोस्ट आणि टेलिग्राफचे पोस्ट ऑफिस ते दुसऱ्याच्या जागेमध्ये आहे आपल्या प्लानवर कुठेही त्याचे आरक्षण नाही. ही फार गंभीर बाब आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सभागृहामध्ये असे वाटायला लागले की, सगळा विकास आराखडा बनविला तो सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी बनविला असे सभागृहात लोकांचे मत आहे. कारण ह्यावेळी ते प्लानिंग समितीचे सभापती होते. खरं म्हणजे बऱ्याचशा नगरसेवकांना माहित नाही की, विकास आराखडा हा जी कमिटी बनली होती त्या कमिटीचे चेअरमन स्वतः डायरेक्टर ऑफ टाउन प्लानिंग होते आणि त्यांच्या सोबत इतर त्यांचे सहकारी होते. त्यांनी हा विकास आराखडा प्रारूप प्लान डेव्हलपमेंट प्लान बनवून तुमच्याकडे पाठविला, तुम्ही पब्लिश केल. ऑब्जेक्शन, सजेशन, हेअरिंग द्यायला तुम्हाला संध मिळाली ही काय छोटी बाब नाही. पण त्यावेळी जी आरक्षण टाकली गेली व सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांचा जो आरोप आहे काही अशी घर आहेत व खारी गावात ही जिथे दाटीवाटीने वस्ती आहे तिथे आरक्षण आहेत. बिल्डींग आहे पण तिथे आरक्षण पडलेली आहेत. ह्याचा अर्थ असा होत नाही की, स्थानिक लोकांनी विकास आराखडा बनवून त्याच्यावर आरक्षण टाकलेली आहे आणि त्यावेळची जी प्लानिंग कमिटी होती ती जस्ट अस्तित्वात आलेली होती. २४/११/१९९१ ला आपल्या निवडणूका झाल्या. १९९२ ला आपला विकास आरखडा बनविला नाही. हा आरखडा बनल्यनंतर त्यांचे कामकाज सुरु झाले. पण त्याचे ॲथोरिटी किती होत्या. प्लॅनिंग ॲथोरिटीने ते करताना त्यांनी ॲक्च्युअल त्या भागामध्ये कसल्या प्रकारची वस्ती आहे का, घरं आहे का? बिल्डीग आहे का? की आरक्षण टाकणे योग्य होईल. परंतु, त्यांनी कदाचित २० वर्षानंतरचा किंवा १० वर्षानंतरचा विचार त्यांनी समोर ठेवला असेल ही अनधिकृत इमारत आहे किंवा ह्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत किंवा ह्या जुन्या आहेत त्या पडतील तेव्हा त्याठिकाणी ते आरक्षण वापरलं जाईल. सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांना मी एकच सांगतो की, येथे पोटतिडकीने बोलले की, पोस्ट ॲन्ड टेलीग्रामचे त्याठिकाणी रिझर्वेशन आहे. मी तर त्यांना म्हणतो की, पाच वर्षापासून सत्ता तुमची आहे. सभापती साहेबांनी सांगितले की, ३७ (१) खाली तुम्हाला अशाप्रकारचे आरक्षण चुकीचे आहे. आम्ही सुध्दा आरक्षण बदलले ते विचारा. मी नगराध्यक्ष असताना ३७ (१) खालचे प्रस्ताव, सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा मॅडम, उपनगराध्यक्षा आहेत. आपल्याला माहित आहे की, धारावी मंदिराजवळचा रस्ता कसा दाखविला होता. मधे डोंगर दाखवून रस्ता न दाखविता डायरेक्ट देवळाला लागून रस्ता दाखविला होता. तसा रस्ता नव्हताच. मुर्धा गावचा कोंडवाडा होता. तो एक चुकीचा होता. अशी आरक्षण आम्ही बदलली इव्हन आरक्षण कमी ऑक्ट्राय नाक्याचे जे आरक्षण आहे. त्याठिकाणी सुद्धा ते आरक्षण कमी करावे अशाप्रकारचा प्रस्ताव आम्हीच आणला होता. पाच वर्षे तुम्हाला तुमच्या सभागृहनेत्याने मार्गदर्शन नाही केले का?

**मिलन पाटील :-**

पत्रव्यवहार केलेला आहे. तिथे भाडोत्री राहतात व मी ती बिल्डिंग विकलेली आहे. मला आवश्यकता नाही आणि महानगरपालिकेला वाटले तर ते बदलतील.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी जी.आर. पाठविला आहे. त्याच्यावर योग्य तो निर्णय घ्यावा आणि सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी जो ठराव मांडला आहे ते त्याच्यामध्ये इनक्ल्युड करुन घ्यावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

विकास नियंत्रण नियमावलीचे काय झाले?

**दिलीप घेवारे :-**

आपला जो आपला अंतिम ठराव सुधारित नियंत्रण नियमावलीच्या संदर्भात आहे तो १८ एप्रिल, २००६ ला मंजूर झाला होता त्या अनुषंगाने आपण सर्व परिपूर्ण प्रस्ताव ३१ मे, २००६ रोजी शासनाकडे सादर केलेला आहे. शासनाने सहा नगररचनाकार ठाणे, उपसंचालक कोकण विभाग, संचालक पुणे, या तिघांचे अहवाल मागवलेले आहेत. ठाण्याचा अहवाल दिलेला आहे आणि कोकण विभागाने २३ फेब्रुवारी २००७ ला आमच्याकडे क्रिस्ट केले होते. ते १४ मार्चला कम्प्लाईन्स केलेले आहे. त्यांचा ही अहवाल अपेक्षित आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

विकास नियंत्रण नियमावलीतल्या तरतुदी ह्या आम्ही ज्या बनवून पाठवल्या या मंजूर झाल्यानंतर त्या तरतुदी लागू होतील का? समजा, मला गावठण क्षेत्रामध्ये घरं बांधायची आहेत. आम्हाला नव्या तरतुदीनुसार दोन एफ.एस.आय. मिळेल. कारण आपण त्यातल्या काही तरतुदी लागू केल्या. ज्याठिकाणी महानगरपालिकेचा फायदा होता त्याठिकाणी आपण नव्या विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदी लागू केल्या त्या तशा लागू करणार का? म्हणजे आम्हांला तिथंपर्यंत थांबायला नको.

**दिलीप घेवारे :-**

नंतर मंजूर करता येतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

शासनाने मंजूर केल्यानंतर ते लागू होतील.

**मिलन पाटील :-**

श्री. घेवारे साहेब, तुम्हांला आमची विनंती आहे की, तुम्ही जर ह्याच्यामागे लागा कारण तुमचेच ते काम आहे. जेवढे लवकरात लवकर तुम्ही आणाल तेवढाच शहराचा विकाससुद्धा होईल म्हणून तुम्हांला नम्र विनंती आहे की, तुम्ही लवकरात लवकर शासनाकडून करुन आणले तर बरे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ह्यांनी मांडलेला ठराव, तसेच सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा ह्यांनी मांडलेली सुचना आता ठरावामध्ये समाविष्ट करुन घेण्यांत येते.

**रोहित सुवर्णा :-**

धन्यवाद.

**रोहिदास पाटील :-**

ठरावात जे आवश्यक आहे तेच ॲड करा. या शहरामध्ये हा विकास आराखडा मंजूर झाल्यानंतर तसेच, सर्वसामान्य नागरिकांनी तक्रार केली त्यांना काही रस्ता दिसलाच नाही. त्यांची पोच नव्हती. संबंधित होते त्यांनी ह्यांच्या पर्यंत पोच पर्यंत जावून ई.डी. पर्यंत गेले त्यांनी न्याय मिळवला. काहीकांना न्याय मिळाला, काहीकांना न्याय मिळाला नाही. मला नक्की आठवते की, सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी फार मोठी भुमिका बजावली ते नियोजनचे सभापती होते. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील नगराध्यक्ष होते. त्यांना जे हवे होते ते केले असे म्हणण्याचा प्रयत्न करणार नाही. पण त्यातले बरेच काही झाले हे खरं आहे. पण जे झाले नाही हे त्रिवार सत्य आहे. त्या रोडमध्ये तिथे रस्ते दाखवले डी.पी.चे रोड दाखविले त्याठिकाणी चार चार माळ्याच्या इमारती आहेत. आपल्या महापालिकेचा आजपर्यंत कधीही ठराव गेलेला नाही की, ज्याठिकाणी तुम्ही रस्ता बनवू शकत नाही. आजची स्थिती अशी आहे की, एक रोड आहे. त्याच्यामध्ये आठ नउ इमारती आहेत. त्या इमारती तुम्ही काढू शकत नाही. त्या इमारती काढणार नाही तर त्या रोडमध्ये जी लाईन आहे त्या ठिकाणचा माणूस जर नगररचनाकडे न्याय मागायला जातो, एन.ओ.सी. मागायला जातो. त्यावेळी हेच दाखविले होते की, हा रस्ता आहे. म्हणजे स्वतःचा तो विकास करु शकत नाही. जर केले तरच मी न्याय देत नाही. अशा रस्त्यांची टिपणी करणे गरजेचे होते आणि त्याच्यावर प्रशासनाच्या वतीने आणि सत्ताधारी पक्षाच्यावतीने ही दोघांनी बसून निर्णय घ्यायला पाहिजे होता की, हे रस्ते डिले्ट करायला पाहिजे. आता जसे काही जे रस्ते आहेत. ज्या रस्त्यामध्ये चार चार माळ्याचे एक नाही तर २८-३० इमारती आहेत. जसे ब्रेड कापता तसे कापू शकत नाही. त्या २० फूट आतमध्ये आहेत. तुम्ही जे सांगता तो साठ फुटीचा रस्ता आहे. साठ फूटीचा रस्त्यावर तुम्ही बनवूच शकत नाही. त्याची आवश्यकता नाही किंवा ते बनवू शकत नाही तर ते डिलेट तरी करायला पाहिजे होते ना. आज ते केलं की नाही. कोणत्याही गोष्टीचा विकास होत नाही. आपण असे स्वप्न बघत होते. ज्यावेळी ही बिल्डिंग नविन बनवायला येईल त्यावेळी त्या बिल्डिंगची परमिशन देतेवेळी आपण तो रस्ता मोकळा करुन परमिशन दयायची. आधी बनलेल्या ज्या बिल्डिंग आहेत ते चार माळ्याची आहे. पाच माळ्याची आहे म्हणजे जास्तीचा मिळणारा जो एफ.एस आहे तो सुद्धा अपुरा पडतोय. अशाच कितीतरी इमारती आहेत. त्याला पर्याय न जोडता ते रस्ते आपण खरोखर सात दाखविले तर ४५ तरी बिल्डिंग वाचवू शकतो का? कमी वेळेत वाचवू शकता का? ती तुटली तर त्याचा एक एस.आय मिळेल का? गांर्भीयाने अजूनपर्यंत असा विचार न केल्यामुळे अनेक प्रकरण तुमच्याकडे पेन्डींग आहे. आम्ही टाहो फोडून सांगितले तरी त्याला अर्थ काय? आता पाउस पडला तर बिल्डिंग कुठे जाईल त्याचा पत्ता नाही. आपण नोटीस देवून मोकळे झालो? आपल्या कामाची तऱ्हा अशी आहे की, आपण जर बिल्डिंगच्या लोकांना बिल्डिंग धोकादायक म्हणून नोटीस दिली व खाली करा आणि बाहेर जा. कुठे जायची व्यवस्था नाही. नगरपरिषदेकडून महापालिकेकडे आलात. महापालिकेचे पाचवे वर्षे म्हणजे जलप्रदींचे पाचवे वर्षे पण त्याच्यावर कोणताही पर्याय आपण केला नाही जसे मगाशी सांगितले गेले की, हे पेलवण्याची जबाबदारी कोणाची? नोटीसा देवून आपले कर्तव्य संपले का? की त्यांना राहण्यासाठी सहानुभूतीने संक्रमक बांधणे हे आपले कर्तव्य आहे ह्यांचा कुठेही ताळमेळ झालेला नाही. दुसरी गोष्ट अशी की सरांनी सांगितले की आपण ॲक्वीझेशन करु शकलो नाही. सभागृह किती चिंतेकडे चालले आहे ते बघा. आपलेच चेहरे आपण आरशात बघावे. जी परिस्थिती आहे, आरोग्य समितीचे सभापती कोर्ट आपण जाहिर केले त्यांना केबिन दिले. गाडी दिली आणखिन काय काय

दिले ते सज्ज झाले. त्याची शेवटी तब्येत बिघडली. विधी सभापतींना आपण सर्व काही दिले. जे हवे आहे ते सर्व दिले. पण आजच्या घटकेला त्यांची स्थिती काय? आपण जर वीज संपादन अधिकाऱ्याची पोस्ट क्रिएट केली. डेप्युट केले, डेप्युटेशनवर आले. आले कुठे गेले कुठे? एक बुट प्वॉईंटसाठी महापालिका ताब्यात घेउ शकली नाही. हा इतिहास आहे. ही वस्तुस्थिती आहे की, एक फूटसुद्धा आपण पगार घेतले सर्व काही घेतले, पण त्यांनी एक फूट ॲक्वीझेशन ची परिणाम दिला नाही किंवा एक फूट जागा ही महापालिकेला दिली नाही. जर शासकिय जागा मिळवण्यामध्ये त्यांना यश आले नाही. तर खाजगी जागा काय मिळवणार? खाजगी जागा त्यांच्या सोयीचे आहे. त्यांनी महापालिकेच्या ताब्यात दिले आणि जे हुशार आहेत त्यांनी टी.डी.आर घेतला आपण त्यांना ही धन्यवाद देतो की तुम्ही तेवढी तरी मदत केली व मा. महापालिकेच्या कामामध्ये सहकार्य केले आणि प्रशासनाचे ही काम समाधानकारक नाही आणि सत्ताधाऱ्यांचेही काम समाधानकारक नाही. कोणत्याही कामाचे क्रेडिट घेण्यासाठी आजची स्थिती नाही हे सभागृह बोलते आम्ही विरोधी लोक बोलतो असे नाही तर हे सभागृह बोलतो. एक खरं तरी बोलायचे उशिरा का होईना. सगळेच खरं बोलायला लागले. साहेब, आत्ताचा जो ठराव आहे त्याच्यामध्ये तो दुरुस्त करायचे. महापालिकेचे कामकाज नीटनेटके चालण्यासाठी आवश्यक असेल आम्ही दोघं गेले दोन वर्षासाठी प्रयत्न करत होतो. जेव्हा हे पहिल्यांदा सभापती झाले. प्रभाग समितीला सभापती झाल्यावर त्या त्यावेळी आरक्षण मोकळे करु या. एक नाक्यावरच्या शहरांची शोभा वाढेल. क्र. २२ चे आरक्षण ही सक्षम महानगरपालिका आणि सत्ताधारी सक्षम असतांनाही तुम्ही १० कोटी रुपयाची जागा सुद्धा डेव्हलप करु शकले नाही. हे यश म्हणायचे की अपयश म्हणायचे. मला एवढेच म्हणायचे आहे की ही जी जागा आता मिळू शकते. त्याच्यासाठी तरी आता ही शेवटची करु या करुया हे आपले त्यासाठी शेवटेच बोलणे आहे आतातरी श्री. दिलीप घेवारे साहेब काहीतरी करतील. बरे करतील. असे मी बर बोलून ह्याविषयी मला जे सुचवायचे आहे ते तुमच्या लक्षात आले की शहराच्या दृष्टीने जे आवश्यक आहे त्याच्यावर आतातरी काम करा धन्यवाद.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी खाली बसावे. एकाच विषयावर तीच तीच चर्चा होत आहे. आरक्षणाचाच विषय आपण बोलत आहात.

**मिलन म्हात्रे :-**

पुढे प्रशासन काय करणार?

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, मुझे इस बारे मे जानकारी नही इसलिए मैं बोलूँगा नही। यश और अपयश की बात आई इसलिए मैं बोल रहा हूँ। मैं अभिनंदन का ठराव मांड रहा हूँ। मा. श्री. संजय केळकरजी, मा. श्री. रामनाथ मते इनके खुलासासे नवघर चौकी आज पुलिस स्टेशन रुपांतर होने को जा रही है। मा. गृहराज्य मंत्री उनके के अनुसार जेसलपार्क चौपाटी मा. रामनाथजी मते, आमदार मा. संजयजी केळकर इनके खुलासासे...

**मिलन पाटील :-**

मॅडम, विषयाचे रुपांतर चालले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, एखादया राजकीय भूमिकेचे विषय चालला आहे की, कसला विषय चालला आहे?

**शिवप्रकाश भुदेका :-**

उनके प्रयास से जेसल पार्क चौपाटी का हस्तांतरण मिरा भाईंदर महानगरपालिके के पास हो गया है। उसके लिए मैं अभिनंदन का ठराव मांड रहा हूँ।

**मदनसिंग उदितनारायण :-**

उसको मैं अनुमोदन दे रहा है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसून घ्यावे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर, आता जो अभिनंदनाचा ठराव सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका ह्यांनी मांडला त्याला आमचा विरोध आहे. याबाबत आमच्याकडे संपूर्ण पेपर आहेत. एस. पी. साहेबांकडून आम्ही पेपर आणलेले आहेत. मा. श्री. आर. आर. पाटील गृहमंत्री असल्यापासून आम्ही तिथे पुरावा केलेला आहे. त्यांचे पेपर आम्ही घेतलेले आहे आणि तो विषय आम्ही आणलेला आहे. या शहराचे प्रथम आमदार मुझफ्फर हुसैन साहेबांनी ह्याच्यासाठी भरपुर प्रयत्न केलेले आहेत. आज हा आदेश गृहराज्य मंत्री ह्यांनी दिला आहे. पण ह्यांच्या प्रयत्नामुळे असे काही म्हणता येणार नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपका काम कांड करनेका है और हमारा काम दान करनेका है।

**दिनेश नलावडे :-**

मा. मुझफ्फर हुसैन साहेबांचे अभिनंदन झाले पाहिजे. त्यांनी प्रयत्न केलेले आहेत. त्यांनी प्रयत्न करुन आज नवघर चौकी ही पोलिस चौकीमध्ये रुपांतर झालेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे लक्षात घ्या त्या बैठकीत मी होतो. बैठक अधिकृत होती.

(सभागृहात गोंधळ)

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, विकास आराखडयाची गोष्ट चालली होती. मा. माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील साहेब व नियोजन समितीचे माजी सभापती लिओ कोलासो साहेब, विकास आराखडयाबाबत सन्मा. सदस्य रतन पाटील साहेबांनी मुद्दा उचलला की कुठेतरी बिल्डिंग आणि सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांनी जाणीव आणली. कुठे जकात नाका होता. कुठे कुठले रिझर्व्हेशन आहे तिथे आता बिल्डिंग आहे तर माझा प्रशासनाला फक्त एकच प्रश्न आहे की अशी रिझर्व्हेशन जेव्हा आपण विकास आराखडयामध्ये दाखवलेली आहे त्या आराखडयाच्या पेपरवर रिझर्व्हेशन दिसत आहे. परंतु, ॲक्च्युअली आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये त्या रिझर्व्हेशन बिल्डिंग किंवा स्ट्रक्चर आहे. अशी रिझर्व्हेशन किती आहेत? ऑन दि पेपर आपल्याला रिझर्व्हेशन दिसत आहे. असे की पोस्टाचे रिझर्व्हेशन तिथे ऑलरेडी आता चार माळ्याची बिल्डिंग आहे अशी रिझर्व्हेशन आपल्याकडे किती आहेत? परंतु, तिथे आज एक्स, वाय, झेड स्ट्रक्चर निर्माण होत आहे. तसाच माझा दुसरा प्रश्न असा की सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी जो ठराव मांडलेला आहे त्या ठरावाचे सभागृहामध्ये वाचन करावे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आयुक्त साहेब सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, लिओ कोलासो साहेब ह्यांचे असे आहे की, पुढच्या येणाऱ्या कालावधीमध्ये आरक्षण कदाचित लॅप्स होतील. साहेबांनी सांगितले की आपण त्यांना नोटीसा बजवायच्या आणि ॲक्वीझेशन करायला सुरुवात करायची. खरं म्हणजे ही चर्चा करायला नको होती. कारण ही सगळी गोष्ट बिल्डर लॉबीला बाहेर माहित पडली असता कदाचित आपले आरक्षण लॅप्स होतील. आपल्याकडे अजूनपर्यंत १० वर्षापर्यंत मुदत आहेत. जिथंपर्यंत बिल्डर आपल्याला मालकीची जागा ॲप्रोच करित नाही. तिथंपर्यंत एखादयाला जर आपण नोटीस वाजवली उदया तुम्ही सर्वांना नोटीस वाजवली आणि सर्वांना सांगितले की आमचे ॲक्वीझेशन करा आणि कॉम्पनसेट करा तर तुम्हाला करोड नाहीतर अरबो खरबो करोड रुपये लागणार आहे. मग त्यावेळी तुम्ही त्यांना नाकारु शकत नाही की तुम्ही दोन वर्षानंतर या किंवा तीन वर्षानंतर या नोटीस न वाजवता आपल्याकडे समोरुन जे लोक नोटीस देतील त्याचे ॲक्झीशनचे प्रोसेस सुरु करा. नोटीस वाजवली तर मोठया प्रमाणात नुकसानच होणार आहे आणि त्यावेळी आपण त्यांना कॉम्पनसेट केले नाही तर मग आरक्षण लॅप्स होतील. त्यामुळे आपण माझी तशी सुचना घ्यावी.

**तुळशीदास म्हात्रे :-**

शिवसेना बी.जे.पी शासन आल्यानंतर त्या लोकांनी आरक्षण घेउन जागा ताब्यात घेतली व ज्याने ऑब्जेक्शन घेतले व ते ऑब्जेक्शन, सजेशन दिले होते त्याच्यावर जाणूनबुजून आरक्षण टाकले. उलट केले त्याप्रमाणे आझाद नगरमध्ये ८३ ची घरं आहेत त्यांचे संपूर्ण आरक्षण टाकलेले आहे अशा कितीतरी चुका झालेल्या त्या चुका शासनाने केलेल्या आहेत. आम्ही त्या सुधारण्यासाठी बसलो होतो. इतक्यात शासनाने तो नकाशा आपल्या ताब्यात घेतला आणि आमचे तिथे काहीच चालले नाही. नगरपालिकेचे काहीच चालले नाही. ही वस्तुस्थिती आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

**दिलीप घेवारे :-**

३४ आरक्षणावर अतिक्रमण आहे अशी मी मा. महासभेमध्ये माहिती दिलेली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, मी अतिक्रमण बाबत विचारत नाही. माझा प्रश्न तो नाही. आपल्या विकास आराखडा आपण एक रिझर्व्हेशन दाखवलेला आहे. परंतु, आपण जेव्हा ते रिझर्व्हेशन दाखवले तेव्हा तिथे ऑलरेडी कुठला ना कुठला स्ट्रक्चर होता. तरीपण तो आरक्षण दाखवलेला आहे. मला ते रिझर्व्हेशनबाबत माहिती पाहिजे.

**दिलीप घेवारे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काकांनी) ह्यांनी जी सुचना मांडली होती ती स्थायी समितीमध्ये सुद्धा मांडली होती. त्या अनुषंगाने श्री. राणे हे जे सर्व्हेअर आहेत त्यांना आपण सर्व्हे करायला सांगितलेले आहे. कारण ज्यावेळेस १९९२ ला विकास आराखडा झाला आणि आरक्षण टाकली गेली त्याच्यापूर्वी किती स्ट्रक्चर होते त्याचा सर्व्हे त्याला करायला सांगितलेला आहे ते आले की, मी आपल्याला सांगतो.

**रिटा शाह :-**

म्हणजे प्रशासनाकडे ह्याची कुठलीही माहिती नाही. ह्याचा अर्थ असा आहे की, जेव्हा विकास आराखडा तयार झाला त्याच्यामध्ये इथले लोक त्या समितीवर होते. कॉर्पोरेशनची माणसं होती. कुठल्या

गल्लीत, कुठल्या बिल्डिंगमध्ये कुठे काय आलेले आहे हे सर्वांना माहित होते. ती बिल्डिंग तिथे असताना ते स्ट्रक्चर तिथे असताना ते रिझर्व्हेशन तिकडे कायम झाले. त्याचा एकच अर्थ होतो की ते रिझर्व्हेशन आपल्याला ऑन दि पेपर दाखवायचे आहे की, मिरा भाईंदर शहरामध्ये आम्ही १० वर्षाचा विकास अशाप्रमाणे करणार आहोत आणि ही रिझर्व्हेशन लावलेली आहेत. परंतु, समितीवर बसणारे सर्व समितीवरचे सदस्य व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना माहित होते की, सदर रिझर्व्हेशनवर बिल्डिंग आहे. इंडस्ट्रीयल स्ट्रक्चर आहे झोपडपट्टी आहे. तिथे अमुक स्ट्रक्चर आहे हे सर्वांना माहित असून सुद्धा विकास आराखडयामध्ये हे रिझर्व्हेशन फक्त दाखवण्यासाठी दाखविलेले गेले त्याची माहिती आपण मला देवू शकणार नाही आणि उदयाही देवू शकणार नाही कारण ते सर्वांना माहित असूनसुद्धा ते आपले होते तेव्हा जाणुनबुजून रिझर्व्हेशन लावलेले आहे. मोकळी जागा अशीच मोकळी राहिली आणि जिथे बिल्डिंग आहे तिथे रिझर्व्हेशन झाले जिथे बिल्डिंग आहे तिथे रोड दाखवले जिथे बिल्डिंग आहे तिथे गटार दाखवली. आज आपल्याकडे नाल्याचे रिझर्व्हेशन आहे जिथे आपला कुदरती नाला आहे. त्याच्यावर मागे पाच वर्षात कन्स्ट्रक्शन होत होते. त्याचे आपण काहीच करु शकत नाही. ती आपली जरुरी वस्तू आहे. त्याच्यावर स्ट्रक्चर झालेले आहे. आपल्या गटारावर बांधकाम झालेले आहे. आपल्या गार्डन रिझर्व्हेशनमध्ये बांधकाम झालेली आहेत. मॅडम, मला तोच प्रश्न विचारायचा जेव्हा आपण आरक्षणाबाबत १० वर्षाच्या विकास आराखडयाची गोष्ट करता आणि २० वर्षे प्लॅनिंगची आपण गोष्ट करता परंतु जेव्हा आपण विकास आराखडा तयार केला तेव्हा आपण रिझर्व्हेशन स्ट्रक्चरवर लावलेले आहे. ओपन प्लॉटवर लावलेले नाही.

**प्रभात पाटील :-**

ह्या विषयावर ठराव झाला आणि आपण निर्णय दिला की सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा ह्यांची ही सुचना त्याच्यामध्ये इनक्युड करा. मूळात ती स्कीम काय आहे ह्या सभागृहाला त्याची माहिती घ्यायची गरज वाटत नाही का? मला तर गरज वाटते म्हणजे केवळ त्यांना माहित आहे आणि त्यांच्याकडे जी.आर. आहे म्हणून तुम्ही ते इनक्यूड करायला लावले. सभागृहाला त्या विषयाची काय माहिती नको? त्याची लेखी काय नको का? अजेंडयावर असलेला विषय वेगळा आहे आणि त्यांनी सांगितलेला विषय वेगळा आहे आणि आपण ते त्याच्यामध्ये इनक्यूड करायला सांगितले मग त्याची पूर्ण माहिती सभागृहाला नको मला माहिती हवी आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी काय नविन सांगितलेले नाही. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत आहे. कदाचित प्रशासनाने दिलेला जो गोषवारा आहे त्याच्यामध्ये तो नव्हता म्हणून मग ते ॲड करायला लावले आहे. दोन्ही हाउसिंग स्कीम आहेत. गरिबांसाठी, दलितांसाठी मागासवर्गीयांसाठी......

**प्रभात पाटील :-**

ती स्कीम कोणाविषयी आहे ह्याविषयी मला ऑब्जेक्शन नाही. पण त्याची माहिती आपण सभागृहाला द्यावी.

**रोहित सुवर्णा :-**

गोषवाऱ्यामध्ये माहिती आहे. फक्त कार्यक्रम त्याच्यात नव्हता.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, भाईंदर पश्चिमेचा कितीतरी भाग सी.आर.झेडमध्ये टाकण्यात आला. त्याच्याकरिता आपण काय कार्यवाही केली का?

**मिलिंद वाणी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, आपण जो विषय आणला होता तो डि.ओ.सी.पी यात मुलभूत ज्या झोपडपट्टया आहेत त्या झोपडपट्टयांच्या ठिकाणी चांगल्या प्रकारची शासनाच्या नियमानुसार घरं बांधून देणे् हे अभिप्रेत आहे आणि सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा ह्यांनी जो विषय घेतला होता आय.एच.एस.डी.पी. म्हणजे एकात्मीक गृह निर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम तर ह्या ज्या घोषित केलेल्या झोपडपट्टया असतात त्याला शासन ज्या फॅसिलिटी देतात. रस्ते, लाईट गटार त्याच्यासाठी काही प्रमाणात अनुदान देण्याची शक्यता असते. त्याच्यात आपण रस्ते, गटारे, अशी सुविधा शासनाच्या पैशातून काही स्वरुपात अनुदानाच्या रुपात आपल्याला मिळू शकतात. म्हणून त्यांनी ती सुचना केली होती की त्याचा उल्लेख करावा.

**प्रभात पाटील :-**

मगाशी आपला घोषित झोपडपट्टयांचा विषयच ठप्प झाला होता. अगोदर जो लंचपूर्वी विषय झाला तो विषय ठप्प झाला ना. तुमच्या झोपडपट्टया कुठे घोषित झाल्या? जेव्हा आपला विषय येईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी याबाबत खुलासा करु इच्छितो की जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरिक पुर्ननिर्माण अभियान या कार्यक्रमामध्ये दोन घटक आहेत १) शहरी गरिब मुलांना मुलभुत सुविधा पुरविणे बी.एस.यू.पी आणि दुसरा घटक आहे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम हे दोन्ही कार्यक्रम एकमेकांशी जुळते आहे आणि यापूर्वी जो विषय झालेला आहे त्याच्याशी सुद्धा हे निगडीत आहेत. आपल्याकडे ज्या झोपडपट्टया आहेत, साधारणतः याठिकाणी आत्ताच्या ठरावामध्ये २० झोपडपट्टयांची यादी प्रशासनाने केलेली आहे. केंद्र शासनाने

जे.एन.एन.यू.आर.एम. खाली भविष्यामध्ये जर निधी उपलब्ध झाला तर त्याच्यामध्ये शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे म्हणजे रस्ते, नाले, गटार त्यांना पायवाटा त्यांना पाण्याच्या सुविधा, शौचालय ह्या ज्या बाबी आहेत त्या आपण आपल्या फंडातून पुरवितो या शासकिय वसाहतीच्या झोपडपट्टया त्याठिकाणी आहेत. तो निधी वापरताना त्या झोपडपट्टया ज्याठिकाणी आहेत त्याठिकाणी आपल्या विकास योजनेमध्ये काही आरक्षण आहेत. उदा. बगीचा, मार्केट आहे. तर केंद्र शासनाचा हा निधी आला आणि तसे जर आरक्षण असतील तर त्या ठिकाणी तसा निधी वापरायला अडचणी येणार आहेत म्हणून त्या ठिकाणी तसा निधी वापरायला अडचणी येणार आहेत. म्हणून त्याठिकाणी असलेले आरक्षण हा निधी वापरणे जोगे ३७ करण्याचा हा विषय आहे आणि दुसरा मुद्दा सन्मा. सदस्य रोहित सुवर्णाजीने सांगितलेला आहे. गृहनिर्माण योजना लागू करावी ही त्याची दुसरी स्टेप आहे त्यामध्ये घोषित झोपडपट्टी राहणे बंधनकारक आहे. हे सायमलटेनिस पुढच्या वेळेस जो घोषित झोपडपट्टीचा जो विषय येईल त्यावेळेस ते आपल्याला घेता येईल.

**दिलीप घेवारे :-**

सी.आर.झेडच्या वर्गीकरणाबद्दल दोन ते तीन असे इंडीव्ह्यूज्वल प्रस्ताव मंत्रालयात पाठविले होते आणि जी डेव्हलपमेंट आता हा आपल्या समोरचा रस्ता आहे. हा रस्ता सन १९३० पासूनची पायवाट आहे. हा रस्ता टी.डी.आर च्या मौजे व्हिलेज मॅपवरही आलेला आहे. तरीसुद्धा त्याचा इकडचा भाग सी.आर.झेड ३ ने दाखविला गेला. इतकेच नाही तर मिरारोड स्टेशन आणि भाईंदर स्टेशनही सी.आर.झेड ३ मध्ये दाखविले गेले आहे. ते स्टेशन १०० वर्षापासूनचे आहे. त्यांना दाखविल्यानंतर ते त्यांना पटले. मग त्यांनी आपल्याला रिव्हाईज प्रस्ताव सादर करायला सांगितल्याप्रमाणे आम्ही केलाही होता. त्यात काही त्रुटी काढल्यानंतर तो प्रस्ताव पुन्हा आणला आहे आणि आपण पुन्हा लवकरच सगळे वर्गीकरण संदर्भीय आणि त्यांनी हे आश्वासन दिले आहे की, आम्ही हे सर्व रेकमेंड सद्या करुन चेंज करुन घेउ.

**परशुराम पाटील :-**

आपण जो मुद्दा उपस्थित केला तो सुद्धा पटण्यासारखा आहे. पण, ज्यावेळेला सी.आर.झेड झाला. तेव्हा अपल्या महापालिकेला किंवा नगरपालिका होती. त्यावेळेला त्यांनी आपल्याला तसे कळविले होते का?

**दिलीप घेवारे :-**

त्यांचे अधिकारी त्यावेळेला आले होते. त्यावेळेला ते सर्व्हे करुन गेले.

**परशुराम पाटील :-**

ते महानगरपालिकेच्या वेळेला आले होते? की नगरपालिका असताना आले होते?

**दिलीप घेवारे :-**

सन २००३ किंवा २००४ साली महानगरपालिका असतांना आले असावे असे माझे मत आहे.

**परशुराम पाटील :-**

सन २००४ साली जर आले असतील तर तेव्हा जर इथे ते आले असतील तेव्हा त्यावेळेला ती लोक आले होते किंवा त्यांच्याशी पत्रव्यवहार झालेला असल्याचा मुद्दाम सभागृहासमोर का ठेवला गेला नाही?

**प्रफुल्ल पाटील :-**

आले गेल्याचा अहवाल सभागृहात ठेवायचा असतो का?

**परशुराम पाटील :-**

तर त्या पद्धतीने हा मुद्दा सभागृहाच्या माहितीचा असता तर. आज स्थानिक लोकांच्या ज्या जमिनी सी.आर.झेड मध्ये आहेत. तिथे बांधकाम किंवा कनस्ट्रक्शनसाठी आपल्याकडे परमिशन मागण्यासाठी आले असते. तुम्ही सांगता की, त्याठिकाणी सी.आर.झेड असल्यामुळे त्याठिकाणी काही बांधकामास परमिशन देता येत नाही. मग त्या पद्धतीने आपण आता त्यांच्यासाठी काय करणार आहोत?

**दिलीप घेवारे :-**

आपण सुधारित प्रस्ताव तयार केलेला आहे. शासनाच्या सांगण्यावरून आपण त्यांना पाठविलेला आहे.

**परशुराम पाटील :-**

आणि आता जो आपल्याकडे आराखडा आहे तो बदलण्यासाठी जो प्रस्ताव सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील माजी नगराध्यक्ष आहेत त्यांनी तसा ठराव मांडलेला मुद्दा मांडलेला आहे. तर तो ३७ खाली फ्लॅट बदली करु देवू शकणार नाही? आणि आता जे तुम्ही घर बांधण्याचे प्लॅनमध्ये नमुद करता. तर एखादया व्यक्तीची जमीन त्या झोनमध्ये असेल. कुठेतरी गार्डनमध्ये तर आपण त्या जमिनी मालकाला त्याचे काही बेनिफिट देणार का?

**दिलीप घेवारे :-**

आरक्षणामधल्या जमिनी त्यांसनी आम्हांला हस्तांतरीत करायच्या आहेत. त्याच्या बदल्यांत पैसे, टि.डी.आर., एफ.एस.आर. यामध्ये काय पाहिजे ते आम्ही त्यांना देवू.

**परशुराम पाटील :-**

बरोबर आहे. त्यांना तुम्ही कळविल्याशिवास काही डेव्हलप करणार आहात का? ते त्यांना कळवायला लागणार आहेच ना. ते कळविल्यानंतर तुम्ही काही करु शकणार. नोटिसा पाठवा.

**दिलीप घेवारे :-**

त्यांना वैयक्तिक नोटिसा पाठवू. वर्तमानपत्रांत जाहिरात देवू सगळे करु.

**परशुराम पाटील :-**

ठिक आहे.

**मिलन पाटील :-**

प्रस्ताव पाठविला आहे की, पाठवायचा आहे?

**दिलीप घेवारे :-**

आपण त्यांना प्रस्ताव पाठविलेल्या आहेत. पण त्यांनी त्यात काही एक दोन मुद्दे काढले म्हणून आपण त्या प्रस्ताव पुन्हा पाठविणार आहोत.

(सभागृहात गोंधळ)

**परशुराम पाटील :-**

ज्या वेळेला श्री. लिओ कोलासो साहेब प्लॅनिंग अधिकारी होते. तर त्यावेळेला हे एक दोन मुद्दे डिक्लेअर केले. त्या डि.पी. प्लॅन मध्ये जे रस्ते आहेत. तारोडी गावामधून कम्पलिंट त्यांचे जे गावठण आहे. त्या गावातून ६० फूटी रस्ता कसा होणार? धारावी मंदिराकडे चौककडे जाणारा, त्यातून आपण लोकांची घरे तोडणार का? तो बदली करणार नाही का?

**दिलिप घेवारे :-**

ज्यावेळेस विकास योजना प्रसिद्ध झाली. त्यावेळेस आपल्याला सुचना हरकत मागवण्याची संधी प्रत्येकाला होती. त्यावेळेस आपण ती दयायला पाहिजे होती. त्यानंतर ही आपण ३७ मध्ये प्रस्ताव आणून तुम्ही इनडयुव्हयूजल जरी पत्र व्यवहार केला असता किंवा प्रपोजल दिले असते तरी चालले असते.

**परशुराम पाटील :-**

साहेब, आत्ता सुद्धा मी माझे पत्र दिलेले आहे. मी आता पत्र मागवून घेतो आणि तुमच्याकडे देतो. श्री. खांबित साहेबांना आणि मा. आयुक्त साहेबांनाही आम्ही सांगितलेले आहे. मा. सभागृह नेतेही याठिकाणी बसलेले आहेत. त्यांनीच असा विषय सुद्धा काढला होता की...

**हॅरल बोर्जीस :-**

३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही झालेली आहे. विरोधी पक्षनेत्यांचा विषय असा होता की, असे बरेचसे विदयमान रस्ते आहेत की ज्याठिकाणी पूर्वापार वस्ती असून सुद्धा असे काही रस्ते पाडलेले आहेत तर ३७ ची कार्यवाही घ्यावी. त्यासाठी त्यांनी आपल्याकडे बऱ्याचवेळा पत्रव्यवहार केलेला होता.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील विषय घ्यावा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, तुम्ही पुढील ठरावाचे वाचन करा.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, ठरावाचे वाचन करा. ठराव काय केला ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला एक खुलासा पाहिजे, सी.आर.झेड चे जे काही इलेक्शन मिळाले की नाही मिळाले? की जो आहे तोच आहे.

**दिलिप घेवारे :-**

आज तरी जो आहे तोच आहे आपण इलेक्शनसाठी प्रस्ताव पाठविलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मग ज्यांचा आपण प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यांच्याच एन.ओ.सी. दिलेली आहे की...

**दिलिप घेवारे :-**

जनरल सगळ्या शहराला एन.ओ.सी पाठविलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुमच्या म्हणण्यानुसार ती एरिया सी.आर.झेड ची आहे. त्याच्यामध्ये आता जी बांधकामे चालू आहेत ती बांधकामे अधिकृत आहेत की अनधिकृत बांधकामे आहेत?

**दिलिप घेवारे :-**

आपल्याकडे सन २००५ साली जो सी.आर.झेड चा नकाशा आला होता. त्याच्यापूर्वी ज्या मंजूरी दिलेल्या आहेत. त्या अधिकृत आहेत. त्यानंतर जी बांधकामे झाली आहेत किंवा होत आहेत. ती बांधकामे अनधिकृत बांधकामे आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मी असे जाणून घेवू इच्छितो की, जेव्हा तुमच्याकडे ती एन.ओ.सी. आली. त्यांचे पत्र आले किंवा आज ज्या ठिकाणी सी.आर.झेड ची एरिया येते. मग तुम्ही दिलेल्या एन.ओ.सी प्रमाणे चालू ठेवले. की त्या इंनटिमेंट केले. त्याचे काय केले?

**दिलिप घेवारे :-**

पूर्वी ज्या परवानग्या दिलेल्या आहेत ते चालू ठेवलेले आहे. त्या रद्द केलेल्या नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

मग ते तुमचे काम नव्हते? साहेब, तुम्ही सभागृहाला कसे उत्तर देता? की जेव्हा तो भाग सी.आर.झेड मध्ये आला. जर तुम्ही जरी पूर्वापार ज्यांना परवानग्या दिल्या असतील किंवा आता ही अडचण आहे. सरकारचा असा कायदा आहे. अशी सुधारणा झालेली आहे. ह्याबाबत काही लेखी कळविले की नाही कळविले? कोणालाही कळविण्याची कसर तुम्ही केली का नाही केली?

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांचे म्हणणे असे आहे की, डेव्हलपमेंट परमिशन दिलेली आहे. त्याठिकाणी आता सी.आर.झेड लागलेला आहे. मग त्यांना तुम्ही काही कळविले की नाही. खरं म्हणजे अशा इंस्ट्रक्शन आहेत की, ज्यांचे काम चालू आहेत त्यांना, कळविण्याची गरज नाही. त्यांनी ते काम पूर्ण करावे. तेच सांगा.

**रोहिदास पाटील :-**

माहिती नाही. असे कसे? सांगायला तर पाहिजे ना? जे बांधकाम चालू होते की, एन.ओ.सी. होती. त्यावेळेला चालू ठेवले की बांधकाम करण्याला प्रवृत्त केले असे सांगा की तुमचे बांधकाम सी.आर.झेड मध्ये जात आहे. ते लवकरांत लवकर पूर्ण करा.

(नगरसचिवांनी ठरावाचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

साहेब, या ठरावाच्या जोडीला मूळ तक्ता दिलेला आहे. तो तक्ता कुठे आहे?

**रिटा शाह :-**

तक्ता कुठे आहे?

**रतन पाटील :-**

याच्या जोडीला तक्ता कुठे आहे? कुठल्या ह्याच्यामध्ये केले? तो तक्ता कुठे आहे? ठराव झाला. मा. महापौर मॅडम, याच्यामध्ये तक्ता कुठे जोडला गेलेला आहे? तक्ता तर सांगा.

**नगरसचिव :-**

हा तक्ता आहे.

**रतन पाटील :-**

पण तक्ता इकडे कुठे आहे?

**शुभांगी नाईक :-**

सचिव साहेब, तक्ता वाचून दाखवू नका. तक्ता सगळ्यांना दाखवा.

**हॅरल बोर्जीस :-**

गोषवाऱ्यामध्ये मा. आयुक्त साहेब, स्वतः स्पष्ट लिहितात की, सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार सभागृहाच्या...

**रतन पाटील :-**

मागचा विषय झाला की, झोपडपट्ट्यांची यादी नाही. तो तसाच. त्यामध्येही तक्ता नाही. तक्ता कुठे आहे?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी तक्त्याबद्दल विचारले होते. सभागृहनेते साहेब, मी तुमच्या आठवण्यासाठी सांगतोय, मी विचारले होते की, तक्ता कुठे आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो) :-**

मा. महापौर मॅडम, सदर ठरावातील तक्त्याची झेरॉक्स दोन मिनिटांत सभागृहातील सर्व सदस्यांना देण्यांत येईल.

**परशुराम पाटील :-**

सगळ्या सदस्यांना तक्ता देण्यात यावा आणि त्यावर चर्चा करण्यांत यावी.

**रिटा शाह :-**

आधी ठराव वाचा नंतर आम्हाला कॉपी दया. जर आम्हांला ते पटले तरच आम्ही ठराव मंजूर म्हणून सांगू.

**रतन पाटील :-**

तोपर्यंत स्थगिती करा..

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, सचिव साहेबांकडे जो तक्ता आहे तो आधी फक्त वाचावा आणि नंतरच झेरॉक्स कॉप्या दयाव्यात.

**रिटा शाह :-**

आधी तक्त्याचे वाचन करा. नंतर आम्हाला कॉप्या दया. जर आम्हांला ठराव पटला तरच आम्ही ठरावात मंजूरी देवू.

(नगरसचिवांनी तक्त्याचे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला ही जी लिस्ट वाचनू दाखविली. फक्त सर्व्हे नंबर..

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर सो. :-**

सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त महोदय, ही जी कॉपी आहे. ही कॉपी सर्वांना ह्या ठरावाबरोबर ॲटेज दयायला पाहिजे होती. गोषवारा लिहिला. त्यामध्ये तक्ता समाविष्ट केलेला आहे. असे लिहिलेले आहे. परंतु, या सभागृहात कोणालाही ही तक्त्याची कॉपी दिलेली नाही सचिव साहेब ती कॉपी आपल्याकडे कुठून आली ते सांगावे. दुसरे असे आहे की, जेवढया आपण ज्या वाचल्या. आम्हांला त्या सगळ्या समजल्या नाहीत. पण त्यातल्या बऱ्याचशा सी.आर.झेडमध्ये आहेत. त्या सी.आर.झेडमध्ये आहेत आणि आम्ही त्याला मान्यता कशी दयायची? आणि अतिशय महत्त्वाचे असे की, जवाहरलाल नेहरू, नॅशनल हर्बल रिडीयल मिशन या केंद्र शासनाच्या योजनेमध्ये आपण ज्या अमाउंट लावणार आहोत. आपल्याला मिळणारे रु. १ हजार नउशे पंचवीस कोटी रुपये. ह्याच्यामध्ये ५० टक्के हे स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे मिरा - भाईंदर महानगरपालिकेला भरावे लागणार आहेत. १५ टक्के राज्य शासनाला भरावे लागणार आहेत आणि ही रक्कम जेव्हा तयार होईल तेव्हा केंद्र शासनाचे ३५ टक्के आपल्याला मिळतील. मग ह्या रक्कमेपैकी आपण किती टक्के बी.एस.यु.पी मध्ये लावणार आहोत? अजूनपर्यंत त्याचा खुलासा होत नाही. आणि बी.एस.यु.पी. मध्ये जेव्हा आपण त्याच्या माध्यामातून पैसे लावणार आहोत. तेव्हा केंद्रशासनाची नेमकी पॉलिसी काय असणार आहे? त्या पैश्यातून विशिष्ट टक्केवारी देणार आहे? कि ते सगळे पैसे दयायचे आहेत? जेव्हा या महापालिकेवर ५० टक्के निधी जमा व्हायची वेळ येईल. तेव्हा रु. एक हजार नउशे पंचवीस कोटी रुपयांमधला ५० टक्के हिस्सा आपल्याला किती बजेट विना खर्चाने काय करावे लागणार आहे? या शहराच्या विकासामध्ये कुठचाही पैसा लावावा लागणार नाही आणि आपण बी.एस.यु.पी चा एक जवाहरलाल नेहरू नॅशनल हर्बल रिडीयल मिशन चे अपांत्य जरी असलो तरी पण आपल्याला निदान ५०टक्के रक्कम जमवायची म्हणजे ती किती रक्कम असेल? मग ती काहींना काही रक्कम जमल्यावरच राज्य शासनाला कळवायला लागेल आणि राज्य शासनाला कळविल्यानंतरच केंद्र शासनाला कळवायला लागेल. तर ज्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून हा विषय आला त्यांनी त्या गोष्टीचे नक्कीच कॅल्क्युलेशन करायला पाहिजे होते. आता विषयसमोर आहे. त्याच्यामुळे आपण ह्या बी.एस.यु.पी मध्ये शासनाकडून आपल्याला किती निधी मिळणार आहे? आपण किती खर्च करणार आहोत? ह्याचे खुलासेवार चर्चा झाली पाहिजे. दुसरे असे की जो तक्ता जोडले्ला आहे. हा तक्ता आतापर्यंत गायब होता. हा तक्ता सर्व सदस्यांना मिळाला पाहिजे. सर्व सदस्यांच्या नजरेखालून घालण्यासाठी निदान अर्ध्या तासाचा अवधी तरी पाहिजे.

**रतन पाटील :-**

हा विषयच अपूर्ण आहे हा विषय पुढील महासभेत घ्या.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की हा जो आपण ठराव घेतलेला आहे. त्याच्यामध्ये तक्ता आलेला नाही. तर तो आपण सदस्यांना देणार आहोत. सदस्यांना दिल्यानंतर त्यांना त्याचा अभ्यास करायला पाहिजे. म्हणून तुम्हांला सांगतो. हा जो विषय आहे. तो विषय पुढच्या मिटींगला ठेवण्यांत यावा.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सदरचा जवाहरलाल नेहरु अर्बन हा विषय आमच्यापुढे आणला होता. त्याचा तक्ता तुम्ही आमच्यापुढे सादर न करता ठरावामध्ये तुम्ही परस्पर जॉईंट केलेले आहे. म्हणून सदर विषय पुढच्या मा. महासभेत घ्यावा. असा मी ठराव मांडत आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

या ठरावास सर्वांनुमते अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह गेल्यावेळची मा. महासभा आणि यावेळची जी मा. महासभा चालू आहे जे वातावरण सभागृहामध्ये आहे. सन्मा. सर्व सदस्यांनी विषयपटलावरील विषय पुन्हा एकदा ५ मिनिटांत वाचून घ्यावे. विषय पटलावरील सर्व विषयांवर एकदा व्यवस्थितपणे नजर फिरवा आणि एकमताने सांगा की, हे विषय आजच्या विषय पटलांवरून बाद करा. आणि हे दोन-तीन विषय तुम्हांला महत्त्वाचे वाटतात. त्यावर सभागृहाने ठरवावे की या विषयाला प्राधान्य दयावे आणि हे विषय पुढे घ्या.

**शानु गोहील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य सौ. रिटा शाह यांनी मांडलेल्या ठरावास माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**रिटा शाह :-**

यादी का लपविली?

**मा. महापौर :-**

यादी कोणीही लपविलेली नाही. ही यादी सकाळी त्यांच्याकडे आलेली आहे.

**रिटा शाह :-**

ठरावामध्ये तुम्ही वाचत नाही. तुम्ही ठरावामध्ये बोलत नाही. आणि तुम्ही आमच्यावर दोष लावता.

**मा. महापौर :-**

प्रशासनाला गोषवारा देतांना उशिर झाला असेल. परंतु, त्याचा असा अर्थ होत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

आरोग्य केंद्रामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विषय आहे. महानगरपालिकेत औषधे, उपकरणे, साहित्य, रेबिज सारखे प्रतिबंधक लस पुरवठा करण्यासारखे विषय मा. महासभेच्या विषय पटलांवर आहे. जे विषय आपल्या सर्व सदस्यांना प्रथम घ्यावेसे वाटतात. त्यांनी तशी मागणी करा. त्याप्रमाणे विषय घ्या. आपल्याला जे विषय करायचेच नाही. त्या विषयाला शेवटी घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅछम, सर्व सन्मा. सदस्य, आरोप करतात कशासाठी घ्यायचे? एकतर आपल्या प्रशासनाकडून चुका होतात. आपण त्याला गोषवारा जोडत नाही. यादी जोडत नाही. आपण सदस्यांवर आरोप करत आहात.

**मा. महापौर सो. :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील साहेब, तुमचा कल दोन महिन्यापासून कुठल्या बाजूला आहे हे कळत नाही. परंतु, आज पहिली मा. महासभा नाही की, त्याचा गोषवारा नाही. अशा कितीतरी मा. महासभा झाल्या की, त्याचा गोषवारा मिळालेला नाही. अशा किती महासभा झाल्या की, त्या मा. महासभेचा गोषवाराही मिळालेला नाही. अशा बऱ्याच मा. महासभा झाल्या. ज्याचा विषयाला गोषवारा नसतानाही हा सभागृहात ठराव पास झालेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ही पाहिलीच मिटींग आहे का? की गोषवारा नाही म्हणून एवढा हंगामा होत आहे. बिन्या गोषवाऱ्यानेही ठराव पास झालेले आहेत. तेव्हा झोपलेले का?

**रिटा शाह :-**

ह्या ठिकाणी कोणीही झोपत नाही. सर्व जागृत आहेत. कितीही लपवा-लपवी केली तरी आम्हांला सगळे समजते.

**नयना म्हात्रे :-**

एवढे महिने गेले त्यावेळेला का नाही सांगितले?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण सी.आर.झेड चा जो विषय करता त्यावेळेला शासनाचे नियम आहेत. त्या नियमाला धरुनच ठराव करावा. आपल्याला सी.आर.झेड मध्ये राबवायचे असेही नाही. शासनाने या विषयाला मंजूरी दिलेली आहे आपण त्याप्रमाणे विषय राबवणार आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो) :-**

या ठिकाणी बी.एस.यु.पी. अंतर्गत प्राप्त होणारा निधी गरीबांसाठी त्यांनी जो प्रश्न विचारला त्या प्रश्नाचे उत्तर देतो.

(सभागृहात गोधळ)

**रिटा शाह :-**

साहेब रीतसर विषय येवूद्या नंतर आम्ही बघू.

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम, विषय क्र ४० घ्यावा. त्यानंतरच विषय क्र.४२ खुप महत्वाचा विषय आहे. विषय क्र.४१ ही महत्वाचा आहे. त्यानंतर विषय क्र.४७ ही फार महत्वाचा आहे. डॉ.बाबसाहेब आंबेडकर,भोलानगर वाल्याचा जो ठराव आपण दिनांक ६ डीसेंबरला मंजूर केला होता त्याच्यावर फेर विचार करण्यात यावा म्हणून मा.आयुक्त साहेबांनी विषय पत्रिकेवर विषय आणला होता. हे चार पाच विषय फार महत्वाचे आहेत. आत फक्त शेवटचे पावणे दोन तास राहिलेले आहेत. तरी कृपया त्यावर विचार करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा.सदस्यांनी विषय क्र. ४३, ४०, ४१ विषयाची मागणी केलेली आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

नियमाप्रमाणे पुढील विषयाची विषय पत्रिका वाचा त्याच्यावर निर्णय होवू द्या. एखादा विषय पेडींग ठेवायचा असेल तर विषयाचे वाचन करा.

**रोहिदास पाटील :-**

मा.महापौर मॅडम तुम्हाला विषय क्र.४१ वर चर्चा करावी लागेल.

**रोहीत सुवर्णा :-**

सन्मा.सदस्य श्री.रोहीदास पाटील काका साहेब विषय क्र. ४० वर चर्चा न करता विषय क्र. ४१ वर कशी काय चर्चा करायची आणी विषय क्र.४० घ्या.

**गिता जैन :-**

मा.महापौर मॅडम मला तुमच्याकडून एक जबाब पाहिजे आहे. आता तुमचा आक्षेप होता कि,सन्मा. नगरसेवकांचा आज मुड नाही. त्यामुळे एकही विषय घ्यायचा की काय पण आता माझा असा आरोप आहे की आता प्रशासनामुळे नाही. एकही गोषवारा दिलेला नाही. प्रशासनाचा अभ्यास नाही. त्यांच्याकडे डीटेल नाही. मग तुम्ही असा कसा आक्षेप करु शकता की सन्मा.नगरसेवकांचा मूड नाही.

**मा. महापौर :-**

मी एकदा बोलले होते ते आता पून्हा बोलते की जे विषय आपल्याला घ्यायचे आहेत.आपल्याला जे विषय घ्यायचे नाहीत ते सांगा आणि जे विषय घ्यायचे आहेत. त्या विषयांना प्राधान्य द्या. आणि त्या विषयाचा क्रंमांक सांगा.

**गिता जैन :-**

जे विषय घ्यायचे नाहीत ते विषय विषय पटलावर कशासाठी आहेत. ज्या विषयाचा अभ्यास केलेला नाही ज्या विषयाची डीटेल नाही तो विषय विषय पटलावर कशासाठी घेतलेला आहे.

**मा. महापौर :-**

एवढा वेळ चर्चा केल्यानंतर तो विषय स्थगीत ठेवण्यात येतो. त्यापेक्षा सुरवातीलाच सांगा की या विषयावर चर्चा करु नका. हा विषय पेडींग ठेवण्यांत......

**हॅरल बोर्जीस :-**

विषय क्र. ३९ ला रुलींग दिले आणि विषय क्र. ४० चे वाचन करायला सांगा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४० चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ४० झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण योजना सभागृहामध्ये पहील्या सत्रामध्ये सकाळी विषय क्र. ३८ वर मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्व झोपडपट्ट्या घोषीत करण्याचा विषय स्थगीत राहीला होता. पुन्हा एकदा हा विषय क्र. ४० आणि विषय क्र. ३८ हे दोन्ही कनेक्टेड असल्यामुळे प्रकरण क्र. ४० हा विषय स्थगीत ठेवून पुढचा विषय वाचण्यासाठी आपण नगरसचिवांना विनंती करुया.

**प्रफुल्ल पाटील :-**

दोन्ही विषयाची सांगड कशी घालता येईल. मागचा विषय होता, सर्व झोपडपट्ट्या घोषीत करण्याबाबत. आताचा विषय झोपडपट्टी पूनर्वसनला एस.आर.ए. स्कीम लागू करणे. हे दोन्ही विषय एकत्र कसे होतील. झोपडपट्ट्या एक वेळा घोषीत झाल्या नाहीत. तरी एस.आर.ए. स्कीम लागू करता येत नाही का? एस.आर.ए. स्कीम लागू केल्याशिवाय कुठली माहिती मिळणार आहे का? एस.आर.ए. स्कीम लागू करण्याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी. ती स्कीम कशी लागू होईल? मा.उपायुक्त साहेब हया ठिकाणी उपस्थित आहेत.आपण करणारे कोण? आम्ही फक्त तत्वःत मंजूरी दिल्यानंतर त्याला शेवटी राज्यशासन मंजूरी देणार आहे की काय आहे त्याची माहिती द्या? ह्या संदर्भात माहिती द्या.

**रिटा शाह :-**

प्रशासनाने माहिती द्यावी.

**मा. उपमहापौर :-**

मा.महापौर मॅडम हा विषय तुम्ही आणलात प्रशासनाने आणला तर प्रशासनाने विषय का आणला? त्याच्या नजरे समोर आपल्याला एस.आर.ए. कुठे राबविता येईल? असे काहीतरी चित्र असेल की नाही आपण एस.आर.ए. स्कीम आणली ती कुठे राबविणार असे चित्र असेल आपल्या स्वतःच्या इच्छेने विषय आलेला आहे. आणि त्या विषयाबद्दल आपल्यासमोर एखादे चित्र असेल. संकल्पना असेल की अमुक ठिकाणी आपल्याला एस.आर.ए. स्कीम राबविता येईल. एस.आर.ए. स्कीम नेमकी काय आहे? ह्याचे मला स्वतःला नॉलेज नाही. या माझ्या सभागृहातल्या किती सदस्यांना त्याच्याबद्दल माहिती असेल हे मला माहिती नाही. तर सर्व सदस्यांना ती एस.आर.ए. स्कीम काय आहे? ते समजाविणारा सक्षम अधिकारी पाहिजे. जर आपण ते ते लेखीच दिले असते माहिती पत्रात तर ते बरे झाले असते. सर्व साधारणपणे आपल्या सभागृहात बघावा तसा

आपल्या सदस्यांना माहीती नसली तर त्या विषया संबधी संपूर्ण माहितीची मागणी सदस्य करत असतात म्हणून या विषयासंदर्भात कुठल्याप्रकारची माहिती आलेली नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मा.महापौर मॅडम मी बोलू इच्छितो कि, एस.आर.ए. बाबत आम्ही माहिती देवू शकतो.

**मा. उपमहापौर :-**

आम्हांला माहिती अधिका-यांकडून अपेक्षित आहे. आपल्या कडून नाही.

**रोहित सुवर्णा :-**

आपल्याकडे एस.आर.ए आहेत माहिती देणारे अधिकारी आहेत. पूणे महानगरपालिकेला लागू झालेले आहे.ठाणे महानगरपालिकेला लागू झालेली आहे. नागपुर महानगरपालिकेला लागू झालेला आहे. मुंबई महानगरपालिकेला लागू झालेला आहे. मग मिरा भाईंदर महानगरपालिकेला का लांब ठेवता? केंद्र सरकारच्या योजनेमध्येही मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नांव आहे. एक तर ४०० झोपडया तोडल्या, ती लोक गेल्या चार वषार्पासून रस्त्यावर राहतात.महानगरपालिका घरे बांधत नाही. कमीत कमी एस.आर.ए. वाल्यांनी तरी पूर्नवसन करावे. आपल्याकडे अधिकारी आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

श्री. दिलिप घेवारे साहेब, सभागृहामध्ये एस.आर.ए. स्कीम बद्दल माहिती देत आहेत.

**मा. उपमहापौर :-**

माहिती देणे अवघड होत असेल तर आपल्याला विनंती आहे की, मा सभागृह नेते आपण एक ठराव घ्यावा की, आपल्यासमारे संकल्पना आणावी की, आपल्याला कुठे एस.आर.ए. स्कीम कार्यान्वीत करायची आहे? ती कुठे लागू शकते? त्याची डीटेल्स काय आहेत? हा रीतसर विषय मा.सभागृहनेते तसा आपण ठराव देवून मागणी करुन घ्या. आणि असे विषय पूढच्या सभेत येवू द्या.

**रोहित सुवर्णा :-**

मा.महापौर मॅडम, आपले श्री.दिलिप घेवारे साहेब या विषया बद्दल माहिती देवू शकतात. आपले श्री. बनसोडे साहेब या विषयाबाबत चांगले बोलू शकतात. त्यांना तूम्ही विचारा झोपडपट्टी पूनर्वसन प्रकल्प म्हणजे काय?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम प्रकरण क्र.४० झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरण योजना मिरा भाईंदर शहरास लागू करण्यासाठी विचार विनिमय करुन निर्णय घेण्याबाबत. एस.आर.ए. स्कीम के बारे मे अभी आप सभागृहमे जानकारी भी देने के बावजूद भी विषय सहमत होने वाला नही है । उसके लिए श्री. दिलिप घेवारे साहब को मेरी बिनती है की, ये सबजेक्ट के बारेमे परीपूर्ण प्रस्ताव सभगृह के सामने लाकर ये .....

**रोहित सुवर्णा :-**

अचानक मराठीतुन हिंदीमध्ये बोलायला लागले.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण हिंदित बोललात म्हणून मी बोललो.

**रोहित सुवर्णा :-**

नाही मी हिंदीत नाही मराठीत बोललो.

**हॅरल बोर्जीस :-**

ह्या स्थितीमध्ये श्री. घेवारे साहेबांनी माहिती एस.आर.ए. बद्दल दिली तर प्रकरण ४० हे मंजुर होउ शकत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा विषय पास होवू शकत नाही ही बाब नंतरची आहे. त्यांनी माहिती दिलेली आम्हांला समर्थक वाटली तर आम्ही त्यावर विचार करु. हे तुम्ही का सांगता? श्री.दिलिप घेवारे साहेबांनी माहिती द्यावी.

**रोहित सुवर्णा :-**

मा.सभागृह नेतें एस.आर.ए. म्हणजे गरीबांसाठी स्वस्त घरे. मा महापौर मॅडम आपण श्री.दिलिप घेवारे किंवा श्री.बनसोडे साहेबांना यावर माहिती देण्यासाठी आदेश द्यावे. ती लोक एस.आर.ए. बाबत माहिती देतील. तुम्हाला जर पटले तर विचार करा.

**मा. महापौर :-**

प्रशासनाने एस.आर.ए. स्कीम काय आहे? याबददल सभागृहाला माहीती द्यावी.

**दिलीप घेवारे :-**

माझ्याकडे या प्रस्तावाबाबत परिपूर्ण माहिती नाही. जी माहिती आहे. ती माहिती मी सभागृहासमोर सादर करतो.

**मुक्ता रांझणकर :-**

साहेब माझे यावर ऑब्जेक्शन आहे. त्यांच्याकडे परिपूर्ण माहिती नसेल तर त्या विषयावर वेळ घालवू नका. आणि पुढचा विषय घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्हाला अर्धवट माहिती चालेल.

**मुक्ता रांझणकर :-**

आम्हाला अपुरी माहिती नको.

**प्रफुल्ल पाटील :-**

ज्याला परिपुर्ण माहिती पाहिजे आहे त्यांना तुम्ही ती माहिती नंतर द्या. आता तूमच्याकडे जी माहिती आहे ती सांगा आम्ही त्यावर अभ्यास करु.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हांला जी माहिती ती माहिती दोन चार मिनीटात सांगा परीपूर्ण माहिती नाही. हे रेकॉर्डीवर आले. माहिती सांगा आणि खाली बसा.

**दिलीप घेवारे :-**

पहीली महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या झोपडपट्टया आपण एस.आर.ए. मध्ये घेणार आहोत. त्या झोपडपट्टया अधिकृत असणे आवश्यक आहे. त्याच्यासाठी आपल्याकडे जो मगाशी विषय आला होता त्यासाठी झोपडपट्टया आधी अधिकृत डीक्लेअर करणे आवश्यक आहे. ते झाल्यानंतर त्याच्यामधील ७०% लोक जर तयार असतील मुंबईसाठी जी एस.आर.ए. स्थापन झाली होती आणिी त्यातील ७०% लोक तयार असतील तर त्यांना आपण अडीच एफ.एस.आय. दोन खाजगी लोकांकडून आणिी त्यांना २५० चौ.फुटांची सदनिका त्यांत बांधून द्यावयाची आहे. त्यातील दोन निकष महत्वाचे आहेत की, ती झोपडपट्टी अधिकृत असणे आवश्यक आहे. आणि ७०% लोकांचे कन्सल्ट असणे आवश्यक आहे. आणि बाकींचे डीसीजन त्याला लागू होतील.

**नरेंद्र मेहता :-**

आपण त्यांना कीती एफ.एस.आय देणार आहोत.

**दिलीप घेवारे :-**

आपण त्यांना अडीच एफ.एस.आय.देणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

आणि किती लोकांची कन्सल्टंट असणे आवश्यक आहे.

**दिलीप घेवारे :-**

७०% लोकांचे कन्सल्टंट असणे आवश्यक आहे. आणि आपण जो सन्मा.सदस्य श्री.प्रफुल्ल पाटील साहेबांनी जे डी.सी. रुल तयार केलेले होते.

**नरेंद्र मेहता :-**

झोपडपट्टी वासीयांना फायदा होईल याबाबत मी बोलतो मी नुकसानचे बोलत नाही.

**दिलीप घेवारे :-**

५८ एफ ही अशी योजना आपण केलेली आहे. पृष्ठ क्र१४० ते १४२ मध्ये त्याच्यामध्येही आपण अधिकृत झोपडपट्टीचा अडीच एफ.आय.एस. चा कंन्सल्ट आणलेला आहे. ते डी.सी. रुल सुध्दा मंजूरीसाठी पाठविलेले आहे. फक्त एस.आर.ए. लागू करणे हे त्यात नाही. ते जरी कोणी प्रायव्हेट डेव्हलपर्स आले त्यावेळेस जरी त्यांनी ७०% कन्सल्टंट दिले तरी आपण त्यांना अडीच एफ.एस.आय. ची परवानगी देवू शकतो. त्यानुसार असते.

**रिटा शाह :-**

आणि साहेब प्रायव्हेट जमिनींचे काय?

**दिलीप घेवारे :-**

प्रायव्हेट करु शकतात.

**रिटा शाह :-**

प्रायव्हेट जमीनींना तुम्ही इनक्ल्युड करणार काय?

**नरेंद्र मेहता :-**

आपण एस.आर.ए. स्किम राबवीली त्यानंतर झोपडपट्टी वासी जे काही रहिवासी आहे. त्यांना त्या भागातील ७० टक्के एक्वीजेशन ज्या कोणाकडे असेल. त्यांना आपण अडीज एफ.एस.आय. ची परवानगी देणार हेच आहे. आणि माझ्या माहिती प्रमाणे डी.सी.ृरुलमध्ये अशी प्रोव्हीजन केलेली आहे. की, झोपडपट्टी रहिवासी ३०,४० टक्के जरी असेल त्यांना आपण अडीच एफ.एस.आय. देणार आहोत. त्यात काय फरक पडणार आहे? उलट पहीला असलेलेच चांगले आहे. ऑलरेडी अडीज हजारांचे प्रोव्हीजन केलेले आहे. मग हे करायची गरज काय? आणि एस.आर.ए. ला ब-याच फॉर्मालिटीज आहे. उलटया मोठया प्रमाणांत हे पास होणार आहे.

**दिलीप घेवारे :-**

या योजनेची शासनाच्या धोरणानुसार काही उद्दीष्टे आहे. झोपडपट्टीच्या पुनविकासाच्या बरोबरच त्यांचे पुनर्वसनही करायचे आहे. त्यांनतर ज्या झोपडपट्टी धारकांचे नाव दि.०१/०१/१९९५ किंवा त्यापुर्वीच्या मतदान यादीत आहे. व ज्यांचे वास्तव्य सद्या त्याच झोपडपट्टीत आहे. तो झोपडपट्टी वासी पूनर्वसन योजने प्राप्त आहे.

झोपडी आणि झोपडीधारक दोन्ही ही सुरक्षीत आहे. त्यानंतर ५०० सदनिका प्रती नउ हेक्टर बांधयाच्या आहेत. अतिरीक्त सदनिका प्रकल्पग्रस्तांच्या पूनर्वसनासाठी वापरण्यांत याव्यात अशा आहेत.

**चंद्रकांत मोदी :-**

मा.महापौर मॅडम एस.आर.ए. कीसीको मालूम नही ऐसा विषय किसने लाया है.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो) :-**

सन्मा. महापौरांनी हा विषय घेतलेला आहे.

**मा.उपमहापौर :-**

त्यांनी हा विषय आहे. तर त्यांचा व्यवस्थीत खुलासाही करावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो) :-**

त्याच्यामध्ये राज्याशासनाचा एस.आर.ए. हे धोरण आहे. जो की इतर शहरांना लागू आहे. मुंबई ठाणे, यामध्ये मा.मुख्यमंत्र्याच्य अध्यक्षतेखाली स्पेशल ॲथोरीटी केली जाते. आणि याचा मुख्य उद्देश म्हणजे ज्या शहरांमध्ये हया झोपडपट्टया आहेत.त्याचे निमूर्लन करणे आणि जे झोपडवासी आहेत.जर ते सन १९९५ पूर्वीचे असतील जर त्याचे हक्क असतील तर त्याचे डेव्हलप होते. त्याच्यामध्ये त्यांच्या अस्तित्व कायम करणे आणि ते अस्तित्व कायम करत असताना खाजगी विकासाकडून त्याच्यामध्ये पैसा वापरणे आणि त्याना बेनिफीट देवून काही सरप्लस एफ.एस.आय. असतो. तो असलेल्या झोपडपट्टी धारकांना त्याच्यामध्ये ॲडजेस्ट करणे हे केव्हा आहे? आपण ठराव करुन शासनाला हे जर पाठविले शासनाने हयाच्यामध्ये निर्णय घेतला आणि त्याचे डी.सी. रुल तयार झाले. तर हे निर्णय होवू शकतात. तर हयाच्यासाठी मा.महापौरांनी हा विषय घेतलेला आहे. हयाच्यामध्ये प्रशासनाकडून मा.आयुक्तांनी गोषवारा दिलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. पण एस.आर.ए. हे शहरातील झोपडपट्टी निर्मूलन करण्याची एक योजना आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा.महापौरांच्या या १ करोड योजनेबद्दल मुंबई, पूणे यांचा चांगला अनुभव नाही म्हणून फेल नाही हे खरे आहे का?

(सभागृहात गोंघळ)

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम याठिकाणी आपण हया ज्या झोपडया तोडतो त्यांचे जर आपण पूर्नवसन करु शकत नाही. तर ते प्रत्येक ठिकाणी झोपडया उभारतात.

(सभागृहात गोंधळ)

**रोहित सुवर्णा :-**

सन्मा. सदस्य श्री.रतन पाटील साहेब ठाणे महानगरपालिकेतील आपले महापौर आहेत. त्यांनी एस.आर.ए. मागवून घेतली. मग ठाणे महानगरपालिकेच्या महापौरांनी एस.आर.ए. का मागवून घेतली.

(सभागृहात गोंधळ)

**रतन पाटील :-**

चर्चा संपलेली आहे. पुढील विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४१ चे वाचन केले)

**मा.उपमहापौर :-**

सन्मा.सदस्य रोहिदास पाटील साहेब (काका) एस.ई.झेड. बाबत माहिती आलेली आहे. पून्हा तसाच विषय आलेला आहे. मागील दोन सभांमध्ये आपण असा उल्लेख करतो कि, सभागृहांमध्ये हयाची पूर्ण माहिती दिली जात नाही. आता हा विषय घ्यावा. अशी मागणी सगळयांनीच केली होती. कारण काही महत्वाचा होता. परंतु, याच्याबाबत मा.महापौर मॅडम आपण हा विषय घेतला. आपल्याला काही प्रशासनाकडून माहिती सादर करायची आहे का?

**शानु गोहील :-**

सन्मा.सदस्य रोहित सुवर्णा साहेब एस.आर.ए. वर बरीच चर्चा झालेली आहे.

(सभागृहात गोधळ)

**मा. उपमहापौर :-**

दिलिप घेवारे साहेब आपल्याकडून दोन गोष्टींचा खुलासा पाहिजे आहे. एस.इ.झेड. स्पेशल इंटटेनमेंट झोन कि स्पेशल इकॉनोमीकल झोन इथून आपला काय आहे? ते आणि या विषयात देखील आपली तशीच माहिती आहे. सर्व सदस्यांची तीच स्थिती आहे. सर्व सदस्यांनी जी शासनाकडून काय माहिती आलेली आहे त्याची माहिती न घेता वृत्तपत्रामधून ज्या बातम्या येतात त्याच माहितीवर सदस्य आहेत. त्याच्यामुळे आपण माहिती विस्ताराने द्यावी.

(सभागृहात गोंधळ)

**संगिता म्हात्रे :-**

आम्ही चार लोकांनी मागणी केली यावर चर्चा करावी म्हणून.

(सभागृहाम गोंधळ)

**रोहित सुवर्णा :-**

मा.महापौर मॅडम एस.ई.झेड. वर मी देखील बाधीत आहे. मी देखील राई, मुर्ध्याला राहतो. मला देखील त्या विषयावर इन्टरेस्ट आहे. पण एस.आर.ए. हा शहरात का नको? मग एस.आर.ए. वर का चर्चा नको?

(सभागृहात गोधळ)

**दिनेश नलावडे :-**

मा.महापौर मॅडम एस.आर.ए. विषय संपलेला आहे. प्रशासनाकडे संपूर्ण माहिती नाही. मग यांच्याकडे कुठे संपूर्ण माहिती आलेली आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील (काका) साहेब म्हणजे तुम्ही एस.आर.ए. वर चर्चा करणार नाही का? मा.महापौर मॅडम जर एस.ई.झेड. वर चर्चा करुन शकतात. तर आम्हालाही चर्चा करायची आहे. पण त्याच्या आधीचा जो एस.आर.ए. चा जो विषय आहे. त्याच्यावर काय ते योग्य रुलिंग आम्हाला द्या. विषय क्र.४० वर तूम्ही योग्य ते रुलिंग द्या. आणि मग नंतर तूम्ही विषय क्र. ४१ घ्या.

**रोहिदास पाटील :-**

तूम्ही निर्णय पूढे ढकललात त्यांना बोलवून त्यांचे मत घ्या. विषय क्र. ४१ चा ही निर्णय तूम्ही पुढे ढकलणार आहे. हे आम्हांला माहिती आहे. आमचे मत घेवून पुढे ढकला. तूम्ही असे थांबवू नका.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांना मी धन्यवाद देतो की, ज्यावेळी पहिल्यांदा सभागृहात आम्ही हा विषय काढला की, पेपरमध्ये जाहीरात आलेली आहे की, उत्तन, पाली, चौक, राई, मोवा, गोराईचा काही भाग म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिकेची पाच गावे, मुंबईतील पाच गावे ही पॅन इंडियासाठी एम.एम.आर.डी.ए. ने एम.आय.डी.सी कडे सुपुर्द करुन त्याच्यावर एस.ई.झेड लागु करण्यासाठी पहिल्यांदा सुचना म्हणुन आले होते. आणि ज्या दिवशी ते पेपरला आले होते. त्याच दिवशी मी सभागृहाला विचारले होते. त्याच्यात स्पष्ट उल्लेख होता की, या नोटीसची प्रत लोकांच्या माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात व महानगरपालिका कार्यालयामध्ये लावलेली आहे. तेव्हा मी मा. आयुक्तांना विचारले की, आपल्या महापालिकेत लावलेली आहे का? कोणीही त्याची माहिती देवु शकले नाही आणि त्यापासुन मी आग्रह धरत राहिलो की, ह्या एस.ई .झेड च्या विषयी तुम्ही संबधीतांना माहिती द्या. पण आपल्याकडुन तो आला नाही. आम्ही आग्रह धरला की, तुम्ही तो विषय सभागृहात चर्चेला घ्या. आणि आज तुम्ही तो घेतला. त्याबद्दल मी धन्यवाद देतो. आणि माहिती देतो की, एस.ई.झेड बाबत याच सभागृहात तीन महिन्यापुर्वी वृत्तपत्रात आलेल्या जाहिरातीनुसार सभागृहाचे लक्ष वेधले होते. महापालिका हद्दितील सात व मुंबई महानगरपालिकेतील दोन गावे महराष्ट्र सरकारने एम.एम.आर.डी कडुन एम.टी.आर.डी कडुन एम.टी.डी.सी कडे वर्ग केली असुन पॅन इंडिया कंपनीस स्पेशल इकॉनॉमिक झोन या स्किममध्ये विकसीत करण्याचे अधिकार देण्याची जाहिर नोटीस प्रकाशित केली होती याबाबत सविस्तर माहिती मा. जिल्हाधिकारी कार्यालय, महापालिका कार्यालय या ठिकाणी नागरिकांना पहावयास मिळेल असे सुचित केले होते. परंतु, त्या दिवशी सभागृहात प्रशासनाच्या वतीने प्रशासन कोणताही खुलासा करु शकले नाही. म्हणुन, मा. पिठासिन अधिकाऱ्यांना आम्ही याबाबत मा. विषयपत्रिकेवर विषय घ्यावा. असा आग्रह धरला. त्या नुसार मा. महापौरांनी हा विषय आज सभागृहात आणल्याबद्दल मी, मा. महापौरांना धन्यवाद देतो मी या सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो की, शासनाच्या वतीने ५,७४० हेक्टर जमिन एस.ई.झेड साठी वापरण्याचे ठरवले आहे. त्यात ३,३००हेक्टर जमिन सरकारी व २४०० हेक्टर जमिन मालकी म्हणुन वापरणार आहेत. शासनाच्या वतीने एस.ई.झेड जाहिर करतेवेळी बोलले जाते की, शासकिय जमिन संपादन करुन विकासकर्त्याच्या परिसराचा विकास करणार. परंतु, आपल्या महापालिका हद्दीतील डोंगरी, तारोडी, चौक, पाली,नवी खाडी, उत्तन, भाटेबंदर, राई, मोर्वा, मुर्धा तसेच गोराई या परिसरातील जमिन शासकीय जरी म्हटल्या असल्या तरी त्या ह्या प्रकारात मोडतात. शासकिय जमिन जी सुमारे २०० ते २५० वर्षापासुन स्थानिक लेकांच्या ताब्यात आहे. त्यात त्यांची स्वतःची घरे आहेत. त्यांची आंबे,काजु,फणसाची विविध झाडे आहेत. ज्यावर त्यांचे कुटुंब अनेक वर्षापासुन उपभोग घेत आहे. बागायत करत आहेत. शेती करत आहेत. परंतु, ह्या जमिनीची जर सरकार दप्तरी सरकारी जमिन म्हणुन नोंद आहे. अनेक जमिनीवर मिठागरे आहेत. गेल्या अनेक वर्षापासुन मिठाचे उत्पन्न होत आहे. त्यावर शिलोत्री म्हणुन नोंद आहे. त्याचे कुंटुब अनेक वर्षे उपजिवीकेचे साधन म्हणुन व्यवसाय करत आहे. अनेक मजुरांचा रोजगार त्यावर अवलंबुन आहे. तसेच हजारो मच्छिमार समुद्र किनारी मच्छिमारी करतात. त्यांच्यावर अवलंबुन आहे. तसेच हजारो मच्छिमार उत्पन्न घेतात. हजारो मजुर मच्छिमारीमध्ये काम करतात. ते ही बेकार होतील. मच्छिमार, शेतीवाले, बागायतीवाले, मिठागरवाले अशा अनेक लोकांचे करोडो रुपयांचे नुकसान होउन संपुर्ण उपजिवीकेचे साधनच निघुन जाईल. शासनातर्फे किंवा पॅर इंडियातर्फे असे कोणतेही स्पष्ट निवेदन झाले. नाही की, फक्त शासकिय जमिन जी मोकळी आहे तीच घेणार असे कुठेही स्पष्ट केले नाही. असे समजते की, विकासकर्ता आपली सेक्युरीटी ठेवुन त्यासर्व विभागाचा विकास करणार ज्यावेळी स्थानिकांना कोणताही व्यवसाय करता येणार नाही. उद्योग करता

येणार नाही. किंवा जाण्या - येण्यासाठी ओळखपत्र घेउन प्रवास करावा लागेल. महापालिकेला कोणताही अधिकार राहणार नाही. हा निर्णय घेतेवेळी प्रशासनाला महापालिकेची, महापालिका ही स्वायत्त सत्ता असतांना महापालिकेचे कोणतेही मत विचारात घेतले नाही. वास्तवीक शासनाच्या वतीने एम.एस.आर.डी.ए च्या वतीने एम.आय.डी.सी च्या वतीने जनजागृती म्हणुन या प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती देणे गरजेचे होते. ही वस्तुस्थिती आहे. आज एस.ई.झेड. बाबत देशाच्या कानाकोपऱ्यातुन शेतकऱ्यांचा,जमिनदारांचा असंतोष प्रकट होवुन नरसंहार होत आहे हे आपण टिव्हीवर पाहात आहोत. पेपरमध्ये वाचत आहोत. आपल्या महापालिका क्षेत्रात अशी परिस्थिती उद्‌भवु नये म्हणुन ही सभा ठराव पारित करत आहे की, शासनाने या प्रकल्पाची सविस्तर माहिती घेउन पुर्नवसनाचे स्पष्ट धोरण जाहिर केल्याशिवाय हा प्रकल्प राबवु नये असा मी ठराव मांडत आहे.

(सन्मा. सदस्य. श्री. रोहिदास पाटील यांनी एम.एम.आर.डी च्या पत्रा चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी प्रकरण क्र. ४१ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जोजफ घोन्सालविस :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, मुंबईच्या उत्तर व पश्चिम टोकावरील एक बेट सरकारने ताब्यात घेतलेले आहे. तर सरकारने एस्सेलवर्ल्ड समुह आहे. आणखी या एस्सेलवर्ल्ड समुहाकडे जवळ - जवळ ७८५ एकर जमिर होती. त्यातील ७० एकर जमिन ही निव्वळ एस्सलवर्ल्डने घेतली आहे आणि उर्वरित भागावर आणखी एस्सेलवर्ल्ड समुहाने दीड हजार एकर जमिनीची मागणी केलेली आहे. त्या पडिक जमिनीमध्ये सॉल्ट डिपाटमेंटची पोर्टट्रस्टची आहे. सरकारी रेव्हेन्यु डिपार्टमेंटची आहे व शेतीसाठी असे वेगवेगळे पॅकेज जाहिर केलेले आहेत. त्यामुळे सरकारचे नक्की धोरण काय आहे? हे जाहिर करणे गरजेचे आहे. समुद्र किनाऱ्याची तिवराची झाडे जंगलाखालील खाजणाची जमिन, मुंबई पर्यावरणाच्या दृष्टीने फार महत्वाची आहे. किनारा नियंत्रण नियमावली या क्षेत्रातील कोणतेही बांधकाम हे निशिब्ध आहे. मात्र विशेष आर्थिक क्षेत्राच्या नावाखाली त्या सगळ्या गोष्टींना मोडुन काढले. जाणार आहे. हे उघड आहे. ६० टक्के सरकारी व ४० टक्के खाजगी अशा प्रमाणातील जमिनीवर त्यात १० गावे,आहेत त्यात मनोरी, गोराई आणि उत्तन ही मोठी आहेत. राई,मोर्वा,मुर्धा सारखी गावे प्रकल्पासाठी तिथुन हटवली जातील. विशेष आर्थिक क्षेत्रातील केवळ जमिनी जात नाही. तर लोकशाहीतील लोकशाही विरहीत शासन व्यावस्था स्विकारावी लागते. सरकारला मोठ्या महसुलाला मुकावे लागते. आर्थिक क्षेत्रासाठी सुसंगत नसलेले कायदे केवळ अधिसुचनेद्वारे बदलविण्याची तरतुद स्विकारावी लागते. आणि या मंडळाच्या विरोधांत कोणतीही कायदेशीर कार्यवाही करता येत नाही. आणि हा संपुर्ण समुह ज्यावेळी ते विकत घेतील त्या वेळेला त्या स्थानिक नागरिकांना त्यांच्या या हद्दीमध्ये जाण्यास सक्त मनाई केली जाणार आहे. आणि याकरिता शासन कायद्यामध्ये वागत नसेल तर कायद्याच्या चौकटीत असंतोष व्यक्त करण्याची जबाबदारी आमच्यावर राहणार नाही. अशी जनतेची भावना आहे. म्हणुन सेझ करिता आमचा संपुर्ण विरोध राहिल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो मॅडम, आता तुम्ही हे जे वक्तव्य केले की, शासनाकडे, प्रशासनाकडे काहीही माहिती नाही. जेव्हा दि. २९/०९/२००६ रोजी मा. मुख्यमंत्र्याच्या दालनात या सेस विषयी मिटींग झाली. त्यावेळेला मा. आयुक्त साहेबांना त्याची प्रत आली होती माझ्या काही सहकारी मित्रांनी नगरसेवकांनी या सेस विषयी माहिती विचारली की, तुमच्याकडे काय माहिती झालेली आहे? तेव्हा त्यांना माहितीच्या आधिकारामध्ये उत्तर दिले की, आमच्याकडे कुठल्याही प्रकारची माहिती नाही. आज तेच वक्तव्य परत ह्याच डायस वरुन केले जाते म्हणजे आम्हांला खोटे सांगितले जाते. ही दि. २९/०९/२००६ रोजीच्या मिटींगमध्ये मा. मुख्यमंत्री मा. सचिव आणि काही मंत्री पॅन इंडीया लिमीटेड कंपनी आणि इतर कंपन्याचे अधिकारी उपस्थित होते. पॅन इंडियाने एक चित्रफित दाखवली आणि त्यानुसार त्यांनी या क्षेत्रात विकास करण्या बद्दलचे त्यात मनोगत जाहिर केले आणि मा. मुख्यमंत्री साहेबांनी ते मान्य केले. ह्या पॅन इंडिया लिमीटेड कंपनीचे श्री. सुभाष चंद्र गोयल ह्यांनी आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आठ गावे राई,मोर्वा, मुधा, उत्तन पाली, डोंगरी चौक आणि मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दोन गावे गोराई आणि मनोरी, या संपुर्ण दहा गावाचे क्षेत्रफळ ५७४० हेक्टर म्हणजे १४,५०० एकर, त्याच्यामध्ये ६० टक्के जमिन सरकारी ही ३,३०० हेक्टर आणि मालकी जमिन २.४४० हेक्टर अशी सर्व जमिन टप्प्या - टप्प्याने विकसीत करण्याचे ठरलेले आहे. आणि त्याप्रमाणे एम.टी.डी.सी ने कलेक्टरला पत्र पाठविलेले आहे. कदाचित त्या पत्रांची प्रत तुमच्याकडे ही असेल पण तुम्ही आता ते पत्र आम्हाला दाखविणार नाही आणि त्यांनी जमिनी आमच्याकडे वर्ग करा अशा प्रकारचे ते पत्र आहे. आणि त्यानुसार मंडळ आधिकाऱ्यांनी त्याचा अहवाल तयार केलेला आहे. आणि तो अहवाल महसुल खात्याकडे पाठविलेला आहे. तसेच एक पत्र एम.टी.डी.सी ने दि. ३१ डिसेंबर २००६ रोजी बंदर खात्याला पाठविलेले आहे. आणि त्या पत्रानुसार उत्तन हे लघु बंदर एम.टी.डी.सी कडे हस्तांतरीत करण्याचे निर्देष दिलेले आहेत. आणि त्यानुसार मेरीटाईम बोर्डाने दि. ८ जानेवरी २००७ रोजी बंदर खात्याने मेरिटाईम बोर्डाला अति तातडीने एक पत्र पाठवुन दि. ८ जानेवारी २००७ रोजीच्या पत्रान्वये

मेरी टाईम बोर्डाचा अहवाल मागविलेला आहे. आणि तो अहवाल १५ दिवसांमध्ये मागीतलेला होता. आणि तो अहवाल देण्यास त्यांनी दिरंगाई केली. त्यावेळेला पुन्हा एकदा बंदर खात्याने दि. १५/१/२००७ रोजी पत्र पाठविले की, शासकिय कामात तुम्ही दिरंगाई केली तर २००५ अन्वये तुमच्यावर कारवाई केली जाईल. म्हणजे नोकरीतुन काढले जाईल. साहेब याच्यावरुन समजते की, शसनाची किती प्रबळ इच्छा आहे की, याठिकाणी एस.ई.झेड राबवायचा? जी सरकारी ६० टक्के जमिन आहे. जवळ - जवळ या दहा गावातील लोकसंख्या ही सव्वा लाख इतकी आहे. या ६० जमिनीवर जवळ जवळ आमचे ६० टक्के लोक राहतात. म्हणजे जवळ जवळ ७५ हजार लोक या सरकारी जमिनीवर राहतात. त्या पिढ्यांन पिढ्यां राहतात. सन १९९५ सालापासुन त्याच्या पुढचे हे सरकारने रेग्युलाईज केलेले आहेत. आणखीन सन १९७१ व १९९० आमच्या ह्या ज्या लोकांच्या ताब्यात बागायती जमिनीवर त्या जमिनीवर बागा केलेल्या आहेत. त्या जमिनी आपोआपच रेग्यूलाईज झालेल्या आहेत अशा जमिनी भु - संपादन कायद्यानुसार तुम्ही डिस्पोजल ऑफलॅन्ड करणार आणि भु - संपादन कायदा सन १८९४ चा वापरणार आणि त्यांना तुम्ही डिस्पोजल ऑफलॅन्ड करणार आणि ह्या सगळ्या जमिनी ताब्यात घेणार तेव्हा आमचे ७५ हजार लोक बेघर आणि निर्वासीत होतील. त्याच्यानंतर मेरी टाईम बोर्डने बंदर खात्याला त्यांचा अहवाल दिलेला आहे. आणि बंदर खात्याचे मत आहे की, नगर विकास खात्यांने स्पेशल प्लॅनिग ॲथोरिटी म्हणुन प्लॅन इंडियाला मान्यता मिळाली की, त्यांच्याकडे ते बंदर वर्ग करतील आणि जेव्हा हे बंदर वर्ग करतील तेव्हा जवळ जवळ ५० हजार लोक त्या किनाऱ्याला लागुन मच्छिमार करित आहेत. लगेच तुमचे त्या ठिकाणी पोलिस आणि सिक्युरिटी येणार मी सांगतो नंदीग्रामला काहीच झाले. नाही. नंदी ग्रामला थोडीच लोक मेली कारण ते एकाच ठिकाणी शेती करत होते. त्यांची एकाठिकाणची शेती बाधित झाली. आणि तेवढ्यातच परिसरातील लोक मेली. परंतु, इथे मनोरी, ते चौक पासुन हा समुद्र किनारा बाधित होणार आहे. आणि जवळ जवळ ५० हजार लोक आम्ही त्या विरोधात उतरणार आहोत. अशा वेळेला जो प्रकार घडेल. तो नंदीग्रामला घडलेल्या घटनेपेक्षा भयंकर असेल आज ह्या एस.ई.झेड ने आम्ही आता पर्यंत जे गुण्यागोविंदाने राहत होते. धंदेकरत होतो शेती करत होतो आम्ही कुठल्या बाहेरुन मुलुखावरु आलेला नाहीत. आम्ही इथे जे कामाविले आम्ही इथेच राहिलो आमच्या मुलांची लग्ने केली. शेती केली घरे बांधली जे काही आम्ही इथे कमाविले ते आम्ही इथेच खर्च केले. कुठल्या दुसऱ्या मुलखाला नेवुन त्याचे दुसरे काही केले नाही. आम्हाला आज सरकार सांगतो की, हे सगळे आमचे आहे. या जमिनी आमच्या आहेत. ही बंदरे आमची आहेत. खाजगी आहेत त्याला ही आम्ही नोटीसा काढुन आमच्या ताब्यात घेवु. आणि हा जो एस.ई.झेड होतोय ह्यात फक्त करमणुक नाही तर हा मन्टिप्रोटक्स एस.ई.झेड आहे. अशा प्रकारची कागदपत्रे आहेत. प्रत्येक वेळेला आम्हाला ह्या डायसवरुन चुकीची माहिती दिलेली आहे. आणि ह्या कायद्याने ना आमचे जेव्हा ही लोक बंदरावरती पोलीस सिक्युरिटी आणतील त्यावेळेला जेव्हा आम्ही विरोध करु. त्यावेळेला प्रथम आमच्यावर लाठीचार्ज करतील त्याच्यानंतर अश्रुघुर सोडतील त्याच्यानंतर सरळ फायरिंग करतील यात आमची काय चुक आहे? जर मालमत्ता स्वातंत्र आणि आमचे जे मुलभुत हक्क आहेत. आमचे मालमत्ता स्वांतत्र्य आम्ही ह्याची मागणी करणार आणि ह्या सर्वाच्या संरक्षणासाठी आम्ही उभे राहणार आणि तुम्ही आम्हांला गोळी मारुन ठार करणार हे सर्व भयंकर आहे जेव्हा जालीयनबाग हत्याकांड झाले. ते आम्ही समजु शकतो. त्यावेळेला ब्रिटीश सरकार होते. त्या परकिय लोकांनी आम्हांला मारले आज आम्ही निवडुन दिलेले सरकारच आम्हाला मारणार असेल तरी शरमनाक गोष्ट आहे आणि आता सध्याची परिस्थिती अशी आहे की, आम्ही सकाळी उठतो ते ही एका भितीने कधी तुमचे पोलीस बंदरावर येतील? कधी आम्हांला नोटीसा काढतील? आमचे कधी काय होईल? या भितीने आम्ही झोपलो तरी आम्हांला तीच स्वप्न पडतात. आमचे काय होणार? आणि एवढा मोठा प्रदेश जर तोडला. नगरपालिकेच्या हद्दीतून ही ८-१० गावे महसूल विभाग तुम्ही तोडला. तुम्ही सन २००४ साली पर्यटन क्षेत्र करण्यासाठी एम.एम.आर.डी. ला दिला. या सभागृहाचे आम्ही नगरसेवक होतो. त्यावेळेला तुम्ही एक तरी असा ठराव आणला का? किंवा आम्हांला त्यापासून अवगत केले का? की तुम्हांला आता आम्ही हा भाग तोडतो? उदया आम्हांला तुमची ही नगरपालिका ही नसणार. इथे कमिशनर नेमला जाईल. त्याचे कोर्ट वेगळे असेल. कामगारांचे जे नियम आहेत. ते शिथिल केलेले असतील. आणि जे नियम केलेले असतील आणि आम्हांला जरी आत जायचे झाले तरी आम्हांला पास टिकिटे असतील ऐवढे करतांना या सभागृहांचे सगळे मा. नगरसेवक बसलेले आहेत. ही बॉडी बसलेली आहेत. तुम्हांला काय अधिकार होता की, ह्यांना विचारल्याशिवाय किंवा ह्यांना माहिती दिल्या शिवाय हा प्रदेश तोडायचा आणि एवढे झाल्यानंतर एस.ई.झेड. डिक्लेअर झाला. तुम्हांला त्याबद्दलची पत्रे येतात. त्याबद्दलची पत्रे येतात. त्याबद्दलची माहिती येते. आम्ही तुम्हांला त्या संबंधि विचारतोय.तरी तुम्ही आम्हांला काहीच माहिती देत नाही. आम्ही याचा काय अर्थ समजायचा? आम्ही म्हणजे तुमचे कोणीच नाही का? असे असेल तर नाहीतर व्हायचे तेच आहे की, तुम्ही आमचे कुणीच नाही. असा एक ठराव करा की, ह्यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्यामध्ये असे नमुद करा की, ही लोकं जी विस्थापित होणार आहेत. या एस.ई.झेड मुळे जे परिणाम होणार आहेत. इथे ही परिस्थिती नंदीग्राममध्ये घडलेल्या घटनेपेक्षा भयंकर होणार आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्या सुचना नोंदवून घेतलेल्या आहेत. सन्मा. सदस्यांनी ठराव मांडलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

याच्यांत आपण कुठलेही खोटे बोललो नाही. आपल्याला जी वस्तुस्थिती मिळालेली आहे. तीच आपण मांडलेली आहे. लोकांचा जीवन - मरणाचा विषय आहे. त्यामुळे वेगळे असे काही कारण नाही. या सभागृहाची भावना आपण कळवू या. प्रशासन काय करायचे ते करेल. आपण आपली करुया आणि याच्यात काही चूक आहे असेही नाही. आपण कोणावर आरोप करतो. असेही नाही. ह्यांनी केले तरी ते विश्वासात घेतलेले नाही. आपण तेवढेच घेतो. मला ह्याच्यात चुकीचे असे काही वाटत नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मी त्या ठिकाणी दोन ओळींचा खुलासा करतो. सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब, जे म्हणतात की यांत सगळेच खरे आहे असे नाही.

**रोहिदास पाटील :-**

मी हे बोललो नसतो तर खरे कुठे लपलेय ते माहिती पडले नसते. सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो आपल्याला खरी माहिती देतील.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, यांच्यामध्ये दाखविलेली सर्व भिती खोटी आहे. मी मुद्दामहून एरिया रस्टीकेट समजतो की, राई, मोर्वा, मुर्धा, या भागांतील विकास प्रस्तावाबद्दल मी जास्त बोलणार नाही. पण उत्तन, चौक, डोंगरी, पाली, तारोडी जे आमचे कार्यक्षेत्र आहे. त्या संदर्भात सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब मला बरे वाटले की, त्यांनी सर्व माहिती लिहून आणलेली आहे आणि आता ती माहिती सगळेच्या सगळे वाचून दाखविलेली आहे. खरंच सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब, (काका) कधी कधी स्पोन्टीनीजली बोलतात. उस्फुर्तपणे बोलतात आणि आज त्यांना निळ्या रंगाची फाईल घेवून एवढे विस्तृतपणे बोलावे लागले. इथेच मला शंका आली की, ह्याच्यात काहीतरी काळेबेरे आहेत. मा. महापौर साहेबा, एस.ई.झेड स्पेशल इकॉनोमिक झोन आणि एस.ई.झेड स्पेशल इंटटेन्टंमेंट झोन अशी या व्यवहाराची व्याख्या आहे. मी सुरुवातीपासून ह्या प्रस्तावाचे स्वागत केले, समर्थन केले. ते एका दृष्टीकोनातून की मा. महापौर साहेबा, आमच्या भागामध्ये जो काही असंतुलित विकास झालेला आहे. जी काही वेडी-वाकडी बांधकामे झालेली आहेत. माणंसाना चालण्यासाठी सुद्धा रस्ता नाही. तर उर्वरित जे क्षेत्र आहे. त्या क्षेत्रामध्ये नीट पद्धतीचे नियोजन व्हायला पाहिजे. म्हणून आम्ही सुरुवातीलाच या प्रस्तावाचे स्वागत केले होते. हा प्रश्न आज आलेला नाही. सन २००४ च्या ऑगस्ट महिन्यामध्ये ह्यांचे फस्ट इंनटेन्शन जाहिर करतांना हा विभाग पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विकसित करावा. असा त्यावेळचा मूळ प्रस्ताव होता. आणि त्यामुळे हल्ली सुद्धा त्या विभागामध्ये मोठया प्रमाणात पर्यटनाचा व्यवसाय झालेला आहे. एक बाजूला एस्सेलवर्ड आहे. दुसऱ्या बाजूला वेलंकनी चर्च आहे. तिसऱ्या बाजूला गोराई बीच आहे. चौकचा पॉईंट डेव्हलप होत आहे. एस.ई.झेड ला विरोध आहे. पर्यटन केंद्राला विरोध आहे. पण गोराईमध्ये मोठया प्रमाणामध्ये गेस्ट हाउसेस, रेस्ट हाउसेस, रिकरेशन्स आहेत. भारतामध्ये आणि विशेषतः महाराष्ट्रामध्ये जेव्हा एस.ई.झेड ची संकल्पना आली. नंदीग्रामामध्ये जे झाले, रायगड जिल्हयामध्ये जे झाले. त्या ठिकाणी जे फोर्सीबल लॅन्ड एक्वीझेशन झाले. त्यामुळे हा विषय लोकांना थोडासा कटू वाटू लागला. त्यामुळे लोक सावध झाले. त्यातून भिती निर्माण झाली आणि अशी भिती स्वाभाविक आहे. ती दर्शविण्यांत ही काही चुक नाही. पण उत्तनमध्ये असे दाखविण्यांत आले की, उद्या सकाळी येतील आणि तुम्हांला सगळ्यांना, तुमची बोचकी उचलून तुम्हांला वाडा, मोखाडा, जव्हारला अशा ठिकाणी टाकतील. अशा स्वरुपाचे भयंकर पॅनिक काही मंडळींनी केले. आमचे म्हणणे आहे की, आपण सत्यवादी आहोत. आपण सत्य मर्यादित स्वरुपात मांडले पाहिजे. थोडीसे पॉलिटीक्स त्यामध्ये मसाला म्हणून टाकले तर थोडेसे चालले पाहिजे. पण आजच्या आज उचलून नेतील. गाव खाली......

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांना बोलू दया.

**लिओ कोलासो :-**

मला पहिल्यांदा असे सांगायचे आहे की, एम.एम.आर.डी. चा एस.ई.झेड चा जो प्रस्ताव होता. त्याचे आम्ही समर्थन केलेले आहे आणि एस.ई.झेड चा मोठयात मोठया ॲक्टीव्हीटीज चालू आहेत. सभागृहामध्ये हा विषय उशिरा आला जशी मला याची जाणीव आहे. त्यांनी जे व्यक्त केले तेही बरोबर आहे की एका मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये डेव्हलपमेंट ॲथोरिटी मिरा भाईंदर ला स्वतः असताना त्याच्यामध्ये एम.एम.आर.डी. हे डेव्हलपमेंट ॲथोरिटी सरकारने नेमण्याचे ठरविले. तर ते एक प्रकारे आपल्या हक्कांवरती गदा आणल्याचा प्रकार आहे. त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. पण आम्ही या दृष्टीकोनातून या प्रस्तावाचे स्वागत करित आहोत की, ही जी भीती आहे. ही भिती खरेतर आपण याठिकाणी कॉम्पिंटन्ट ऑथोरिटी म्हणून एम.एम.आर.डी. च्या लोकांना किंवा एम.टी.डी.सी. च्या ठेकेदार अधिकाऱ्यांना या सभेला बोलवायला पाहिजे होते. आणि त्यांचे एकझॅट काय प्रपोजल आहेत, सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील (काका) साहेबांच्या ठरावात आहे. मी तुमचा ठराव चांगल्याप्रकारे ऐकलेला आहे की सरकारचे धोरण त्याच्यामध्ये स्पष्ट नाही तर सुस्पष्ट होणे आवश्यक आहे. म्हणून एकतर एम.टी.डी.सी. च्या अधिकाऱ्यांना एम.एम.आर.डी च्या

अधिकाऱ्यांना या सभागृहामध्ये पाचारण करायला पाहिजे. नसतील तर त्यांच्याकडचे जे डिटेल असतील ते सभागृहाच्या माहितीसाठी सभागृहासमोर सादर करायला पाहिजे. अशी मी या ठिकाणी मागणी करतो. धन्यवाद.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने यामध्ये प्रशासनाकडून खुलासा करतो. महाराष्ट्र शासनाच्या एस.ई.झेड अंतर्गत उत्तन, पाली, चौक, डोगरी, तारोडी या गावांतील जमिनीचा मनोरंजन व पर्यटन विकास क्षेत्र म्हणून विकास करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २० पोटकलम XV अन्वये दि. ३०/१२/२००६ रोजी एम.एम.आर.डी. कडून जाहिर प्रसिद्धी करण्यात आली होती त्याबद्दल मा. महासभा २०/०२/२००७ रोजी लक्षवेधी मांडण्यात आली होती. त्या अनुषंगाने येणाऱ्या पुढच्या मा. महासभेमध्ये दि. १६/०४/२००७ रोजी संबंधित विभागाचे तज्ञ अधिकारी याठिकाणी बोलवून त्यांच्याकडून मा. सभागृहाला या विषयाबाबत माहिती व्हावी म्हणून प्रशासनाकडून दि. ७/४/२००७ रोजी मनपा. जा.क्र. २०००७/०७-०८ अन्वये संबंधित विभागाचे मुख्य मा.श्री. भुषण गगरानी जी यांच्याशी पत्र व्यवहार केला होता. त्यावरुन सन्मा. श्री. गगरानी साहेबांनी सदरचा विषय एम.एम.आर.डी. कडील असल्यामुळे आपण त्यांच्याशी संपर्क करावा असे आपल्याला दि. १३/४/२००७ रोजीचे पत्र लिहिलेले आहे. तद्नंतर याबाबतची नियोजन ॲथोरिटी म्हणून एम.टी.डी.सी. शासना डिक्लेअर केलेले आहे. त्याबाबत सुद्धा प्रशासनाकडून एम.टी.डी.टी. ला विनंती केलेली आहे की, मा. महासभेमध्ये अधिकारी पाठवून सन्मा. सदस्यांना याबाबत मार्गदर्शन करावे. त्या अनुषंगाने एम.टी.डी.सी. कडून आपल्याला पत्र प्राप्त झालेले आहे. थोडक्यात मी आपल्याला त्या पत्रांचा आशय वाचून दाखवितो.

(पत्राचे वाचन केले.)

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

तर त्या अनुषंगाने हा विषय महामंडळांत आपले लोक प्रतिनिधी अधिकारी यांचे एक प्रतिनिधी मंडळ जाउन सविस्तर माहिती घेवून हा विषय चर्चेला घेतल्यास त्यामध्ये निर्णय होउ शकतो.

**जोजफ घोन्सालविस :-**

साहेब ते पत्र कधीचे आहे? त्यांनी हे कधी कळविले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे रिसेन चे दि. १६ मे २००७ चे पत्र आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

हे पत्र दि. १६ मे २००७ आहे. मी तुम्हांला त्यांचे डिसेंबर महिन्याचे पत्र दाखवितो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हा विषय चर्चेला आला. प्रशासन कंटिन्युटी त्या मोशन मध्ये आहे. असे नाही की आम्ही काही केले नाही. आम्हांला याबद्दल अजून पूर्ण माहिती मिळालेलीच नाही. ही वस्तूस्थिती आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

साहेब, मी असे म्हणत नाही की, तुम्हांला याबाबत पूर्ण माहिती आहे मी तुम्हांला एम.टी.डी.सी. चे दि. ३१ डिसेंबर रोजी चे पत्र दिलेले आहे. ते पत्र सचिव साहेबांनी वाचून दाखवावे की, एम.टी.डी.सी. कसे खोटे बोलते आणि सभागृहाला कशाप्रकारे फसविते? तेवढे फक्त सांगा. सचिव साहेब, माझी तुम्हांला विनंती आहे की, तुम्ही ते पत्र वाचून दाखवा.

**मा. उपमहापौर सो. :-**

मा. महापौर मॅडम, एस.ईझेड बद्दल केंद्रीय, वाणिज्य, सचिव आणि या समितीचे अध्यक्ष श्री. जी.के.पिल्ले साहेब आणि नवी मुंबईचा एस.ई.झेड हाताळतांना असा करार केला होता की ५ गांव बांधित होतात. पाणी योजना बाधित होते आणि जो मुख्य नॅशनल हायवे आहे. त्यांचेही ऑब्जेक्शन होते तर नवी मुंबई मधील एस.ईझेड जवळ जवळ तो रद्द करण्यांत आला. तर मी सभागृहाला अशाप्रकारे सांगू इच्छितो की आपल्याकडे सविस्तर माहिती येवू दे. आपल्या शहरामध्ये त्यांना नेमके काय अपेक्षित आहे? आणि आपल्याला त्या विरोधात काय सांगता येईल? हे एस.ई.झेड लागावा यासाठी काही लोक त्यांच्या बाजूने असतील काही लोक हा एस.ई.झेड लागू नये याच्या विरोधात असतील. जेव्हा महाराष्ट्र सरकारने भुमिका घेतली की, दि. १/१/१९९५ च्या आधीची जी घरे आहेत, त्या झोपडया अधिकृत आहेत, ज्यांच्या प्रायव्हेट जागा आहेत त्यांना अधिकृत मानणार नाहीत, त्यांच्या इमारती अनधिकृतच राहतील. पण दि. १/१/१९९५ च्या आधीपासून सरकारी जागेवर राहतात. त्यांनादेखील अधिकृत मानतात ज्या उत्तन किनारपट्टया परिसरात १७ व्या शतका पासुन लोक राहतात. त्यांना सहजा सहजी कोणी उचलुन नेणार नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सन १८९४ चा कायदा हा भु - संपादन कायदा म्हणुन ती लोक वापरतात. आणि त्या भु - संपादन कायद्या मध्ये डिसपोझल ऑफ लॅन्ड करतात. आणि जे मालकीचे आहे. त्याला ५ (अ) मधुन नोटीसा देतात. तुम्हांला सगळ्यांना माहिती आहे. म्हणुन कृपा करुन या सभागृहाची दिशाभुल करु नका. तुम्हालां पाहिजे असेल वैयक्तिक मत असेल तर तुम्ही तसे वैयक्तिक मत मांडा याच डायसवरुन साहेबांनी एम.टी.डी. सी चे

पत्र वाचुन दाखविले सचिव साहेबांनी ते पत्र सभागृहाला वाचुन दाखववे. त्यावरुन समजेल की, एम.टी.डी.सी कशा प्रकारे गोलमोल करते. तुम्ही तर आम्हांला आता नसणार त्याबाबत प्रश्न नाही. निदान आम्ही तुमच्याकडे सहानुभुती म्हणुन मागतो आता तुम्ही आमचे काय करणार आहात? आम्हांला मिरा भाईंदर महानगरपालिकाच नसणार असणार का?

**मा. उपमहापौर :-**

तुम्हालां एकट्यांनाच याची कणव आहे. असे वाटते का? तुम्ही असा गैरसमज ठेवु नका. तुम्हालां कदाचित माहित नसेल की, याबाबत श्री. नितीन मिस्त्री नावाचा एस्सेलवर्ल्डचा अधिकारी माझ्याकडे आला होता. त्यांने मला सांगितले की, याबाबत शासनाची भुमिका वेगळी आहे याबाबत आपली आणखी वेगळी धोरणे अशी आहेत. आणि याच्यामध्ये फक्त सरकारी जागा ताब्यांत घेणार आहे. मी त्यावेळेस त्याला सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंट कडुन या महापालिकेला असे पत्र आले आणि त्याच्यात स्पष्ट लिहीले आहे. ही ५ गावे जातात. याच्यांत एवढा भाग वगळला जातो. ऐवढा पकडला जातो. असे काही तरी स्पेसिफीक येईल. त्यावेळेला आम्हाला त्याच्यावर काही तरी चर्चा करता येईल. आता आम्हांला याच्याबाबतीत काहीच माहिती नाही. आम्हाला फक्त ऐवढे माहिती आहे की, आमच्या या मिरा भाईंदर शहराची ५ गावे, आणि मुंबईची दोन गावे मनोरी आणि गोराई अशा सात गावांचा त्यामध्ये समावेश केलेला आहे. मी आधी सांगितले की, स्पेशन इंटटेंन्मेंट झोन एस.ई.झेड की स्पेशल इकॉनोमिक झोन कारण याच्यामध्ये वेगवेगळे समुह आहेत. टाटाच्या समुहाने उत्तर प्रदेशामध्ये गुंतवणुक केलेली आहे. रिलायन्सच्या समुहाने काही ठिकाणी गुंतवणुक केलेली आहे काही ठिकाणी यांना पिटाळुन लावलेले आहे. अशा अनेक स्वतंत्र कंपन्यांची हे एस.ई.झेड विकसीत करायला घेतलेले आहे. कंपन्यांनी याबद्दल अजुन पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या विधीकडुन किंवा एम.एम.आर.डी कडुन आपल्याला कुठल्याही प्रकारचे निर्देश नाहीत. आपल्याला फक्त एम.एम.आर.डी चे एक पत्र प्राप्त झालेले आहे. या व्यक्तिरीक्त आपल्याकडे काहीच माहिती नाही. मागच्या सभेमध्ये ती लक्षवेधी केली होती. त्यावेळेला देखील मी निवेदन करतांना सांगितले होते की, आपल्या या परिसराच्या लोकांवर अन्याय होत असेल त्यांच्यावर जाबती होत असेल. तर या सदनातील प्रत्येक सदस्य त्यांच्याबरोबर पुर्ण ताकदीनीशी राहणार आहे. आपण जोरात बोललात किंवा जास्त बोललात तर इथे आपण काहीही केले असे होत नाही. आज आपली अशी परिस्थिती आहे की, इथे आपण स्पेसिफिक काही ठरवले असे होउ शकत नाही. सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब, आपण हा विषय फक्त चर्चेसाठी आणलेला आहे. आपण चर्चेची मागणी ही केली होती. परंतु, आपल्याकडे काही प्रश्नावली आलेली नाही किंवा आपल्याकडे कुठल्याही प्रकारचा जवाब मागितलेला नाही. तर आपण काहीतरी ठराव करुन पाठविणे योग्य नाही. जर याच्या व्यतिरिक्त अतिरिक्त काही माहिती असेल ती माहिती मिळे पर्यंत आपण याठरावावर काही वाच्यता केली. आणि आपला एखादा शब्द उलट - सुलट मागे पुढे झाला. तर आपण उगीच कळ काढल्या सारखे होईल. म्हणुन आपल्याला विनंती आहे की, वाटल्यास आपल्या अधिकाऱ्यांना त्यांचा कुठला अधिकारी दोन दिवसांत आपल्याकडे बोलवता आला. या स्थायी समितीच्या दालनांत सर्व गटनेते किंवा ज्यांची ज्यांची इच्छा आहे. त्यांना बोलावुन चर्चा केली तर अधिक सोपे राहिल यापेक्षा आपण असाच काहीतरी ठराव करायचा आणि त्यात आपले एखादे अक्षर पुढे मागे झाले आणि जर आपल्यामुळे एखादा काळ ओढवला तर अननेसेसटीला आपण त्या गोष्टीला जबाबदार राहु. ठरावामध्ये परत काही चेंजेन्स करायचे असतील तर सोप्या भाषेमध्ये करा किंवा ठराव करु नका याविषयी आपल्याकडे माहिती उपलब्ध होउ शकेल किंवा जर कोणी आधिकारी येउ शकत नसेल तर आपल्या अधिकाऱ्यांनी म्हणजे श्री. दिलीप घेवारे साहेबांनी त्यांच्याकडे आपल्या काही. सदस्यांना घेवुन जाण्याची व्यवस्था करा. पण आपण कुठेतरी एका निश्चित चर्चेवर राहुन मग संपुर्ण शहराला कशी मदत येईल. नाहीतर मग उगीच आपण काहीतरी करायचे आणि त्यातुन करायला गेलो एक झाले अनेक असे प्रकार व्हायला नकोत. म्हणुन हा प्रश्न पुर्ण विचारांती सर्वांनुमते गेलेला आणि जी तज्ञ मंडळी आहेत त्यांच्या सल्यानुसारच गेलेला अधिक चांगला राहील तुमचा आमचा सगळ्यांचाच या बाबतीत निश्चीत ज्ञान तोकडे आहे.

(नगरसचिवांनी एम.टी.डी.सी चे दि. ३१ डिसेबंर २००६ च्या पत्राचे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

एवढे स्वयंस्पष्ट पत्र हे प्रशासनाच्या हातात आहे. मा. उपमहापौर मी सन्मान करतो. की, तुम्ही उपमहापौर आहात. तुम्ही एका पक्षाचे चांगले प्रतिनिधीत्व करत आहात मी या सभागृहात सन्मा. सदस्य श्री. जोजफ घोन्सालवीस यांचे अभिनंदन करतो की, ज्याकडे सभागृह एका दृष्टीने बघते त्यांनी केलेल कष्ट त्यांनी आणलेली माहिती मी अजुन आपुलकीने विचारतो म्हणजे मी आपल्याकडुन अपेक्षा करतोय तुमची कंम्पलसरी ड्युटी आहे की, या महानगरपालिकेच्या हद्दीत जरा जरी कुठे काय झाले? ते चांगले होउ दे वाईट होउ दे त्या सर्वाचे मानकरी तुम्ही आहात त्या सगळ्याला तुम्ही जबाबदार आहात. ही एवढी मोठी घटना होते वेळी सन्मा. सदस्य श्री. जोजफ घोन्सालवीस साहेब ही माहिती गोळा करु शकतात. तर मा. महापौर हे का करु शकत नाही? मा. उपमहापौरांनी हे का करु शकत नाही? मा. आयुक्त साहेब हे का करु शकत नाही? ती केली नसेल तर मी जे देतोय ती तरी सद्विवेक बुध्दीने ऐकावी. सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो (गुरुजी)

यांनी सांगितले की, ब्लु फाईल अंत्यत पारदर्शक आहे ती काळी नाही. त्याच्या फाईल मध्ये लागला म्हणुन तो कलर दिसला मी एक पत्र वातो ते इंग्लीशमध्ये असल्यामुळे कदाचित वाचायला अडचण होईल.

(सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी पत्राचे वाचन केले.) आता इकॉनॉमिक झोन हे स्पष्ट लिहिले आहे. मग इंन्टेटमेंट झोन कुठुन आाल? हे त्याचे सब्जेक्ट आहे. (पत्राचे वाचन केले.) हे एवढे स्प्ष्ट पत्र लिहीले असतांना याबद्दलची आपल्याला आणखी कुठली माहिती पाहिजे? आम्ही जो ठराव दिलेला आहे. त्या ठरावामध्ये सन्मा. सदस्य लिओ कोलासो (गुरुजी) म्हणतात. ह्यामध्ये राजकारणाचा थोडासा मसाला ह्यामध्ये टाकला तर काही हरकत नाही. ते जरासेही टाकण्याचा प्रयत्न केलेला नाही. हा अत्यंत पारदर्शक केलेला आहे की, जो पर्यंत ह्या बद्दल सविस्तर डिटेल येत नाही. तोपर्यंत हा प्रकल्प राबवु नये. जर त्यात कोणाला इंटरेस्ट असेल, प्रशासनाला असेल तर प्रशासनाने ह्या वर्षाभरामध्ये कारण हे पहिले पत्र आहे दि. ४ एप्रिल २००६ चे आहे एक वर्ष पुर्ण झाले. प्रशासनाला माहिती नाही सत्ताधाऱ्यांना माहिती नाही. आम्ही ओरडतो तुम्ही अशी भुमिका घेतली आम्ही  त्याबद्दल चा दोष ही देत नाही. पण अजुन वेळ गेलेली नाही म्हणुन अगदी सहानुभुतीने या सभागृहाचा एकमताचा ठराव द्यावा प्रशासनाला त्याची आवश्यकता आहे किंवा त्या पॅन इडियाला आवश्यकता आहे. ती माहिती त्यांनी आणावी त्यांनी आणल्यानंतर सभागृहाने सभागृहाचे मत हे चांगले आहे. शहराच्या हिताचे आहे. नागरिकांच्या हिताचे आहे. महापालिकेच्या हिताचे आहे. आपण त्याचे स्वागत करणार अन्यथा जे आहे ते स्पष्ट आहे. सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो यांनी सांगितल्या प्रमाणे भिती पसरवली जाते. आम्हाला जे वाटले ते आम्ही लिहीले ते खोटे असेल तर खोटे ठरेल नसेल तर ते ठिक आहे. पण ती माहिती अधिकृत होईल. आमची अपुरी माहिती किंवा सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो (गुरुजी) यांची अपुरी माहिती किंवा मा. उपमहापौर साहेबांची अपुरी माहिती प्रशासन काहीतरी लपवितो असेही होउ नये म्हणुन आम्ही तो ठराव मांडलेला आहे. ठराव एकमताने पारित करावा. अशी मी तुम्हाला विनंती करतो. याच्यात कोणतीही राजकीय भाषा नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, आता माझे मित्र उपमहापौर साहेब, यांनी जे निवेदन केले की, मला पॅन इंडियाचे जे श्री. मिस्त्री आहेत. त्यांनी त्यांना त्याबद्दल माहिती दिली. तर मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगतोय की, ह्या लोकांनी आम्हाला हॉटेलमध्ये ऑफर केली होती की आम्ही विरोध करतोय तर ते माहिती किती खरी देतील? याच्यासाठी मी सभागृहाला सांगितले की, ह्या माणसांनी आम्हाला ऑफर दिली होती.

**रोहित सुवर्णा :-**

ह्याच माणसांने राधास्वामी संत्संग समितीच्या रॉयल्टीच्या प्रकरणामध्ये माझ्याशी संपर्क केला होता ह्याच माणसाने आता ज्या  माणसाचे नाव त्यांनी घेतले शासनाचे रेव्हीन्यु डुबतोय तर राधास्वामी संत्संग समितीचे ७ कोटी १८ लाख रुपयांची जागा रॉयल्टीची पेंनल्टी लागली तर ह्याच लोकांनी माझ्याशी संपर्क केला होता की, तुम्ही सेंटीग करण्यासाठी आमच्याबरोबर कुठल्यातरी फाईव्ह स्टार हॉटेल मध्ये बसा. आणि मी मान्य केले नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानंगीने बोलतोय, माझ्याकडे एक पत्र आहे. श्री.भुषण गंगरानी....

**मा. महापौर :-**

ते पत्र सगळ्यांकडेच आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील (काका) साहेब, आपण एक स्पेशल इकोनॉमिक झोन, अणि स्पेशल इंटटेन्ट झोन असे चालले होते आपण त्याचा उल्लेख करतांना विशेष आर्थिक क्षेत्र असाच केला होता. कारण ह्याच्या पत्रामध्ये ह्याच्यात विशेष आर्थिक क्षेत्र असा उल्लेख आहे आणि याच्यात दुसरे स्पष्ट असे लिहीतात. की, उत्तन हे लघुबंदर स्पेशल परपज, व्होकलला हस्तांतरीत करण्याबाबत योग्यती कार्यवाही करण्याचे निर्देश प्रधान सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मेरी टाईम बोर्ड यांना देण्यात आले. या प्रकल्पातील काही भाग सी.आर.झेड बाधीत असल्यामुळे केंद्र शासनाच्या पर्यावरण, वनमंत्रालय, व वाणिज्य मंत्रायलास शासनातर्फे अचित शिफारशी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. मी तर म्हणतो की काही भाग नाही तर संपूर्ण भाग सी.आर.झेड असणार आणि सी.आर.झेड असताना म्हणजे त्याठिकाणी कुठच्याही प्रकारचा विकास होईल. असे मला वाटत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

पहिल्यांदा याचा खुलासा होवू द्या की, ह्याच्या येण्यामुळे शहराच्या हितामध्ये, गावाच्या हिताचा काय निर्णय होतोय? याबाबतीचा सविस्तर खुलासा होउ द्या. आपण ह्याच्यावर येण्या-जाण्यापेक्षा त्याच्या पुढच्या वर्षी होउ दया. मी काय म्हणतो की याबाबतीतला नेमका ठराव समजून घ्यायचा असेल तर आपल्याला त्याच्या मुळापर्यंत पोहोचावयास पाहिजे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आता इथेच बघा ना, मा. आयुक्त साहेबांनी तुमच्याकडे खोटी माहिती दिली तर पुढच्या वेळी काय खरे बोलतील?

**अनंत पाटील :-**

हे जे आहेत त्यांना सी.आर.झेड चा नियम लागू नाही. एस.ई.झेड ला पूर्ण नियमावली आहे. ती त्यांची स्वतंत्र नियमावली आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, एस.ई.झेड बाबत सन्मा. उपायुक्त साहेबांनी सन्मा. सदस्य श्री. जोजफ घोन्सालवीस तुमच्या भावनेशी संपूर्ण सभागृह सहमत आहे. या स्थानिकांवर कोठेही अन्याय होत असेल या गोष्टीला कोणीही पाठिशी घालणार नाही. मा. महापौर मॅडम, आपणांस अशी विनंती आहे की, प्रशानसाकडून एम.एम.आर.डी. च्या संबंधित खात्याच्या एखादया अधिकाऱ्याला येथे बोलवा आपल्या स्थायी समितीच्या सभागृहामध्ये सर्व गटनेत्यांना आणि सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांना आणि स्पेशल करुन त्या भागाचे जे संबंधित नगरसेवक आहेत. त्या सगळ्यांना त्या बैठकीसाठी अवगत करा. त्यांच्याकडून आधी माहिती प्राप्त करा आणि त्याच्यानंतर मा. उपमहापौर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे एखादा ठराव घाई गडबडीमध्ये करण्यात काही अर्थ नाही. एखादा कानामात्रा जरी चुकला तरी त्याचे फायदे तोटे आपल्यालाच सहन करावे लागतील. तर सन्मा.सदस्य श्री. रोहिदास पाटील (काका) यांच्या मताशी आम्ही सगळेजण सहमत आहोत. तर कृपया प्रशासनामार्फत एम.एम.आर.डी. च्या लोकांना याठिकाणी बोलविण्याचे आपण प्रयत्न करावे.

**जोजफ घोन्सालविस :-**

मी परत परत मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, मॅडम, की ही लोक खरं बोलत नाही. खरं सांगत नाही. त्यांची प्रत्यक्ष कार्यवाही सुरु झाल्याचे तुम्ही बघितले. उदया आम्ही विस्थापित होवू हेही सत्य आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

साहेब, तुम्ही त्या लोकांची वेळ घ्या. आपण संबंधित प्रतिनिधी जाउ.

**जोजफ घोन्सालविस :-**

असे असताना हे अधिकारी पाहिजे. ते अधिकारी पाहिजे. अहो साहेब त्यांना जमिन पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालविस भावना विवश होउन सभागृहात बोलण्यात काही अर्थ नाही.

**जोजफ घोन्सालविस :-**

भावना विचारांत होवूनच निर्णय घ्यावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्त साहेबांच्या पत्राला एम.टी.डी.सी. कडून उत्तर आलेले आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**जेन्वी अल्मेडा :-**

उत्तन विभागामध्ये ६ नगरसेवक आहेत. ६ नगरसेवकांपैकी मला वाटते. सन्मा. सदस्य श्री. जोजफ घोन्सालविस साहेबांना एकटयांनाच त्या गावाची काळजी आहे. तुम्हांलाच काळजी आहे असे नाही. तर सगळ्या नगरसेवकांना त्याबद्दल कळकळ आहे आणि एवढया प्रचार करतात की चार दिवसांत गावे खाली करुन त्यावरुन नांगर फिरवू अशी खोटी आश्वासने देवून लोकांमध्ये भिती निर्माण करतात.

**जोजफ घोन्सालविस :-**

यांनी कुठेतरी बाहेर जमिनी वगैरे विकत घेतल्या असतील म्हणून गावांतल्या लोकांची ह्यांना काळजी नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

काहीतरी खोटी आश्वासने देवून लोकांना भरवायचे.

**जोजफ घोन्सालविस :-**

तरी असेल म्हणूनच तुम्ही असे वागता. नाहीतर आमचे आम्ही मागतो. तुम्हांला त्याबद्दल काहीच वाटत नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

ही लोक जनतेची दिशाभूल करीत आहेत. तुम्ही एक दोन दिवसांमध्ये एम.एम.आर.डी. त्या लोकांना भेटण्याची वेळ घेवून आम्हांला तसे कळवा. आणि एक शिष्ट मंडळ त्याठिकाणी जावू दया.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस साहेब, तुमच्या मनांत जर काही शंका असतील जसे तुम्ही म्हणता की आपल्याकडून तसे काही होण्याची अपेक्षा करु नका. ह्याच्यात ऱ्हर्स्व दिर्घ काय? आपण शासनाला या सभागृहाच्या भावना कळवितो. आपण या सभागृहाच्या काय भावना कळवितो? त्याच्यांत अगदी विचारपूर्वक

लिहिले आहे की, शासनाने या प्रकल्पाची सविस्तर माहिती देवून पुर्नवसनाचे स्पष्ट धोरण जाहिर केल्याशिवाय हा प्रकल्प राबवू नये. असा मी ठराव मांडत आहे ही सभागृहाची भावना आहे.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील (काका) आपण जे वाचलेत. ते बरोबर आहे आम्ही त्याच्याशी सहमत आहोत.

**मा. महापौर सो. :-**

सन्मा. सदस्य आपण ह्या विषयांवर चर्चा करु नका. सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील (काका) साहेब यांनी ठराव मांडलेला आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

पुनर्वसनाचा त्यांच्याकडे असा कुठलाही मास्टर प्लॅन नाही किंवा या कायदयात पुनर्वसन नाहीच आहे. १८९४ च्या कायदयात आहे का ते तुम्ही बघा.

**मा. महापौर सो. :-**

सचिवांनी पुढील विषय घ्यावा.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम तुम्ही पुढचा विषय घ्या. पण सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालविस जे सांगतात. त्याच्यात त्यांना माहिती काढली की त्यात तरतुदी आहेत.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढील विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४१ :-**

शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे **S.E.Z.** बाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. १३ :-**

S.E.Z बाबत याच सभागृहात मी ३ महिन्यापूर्वी वृत्तपत्रात आलेल्या जाहिरातीनुसार सभागृहाचे लक्ष वेधले होते की, महापालिका हद्दीतील ७ व मुंबई महापालिका हद्दीतील २ गावे महाराष्ट्राने सरकारने M.M.R.D कडून M.T.D.C कडे वर्ग केले असून पॅन इंडिया या कंपनीस स्पेशल इकोनॉमिक झोन या स्कीममध्ये विकसित करण्याचे अधिकार देण्याचे जाहिर नोटीस प्रकाशित केली होती व याबाबत सविस्तर माहिती जिल्हाधिकारी कार्यालय व महानगरपालिका कार्यालयात नागरिकांना पहावयास मिळेल असे सुचित केले होते परंतु त्यादिवशी सभागृहात प्रशासनच्या वतीने प्रशासन कोणताही खुलासा करु शकले नाही म्हणून पिठासिन अधिकाऱ्यांना आम्ही याबाबतीत महासभेत विषयपष्त्रिकेवर विषय घ्यावा असा आग्रह धरला त्यानुसार महापौरांनी हा विषय आज सभागृहात आणल्याबाबत मी महापौरांना धन्यवाद देतो.

मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, शासनाच्या वतीने ५७४० हेक्टर जमीन S.E.Z साठी वापरण्याचे ठरविले आहे त्यात ३३०० हेक्टर जमिन सरकारी व २४०० हेक्टर जमिन मालकी म्हणून वापरणार आहेत. शासनाच्या वतीने S.E.Z जाहिर करतेवेळी बोलले जाते की, शासकीय जमिन संपादन करुन विकासकर्ता त्या परिसराचा विकास करणार परंतु आपल्या महापालिका हद्दीतील डोगरी, तारोडी, चौक, पाली, नवीखाडी, उत्तन, भाटेबंदर, राई, मोर्वा, मुर्धा तसेच गोराई या परिसरातल्या जमीन शासकीय जरी म्हटल्या असल्या तरी त्या या प्रकारात मोडतात १) शासकीय जमीन जी सुमारे २०० ते २५० वर्षापासून स्थानिक लोकांच्या ताब्यात आहे त्यात त्यांची स्वतःची घरे आहेत, त्यांची आंबे, काजू, फणसाची विविध झोडे आहेत, ज्यावर त्यांचे कुटुंब अनेक वर्षापासून उपभोग घेत आहेत, बागायत करत आहेत, शेती करत आहेत. परंतु, या जमिनींची सरकारी दफ्तरी सरकारी जमिन म्हणून नोंद आहेत. अनेक जमिनीवर मीठागरे आहेत त्यात अनेक वर्षापासुन मीठाचे उत्पादन होत आहे. त्यावर शिलोत्री म्हणून नोंद आहे त्यांचे कुटूंब अनेक वर्ष उपजिवीकेचे साधन म्हणून व्यवसाय करत आहेत तर अनेक मजुरांच्या रोजगार त्यावर अवलंतुन आहे तसेच हजारे मच्छीमार समुद्रकिनारी मच्छीमारी करतात. त्यांच्यावर व्यवसाय म्हणून त्यांचे उत्पन्न घेत आहेत. हजारो मजूर मच्छीमारीमध्ये काम करतात तेही बेकार होतील. मच्छीमार, शेतीवाले, बागायतवाले व मीठागर वाले अशा अनेक लोकांचे करोडो रूपयांचे नुकसान होउन संपुर्ण उपजीवीकेचे साधनच निघुन जाईल. शासनातर्फे किंवा पॅन इंडिया तर्फे असे कोणतेही स्पष्ट निवेदन झाले नाही असे समजते की विकास कर्ता आपली सिक्युरिटी ठेवून त्यासर्व विभागाचा विकास करणार ज्यावेळी स्थानिकांना कोणताही व्यवसाय करता येणार नाही, उद्योग करता येणार नाही किंवा जाणे - येण्यासाठी ओळखपत्र घेउन प्रवेश करावा लागेल व महापालिकेत कोणताही अधिकार राहणार नाही.

हा निर्णय घेतेवेळी प्रशासनाने महापालिकेनेही स्वाहिक्त संस्था असताना महापालिकेने कोणतेही मत विचारात घेतले नाही. वास्तविकता शासनाच्या वतीने M.M.R.D.A. च्या वतीने M.I.D.C. च्या वतीने जन जागृती म्हणून या प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती देणे कर्तव्य होते. ही वस्तुस्थिती आहे. आज S.E.Z बाबत देशाच्या कानाकोपऱ्यांतुन शेतकऱ्यांचा, जमिनदारांचा असंतोष प्रकट होउन नरसंहार होत आहे हे आपण टिव्हीवर पहात आहोत पेपरमध्ये वाचत आहोत, आपल्या महापालिका क्षेत्रात अशी परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून ही सभा असा ठराव पारीत करत आहे की, शासनाने या प्रकल्पाची सविस्तर माहिती देउन पुर्नवसनाचे स्पष्ट धोरण जाहिर केल्याशिवाय हा प्रकल्प रावबू नये असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील.          अनुमोदक :- श्री. जोजफ घोन्सालविस.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ४२ चे वाचन केले.)

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ४२ मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाने सभा दि. ३०/४/२००७ रोजी त्यांच्या तहकूब सभेमध्ये म्हणजे दि. २३/५/२००७ रोजी, १५ शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत एक ठराव देखील केलेला आहे. सन्मा. सदस्य श्री. शशिकांत शहा साहेब हे त्या ठरावाचे सुचक आहेत आणि सन्मा. सदस्य श्री. अजय शेठ यांनी त्या ठरावास अनुमोदन दिलेले आहे. याठिकाणी त्यांनी हा ठराव पाठविलेला आहे. त्यामध्ये शिक्षकांची संख्या १५ आहे. त्याठिकाणी १६ शिक्षक असे पाहिजे होते. चुकून त्याठिकाणी १६ ऐवजी १५ झाले आहे तर याठिकाणी शिक्षण अधिकारी साहेब उपस्थित आहेत. आपण त्यांचे या विषयावर ओपिनियन मागवावे आणि हा ठराव मंजूर करावा अशी माझी विनंती आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते पण ह्यामध्ये शिक्षकांची नावेच कुठे दिलेली आहेत? कुठल्या शिक्षिका आहेत?

**एसृ ए. खान :-**

साहेब यामध्ये गोषवारा नाही, कोणत्या शिक्षिका आहेत. त्यांची लिस्ट नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम्, गोषवारा नसलेल्या विषयांवर आपण १ तास चर्चा केली. सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान साहेब उर्दू मिडीयमच्या शाळेला ८ शिक्षकांची गरज आहे आणि हिंदी मिडीयमच्या शाळेला ७ शिक्षकांची गरज आहे.

**एस. ए. खान :-**

ते बरोबर आहे. पण कुठल्या शिक्षिका आहेत. त्यांच्या नावाची लिस्ट दया.

**रोहित सुवर्णा :-**

नावांची लिस्ट देणारा मी कोण आहे? नावे देणारा मी नाही. तुम्ही करार पद्धतीने घ्या. शिक्षण अधिकारी याठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना तुम्ही विचारा.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, शिक्षण खात्याकडून मा. महासभेमध्ये प्रस्ताव येताना शिक्षण खात्याकडे त्याबद्दल काहीच माहिती नाही का?

**रोहित सुवर्णा :-**

सभागृह नेते याठिकाणी आलेले आहेत. मा. महापौर मॅडम, या विषयाचा गोषवारा आला नाही म्हणून हा विषय प्रलंबित ठेवू नका. १५ जून रोजी शाळा सुरु होणार आहेत.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, माहिती नही होगी। तो अगले मिटींग मे ये विषय लिजीए। अधिकारीयोंको भी मालूम नहीं।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, अच्छा विषय है। इसका गोषवारा भी नही है।

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या बाजूला जे कोणी नवीन अधिकारी आले असतील त्यांनी प्रथमतः आपली ओळख करुन दयावी.

**एन. के. सोनार (शिक्षण अधिकारी ) :-**

सन्मा. व्यासपिठ तसेच सन्मा. सर्व नगरसेवक मी २ एप्रिल २००७ रोजी मिरा भाईंदर शिक्षण मंडळ याठिकाणी प्रशासन अधिकारी म्हणून हजर झालेलो आहे. माझे नाव एन. के. सोनार मी ठराव पाठविलेला आहे.

**नगरसचिव :-**

अजेंडा दिलेला आहे. त्याच्यात शिक्षण मंडळाचे पत्र, अजेंडा अगोदरच निघालेला होता. आपला अजेंडा गेल्यावर ठराव आलेला आहे. इथे मी शिक्षण मंडळाचे पत्र निरंक लिहिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

लिहिले नाही?

**नगरसचिव :-**

त्यावेळेला आलेला नव्हता. आपल्याकडे निरंक लिहिलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

या शिक्षण खात्याचा कारभार असा चाललेला आहे की, सदस्य बोंबाबोंब करतात. नविन शिक्षण अधिकारी आला की, त्याला बोंबटया मारतात. त्याला पळवतात. दुसरा आला की, त्याच्यामागे लागतात आणि त्यालाही पळवतात. श्री. संन्याशिव गेले. मधे श्री. सुर्यवंशी गेले आणि आता चंद्रवंशी आहेत. परवा शाळा सुरु होणार आणि तुमची शिक्षण समिती काँग्रेसच्या दोन सदस्यांनी ठराव करुन पाठविलेला आहे आणि शाळेला शिक्षक पाहिजे आहेत. एवढा मोठा महत्त्वाचा विषय असतांना तुम्ही म्हणता की, हा विषय पुढे घ्या. मग पुढच्या वर्षीच घ्या. नाहीतर शाळा बंद करा. तुम्हांला शाळेची काही काळजी नाही. तुम्हांला एस.ई.झेड ची काळजी नाही. तुम्हांला कोणाचीच गरज नाही. जो येईल तो विषय पुढे घ्या, पुढे न्या. शिक्षण खात्यामध्ये तुम्हांला शिक्षकांची नावे कशाला पाहिजे? करार पद्धतीने घ्यायची आहेत. म्हणजे अजून शिक्षक निश्चित करायचे आहेत ती तुम्ही आणा. तुमच्या कोणी शिक्षिका असतील त्यांना घेवून या. त्यांना शिक्षण सेवक म्हणून रु. ३०००/- पगार देवू असे टिपण्णी त्यांनी म्हटलेले आहे. तुमचेच नगरसेवक आहेत. तुमच्याच नगरसेवकांनी शिक्षण मंडळामध्ये ठराव केला. आणि त्याचीच अंमलबजावणी करायला आता मा. महासभेमध्ये आणलेला आहे. त्याविषयाचे गांभीर्य कळायला नको. हा विषय अति महत्त्वाचा आहे. इमरजन्सी आहे की, परवा शाळा सुरु होणार आहे. आणि त्या शाळांमध्ये १६ शिक्षक नसणार आहेत त्या शाळेमध्ये तुम्ही शिकवायला जाणार आहात का? तिकडे जाणार आहात का? इकडे शिकविता ते खूप झाले हा विषय ताबडतोब मंजूर करुन घ्या.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, हा खुप महत्त्वाचा विषय आहे आपल्याला २९ शिक्षकांची गरज होती. आणि आपण शासनाकडे प्रस्ताव पाठवलेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

ह्या विषयासाठी शिक्षण मंडळाचे सभापती इथे हजर झाले असते. उपसभापती जरी हा ठराव घेवून हजर झाले असते. सचिवांचे असे म्हणणे आहे की, माझ्या अजेंडयामध्ये शिक्षण विभागाची पत्र निरंक असे आल्यानंतर माझ्याकडे जर ठराव आला असेल तर तो मी देवू शकत नाही. शिक्षकांची आवश्यकता सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, आपल्याला काल लागलेली नाही. यावर्षी नाही लागली आपल्याकडे आपण शाळा ताब्यात घेतल्या त्यावेळेस २१० शिक्षक होते. रिटायर्ड होत-होत. आतापर्यंत शिक्षकांची संख्या १९०-१८६ वर आलेली आहे. इतर शाळेतून आलेल्या शिक्षकांना आपण आपल्या सेवेत सामावून घेतलेले आहे. श्री. सुर्यवंशी साहेब, होते. तेव्हापासून हा प्रघात पडलेला आहे. त्यांनी सामावून घेतलेले आहे. त्यांची फक्त नियुक्ती करायची आहे. शिक्षिका हजर झालेल्या आहेत. असाच प्रकार असावा. आणि असे नसेल. तर शिक्षण मंडळ स्वायत्त आहे. त्यांनी त्यांच्या मंडळामध्ये तशा शिक्षिका घाव्यात. आणि मा. महासभेपुढे कार्योत्तर मंजूरीसाठी करार पद्धतीचा ठराव पाठवून दयावा. याबद्दल फार काळजी करायचे कारण नाही. त्याच्यामध्ये मार्ग निघू शकतात.

**प्रफुल्ल पाटील :-**

करार पद्धतीने त्यांना कुठे अधिकार आहे? मा. महासभेच्या परवानगी शिवाय ते काही करु शकतात का?

**मा. उपमहापौर :-**

पाटील साहेब, तुम्हांला सांगतो की सन १९९४ साली शाळा ताब्यात घेतल्या त्यावेळेला २१० शिक्षिका पदांवर होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

ते आता रिटायर्ड झाले.

**मा. उपमहापौर :-**

रिटायर्ड झाले. आता १८६ शिक्षक होते पण १८६ मध्ये आपण कितीतरी शिक्षक बाहेरून घेतलेले आहेत.

(सभागृहात गोधंळ)

**मा. उपमहापौर :-**

आपल्याकडे बाहेरून शिक्षक आले आहेत की, नाही?

**प्रफुल्ल पाटील :-**

नको असतील तर आम्ही कशाला उठाठेव करु.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, विषयाची माहिती घेतल्याशिवाय आपण कसे विषय आणता?

**एस. के. सोनार (मा. शिक्षण अधिकारी) :-**

विषयाची माहिती घेतलेली आहे.

**मा. उपमहापौर :-**

मग विषयाबरोबर विषयाची माहिती का नाही? तुमचे कित्येक ठराव असे आले आहेत की, ज्यांचा काही पायपोस नाही म्हणून आम्ही पहिल्यांदाच सभेमध्ये सांगितले होते की, स्वहितामध्ये विषय आलेले आहेत. आम्ही तेव्हाच सांगितलेल होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुमच्या स्वतःच्या शाळा आहेत का? तुम्ही शिक्षक घेणार म्हणून असे.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही तसा खुलासाही केला होता. आपल्याबरोबर या विषयावर ॲग्यूमेंट करायची काही कारण नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर सो. :-**

मा. उपमहापौर साहेब आणि सन्मा. सदस्य आपण उगाच सभागृहामध्ये गैरसमज पसरविता आहात. गेल्या मा. महासभेत आपण तेच सांगितले. आताही तेच सांगता. प्रशासनाने दिलेला विषय हे विषय पटलावर घेण्यांत आलेला आहे. फक्त प्रशासनाने गोषवारा दिलेला नाही. त्यांच्याकडे आपले लेखी पत्रसुद्धा गेलेले आहे. आणि शिक्षण मंडळाचा ठराव याठिकाणी आलेला आहे. त्यांनी १६ शिक्षक आपल्या कमिटीवर सांगितलेले आहेत आणि मा. महासभेपुढे हा विषय ठेवलेला आहे. मा. महासभेमध्ये आलेले सर्व विषय चांगले आहेत, धोरणात्मक आहेत आणि सरतेशेवटी जर आपण सगळे विषय एकमताने मंजूर केले तर खरचं जनतेमध्ये चांगल्या प्रकारचा मॅसेज जाईल. परंतु, आपण प्रत्येक विषयाला विरोध करत आहात.

**मा. उपमहापौर :-**

मा. शिक्षण अधिकारी साहेब, आतापर्यंत जे शिक्षक होते आणि त्याच्यात नविन आलेल्या किती शिक्षकांची नावे आहेत? अशा शिक्षकांची यादी दया.

**जेन्वी अल्मेडा :-**

हे १५ शिक्षक ऑलरेडी आहेत की ठेका पद्धतीने घ्यायची आहेत?

**प्रफुल्ल पाटील :-**

मॅडम, अगोदर आम्ही मागणी केली आहे की, हे १६ शिक्षक पाहिजे आहेत की नाही?

**जेन्वी अल्मेडा :-**

त्यांची नियुक्ती झालेली नाही. त्यांना घ्यायचे आहे. शाळा सुरु होण्यापूर्वी आपण घ्यायला पाहिजे.

**एस. के. सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

सन्मा. सभागृह आपल्याकडे २०२ शिक्षक मंजूर आहेत. आणि आता १९७ शिक्षक काम करीत आहे. ५ पदे आहेत जी जिल्हा परिषदेकडून दि. १४ तारखेला आपल्याकडे हजर होण्यासाठी येत आहेत शासनाच्या निकषाप्रमाणे २२८ पदांची खरोखर आपल्याला आवश्यकता आहेत आणि जी २६ पदे राहिलेली आहेत. त्यांच्या मंजूरीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. परंतु, शासनाकडून २६ पदांना अदयापपर्यंत मंजूरी मिळालेली नाही. त्यामुळे उर्दू,हिंदी आणि मराठी माध्यमांच्या शाळांना शिक्षकांची अत्यंत गरज आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरुपाची उपाययोजना म्हणून १५ शिक्षकांची महापालिकेमार्फत करार पद्धतीने नेमणूक करण्याबाबतचा ठराव पारित केलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

शिक्षण समितीने केलेल्या ठरावाचे आम्ही याठिकाणी समर्थन करायलाच पाहिजे आणि मा. महापौर मॅडमने, अर्जेन्सी लक्षात घेउन विषय घेतलेला आहे. आपल्याला हे समजायला पाहिजे की, या शाळा सुरु होणार आहेत. आपल्याला १६ शिक्षक कमी पडणार आहेत. अजूनपर्यंत शिक्षकांची नियुक्ती झालेली नाही. शिक्षकांची डायरेक्ट नियुक्ती करण्याचे अधिकारही शिक्षण अधिकाऱ्यांना दिलेले नाही. असे असतांनाही मा. महापौर मॅडमनी हा विषय मंजूरीसाठी मा. महासभेपुढे ठेवलेला आहे.

**एस. के. सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

सन्मा. सभागृह समजा शिक्षकांना शासनाच्या नियमानुसार रु. ३००/- मानधनावार नेमणूक करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत. आपल्याला फक्त रु. ३०००/- द्यायचे आहेत आणि ३ वर्षानंतर समजा यदा कदाचित आपली २६ पदे मंजूर झाली नाहीत. तोपर्यंत आपल्याला खर्च भागवायचा आहे. त्यानंतर २६ पदे मंजूर झाल्यानंतर आता जसे तुम्ही सदरचा खर्च शासनाच्या अनुदानात फिफ्टी-फिफ्टीमध्ये तो प्राप्त होणार आहे.

(सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ४२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**नयना म्हात्रे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

या ठिकाणी दुसरी महत्त्वाची अशी गोष्ट आहे की, आता शिक्षण मंडळाने शिक्षक पाहिजे असा ठराव पाठविला. तरीसुद्धा आपल्या सभागृहाला जाग येत नाही की, १५ जून पासून शाळा सुरु होणार आहे आणि आपल्या शाळेत शिक्षक नाहीत. आता गणवेशाबाबतच जर बोलायचे झाले तर मग पदाधिकारी काय करतात?

त्या मुलांना गणवेश नाही, पाटी नाही, दप्तर नाही, पुस्तक नाही, ते काय तुमच्याकडे मागायला येणार आहेत का? प्रत्येक वर्षी ह्या विषयाला असेच आहे. जूलै, ऑगस्ट, सप्टेंबर, डिसेंबर येतो. मार्च मध्ये आम्ही शालेय साहित्य वाटतो. मी तर म्हणतो की, पदाधिकाऱ्यांना लाज वाटायला पाहिजे की त्या लोकांना मुलांची अजिबात कदर नाही. कारण, महानगरपालिकेच्या शाळेत जर तुमची मुले शिकत असती तर तुम्हांला ह्या मुलांबद्दल थोडे फार वाटले असते की, आपण लवकरांत लवकर १-२ शिक्षक ठेवू. त्या मुलांना पाटी, दप्तर, रेनकोट, बेंचेस देवू. याप्रमाणे सगळ्या गरजेच्या गोष्टी पुरविल्या असत्या. पण महानगरपालिका दर वर्षी देते. ते सुद्धा तुम्ही देत नाही. खरं म्हणजे याची सुद्धा मंजूरी, या सभेपुढे आणायला पाहिजे होती. जूनमध्ये मुले येणार तेव्हा ती काय नागडी-उघडी येणार का? त्यांना गणवेश नको का दयायला? त्यांना पाठयपुस्तके, वह्या दयायला नको का? अशाप्रकारचे ठराव मागे का राहिले?

**एस. के. सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

मा. सन्मा. सभागृह आपल्या महानगरपालिकेतील प्राथमिक शाळेतील मुलांकरिता आपण गणवेशाची मागणी केली होती. त्याप्रमाणे आपल्याकडे गणवेश प्राप्त होत आहेत. आपल्याला एक लॉट मिळालेला आहे आणखीन दुसरा लॉट आपल्याला दोन-तीन दिवसांमध्ये मिळणार आहेत. म्हणजे आपण आपल्या महापालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विदयार्थ्यांना यावर्षी गणवेशाचे वाटप करणार आहोत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

गणवेशाचे टायसुद्धा बघा.

**मा. उपमहापौर :-**

शिक्षण अधिकारी साहेब, आपण सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांना सांगितले की गणवेश आलेले आहेत. ते अतिशय पोटतिडकीतून बोलले होते. त्यामुळे त्यांनाही बरे वाटले असेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही माझी पोटतिडकी बघू नका. गेल्या पाच वर्षामध्ये किती विदयार्थ्यांना गणवेश दिले? तुम्ही एवढे स्पष्टीकरण करता जसे तुम्ही आयुक्त आहात. मी महानगरपालिका प्रशासनाला विचारतो. तुम्ही किती वेळा गणवेश दिले?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, महानगरपालिकेचया २९ शाळा होत्या. त्या आता वाढवून ३१ शाळा करण्यांत आलेल्या आहेत आणि या शाळांमध्ये विदयार्थ्यांबद्दल बोलतांना आपण शाळा क्र. १६,१७,१८ या शाळांबद्दल बोललात. मी तुमच्या माहितीसाठी सांगतोय, आपण शाळा क्र. १७ क्रमांकाच्या शाळेमध्ये १४४ विदयार्थी आहेत. उत्तनच्या मराठी शाळेमध्ये पहिलीच्या इयत्तेत १३ विदयार्थी, दुसरीच्या इयत्तेत ९ विदयार्थी आणि तिसरीच्या इयत्तेत १० असे एकूण ३२ विदयार्थी आहेत. महापालिकेच्या एकूण ३१ शाळांमध्ये एकूण ९,४९० विदयार्थी आहेत. यावेळेला अभिनव विदया मंदिर सारख्या एका शैक्षणिक संस्थेमध्ये १५,००० पेक्षा जास्त विदयार्थी शिक्षण घेतात. आणि महापालिकेच्या २९+२ ह्या शाळांमध्ये किती विदयार्थी आहेत? तर ९,४९० विदयार्थी आहेत. त्याच्यातले ७०० विदयार्थी दरवर्षी कमी असतात. आणि ही परिस्थिती असतांना ह्या शाळांमध्ये आपण सगळे देत असतो. विदयार्थ्यांकडून फी आकारली जात नाही. त्यांना मोफत वह्या-पुस्तके, ह्यावर्षी त्या विदयार्थ्यांना बूट आणि टाय दयायचे. आपण असाही ठराव घेतला. उर्दू शाळेबद्दल बोलले गेले. उत्तनच्या उर्दू शाळेमध्ये १४८ विदयार्थी आहेत, काशिच्या उर्दू शाळेमध्ये ६९६ विदयार्थी आहेत. आपल्याकडे या दोन उर्दू माध्यमाच्या शाळा आहेत. चार गुजराथी माध्यमाच्या शाळा आहेत. २० मराठी माध्यमाच्या शाळा आहेत. मग एवढया शाळांमध्ये आपल्याकडे ही परिस्थिती होती. यावर्षी आपल्याकडे जवळ जवळ १२ नविन शिक्षक आले आणि अशा परिस्थिती मध्ये गेल्यावर्षी ५ शिक्षकांना सर्व शिक्षा अभियानाच्या कामाअंतर्गत महापालिकेने त्यांना ३ वर्षे बसायला दिले. हा कुठचा न्याय होता? त्यावेळेला वारंवार या सभागृहासमोर आपण ही चर्चा केली होती. आणि इथे शिक्षकांना सर्व शिक्षा अभियानचे अधिकारी म्हणून कारभार बघत होते. त्यावेळेला आपण सांगत होतो की वर्गावर वर्ग शिक्षक नाही. श्री. मिश्रा नावाच्या एका शिक्षकाने दोन वर्षे फक्त तो शाळेच्या पटावर तो जाउन सही करुन यायचा आणि इथे बसून कामकाज करायचा. शिक्षण खात्याबद्दल कोणाला काही गैरसमज असावा असे कारण नाही. परंतु, बऱ्याच नगरसेवकांच्या शाळा आहेत. या शाळा जेव्हा सन १९९४ साली महापालिकेने सगळ्या शाळा ताब्यात घेतल्या. त्यावेळेला या शाळांच्या पटावर १४,७०० विदयार्थी संख्या होती. ती कमी का झाली? एका शाळेतून दुसऱ्या शाळेत दाखला देतांना प्रत्येकाला आपल्या पाल्याच्या भवितव्याची काळजी असते. बऱ्याच लोकांनी आपल्या मुलांना मराठी शाळेतून काढले आणि बाजूच्या हायस्कूल मध्ये ॲडमिशन घेतले. असे सगळ्यांमध्ये झाले. अशा किती शाळा आहेत? परंतु, नियमाप्रमाणे १ किलोमीटरच्या आतमध्ये तुम्हांला दाखला देता येत नाही अशी माझी माहिती आहे पण आपल्या शिक्षकांनी सगळ्या विदयार्थ्यांना दाखलेही दिले. मग त्या जवळच्याच आपल्या लोकांच्या शाळांमध्ये आपल्या मराठी शाळांमध्येच विदयार्थीनी ॲडमिशन घेतले मग ते घोडबंदर शाळेचा असू दे. नवघर शाळेचा असू दे. गोडदेवच्या शाळेचा असू दे, किंवा भाईंदरच्या शाळेचा असू दे. मग या शाळांमध्ये असे सांगितले गेले की, खूप विदयार्थी ॲडमिशन घेतात. यावर्षी विदयार्थ्यांच्या ॲडमिशनचा आकडा किती झाला? ते शिक्षण अधिकारी साहेब आपण सांगावे. आपण हे जाहिरपणे सांगावे की किती नविन विदयार्थ्यांनी ॲडमिशन घेतले?

**प्रफुल्ल पाटील :-**

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट मी या ठिकाणी सांगतो की महानगरपालिका एवढेच मोजून आपण सांगता तुमच्या शाळेच्या विदयार्थ्यांचे रिझल्ट काय आहेत? तेही आम्हांला माहिती आहे. फार जवळून माहिती आहे. कारण आम्ही ही मुले फार जवळून बघितलेली आहे. तुम्ही आता या पाच वर्षामध्ये त्यांना किती सुविधा दिल्या? प्रत्येक वर्षी ह्या विदयार्थ्यांना गणवेश देता की नाही? आणि जर गणवेश दिले ते कधी दिले? याचे सगळे रेकॉर्ड आहेत. मी यासाठी कोणाला वैयक्तिक जबाबदार मानले नाही. मी हा निषेध प्रशासनाला केला की, तुम्ही दरवर्षी जून महिना गेला, जुलै महिना गेला, सप्टेंबर महिना गेला की जागे होता आणि विषय आणता आता जून सुरु होणार आणि गणवेशाचा पाटी, दप्तर, पुस्तकांचा काही पत्ता नाही. ठिक आहे. गणवेश आपण गेल्यावर्षी दिला नाही म्हणून यावर्षी लवकर देवू. अशाप्रकारे आता सातवीपर्यंतचे वर्ग तुम्ही चालवता. आठवीच्या वर्गाची काय तयारी आहे? तुम्ही म्हणता शिक्षणामध्ये तुम्ही इतकी प्रगती केली तर आठवीला तुमचे विदयार्थी कुठे जातात? सहावीला तुमचे विदयार्थी कुठे जातात? खरं म्हणजे महापालिकेच्या शाळांमधून इयत्ता १० वी पर्यंत वर्ग सुरु करावे. आपली एवढी कॅपेसिटी आहे आपण विदयार्थ्यांची एवढी पटसंख्या वाढविली. आणि आजूबाजूच्या खाजगी शाळा बंद झाल्या. तर मग आपण आपल्या महापालिकेच्या शाळा इयत्ता १० वी पर्यंत का चालवत नाही? उलट शिक्षण अधिकाऱ्यांनी याबद्दल प्रस्ताव पाठवायला पाहिजे. तुम्ही भाडे मिळवू शकला नाही. गेली पाच वर्ष बजेटमध्ये साडे पाच कोटीच्या रुपयांच्या प्रत्येक वेळी लिहिता. पाच कोटी रुपये आम्हांला प्रत्येक वेळी भाडे मिळणार आहे. एक तर पदाधिकारी त्याठिकाणी गेला आहे का? तुम्ही भाडे मागितले का? तुम्हांला तीन कोटी रुपये काय? तर १ रुपयांसुद्धा तो देणार नाही अशी तुमची परिस्थिती आहे आणि अशा परिस्थितीमध्ये तुम्ही शाळा चालविता. जर आमच्या शाळा नसत्या तर तुमच्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सगळ्या शाळा बंद पडल्या असत्या हे मी छातीठोकपणे सांगतो. कारण तुमच्या इयत्ता ५ वी नंतर इयत्ता ६ वी मला आम्ही ॲडमिशन देतो. तुमच्या इयत्ता ७ ची नंतर ८ वीला आम्ही ॲडमिशन देतो आणि असे विदयार्थी असतात की जे इयत्ता आठवीला सुद्धा पास होत नाही. शाळेत काय चालते? ते आम्हांला माहिती आहे. आपले स्वतःचे बघायचे आणि नंतर बोलायचे. पण तुर्त मा. महापौरांनी चांगला विषय आणला. त्याबद्दल मी मा. महापौरांचे अभिनंदन करतो.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, ह्यांनी आपल्या महापालिकेच्या शाळांचे जे भाडे थकलेले आहे आणि राज्य शासनाकडून आपल्याला त्या संदर्भात रु. ३ कोटी रुपये येणार आहेत.

**रतन पाटील :-**

साडे पाच कोटी रुपये येणार आहेत.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, जेव्हा हा भाडयाचा प्रश्न आला त्यावेळी आपण ओ.एस.डी. दर्जाचा नाही परंतु एक विशेष अधिकारी या कामासाठी नेमलेला होता आणि त्या अधिकाऱ्यांने अत्यंत प्रामाणिकपणे आणि मेहनतीने त्या कागदपत्रांचा निपटारा करत करत हे प्रकरण मंजूरी स्तरापर्यंत आणलेले होते पण मा. महापौर मॅडम, आपल्याकडे आपण खास विशेष अधिकाऱ्यांकडे हे काम दिलेले होते. आणि त्याने प्रामाणिकपणे आणि पोटतिडकीने ते काम केलेले होते. दुदैवाने त्याची टर्म संपली म्हणून त्या खात्याकडे आपण परत पाठविले. हे चुकीचे झाले. मी त्यावेळेला सांगत होतो की आपले साडे तीन, साडे चार कोटी रुपये येणे असतील तर ह्या अधिकाऱ्याकडून ते काम करुन घ्यायला पाहिजे. ती दुदैवाची गोष्ट आहे. आपण त्या अधिकाऱ्यांची बदलीमध्ये सगळ्यांनी उपेक्षा वृत्ती दाखविली आणि एका चांगल्या अधिकाऱ्याला आपण ह्या कामातून घालविले त्याबद्दल वाईट वाटते.

**रोहिदास पाटील :-**

ठराव मांडला मंजूर झाला आत्ता पुढचा विषय घ्या. चांगला विषय आहे. चांगले झालेले आहे. मा. महापौर मॅडम, पुढचा विषय घ्या.

**मा. महापौर :-**

विषय मंजूर. पुढील विषयाला सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ४२ :-**

करार पध्दतीने शिक्षकांची नियुक्ती करणे बाबत.

**ठराव क्र. १४ :-**

जीवनात शिक्षणाचे संस्कार अंत्यत महत्वाचे आहेत. जर शिक्षणाचा स्तर उंचावला तर विकासाची गती वाढते आणि त्याचबरोबर जीवनाचा स्तर देखिल उंचावतो. ही बाब जाणुनच ८६ वी घटना दुरुस्ती करण्यात आली आणि मार्गदर्शक तत्वाएवजी मुलभुत अधिकाराचे २१ अ हे कलम भारतीय राज्य घटनेत नव्याने समाविष्ठ करण्यात आले. या कलमानुसार, ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षणाचा हक्क हा मुलभुत हक्क म्हणुन घटनेने मान्य केला आहे.

मिरा भाईदर महानगरपालिका परिसरात विकास कामे मोठ्या प्रमाणावर होत असुन विकास कामे वेगाने सुरु आहेत. त्याचप्रमाणे लोकसंख्या सुध्दा वाढत आहे. लोकसंख्या झपाट्याने वाढल्यामुळे सहाजिकच

शाळेतील मुलांची पटसंख्या वाढत असुन जशी मुलांची पटसंख्या वाढते त्याचप्रमाणे वर्गाचे प्रमाण वाढत आहे. परंतु, पटसंख्या वाढल्यामुळे व वर्ग वाढल्याने शिक्षकांची मंजुर पदसंख्या २०२ पेक्षा अधिक झालेली नाही त्यामुळे सध्या २०२ मंजुर शिक्षक पदापेक्षा अधिक शिक्षकांची आवश्यकता आहे. परंतु, शासन मंजुरी पेक्षा अधिक शिक्षक भरता येत नाही. शासनाजवळ दि. ३०/०९/२००६ च्या पटसंख्येच्या प्रमाणात २६ पदे वाढीव शिक्षकांची मागणी केलेली आहे. परंतु, त्यास मंजुरी येईपर्यंत बराच कालावधी लागेल. त्यामुळे सन २००७ - ०८ या शैक्षणिक वर्षात मुलांच्या पटसंख्येत अजुन वाढ अपेक्षित असुन या वाढीव पटसंख्येत उर्दु व हिंदी माध्यमांच्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे कार्यरत शिक्षकांच्या संख्येत उर्दु व हिंदी माध्यमांच्या शाळेत शिक्षक अनुक्रमे ८ व ७ किमान कमी पडणार आहेत. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ मनपा शाळा क्र. १६, १७, १८ व ३० या भाईंदर (प.) च्या शाळेतील शिक्षकांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार तामिळ माध्यमाची शाळ चालु करण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार सन २००७ - ०८ या शैक्षणीक वर्षात तामिळ माध्यमाची शाळा भाईंदर (प.) येथे सुरु करण्याचा मानस असुन एक तामिळ शिक्षक सुध्दा लागणार आहे. (उर्दु = ८, हिंदी = ७ व तामिळ = १ एकुण १६) त्यासाठी सन २००७ - ०८ या शैक्षणीक वर्षात मुलांना शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या नियमानुसार पटसंख्येच्या प्रमाणात वर्गनिहाय एक शिक्षक किमान देण्याचे दृष्टीने व शासनाकडुन पदे मंजुर होउन येईपर्यंत मनपा शाळेतील शैक्षणीक कामकाज सुरळीत सुरु राहण्याचे दृष्टीने महानगरपालिकेने शिक्षण मंडळासाठी किमान १६ शिक्षक करार पध्दतीवर रु. ३०००/- (तीन हजार रुपये मात्र) या शिक्षण सेवकाच्या वेतनावर तात्पुरते करार पध्दतीने नेमणुक करण्यास मंजुरी द्यावी व नेमणुक करण्यात येणाऱ्या शिक्षकासाठी देण्यात येणाऱ्या वेतनाचा खर्च महानगरपालिकेने स्वनिधीतुन करावा असा ठराव मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाने सभा दि. ३०/०४/२००७ रोजी ची तहकूब सभा दि. २३/०५/२००७ रोजी सर्वांनुमते मंजुर करुन पुढील कार्यवाही साठी शिफारस केली आहे. तरी महानगरपालिकेने करार पध्दतीने १६ शिक्षकांची नियुक्तीला येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल का. पाटील.    अनुमोदक :- श्रीम. नयना ग. म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४३ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांना प्रकरण क्र. ४३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वांनुमते मंजूर पुढील विषयांस सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. :- ४३**

भाईंदर पुर्व - पश्चिम जोडणाऱ्या पादचारी पुलाबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर पूर्व प्रशांत हॉटेल ते भाईंदर पश्चिम बालाजी नगरपर्यंत रेल्वेवरुन फुट ओव्हर बांधणे अत्यंत गरजेचे असून सदर फुट ओव्हर ब्रिज बांधणे कामी येणाऱ्या खर्चास व रेल्वे प्रशासनाकडून आवश्यक ती मंजुरी घेवून कामाबाबत पुढील कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील.    अनुमोदक :- श्री. धनराज अग्रवाल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४४ चे वाचन केले.)

**मा. महापौर साो. :-**

विषय ४४ स्थगित ठेवण्यांत येत आहे. पुढील विषयांस सुरुवात करावी.

**प्रकरण ४४ :-**

नागरी संरक्षण समिती गठीत करणे बाबत.

(सदरचा विषय मा. महापौर यांच्या आदेशान्वये स्थगित करण्यात आला.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४५ चे वाचन केले.)

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आता आरोग्य विभागाचे इथे कोणी संबंधित अधिकारी आहेत का? जे सक्षम उत्तर देवू शकतील असे कोणी अधिकारी इकडे आहेत का? नाहीतर आम्ही प्रश्न विचारतो, उत्तर देणारे दुसरे असतात. नंतर कार्यवाही झाली नाही की सांगतात की सक्षम अधिकारी नाही. इथे आरोग्य विभागाचा सक्षम अधिकारी आहे का? त्याने आम्हांला गोषवारा जो दिलेला आहे त्या संदर्भात ते माहिती देतील का? आता किती औषधे आहेत? कुठल्या प्रकारची औषधे आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

त्याबद्दल माहिती दिली जाईल. आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित आहेत?

**प्रफुल्ल पाटील :-**

त्या अधिकाऱ्यांनी आता माहिती दयावी की, कुठल्या प्रकारची औषधे कुठल्या गोदामात किती प्रमाणात आहे? आम्हांला याची माहिती दयावी आणि औषधे नसतील तर डासांची फवारणी चालू आहे का? धुर फवारणी चालू आहे का? गेल्या दोन महिन्यांत एकही माणूसही काम करताना दिसत नाही. कुठलीही फवारणी करत नाही. फक्त हे तोंडावर स्प्रे करुन येतात.

**नगरसचिव :-**

सभागृहाची वेळ संपलेली आहे. हा विषय पुढील सभेत घेण्यात येईल.

**सभा तहकूब झाल्याची वेळ :- सायं ७.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**